म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय काद. वा.
दा. क्र. ५४७५

IRBK-0105415
IRBK-0105415

# सुशीलेचा देव

वामन मल्हार जोशी

पुरस्कार : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
प्रस्तावना : प्रि. कु. सुलभा पाणंदीकर
जीवन-परिचय : प्रा. अ. म. जोशी



बलवन्त प्रकाशन
गिरगांव : मुंबई

क्रमांक : ४४

बलवन्त पुस्तक भाण्डार,
गिरगांव नाका, मुंबई ४

IRBK-0105415

IRBK-0105415

: प्रकाशक :
त्रिं. वि. परचुरे,
बलवन्त पुस्तक भाण्डार,
गिरगांव नाका--मुंबई ४

आवृत्ति पांचवी

किंमत ३ रुपये

: मुद्रक :
कृ. ना. सापळे,
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
मोरबाग रोड, दादर, मुंबई १४

: मुखपृष्ठ :
वि. आ. बुवा,
व्ही. जे. टी. आय्., मुंबई १९

: वेष्टन-छपाई :
सर्वोदय प्रिंटर्स, मुंबई ४

: ब्लॉक मेकिंग :
मे. गुप्ता ब्रदर्स, मुंबई १२

: प्रकाशन-दिन :
२० जुलै, १९५५
(वा. म. जोशी स्मृतिदिन)

# पुरस्कार

कै. वा. म. जोशी यांची महाराष्ट्रांत तत्त्वचिकित्सक व साहित्यिक म्हणून ख्याति आहे. तात्त्विक विचार व ललित साहित्य या दोन्ही बाजूंना सहज पेलून नेणारी सव्यसाची अशी त्यांची भाषाशैली आहे. श्रद्धा व बुद्धिवाद यांचा योग्य समन्वय वामनरावांच्या मध्यें झाला होता; म्हणूनच ते बुद्धिवादाला (Rationalism) विवेकवाद म्हणतात. 'सुशीलेचा देव' या त्यांच्या पुस्तकांत त्यांनीं अशा प्रकारचा शब्दप्रयोग केला आहे. या विवेकवादाचा त्यांनीं कलात्मक आविष्कार आपल्या कादंबऱ्यांमध्यें केला आहे. ते सूक्ष्म बुद्धिवादी म्हणून जरी प्रसिद्धीस आले असले तरी शुद्ध नैतिक तत्त्वांवरील श्रद्धा त्यांच्या मनांत खोल रुजली होती. म्हणूनच त्यांच्या बुद्धिवादानें नैतिक पवित्र्याला बाध येणार नाहीं, अशी खबरदारी घेतली होती. त्याबरोबरच त्यांच्या श्रद्धेनें बौद्धिक सत्याची अवहेलना किंवा उपेक्षाहि कधीं केली नाहीं. त्यांनीं श्रद्धेय असलेल्या धार्मिक व नैतिक प्रमेयांची प्रखर समीक्षा केली, तरी त्या समीक्षेनें अधिकच शुद्ध व अचल अशा तत्त्वांच्याकडे बुद्धि आकर्षिली गेली. धर्मविषयक टीका त्यांनीं लिहिली, अधिक उच्च धर्मरहस्य वश व्हावें म्हणून; नीतिसिद्धान्तांची साधकबाधक चर्चा केली, अधिक पवित्र नैतिक सिद्धान्त हस्तगत व्हावा म्हणून; आणि ध्येयवादांची प्रखर समीक्षा केली, अधिक उन्नत ध्येयसृष्टि दृष्टिपथांत यावी म्हणून. नवा धर्म, नवी नीति, नवें ध्येय व नवें सत्य वर्तमानयुगांतल्या मानवांना प्राप्त व्हावें अशी तळमळ त्यांच्या लेखनांतून व्यक्त होते. या बाबतींत ते अशा निर्णयाला पोंचले होते कीं, माणसानें सतत पुढेंच गेलें पाहिजे. धर्म, नीति, ध्येय व सत्य बदलत राहातें व विकास पावतें. याच त्यांच्या निर्णयांतून ते संशयवादी बनले.

या संशयवादाप्रमाणें, अंतिम सत्याबद्दल संशय कायम राहातो; परंतु तात्पुरते निर्णयहि घेतां येतात; कांहीं बाबतींत अनिर्णय स्थिति प्राप्त होते आणि कांहीं बाबतींत स्पष्टपणें दिसणारें सत्य, उच्च वाटणारा धर्म, युक्त वाटणारी नीति, व मान्य होणारें ध्येय ही तात्पुरती विकासाची अवस्था आहे; असें वामनरावांना म्हणावें लागलें. कशाचाच कायमचा निर्णय करतां येत नाहीं; असा त्यांचा निर्णय होता. या अनिश्चय-वादानें अनिष्ट मनस्थिति

मात्र निर्माण होत नाहीं. ध्येयाची उपेक्षा, स्वार्थपरायणता किंवा मनोदौर्बल्य त्यामुळें येत नाहीं. उलट या संशयवादानें नम्रता व अनाग्रहीपणा वाढूं लागतो; शुद्ध नैतिक विवेक म्हणजे काय, हें जाणण्याची उत्कंठा उत्पन्न होते; व सत्यसंशोधनाची तळमळ लागते. याचें मुख्य कारण, त्यांची बौद्धिक चर्चा शुद्ध हेतूनें प्रेरित झालेली असते, हें होय. त्यांत सात्त्विकपणा पूर्ण भरलेला असतो.

व्यापक मानवी सहानुभूति, हें या सात्त्विकतेचें रूप होय. म्हणूनच देवासंबंधाच्या सर्व साधकबाधक चर्चा व शंका झाल्यावर अखेरीस त्यांच्या प्रतिपादनांत देवाचा शोध लागतोच. तो म्हणजे आजपर्यंत प्रसिद्ध असलेल्या धर्मपंथांचा किंवा वेदान्ताचाहि देव नव्हे; तो देव जुना झाला आहे. त्याचें देवपण निघून तो अडगळींत टाकण्यासारखा झाला आहे. हा नवा देव म्हणजे सत्य. या देवाची त्यांच्या मनोमंदिरांत पूर्ण प्रतिष्ठा झालेली आढळते ! आणि याच देवांत सौंदर्य व साधुत्वहि समावलेलें त्यांच्या श्रद्धेस प्रतीत होतें. हें सत्य मात्र माणसाच्या किंवा ज्ञानाच्या विकासाबरोबर विकास पावणारें आहे, असें त्यांचें मत आहे. या देवाचा कलात्मक आविष्कार करण्याकरितां ‘ सुशीलेचा देव ’ अवतरला आहे.

‘ सुशीलेचा देव ’ या कादंबरींतील मुख्य पात्र ‘ सुशीला ’ होय, हें उघड आहे. कथानकाचा शेवट बळवंतरावांशीं तिचा पुनर्विवाह होऊन झाला आहे. पतिदेव मरतो म्हणून नवा पती करणें जसें वाईट नाहीं; त्याचप्रमाणें, जुने देव, धर्म किंवा ध्येयें निर्जीव होतात म्हणून तींहि बदलणें योग्य होय, असें या योगानें सूचित करावयाचें आहे. सत्य हाच देव आहे, यासंबंधीं ती एका पत्रांत लिहिते. बळवंतरावांशीं तिचा पुनर्विवाह कसा घडून आला, यासंबंधीं हकीगतीचें पत्र ती विलायतेहून पाठविते. त्या पत्रांत विवाहाच्या निर्णयास ते दोघे जेव्हां पोंचले त्या वेळचा संवाद लिहिते. ती त्या संवादांत बळवंतरावांना, भावी पतीला, म्हणते, “ सत्य हाच आपला धर्म आणि तोच देव. सत्याच्या जोडीला सौजन्य व सौंदर्य हे दोन ठेवले पाहिजेत. ते उच्चतम सत्याच्या पोटीं येतातच. सत्य हें जुन्या परमेश्वराप्रमाणें वस्तुतः एकच असून भक्तांना तें त्रिमूर्तिक दिसतें.”

अशा व्यापक व खोल सत्याची व त्यांतलि सौजन्य व सौंदर्य यांची प्राप्ती सहजसाध्य होत नसते. त्याकरितां श्रद्धाजाड्य झाडलें पाहिजे, म्हणजे अज्ञानाची व भ्रमाची तरफदारी करणारी श्रद्धा टाकली पाहिजे; त्याचप्रमाणें, स्वार्थ व इंद्रियसुखांचा अभिलाष यांचें समर्थन करणारा उथळ बुद्धिवादहि बुद्धींत

शिरतां कामा नये. 'सुशीलेचा देव' यामधील गिरिधरराव हे स्पेन्सरच्या बुद्धिवादाचे पुरस्कर्ते; त्यामुळें ते स्वत: कर्तव्यनिष्ठ समाजसुधारक बनले. परंतु त्यांनीं आपल्या चिरंजीवांसहि तेच बुद्धिवादाचे धडे दिले; त्यामुळें चिरंजीव रावबा मात्र अट्टल सुखवादी बनून विषयलंपट झाले. त्यामुळें त्यांच्या कुटुंबाची इभ्रत जाऊन धूळधाण झाली आणि त्यांच्या आयुष्याचें मातेरें झालें. सात्त्विक श्रद्धा व सूक्ष्म बुद्धिवाद यांचा समन्वय झाला तरच सत्याच्या अनंत पथाचें आक्रमण करणारें जीवन निर्माण होतें. अशाच जीवनांत उन्नत ध्येयांचीं नवीं नवीं क्षितीजें क्रमानें प्रकट होत जातात. सात्त्विक श्रद्धा व सूक्ष्म बुद्धिवाद यांच्यांतून उच्च दर्जाचा जीवनसंग्राम निर्माण होतो. अशा जीवनसंग्रामांत ध्येयवादाचा विकास होत जातो. अशा संग्रामाचा व विकासाचा सांधा जुळवून तयार केलेलें कथानक 'सुशीलेचा देव' या कादंबरीचा विषय होय.

सहनशीलता व धैर्य यांच्या योगानें आपत्ति, दारिद्र्य किंवा लोकनिंदा यांना तोंड देत, जीवनसंग्रामांत पराभूत न होतां, पुढें जाणाऱ्या तीन बालमित्रांचें चरित, हा या कादंबरीचा विषय होय. या बालमित्रांतील 'सुशीला' हें मुख्य पात्र होय. 'सुशीला' हें पात्र आधुनिक युगाचें किंवा आधुनिकतेचें समर्पक प्रतीक होय. सनातनी व आधुनिक हे प्रतियोगी शब्द होत. शतकानुशतकें रूढीला पवित्र मानून एकाच प्रकारच्या ध्येयांची किंवा देवाधर्मांची आराधना करीत लोक ज्या कालखंडांत राहतात, तें सनातनी युग होय. नित्य विकासमान होत जाणाऱ्या बुद्धीच्या प्रकाशांत, तारतम्यविचार करून, रूढींत व ध्येयांत बदल करण्याची प्रवृत्ति ज्या कालखंडांत प्रभावी होते, तें आधुनिक युग होय. सनातनी आणि आधुनिक यांतला फरक ही कादंबरी दाखवून देते. परंतु ही कादंबरी आदर्शवादी नसून वस्तुवादी आहे, असें वाङ्मयसमीक्षेच्या दृष्टीनें म्हणतां येतें.

ही कादंबरी वस्तुवादी आहे असें म्हणण्याचें कारण असें कीं, इ. स. १९०५ ते १९३० या कालखंडांत भारतांत, व विशेषत: महाराष्ट्रांत जी सामाजिक व राजकीय चळवळ निर्माण झाली, आणि त्या चळवळींत जें सामाजिक व राजकीय नवविचारांचें आंदोलन सुरू झालें, त्या चळवळीचें व त्या आंदोलनाचें व्यक्ति-चरित्राच्या परिसरांत स्पष्ट दर्शन या कादंबरीच्या द्वारें घडतें. यांत वर्णिलेलीं मुख्य व अंगभूत पात्रेंहि या चळवळींतील व आंदोलनांतील खऱ्याखुऱ्या व्यक्तींचेच नमुने

आहेत. त्यांत अतिशयोक्ति नाहीं. या इतिहासांत ज्या प्रकारच्या वास्तविक घटना घडल्या त्यांच्याशीं हुबेहूब साम्य असलेले प्रसंगच या कथेंत ग्रथित केले आहेत. चळवळीचें दर्शन पक्षपातीपणानें यांत घडविलेलें नाहीं; आणि वैचारिक संवादांचीहि मांडणी एकांगीपणानें केलेली नाहीं. त्यामुळें समतोलपणा व प्रमाणबद्धता आली. अतिशयोक्ति व महत्त्वाच्या अंगांची उपेक्षा त्यांत केलेली नाहीं. स्वतः लेखकच संशयवादी असल्यामुळें, संवाद विनाकारण किंवा सकारण, एकाच बाजूची अधिक तरफदारी करणारे दिसत नाहींत. संवाद कथाप्रसंगांत नीट रीतीनें गोवलेले असल्यामुळें त्यांना कृत्रिमता आली नाहीं. सूक्ष्म बुद्धिवाद व संशयवाद यांचें साहाय्य लेखकास लाभल्यामुळें या कादंबरींत प्रचारवाङ्मयाचा दोष उत्पन्न झाला नाहीं. ऐतिहासिक परिस्थिति ही संकल्पित स्वभावचित्रणास अनुरूप अशी पार्श्वभूमि म्हणूनच पत्करल्यामुळें, रूपकवजा इतिहास असें रुक्ष स्वरूपहि या कथेस प्राप्त झालें नाहीं. वैचारिक परिवर्तनाचें किंवा ध्येयपरिवर्तनाचें कलात्मक दर्शन घडविणारी नमुनेदार कथा, या नात्यानें ही कादंबरी मराठी वाङ्मयांत चिरस्थायी झाली आहे.

देवधर्माकडे पाठ फिरवून बुद्धि व भावना यांना खेंचणाऱ्या ध्येयवादाकडे अभिमुख झालेलें हें युग आहे. या युगप्रवृत्तीचा अर्थ कलेच्या प्रतीकांतून प्रतीत करून देणें हा या कादंबरीचा उद्देश आहे. हा उद्देश कांहीं अंशीं सफल झाला आहे, असें जरी म्हणतां येतें, तरी कलासमीक्षेच्या दृष्टीनें कांहीं शंका या कादंबरीच्या बाबतींत शिल्लक राहातात. एक महत्त्वाची शंका अशी आहे कीं, या कादंबरीच्या मुळाशीं जी खोल जाणीव आहे तिला अनुरूप असें या कादंबरीचें पर्यवसान झालेलें दिसत नाहीं. जुने देव जाऊन नवे देव येतात किंवा जुनीं ध्येयें जाऊन नवीं ध्येयें येतात, अशा प्रकारची जाणीव सकृत्‌दर्शनीं या कादंबरीच्या मुळाशीं आहे; असें जरी म्हणतां येत असलें तरी तेवढ्यानें त्या जाणिवेचें स्वरूप पूर्ण होत नाहीं. त्यांत आणखी अधिक एक महत्त्वाचा भाग आहे. जुने देव हीन, खोटे व नकली ठरून त्या जागीं नवे जे उन्नत देव येतात तेहि कालांतरानें खोटे ठरतात; विचाराच्या कसोटीला शेवटीं कांहींच उतरत नाहीं. जी देवांची गोष्ट तीच ध्येयांचीहि. नवा विश्वकुटुंबवाद म्हणजे समाजवाद किंवा साम्यवाद होय. हे ध्येयवाद सत्‌भावनांना आवाहन देतात व भावुक मनाला प्रथम निर्दोष व परिपूर्णहि वाटतात. परंतु वैचारिक समीक्षेला त्यांचे दोष दिसूं लागतात, आणि ते ध्येयवाद प्रत्यक्ष सृष्टींत देवाप्रमाणें

अवतरले म्हणजे त्यांचीं व्यंगें उघडकीस येतात. प्राचीन युगाचे देवधर्म जसे भ्रांतिमय ठरतात, त्याप्रमाणें नवे कल्पनारम्य ध्येयवादहि भ्रांतिमय ठरण्याचा जबर संभव आहे. अॅडलर म्हणतो त्याप्रमाणें सर्वच उच्चतम मानवी ध्येयवाद हे मार्गदर्शक भ्रांत कल्पना ( Guiding fiction ) होत, असें म्हणण्याची पाळी येते कीं काय अशी काळजी किंवा भीति वाटते. ही काळजी किंवा भीति या कादंबरीतील अनेक संवादांमध्यें प्रकट झाली आहे. या काळजीच्या पोटांत वैफल्याचें भय भरलेलें आहे. विश्वकुटुंबवादहि वस्तुसंग्रहालयांत जमा करावा लागेल, अशी एका पात्रानें केलेली कोटी सुशीलेनें ' सध्यां नव्हे, पुढें केव्हां तरी ' म्हणून मान्य केली आहे. जुन्या युगांतील देवांनीं राखलेली समाजव्यवस्था निर्दय व स्वार्थी लोकांनीं भरलेली आहे. पिढ्यान्‌पिढ्या दलित वर्गाची परिस्थिति तशीच ठेवण्याचा त्यांत प्रयत्न असतो. या गोष्टीचें एक मार्मिक रूपक या पुस्तकांत आलें आहे. तें म्हणजे सोनगांवच्या प्लेगाचें प्रकरण होय. जुन्या जगावर गिरिधरराव व सुशीला आग पाखडतात, व नवे ध्येयवाद त्या परिस्थितींत बदल करण्याचे उपाय म्हणून सुचवितात. परंतु नव्या ध्येयवादांच्या बाबतींत विनायकराव व बळवंतराव मार्मिक शंका उपस्थित करतात; त्यांचें समर्पक उत्तर कोणीच देत नाहीं. या सर्वांचा अर्थ असा कीं, या कादंबरीच्या द्वारें नवे देवसुद्धां खरे नसावेत, अशी आशंका प्रकट करावयाची लेखकाची मनीषा आहे. अशी आशंका, काळजी किंवा भीति ही लेखकाची खरीखुरी अंतर्यामींची भावना आहे. परंतु या भावनेस अनुसरून प्रत्यक्ष कथानक मात्र परिणाम उत्पन्न करीत नाहीं. ही कथा आनंदपर्यवसायी आहे. सुशीलेला अखेर चांगले दिवस येतात. आपल्या चिरपरिचित मित्राशींच तिचा पुनर्विवाह होतो; त्यांतच तिला आपला देव सांपडतो. त्यांतच तिला सर्व आदर्शांचा सुखमय प्रत्यय येऊन ती कृतार्थ होते. ध्येयांची सर्वांगिण टीका व त्यांच्या सदोषतेमुळें उत्पन्न होणारी काळजी केवळ संवादांत व्यक्त होते. त्या काळजीचा यत्किंचित्‌हि स्पर्श मुख्य पात्रास होत नाहीं. तात्पर्य, तें ध्येयांचें दोषदर्शन वैचारिक सुखासच कारण होतें. त्या दोष दर्शनानें मन चिंताग्रस्त होत नाहीं. तात्पर्य, लेखकाची मुख्य जाणीव किंवा भावना यांच्या परिपोषास अनुरूप कथारचना झाली नाहीं, अशी विसंगति मनास अस्वस्थ करते. हें मात्र खरें कीं, विषण्ण किंवा चिंताग्रस्त करणारें कथानक रचून यशस्वी व नामवंत झालेला कलाकार भारतांत क्वचितच सांपडतो.

कारण येथील वाचक किंवा प्रेक्षक वर्गाला विषादांत व चिंतेंत कलानंद अनुभवतां येत नाहीं.

या विसंगतीच्या आक्षेपांतून सोडवणूक होऊं शकते, ती अशी : सुनंदराव, बळवंतराव व सुशीला हे तिघेहि ध्येयवादी आहेत. या तिघांत सुनंदराव व सुशीला यांचा ध्येयवाद क्रियाशील आहे. बळवंतराव सामान्यतः सहानुभूति दाखविणाऱ्या वर्गांत मोडतात. विधवा झाल्यावर सुशीला ख्रिश्चन विद्यालयांत पक्की विश्वकुटुंबवादी किंवा समाजवादी बनते. सर्व जाती व सर्व धर्म यांना मोकळीक असलेल्या एका शिक्षणसंस्थेस आपली सर्व संपत्ति अर्पण करून जनसेवेची दीक्षा घेते. परन्तु बळवंतरावांशीं पुनर्विवाह झाल्याबरोबर तिला या नव्या पतीमध्येंच सर्व ध्येयवादांचा संपूर्ण ठेवा सांपडतो. ती विलायतेहून पाठविलेल्या पत्रांतल्या संवादांत म्हणते:—" या क्षणीं एवढं मात्र मी म्हणणार कीं, तूंच माझें सत्य, तूंच माझें सौजन्य आणि तूंच सौंदर्य ! " ( पृष्ट १९७ ) तिचा विश्वकुटुंबवाद अखेरीस तिच्या इवल्याश्या कुटुंबांत विसर्जन पावतो. तिच्या उच्छृंखल व अकालीं निधन पावलेल्या पतीपासून तिची खाजगी कौटुंबिक जीवनाची, पति-संगमनाची किंवा कौटुंबिक आधिपत्याची वासना अतृप्त राहिली होती. त्या वासनेचें निरुपायानें तात्पुरतें उदात्तीकरण झालें. परंतु योग्य संधी सांपडल्या-बरोबर तो उदात्त ध्येयवादाचा मुखवटा तिनें हळूंच बाजूला सारला आणि आपल्या खऱ्याखुऱ्या मानवी पातळीवर येऊन नव्या बाल-देवाच्या अवताराची प्रतीक्षा करीत पूर्वतयारी करूं लागली. अकालीं वैधव्यानें प्राप्त झालेल्या न्यून-तेच्या पूर्तीकरितां विश्वकुटुंबवाद तिला कांहीं काळ उपयोगी पडला, परंतु तो वरपांगीच होता. कौटुंबिक वासनेनेंच त्या विश्वकुटुंबवादावर विजय मिळविला, असें फार मोठ्या कौशल्यानें हळुवारपणें कथालेखकानें सूचित केलें आहे. मानसशास्त्रदृष्ट्या हें रहस्य फार उद्बोधक आहे. मराठी सारस्वताच्या नभांत ही कथा दीर्घकालपर्यंत स्वतेजानें चमकत राहील, असा भरंवसा वाटतो.

वाई
ता. ५-७-५५

लक्ष्मणशास्त्री जोशी

# प्रस्तावना

‘ सुशीलेचा देव ’ ह्या प्रा. वामन मल्हार जोशी ह्यांच्या कादंबरीची पांचवी आवृत्ति प्रकाशित होत आहे, आणि त्या आवृत्तीची प्रस्तावना लिहिण्याचें काम मीं अंगिकारिलें आहे. आकाशाला गवसणी घालण्याचाच प्रयत्न आहे हा! वास्तविक वामन मल्हारांच्या कोणत्याच कादंबरीस प्रस्तावनेची आवश्यकता नाहीं, प्रस्तुत कादंबरीस तर मुळींच नाहीं. परंतु नवी आवृत्ति बाहेर पडतांना, सामान्य वाचकाच्या दृष्टीनें लिहिलेली प्रस्तावना उपयुक्त ठरेल असें वाटल्यावरून, प्रकाशकांनीं मीं ती प्रस्तावना लिहावी असें सुचविलें आणि त्या सूचनेस अनुसरून मीं प्रस्तावना लिहिण्याचें काम हातीं घेतलें आहे.

वामन मल्हारांनीं आपल्या ‘ रागिणी ’ ह्या कादंबरीतून तत्त्वचिंतनपर व विवेचनात्मक कादंबरीचा नवीन प्रकार निर्माण केला. ह्या प्रकाराचें विशिष्ट स्वरूप थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें तर हें कीं कादंबरीतील मुख्य पात्रें सुसंस्कृत असून, जीवनाकडे पाहाण्याची त्यांची दृष्टि चिंतनाची असते. त्यामुळें कादंबरींतील कथनाच्या ओघांत, अनेक तात्त्विक व जीवनविषयक प्रश्नांचें विवेचन या पात्रांकडून घडतें, आणि कथानकाला व व्यक्तिचित्रणाला त्यांतून कलाटणी मिळते. वामन मल्हारांच्याच शब्दांत सांगावयाचें तर ‘ रागिणी ’ची जन्मकथा पुढीलप्रमाणें आहे : “ महादेव शिवराम गोळे यांच्या ‘ हिंदुधर्म व सुधारणा ’ या पुस्तकानें माझ्या मनावर पुष्कळ परिणाम केलेला होता व असें एखादें पुस्तक लिहावें अशी माझ्या मनांत महत्त्वाकांक्षा बीजावस्थेंत असतां सर आर्थर हेल्प्स् यांचें ‘ फ्रेन्ड्स् इन् कौन्सिल ’ हें पुस्तक माझ्या वाचनांत आलें व वरील आकांक्षा बलवत्तर झाली. पुस्तक लिहिण्यास घेतल्यावर तात्त्विक चर्चेपेक्षां कथानकाकडे, व विशेषतः स्वभाववर्णनाकडे अधिक लक्ष जाऊं लागलें. तथापि तत्त्वचिन्तनपर प्रवृत्ति अगदींच थंडावली नाहीं ” * रागिणी या कादंबरीचा मुळांतला हेतू तात्त्विक चर्चेचा आहे. गंभीर विचार गोष्टीरूपानें वाचकांपुढें ठेवले तर ते मनाची पकड सहजतेनें घेतात व त्यांचा प्रसार होण्याचा संभव असतो, ह्या दृष्टीनें कादंबरी लिहावयास घेतली. तरी प्रत्यक्ष निर्मितींत ही दृष्टि मागें पडली, लेखकांतील कलावंत जागृत झाला आणि कथानक व स्वभावचित्रण

---

* ‘ मी आणि माझें लेखन ’—लेख.

ह्यांनाच प्राधान्य मिळालें. परंतु कादंबरींतील पात्रें सुसंस्कृत व विचारशील असल्यानें त्यांच्या जीवनाचें चित्र रेखाटतांना साहजिकच तत्त्वचिंतनास कादंबरींत स्थान मिळालें.

वामन मल्हारांनीं 'रागिणा'तून प्रचोलत केलेल्या कादंबरीलेखनाच्या या प्रकाराचें परिणत स्वरूप 'सुशीलेचा देव' या कादंबरींत दिसून येतें. कथानकाच्या किंवा व्यक्तिचित्रणांतील विविधतेच्या दृष्टीनें, 'रागिणी' आपल्या इतर भावंडांहून सरस ठरेल कदाचित्, तिच्यांतील पात्रें अधिक आकर्षक असतील, कथनांत चटकदारपणा अधिक असेल, पण कलाकृति या दृष्टीनें 'सुशीलेचा देव' या कादंबरीचा दर्जा वरचा आहे.

'सुशीलेचा देव' या कादंबरींत वामन मल्हारांनीं आपल्या निर्मितीचा परमोच्च बिंदु गांठला,* हें कुसुमावती देशपांडे यांचें विधान यथार्थ आहे. 'रागिणी'मध्यें काव्य-शास्त्र-विनोद ह्यांचा वेगळा स्वतंत्र उल्लेख मथळ्यांतच झाला आहे आणि तेंच पृथगत्व प्रत्यक्ष कादंबरींतहि दिसून येतें. कथाभाग, व्यक्तिचित्रण आणि काव्य–शास्त्र–विनोद हीं पूर्णतया एकरूप झालेलीं नाहींत. प्रत्येकाचा वेगळेपणा कमी अधिक प्रमाणांत राहून गेला आहे. प्रा. ह. रा. दिवेकर ह्यांनीं रागिणीच्या पांचव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें, 'कथा–भागासाठीं उत्तरा, रागिणी, आनंदराव व भैयासाहेब हीं पात्रें, तर नानासाहेब, भाऊसाहेब व शास्त्रीबुवा हीं पात्रें काव्यशास्त्रविवादासाठीं अशी विभागणी या कादंबरींत स्पष्टपण दिसून येते.' अशी ही विभागणी हा कादंबरींतील एक दोष आहे. कादंबरीचा नवीन प्रकार प्रथमच अवलंबिल्यामुळें हा दोष राहाणें साहाजिक होतें, पण अशा प्रकारची विभागणी वाचकाला वा टीकाकाराला जाणवणें हें कादंबरींतील विस्कळितपणाचें व विसंगतीचें द्योतक आहे. 'सुशीलेच्या देवां'त कादंबरीचीं विविध अंगें एकमेकांस पूरक आणि पोषक अशी असल्यानें सुसंगतीच्या व एकसूत्रीपणाच्या दृष्टीनें ही कादंबरी अधिक सरस आहे.

'सुशीलेचा देव' व तत्पूर्वीची कादंबरी 'नलिनी' यांत १० वर्षांचा खंड पडला. परंतु "We learn to skate in summer and swim in winter–" पोहण्याची वा स्केटिंगची कला प्रत्यक्ष पोहण्याच्या वा स्केटिंग करण्याच्या दिवसांत शिकतां येत नाहीं, तर ह्या क्रिया सोडून दिल्यावर मधल्या

---

* मराठी कादंबरी–पहिलें शतक

काळांतच नेणत्या मनानें ती कला हस्तगत होते, ह्या मानसशास्त्राच्या तत्त्वानुसार ह्या मध्यंतरींच्या कालावधींतच वामन मल्हारांची कथालेखनाची कला प्रगत झाली असावी. 'रागिणी'मध्यें कांहीं अंशीं नवीन अशा प्रकारची निर्मिति झाली, 'आश्रमहरिणीं'त व 'नलिनीं'त तोच प्रकार अवलंबिला; आणि मग अशा प्रकारच्या वाङ्मयनिर्मितींत १०–११ वर्षांचा खंड पडला. ह्या अर्वाचीन कादंबरी लेखनाचा हा नवीन प्रकार व वामन मल्हारांची कथात्मक कला ह्यांचा विकास नेणत्या मनाच्या बैठकीवर झाला. हा विकास व ही परिणति 'सुशीलेच्या देवां'त अनेक दृष्टींनीं दिसून येतात, आणि ह्या कादंबरींत कलागुणांची परिपक्वता आहे.

एक तर कादंबरींतील विविध अंगांची एकरूपता आपोआपच साधली आहे. 'सुशीलेच्या देवां'तील वादविवाद हे निव्वळ तत्त्वचिंतनपर नसून कथेच्या ओघांत ते उद्भवतात आणि कथानकास व व्यक्तिविकासास अवश्य असेच ते आहेत. कथेंतील मुख्य व्यक्तींचें जीवनचित्र रेखाटतांना हें तत्त्वचिंतन त्यांच्या जीवनाचें अंग म्हणून उद्भवतें आणि त्यांच्या जीवितांतील महत्त्वाच्या घटनांशीं तें संलग्न असतें. स्वभावपरिपोषास ते वाद अवश्य आहेत आणि त्यांतून स्वभावदर्शनहि साधलें जातें. सामान्य वाचक तत्त्वबोधाचा हा भाग गाळून पुढें वाचूं म्हणेल तर तें शक्य होणार नाहीं; कथानकांतील दुवे जुळणार नाहींत आणि त्यांत तुटकपणा येईल. या कादंबरींत तत्त्वचिंतनास प्राधान्य नाहीं, कादंबरीचें मुख्य अंग विशिष्ट परिस्थितींतील व्यक्तींचें जीवनदर्शन व त्यांच्या व्यक्तित्वाचा विकास हें आहे. पण ह्या व्यक्ति सुसंस्कृत व संस्कारक्षम असल्यानें तत्त्वचिंतन हा त्यांच्या जीवनाचा आधार आहे आणि म्हणून त्याला कादंबरींत स्थान आहे. कादंबरींतील भिन्न भिन्न अंगांची एकजीवता हें प्रगत कलेचें लक्षण आहे. तात्त्विक चर्चा, कथानक, स्वभावपरिपोष व प्रसंगनिर्मिति ह्यांतली कलात्मक प्रमाणबद्धता सुशीलेच्या देवांत उत्तम रीतीनें साधली आहे.

या कादंबरीचें दुसरें एक वैशिष्ट्य म्हणजे भाषेचा साधेपणा व सुसंगति. ह्या साधेपणाच्या मुळाशीं कलेस अत्यंत अवश्य असणारे संयम व सदभिरुचि हे गुण आहेत. भाषा ही प्रसंगास व व्यक्तीच्या स्वभावास अनुसरून असली पाहिजे. काव्यमय वर्णनें, संस्कृतप्रचुर अलंकारयुक्त भाषा हीं वेळीं अवेळीं वापरल्यानें कलाकृतींत एक प्रकारचा बोजडपणा येऊन कृत्रिमतेचा दोष संभवतो. कथानकाच्या वा व्यक्तिचित्रणाच्या ओघांत जी भाषा येईल तीच कथात्मक

कलाकृतीस मानवते. हा साधेपणा संस्काराचा, परिश्रमाचा व मुळांतल्या सदभिरुचीचा परिणाम आहे रोमाँ रोलाँ ह्यांनी आपल्या एका कादंबरींत म्हटल्याप्रमाणें 'Literary simplicity isnot natural but acquired; it is a thing achieved by the elect of.the people, लेखनशैलींतील साधेपणा हा उपजत नसून तो परिश्रमानें संपादन केलेला असतो, आणि अगदीं निवडक लेखकच तो संपादन करूं शकतात.

येथें एक गोष्ट निदर्शनास आणणें अपरिहार्यआहे. भाषेच्या व लेखनशैलीच्या बाबतींत जो कलात्मक संयम ह्या कादंबरींत दिसून येतो तो घटना वा प्रसंगांच्या बाबतींत दिसत नाहीं. कित्येक प्रसंगीं सदभिरुचीचा संयम सुटून अतिरंजितपणा आला आहे. उदाहरणार्थ : काफच्या मृत्यूचा प्रसंग. 'सुशीला खिशावर हात ठेवून नको नको म्हणून म्हणत असतां काफनें पिस्तुल काढलें व एकदम तें आपल्या छातीवर रोखून त्यानें स्वतःचा प्राण घेतला.' हा प्रसंग किती अस्वाभाविक, कृत्रिम व अतिरंजित आहे! कथानकाला अशा प्रकारच्या आत्मघाताची आवश्यकता नाहीं. शिवाय हा प्रसंग कृत्रिम आहे. काफ कितीहि अविचारी असला, हळव्या मनाचा असला, जगाच्या स्वार्थी व अन्यायी समाजव्यवस्थेला वैतागलेला असला तरी अशा प्रकारें आपल्या प्रेयसीला संकटांत घालून आपली सुटका करून घेण्याइतका तो स्वार्थी वा अविचारी खास नव्हता.

ह्या आत्मघातानें साधलें काय ? तर प्रचलित समाजव्यवस्था किती उद्वेगजनक आहे, प्रामाणिक व भावनाप्रवण व्यक्तींच्या मनावर तिचा परिणाम काय होतो हें दाखविलें गेलें आणि सुशीलेच्या सलगीच्या वर्तनाला व पुढें तिनें प्रदर्शित केलेल्या मतांना एक प्रकारचा आधार मिळाला. कदाचित् त्या आत्मघातानें तिचा भविष्यांतील प्रेमी जीवनाचा मार्गहि अधिक सुकर झाला. पण हें सर्व आत्मघातापेक्षां–आणि तोसुद्धां अशा नाटकी प्रकारचा–दुसऱ्या स्वाभाविक मार्गानें साधलें नसतें का ?

आपण म्हणतों, Truth is stranger than fiction—सत्यसृष्टि ही कल्पनासृष्टीहून अधिक वैचित्र्यपूर्ण आहे. वाचकास वा टीकाकारास असंभाव्य वाटणाऱ्या घटना सत्यसृष्टींत घडूं शकतात. लेखकांचा असाहि अनुभव आहे कीं प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी लिहिल्या असतांहि टीकाकार आपला

निर्णय देतो, कीं अशा गोष्टी संभवनीय नाहींत. असा टीकेंत दोष आला तरी सामान्य तत्त्व म्हणून हें मान्य केलें पाहिजे कीं, Truth is stronger than fiction. सत्य प्रसंगांत व त्यांच्या वर्णनांत एकप्रकारचें सामर्थ्य आहे, प्रत्यय आहे. कल्पनेच्या आहारीं जाऊन लेखकाच्या कलाकृतींत अतिरंजितपणा आला कीं कल्पिलेल्या प्रसंगांत एक प्रकारची विरलता जाणवूं लागते. सत्याची जी बैठक असते तिचा आधार सुटून हवेंतच भराऱ्या सुरू होतात. संविधानकाचें तंत्र सांभाळण्यासाठीं, किंवा पुढें येणाऱ्या प्रसंगाच्या समर्थनासाठीं, किंवा वाचकांचें मन आकर्षिण्यासाठीं प्रसंगाची योजना केली कीं, त्यापाठीं लेखकाची कल्पकता असली तरी प्रत्यय नसतो; म्हणून ती प्रसंगयोजना कलेच्या दृष्टीनें हिणकस ठरते. उच्च कलेच्या मुळाशीं प्रत्यय असणें अवश्य आहे. हा प्रत्यय प्रत्यक्ष अनुभवांत असेल वा अनुभवाचें कलात्मक परिवर्तन होऊन जी अनुभूति निर्माण होते तिच्यांत असेल; पण निव्वळ कल्पकतेंत तो प्रत्यय असूं शकत नाहीं. घडलेल्या प्रसंगाचें वर्णन करण्यांत कला आहे, कारण त्या वर्णनास प्रत्ययाचा आधार आहे. पण निव्वळ कल्पकतेनें कोणता तरी बाह्य हेतू साधण्यासाठीं म्हणून प्रसंग रचला कीं त्या रचनेपाठीं प्रत्यय नसल्यानें ती रचना कलाहीन ठरते. वामन मल्हारांच्या 'स्मृतिलहरी' अत्यंत सुरस वाटतात त्याचें एक कारण म्हणजे त्यांच्या मुळाशीं असणारा अनुभवाचा प्रत्यय

काफच्या आत्महत्येच्या प्रसंगाप्रमाणेंच रावबानें रचलेलें मृत्यूचें नाटक व रुपाबाई व तिच्या साथीदारांस अटक हाहि प्रसंग निव्वळ कल्पकतेचा खेळ वाटतो, आणि कादंबरींत इतरत्र दिसणाऱ्या सदभिरुचिपूर्ण संयमाशीं विसंगत वाटतो.

ही कादंबरी रत्नाकरांत क्रमशः प्रसिद्ध होत असल्यामुळें वाचकांचें कुतूहल दीर्घकाल कायम ठेवण्यासाठीं व कदाचित् अशा प्रसंगांची योजना करावी लागली असेल, परंतु त्यामुळें रसहानि झाली हें निःसंशय!

वामन मल्हारांच्या कादंबरीलेखनाच आणिक एक वैशिष्ट्य म्हणजे थोडक्या शब्दांत पण वाचकाचें मन समरस होईल अशा प्रकारचें वातावरण निर्माण करण्यांतील त्यांची शैली. हें वैशिष्ट्यहि 'सुशीलेच्या देवांत' परिणत स्वरूपांत दिसून येतें. वातावरण निर्माण करण्यांत बाह्य वर्णन क्वचितच आढळतें, पण त्यांत समंजस निरीक्षणाची दृष्टि व सहृदयता असते आणि एकप्रकारचा 'सूक्ष्म आणि सौम्य विनोद' असतो.

सुशीलेच्या देवांत विविध परिस्थितींतील वातावरण अत्यंत कुशलतेनें रंगविलें आहे. सुनंद–बाळू–रावबा ह्या त्रिकूटाचें बालपण, त्यांचें शालेय जीवन, त्यांची परस्परांतलीं भांडणें आणि आपसुख घडणारे समेट हें सुंदर वठलें आहे. सुशीलेचे व तिच्या बालमित्रांचे निष्पाप प्रेमाचे संबंध तर फारच मनोहर आहेत. तिघांनाहि स्वतःची बहीण नसल्यानें, शेजारच्या बिऱ्हाडांतील आपल्याहून पांच-सहा वर्षांनीं लहान असलेल्या मुलीचें फार कौतुक असतें. तिची खेळांत कितीहि अडगळ वाटत असली तरी तिला घेतल्याशिवाय गमत नसे. पांचसहा वर्षांच्या वडीलकीच्या जोरावर प्रेमानें तिची थट्टाहि करायला तयार व तिचें कौतुक करायलाहि तयार. तिच्या अखंड अव्याहत चालणाऱ्या बालप्रश्नांवर एखादा रागावला आणि 'मूर्ख आहेस तूं' म्हणून म्हणाला कीं दुसरा तिची बाजू घेण्यास तयार. बाळूच्या घरच्या हळदीकुंकवाच्या प्रसंगीं ह्या मुलांच्या निष्पाप प्रेमाचें वातावरण फार सरस वठलें आहे. मुलांचें चिडवणें, सुशीलेचें रुसणें, तितक्यांत मधेंच निघणारें भाषण हें अत्यंत आकर्षक रीत्या रंगलें आहे. वामन मल्हारांनीं, आपल्या एका लेखांत आपणच कबूल केलें आहे कीं "मला पोषाखाचं, चेहऱ्याचं, हस्तक्षेपादि अवयव–व्यापाराचं वर्णन साधत नाहीं." * पण ह्या प्रसंगांतली 'जांभळ्या निळ्या रंगाचा मोठ्या कांठाचा परकर व जरीकांठी खणाची चोळी' घालून बाळूच्या घरांत आपल्याच ऐटींत मिरवणारी आणि पोक्तपणानें ठांसून 'गौर कांहीं रोज करायची नसते...तुझ्या आईला विचार पाहिजे तर. तिला अधिक समजतं का तुला?' असं बाळूला बजावणारी सुशीला मूर्तिमंत डोळ्यांसमोर उभी राहाते. बाळपणाचें आणि लहान मुलांच्या वागण्याचें इतकें सहृदय, सहज आणि सुंदर चित्रण मराठी वाङ्मयांत क्वचितच आढळतें.

त्याचप्रमाणें मधून मधून पार्श्वभूमि म्हणून प्रकट होणारें घरगुती वातावरणहि अत्यंत आकर्षक आहे. 'व्यवहारांतल्या कृत्रिमपणाला कंटाळून कांहीं दिवस रानांत जावंसं वाटणारे' विश्वासराव आणि ह्या लहरींत त्यांच्या पत्नीशीं झालेला त्यांचा संवाद, सुरुवातीचा कडवटपणा व शेवटचा समेट आणि नाजूक थट्टा, विनायकराव व लक्ष्मीबाई ह्या पतिपत्नींतील संवाद ह्यांतून मध्यवर्गीय महाराष्ट्रीयांच्या घरगुती जीवनाचें चित्र डोळ्यासमोर उभें रहातें आणि त्यांतल्या सूक्ष्म विनोदानें

---

* विचार लहरी—'मी आणि माझीं पुस्तकें'

मन आनंदित होतें; आणि, पोट धरून नाहीं पण आपल्याशींच हंसण्याचा मोह होतो. 'माझ्या लिखाणामध्यें विनोद आहे' * हें इतकें आर्जवून सांगण्याची आवश्यकता वामन मल्हारांना कां भासली तें कळत नाहीं. त्यांचा विनोद सूक्ष्म आहे, पण पटणारा आहे. नदीच्या पाण्यावर वाऱ्याची झुळूक आली कीं जसे कोमल तरंग पाण्यावर उमटतात तसाच परिणाम त्यांच्या विनोदाचा वाचकांच्या मनावर होतो; प्रसन्न अशा नाजूक विनोदाच्या लहरी विचारप्रवाहावर उठतात.

ह्याहूनहि वेगळ्या प्रकारचें एक वैचारिक वातावरण निर्माण करण्यांत वामन मल्हारांचा हातखंडा आहे. असें वातावरण ह्या कादंबरीचा पायाच आहे. नेमस्त पक्षाचे स्पेन्सरचे भक्त गिरिधरराव, जहालपक्षाचे विश्वासराव आणि समतोल वृत्तीचे पण जहालपक्षाकडे झुकणारे विनायकराव ह्या तिघांतले वादविवाद, तिघांची घरची राहाणी ही कथानकाची पार्श्वभूमि फार महत्त्वाची आहे. ह्या वातावरणास त्या कालांतल्या सुशिक्षितांचें वैचारिक जीवनचित्रण म्हणून ऐतिहासिक दृष्टयाहि महत्त्व आहे. ह्या पार्श्वभूमीवरच संविधानकाचें वातावरण व त्यांतील मुख्य घटना आधारलेल्या आहेत. ज्वलज्जहाल व पुढें गांधीवादी बनलेला सुनंदा, नेमस्त विचारांचा पण राष्ट्रीय पक्षाविषयीं सहानुभूति बाळगणारा बाळू, जडवादाचा पुरस्कर्ता रावबा आणि ध्येयवादी सुशीला ह्यांच्या मनोवृत्ति ह्याच वातावरणांत रुजल्या आणि त्यांतूनच त्यांचें व्यक्तित्व तयार झालें आहे.

कादंबरीच्या नांवांत सुचविल्याप्रमाणें सुशीलेचा देव ही मध्यवर्ति कल्पना; सुशीला व तिचा देवावरील भाव ह्यांच्या भोंवतींच कादंबरींतील मुख्य प्रसंगांची गुंफण झाली आहे. ह्या कादंबरीला उपनायिका नाहीं व नायक नाहींच म्हटलें तरी चालेल. नायिकेचा स्वभाव परिपोष दाखविणें हेंच कादंबरीचें मुख्य कार्य आहे. नायिकेच्या स्वभावाचें मर्म तिच्या निष्ठेंत आहे. त्या निष्ठेचें स्वरूप तिच्या जीवनांत बदलत राहातें, निष्ठेच्या कोंदणांतली मूर्तीहि बदलत राहाते, आणि या वृत्तीच्या विकासांतच नायिकेचें व्यक्तित्व सामावलें आहे.

बाल-सुशीलेची निष्ठा निव्वळ पारंपरिक स्वरूपाची. अवघी दहा-अकरा महिन्यांची सुशीला देवाला मानते, आणि कुणीहि, कोणत्याहि हेतूनें व कोणत्याहि परिस्थितींत 'देवबाप्पा' शब्दाचा उच्चार केला कीं हात जोडून देवाला नमस्कार

---

* विचारलहरी–'मी आणि माझीं पुस्तकें'

करते. ही निव्वळ कसरत असली तरी तिच्यापाठीं देवबाप्पाच्या मोठेपणाची कांहींतरी अस्फुट कल्पना आहे. आपल्या दुसऱ्या वाढदिवसाच्या भोजनप्रसंगीं त्याच भक्तिभावानें, जेवण्यास सुरुवात करण्यापूर्वी 'तात्या, देवाचं नांव घेऊं ना आतां? आतां इल् इल् मादेव मनूं मी!' असं विचारून महादेवाला हांक मारती झाली. पुढें देवाची कल्पना अधिक स्पष्ट झाली. 'देव म्हंजे आपल्या तात्यांसारखा' अशी कल्पना सुचते. मनोभावानें आपल्या इच्छा प्रकट केल्या तर त्या पूर्ण करण्याचें सौजन्य व सामर्थ्य देवांत आहे असा विश्वास बसतो. 'मीं देवाला सांगितलंय् काल रात्रीं मला पास कर म्हणून, तो मला पास करील' असा रोखठोक जबाब विश्वासरावांना देऊन ती माकळी होते. पण पुढें बालमनांत आपल्या देवाच्या सामर्थ्याविषयीं शंका येते व त्या शंकेचें निरसनहि होतें. 'आमचा देव सगळ्यांत मोठा आहे; तो खात्रीनें बाबांच्या देवाला पाडील. आपल्या तात्यांहून देव बलवान् आहे...' आणि ह्याला प्रमाण काय? तर आई म्हणते कीं,आपल्या देवाइतकं बळ कुणामध्येंहि नाहीं. ह्या वेळची सुशीलेची निष्ठा 'बाबावाक्यं प्रमाणम्' अशाच प्रकारची. आईचें तुळशीला पाणी घालणें, वटपौर्णिमा, मंगळागौर, हरतऱ्हेचीं व्रतवैकल्यें, तिचें वेळोवेळीं झालेलें बोलणें यावरच तिची निष्ठा जोपासली गेली. ह्या पारंपरिक श्रद्धेला आंतरिक भावनेचेंहि बळ होतें. देवाशीं हितगुज बोलणें, त्याला नवस करणें, तो नवसाला पावला नाहीं तर त्याच्याशीं भांडणें, त्यानें केलेलें (!) सांत्वन समाधानानें मानणें,असे अधिक आपुलकीचे संबंध प्रस्थापित होतात. ह्या देवाचें प्रतीक म्हणजे एक तांबडा दगड. पण बाळूनें आणि सुनंदानें चेष्टेनें दगडांतला देव घालवून दिला. येथें सुशीलेच्या निष्ठेला पहिला धक्का बसला. त्या दगडांत देव नव्हताच मुळीं, आपण वेडेपणानें दगडाला देव मानून त्याची पूजा केली, हें तिला पटलें.

पण दगडांतील देव गेला तरी सुशीलेच्या मनांतील देवाचें स्थान अढळ होतें. तिची धार्मिक निष्ठा मुळींसुद्धां कमी झाली नाहीं. बाळू-सुनंदाचे देवाच्या अस्तित्वावरचे वाद व कुचेष्टेचीं बोलणीं ऐकून तिच्या मनांत भ्रान्ति उत्पन्न होई; पण पुढें हे दोघे 'राष्ट्रीय पक्षाच्या पुरातनाभिमानामुळें पुन्हां जेव्हां संध्या वगैरे करूं लागले आणि देवाधर्माची चेष्टा करण्याचें सोडून देऊं लागले,' तेव्हां सुशीलेला परमानंद झाला.

तिची निष्ठामय वृत्ति मुळांतच हादरली ती लग्न झाल्यावर आपल्या पतीच्या जडवादाशीं आणि अश्रद्ध वृत्तींशीं तोंड देतांना. रावबा स्पेन्सरच्या शिस्तींत वाढलेला, प्रत्येक प्रश्न बुद्धीवर घसास लावणारा. स्वार्थाखेरीज कोणत्याहि प्रकारच्या भावनेचें अस्तित्व मानण्यासच तो तयार नाहीं. अहोरात्र देवाधर्मांची चेष्टा करण्यांतच त्याला आनंद वाटे. अशा पतीशीं संसार करतांना सुशीलेच्या धार्मिक भावनांना प्रचंड धक्का बसला. ह्या नव्या कुटुंबांत आल्यावर तिचा देव हरवला, पण निष्ठेची वृत्ति गेली नाहीं. कांहीं कालपर्यंत तरी तिच्या निष्ठेंत देवाचें स्थान पतीनें घेतलें. सुशीला नास्तिक बनली नाहीं. 'मला नास्तिक कोण म्हणेल? मी देव मानतें, इतकेंच नव्हे तर माझा देव मूर्त देहधारी आहे आणि तो माझ्याजवळच आहे.' पण ही केवळ मंगलाक्षतांची जादू होती, ती टिकणारी नव्हती. सुशीला वृत्तीनें नास्तिक नाहीं. 'नास्तिक मनुष्य निराळंच असतं' हें तिच्या श्वशुरांनीं म्हटलें तेंच खरें. सुशीलेच्या मनांत निष्ठेचें व श्रद्धेचें कोंदण सदैव तयार होतें, त्या कोंदणांत कोणत्या मूर्तीची प्रतिस्थापना होईल हाच प्रश्न होता.

पण रावबाच्या अधःपातामुळें मात्र ती कांहीं काल नास्तिक बनली. देवावरचा विश्वास उडाला, इतकेंच नव्हे तर सद्गुणाविषयींहि तिची वृत्ति साशंक बनली. ही अश्रद्ध वृत्ति अस्वाभाविक होती, त्यामुळें सर्व प्रकारची श्रद्धा गमावून बसल्यावर तिच्या मनाची कमालीची ओढाताण झाली. पण त्यांतूनच तिचें स्वतंत्र व्यक्तित्व उदयास आलें. अजूनपर्यंतची सुशीला कोमल होती, तिच्या वागण्यांत गोडवा होता, पण स्वतंत्र वृत्तीनें विचार करण्याचें मानसिक बल तिच्याजवळ नव्हतें. घरांतील वडील मंडळी, बाळू-सुनंदा, पुढें रावबा व त्याचे वडील ह्यांचीं मतें स्वतःच्या बुद्धीनें तोलून न पाहातां तिनें उचललीं होतीं. जोंपर्यंत तिच्या श्रद्धेला विषय होता तोंपर्यंत हें वैचारिक परावलंबित्व ठीक होतें. पण एकदां तो आसरा गेल्यावर तिचें मन हादरलें, त्या धक्क्यानें विचारी बनलें आणि त्यांतूनच सुबुद्ध श्रद्धा निर्माण झाली. तिनेंच आपल्यांतल्या ह्या परिवर्तनाचें वर्णन केलें आहे:-"सासरीं आल्यापासून माझा देव गेला, धर्म गेला, आणि आतां सद्वर्तन हा शब्ददेखील निरर्थक होऊं पाहातो आहे. तेव्हां माझा हा अधःपात कोठवर जाणार आहे?" सुशीलेचें मन भांबावलें, निःश्रद्ध बनलें, पण परिस्थिति अधिक बिकट झाल्यावर तिला तोंड देण्याचा स्वतंत्र विचार करणें तिला भाग पडलें आणि

तेथेंच तिच्या स्वतंत्र व्यक्तित्वाचा उदय झाला. तिचें "हृदयदौर्बल्य जाऊन आध्यात्मिक दृष्ट्या ती पुनः जिवंत झाली, इतकेंच नव्हे तर बलवान्, श्रेष्ठ धारिष्ट्यवान् झाली."

तिचीं मतें बदललीं, तिच्या वृत्तींत कणखरपणा आला; पण तिचें मन कठोर बनलें नाहीं. तिच्यांतला कनवाळूपणा आणि कर्तव्यबुद्धि कायम राहिली, म्हणूनच रावबा आजारी पडून पश्चात्तापदग्ध झाल्यावर त्याच्या सेवेला ती धांवून आली. रावबानें पूर्वी आपल्या सुखवादाच्या भूमिकेवरूनच तिला निराशेनें म्हटलें होतें "तुझी श्रद्धा मला प्राप्त होईल का ?" त्याचा मनुष्याच्या चांगुलपणावर, पावित्र्यावर विश्वास नव्हता, त्याला सात्त्विकतेचा अर्थ कळत नव्हता, सुखाशिवाय त्याला साध्य नव्हतें, त्याला कोमलपणा, प्रेम ह्या भावना माहित नव्हत्या. पण कोरड्या बुद्धिवादावर तो जगूं शकत नव्हता. श्रद्धा भ्रममूलक वाटली तरी तिच्याशिवाय तग धरणें अशक्य झालें होतें. मरतेसमयीं मात्र सुशीलेच्या प्रेमाच्या व कर्तव्यतत्परतेच्या संजीवनीनें त्याचें आत्म्याचें जाड्य जाऊन, त्याच्या मनांत सात्त्विकतेविषयीं श्रद्धा निर्माण होते.

रावबाच्या मृत्यूनंतर सुशीलेच्या विचारांत अधिक सडेतोडपणा आला. सात्त्विकतेवरची तिची श्रद्धा बलवान् झाली; आणि तिला सर्व धर्मांचा व प्रचलित समाजव्यवस्थेचा तिटकारा येत चालला. विवाहसंस्थेंतील अन्याय जाणवूं लागला; प्रचलित संस्थांवरची श्रद्धा उडाली, तरी तिची वृत्ति अश्रद्ध बनली नाहीं. उलट ती ध्येयप्रवण बनली. आणि मानव्याच्या कल्पनेनें तिच्या निष्ठेच्या कोंदणांतील मूर्तीचें स्थान पटकावलें. मानवहित साधण्याच्या ध्येयानें तिचें मन भारावलें, आणि हें ध्येय हेंच देव बनलें. समाजव्यवस्थेंत सुधारणा करण्याची तिला तळमळ लागून राहिली व त्या ध्येयाचें रूपान्तर कृतींत झालें. गांवांत मुलींची एक शाळा तिनें स्थापिली व विश्वकुटुंबी संस्था स्थापण्याचा मानस केला. ह्या बाबतींत प्रचारकार्यच अधिक झालें. ध्येय प्रत्यक्ष कृतींत उतरलें नाहीं.

आपण नास्तिक का आस्तिक, ह्याचें उत्तर सभेंत धीटपणानें तिनेंच दिलें: "आम्ही विश्वकुटुंबाचें ध्येय मानणारे आणि तत्प्रीत्यर्थ परिश्रम व स्वार्थत्याग करणारे ध्येयवादी व ध्येयपूजक लोकच खरोखर आस्तिक; ध्येय हाच आमचा देव आणि ध्येयपूजा म्हणजेच देवपूजा !"

सुशीलेचें हें आंतरिक परिवर्तन चित्रित करण्यांत वामन मल्हारांनीं आपलें सगळें लेखनकौशल्य कामीं आणलें आहे. सुशीलेच्या भावनांचा असा आंतरिक

विकास रेखाटण्यांत निव्वळ कथनात्मक शैली एक तर अपुरी ठरली असती वा कृत्रिम ठरली असती. त्रयस्थाला तिच्या मनाचा ठाव कसा लागणार होता ? एक सुशीलाच आत्मनिरीक्षणानें आपला विकास कसा झाला तें जाणूं शकत होती. आणि तो सांगण्यास जो जिव्हाळा, जी अंतर्मुख दृष्टि अवश्य आहे ती आत्मानिवेदनांतच आविष्कृत होणें शक्य आहे. हें आत्मानिवेदन अत्यंत कुशलतेनें लेखकानें दोन प्रकारांनीं साधलें आहेः–एक प्रकार पत्रलेखनाचा. त्याचा उपयोग भरपूर केला आहे. पण पत्रांत सुद्धां शंभर टक्के मोकळेपणा येऊं शकत नाहीं, तो स्वाभाविकपणें आणण्यास दुसरा प्रकार म्हणजे सुशीलेच्या आत्मचरित्राची योजना केली आहे. आत्मनिवेदनाचा * हा प्रकार वामन मल्हारांच्या ‘ प्रतिभेचा सहजधर्म’ आहे. आणि ह्या कादंबरीच्या मूळ विषयास तो पूर्णपणें साजेल असा आहे. Form आणि Matter ह्यांतली एकात्मकता पूर्णपणें साधली आहे. सुशीलेच्या व्यक्तित्वाचा विकास, तिच्या अंतर्मनांत होणारी चलबिचल, ती चलबिचल जाऊन श्रद्धेच्या बैठकीवर येणारें तिचें मनोधैर्य हें व्यक्त करण्यास एक आत्मनिवेदनच समर्थ आहे. कथाकाराचें नाट्यात्मक दर्शन, प्रसंगांतून वा उक्तींतून केवळ सूचकतेनें केलेलें व्यक्तिदर्शन हें वामन मल्हारांना जमत नव्हतें हें श्री. वा. ल. कुळकर्णी ह्यांचें विधान रास्त आहे; पण ह्या कादंबरींतील विषयाचें स्वरूपच असें आहे कीं लेखकाच्या कलेंतील ही उणीव मुळींच जाणवत नाहीं. लेखकास आत्मनिवेदन उत्तम प्रकारें साधतें आणि ह्या कादंबरींतील विषयास त्याच लेखनप्रकारची अवश्यकता आहे.

ह्या आत्मनिवेदनांतूनच सुशीलेच्या निष्ठेचा व तिच्या व्यक्तित्वाचा विकास प्रकट झाला. सुशीलेचें पात्र वामन मल्हारांनीं निर्मिलेल्या इतर पात्रांप्रमाणें प्रतीकात्मक आहे. सुशीलेंत आधुनिक सुशिक्षित स्त्रीचें चित्र अत्यंत सहृदयतेनें व कौतुकानें रेखाटलें आहे. सुशिक्षित स्त्रीच्या बाबतींत इतकी समंजसपणाची व आदरमिश्रित कौतुकाची दृष्टि पुरुष लेखकांत सहसा दिसून येत नाहीं. हिंगण्यास व एरंडवण्यास मुलींच्या संस्थांतच शिक्षकाचें व प्राध्यापकाचें काम केल्यानें सुशिक्षित स्त्रीविषयीं वामन मल्हारांची दृष्टि आदर्शवादी बनलेली होती. सुशिक्षित स्त्री आपल्या स्त्रीसुलभ कोमल भावना कायम राखून, आचार–विचारांत पूर्णपणें स्वतंत्र कशी असूं शकेल, हा

* वा. ल. कुलकर्णी—वामन मल्हार वाङ्मय–दर्शन.

स्त्रीजीवनाचा आदर्श त्यांच्या मनांत होता. सुनंदानें मानलें नाहीं तरी, सुशीला विचारानें व ध्येयवादानें त्याच्या व बाळूच्या पुढेंच आहे. ती जाडी विदुषी नाहीं, हक्कांसाठीं झगडणारी वावदूक स्त्री नाहीं; पण एक श्रद्धावान्, विचारशील, अत्यंत आकर्षक अशी स्त्री आहे. बोलण्यांत सडेतोडपणा आहे, निर्भीडपणा आहे,पण वागण्यांत कोमलपणा आहे. परिस्थितीच्या धगींत तिचें व्यक्तित्व तावून सुलाखून निघाल्यानें तें सबल आणि समर्थ झालें आहे. त्यांत स्थैर्य आहे, धारिष्ट्य आहे आणि प्रगतिपथावर ध्येयाकडे त्याची ओढ आहे.

सुशीलेचें पात्र अशा प्रकारें प्रतीकात्मक असलें तरी वामन मल्हारांनीं आपणच वर्णिल्याप्रमाणें त्या पात्राचें प्रतीकात्मक स्वरूप जाऊन त्यांत व्यक्तित्व व जिवंतपणा आलेला आहे. लहानपणची निष्पाप मनाची सुशीला आणि विश्वकुटुंबसंस्था स्थापन करणारी सुशीला ह्यांत महदंतर आहे; पण एकाच व्यक्तीच्या जीवनावरील ते दोन टप्पे आहेत हें पटल्यावांचून राहात नाहीं. कादंबरीच्या शेवटच्या भागासंबंधीं मात्र एक प्रश्न मनांत उभा राहातो. रूढीच्या बंधनांतून आपले विचार मुक्त करून घेतल्यानंतर, सडेतोडपणानें बुद्धीच्या जोरावर सगळ्या प्रश्नांचा विचार करण्याची संवय मनाला लावून घेतल्यानंतर, बळवंतरावांशीं पुनर्विवाह करण्यास सुशीला इतके आढेवेढे कां घेते? आणि अनेक दिवस त्याला आशेच्या धाग्यावर झुलवीत कां ठेवते? हीं प्रकरणें वाचतांना, 'सुशीलेचें सगळेंच चांगलें वाटतें,' असें बळवंतरावांनीं म्हटलेलें असलें तरी, तिच्या या अनिश्चयामुळें तिच्याविषयींची सहानुभूति थोडी कमी होते. "जगाचें कोडें उलगडेल पण हिच्या मनाचें कोडें उलगडणार नाहीं." असें सुनंदा म्हणे, तेंच खरें मानून हा प्रश्न इथेंच सोडावा.

सुशीलेच्या पात्रांत जो जिवंतपणा आहे तोच ह्या कादंबरींतील पुरुषपात्रांत आहे. गिरिधरराव व रावबा ह्या पात्रांच्या बाबतींत प्रतीकात्मक स्वरूप बरेंचसें कायम आहे. पण रावबाच्या स्वभावांतलें व विचारांतलें परिवर्तन दाखविल्यानें हें स्वरूप मागें पडून रावबा या व्यक्तीची ओळख होते. गिरिधररावांच्या बाबतींतहि तोच प्रकार दिसतो. भौतिकवादी व बुद्धिवादी गिरिधरराव आपले सगळे वाद विसरून आईचे दागिने विकण्यास निघालेल्या सुनंदास गहिंवरून "Don't talk of that, I cannot bear it" असें म्हणून त्याला आपण पैसे देऊं लागतात; तेव्हां वाटतें कीं ह्या सर्व वादांपाठीं गिरिधररावांचें मन प्रेमळ शिक्षकाचें आहे, पितृतुल्य प्रेमानें ओथंबलें आहे.

पुरुषापात्रांपैकीं उत्तम वठलेलें आणि मनांत आदर व जिव्हाळा उत्पन्न करणारें पात्र म्हणजे विनायकरावांचें–सुशीलेच्या वडलांचें. सुरवातीला ह्यांचें व्यक्तित्व लेखकाच्या मनांत अस्पष्ट व अमूर्त असें आहे, पण कथानकाच्या ओघांत त्यास सजीव आणि मूर्त स्वरूप आलें आहे. पुढच्या पिढींतल्या, आपल्या मुलीच्या वयाच्या तरुण मंडळींचा दृष्टिकोन समजून घेण्याचा त्यांचा प्रयत्न, सुशीलेवरचें त्यांचें प्रेम, महत्प्रयासें तिच्या पुरोगामी विचारांचें आकलन करण्याचे त्यांचे यत्न, त्यांनीं तिला दिलेलें उत्तेजन, तिच्याशीं व तिच्या मित्रांशीं बरोबरीच्या नात्यानें केलेली चर्चा, सत्यान्वेषणाची त्यांची दृष्टि, त्यांच्या भाषणांतला सूक्ष्म विनोद ह्यामुळें हें पात्र चांगलें वठलें आहे, आणि वाचकांच्या आदरास पात्र होत आहे. स्वतः लेखकाचें ह्या पात्राशीं साधर्म्य जाणवल्यावांचून राहात नाहीं.

'सुशीलेचा देव' ही कादंबरी वामन मल्हारांच्या 'ध्येय हाच देव' ह्या त्यांच्या लेखावर आधारलेली आहे असें निव्वळ कालानुक्रम लक्षांत घेतां म्हणतां येईल. पण लेखांतला सिद्धान्त इतक्या कुशलतेनें व कलात्मक रीतीनें कादंबरींत स्फुरला आहे कीं कादंबरीची मूळ कल्पना अशा प्रकारचा सिद्धांत आहे ही जाणीव वाचकाला होत नाहीं. उलट सुशीलेच्या जीवन-चित्रावरून एका विशिष्ट व्यक्तीच्या मनांत ईश्वराविषयक कल्पनांची कशी क्रान्ति झाली, ह्याकडेच लक्ष वेधतें. व्यक्ति व व्यक्तिविकास ह्यासच प्राधान्य मिळून मुळांतला सिद्धांत सजीव स्वरूपांत व्यक्तिजीवनांतच प्रतीत होतो.

ही कादंबरी म्हणजे प्रत्यक्ष जीवनचरित्र आहे, निव्वळ काल्पनिक कथा नाहीं हा आभास उत्पन्न करण्याचा जो यत्न लेखकानें केला आहे तो अत्यंत यशस्वी ठरला आहे. यासाठीं लेखकानें अनेक क्लृप्त्या योजिल्या आहेत. लेखकाने चरित्रकाराची भूमिका घेऊन स्वतःचेंच पात्र कथाप्रवाहांत मिसळलें आहे व आपण लिहिलेलें चरित्र नायिकेनें वाचून त्यावर टीपा लिहिल्या, जेथें आपल्या अंतर्मनाचा ठाव चरित्रलेखकाला लागला नाहीं असें तिला वाटलें तेथें आपल्या आत्मचरित्रांतला भाग उद्धृत करून त्याची जोड दिली आहे, असें सुचविलें आहे. वर्तमानपत्रांतले उतारे व संपादकीय स्फुटें दिलीं आहेत. ह्या क्लृप्त्यांनीं कथेंतील पात्रें वास्तवांतलींच आहेत असा आभास निर्माण होतो. आणि कथेला असा वास्तवाचा आधार मिळाल्यानें वाचक हें खरोखरीच चरित्र आहे ह्या भावनेनं कादंबरी वाचतो. कादंबरींतील प्रसंग व पात्रें संभवनीय असणें हें एकप्रकारचें अवश्य असणारें अंतर्गत सत्य आहे; पण त्याचबरोबर हे प्रसंग प्रत्यक्ष घडलेले

आहेत, व्यक्ति प्रत्यक्ष जीवनांत वावरत असतांना लेखकानें पाहिल्या आहेत हा एक अंतर्गत सत्यास पुष्टि देणारा वास्तवाचा आभास निर्माण केला आहे. अंतर्गत सत्याच्या अभावीं तो वास्तवाचा आभास उत्पन्न करण्याचा प्रयत्न हास्यास्पद ठरला असता, पण तें सत्य मुळांत असल्यानें ह्या क्लृप्तीनें त्यांत वास्तवाची भर मनाला पटेल अशाप्रकारें पडली आहे. मराठी कादंबरींत अशी योजना ही बहुतांशीं नवीनच होती, आणि वामन मल्हारांना ती वापरण्यांत एक विशिष्ट प्रकारचा आनंद वाटे हें उघड दिसतें. हा आनंद केवळ कलात्मकच म्हणतां येत नाहीं, पण एखादें गणित वा कोडें सोडवितांना वा कोडें तयार करतांना जो शुद्ध आनंद होतो त्याचप्रकारचा हा आनंद आहे. कादंबरीच्या वाचनांत वाचकहि त्या आनंदांत सहभागी होऊं शकतो.

ही प्रस्तावना कल्पनेबाहेर लांबली; प्रस्तावनेचें खरें कार्य सोडून परीक्षणाच्या मार्गांत शिरली. परंतु, सुज्ञ वाचक मूळ पुस्तक वाचून मगच आपलीं मतें ताडण्याकरितां प्रस्तावनेकडे वळतात व तीं चाळून पहातात ही पद्धत ध्यानांत आल्यानें, प्रस्तावनेमुळें वाचकाच्या रसग्रहणांत निदान अडथळा निर्माण होणार नाहीं इतका विश्वास वाटतो.

प्रस्तावनेचा शेवट रघुवंशांतील दुसऱ्या श्लोकांतूनच समर्पकपणें होईल :

क्व सूर्यप्रभवो वंशः क्व चाल्पविषया मतिः ।
तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ॥

तरीहि प्रकाशकांनीं मला प्रस्तावना लिहिण्याची संधि दिली व अत्यंत सौजन्यानें ती माझ्याकडून लिहून घेतली, याबद्दल मनापासून त्यांचे आभार मानतें.

मुंबई
ता. ८–७–५५

सुमा पाणंदीकर

# कै. वा. म. जोशी यांचें अल्प चरित्र

'रागिणी'कर्ते कै. वामन मल्हार जोशी हे कुलाबा जिल्ह्यांतील गोरेगांव येथील राहाणारे. त्यांचा जन्म कोंकणांत तळें तेथें २१ जानेवारी १८८२ रोजीं झाला. चार भावांपैकीं वामनराव हे सर्वांत धाकटे. सर्वांत थोरले कै. वासुदेवराव हे सावत्र बंधु असून गोरेगांव येथें भिक्षुकीचा व्यवसाय करीत. सख्या भावांपैकीं थोरले कै. महादेव मल्हार हे बालपणींच शिक्षणासाठीं बाहेर पडले व प्रथम अलिबाग व नंतर पुणें येथें विद्याभ्यासासाठीं येऊन राहिले. पुढें त्यांनीं आपले दोघे धाकटे बंधु रा. नारायणराव व वामनराव यांसहि पुण्यास आणिलें.

पुण्यास त्या काळीं 'न्यू प्रेपरेटरी क्लासेस्' या नांवाचे इंग्रजी शिक्षणाचे वर्ग कांहीं स्वार्थत्यागी मंडळींनीं चालविले होते. त्यांत वामनरावांचें माध्यमिक शिक्षण झालें. पुढें थोरले बंधु कै. महादेव मल्हार हे एम्. ए. होऊन अहमदनगर येथील हायस्कुलांत मुख्याध्यापक म्हणून गेले, व त्याच शाळेंतून १९०० सालीं वामनराव मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. या शाळेंत सेनापति बापट हे त्यांचे सहाध्यायी होते. पुढें पुण्यास डेक्कन कॉलेजांतहि ते वामनरावांचे सहाध्यायी असून दोघांचा अकृत्रिम स्नेह होता. डेक्कन कॉलेजांतून १९०४ सालीं वामनराव बी. ए. झाले, व त्या कॉलेजांत फेलो म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९०६ सालीं तत्त्वज्ञान विषय घेऊन ते एम्. ए. झाले.

शाळेंत व कॉलेजांत वामनराव बुद्धिमान विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. इंग्रजी, संस्कृत व तत्त्वज्ञान हे त्यांचे आवडीचे विषय होते. थोरले बंधु कै. महादेव मल्हार हे मॅट्रिकपासून एम्. ए. पर्यंत सर्व परीक्षांत संस्कृत विषयांत पहिले आले असून त्यांस अनेक बक्षिसें व शिष्यवृत्त्या मिळाल्या. ते वामनरावांसंबंधीं म्हणत, 'वामनाचें संस्कृत खरोखरी माझ्यापेक्षां चांगलें; पण त्याला एकहि बक्षिस किंवा स्कॉलरशिप मिळाली नाहीं; एक दोन मार्कांनीं बक्षिस जावयाचें; हें तरी काय दुर्दैव!' डेक्कन कॉलेजांत ते हुषार विद्यार्थी म्हणून गाजले त्याप्रमाणें उत्तम खेळाडू म्हणूनहि त्यांनीं नांव मिळविलें. कॉलेजांत असतांना टेनिसमध्यें त्यांनीं अजिंक्यपद मिळविलें होतें. टेनिसच्या खेळाची त्यांना विलक्षण आवड होती, व पुढील आयुष्यांतहि मिळाली तेथें टेनिस खेळण्याची संधि त्यांनीं गमावली नाहीं. उतारवयांतहि या खेळांतील त्यांची गति वाखाणण्यासारखी होती.

एम्. ए. झाल्यावर बऱ्या सरकारी नोकरीची संधी वामनरावांकडे चालत आली होती. प्रि. सेल्बी यांची वामनरावांवर फार मर्जी होती व पोस्ट खात्यांत सुपरिंटेंडेंटच्या जागेसाठीं ते त्यांची शिफारस करीत होते. सेल्बीसाहेबांचें सरकार-दरबारीं वजन मोठें. डेक्कन कॉलेजच्या कित्येक पदवीधरांस त्यांनीं मोठ्या नोकऱ्या लावून दिल्या होत्या. पोस्टल सुपरिंटेंडेंटच्या जागेबद्दल त्यांनीं वामनरावांस विचारलें होतें. परंतु राष्ट्रसेवेच्या कल्पनांनीं भारलेल्या वामनरावांनीं ती जागा नाकारली आणि ते कोल्हापुरास कै. अण्णा विजापूरकरांनीं चालविलेल्या 'समर्थ विद्यालया'स जाऊन मिळाले. तेथें असतांना कै. विजापूरकरांच्या 'विश्ववृत्त' या नियतकालिकांत संपादकाचें कामहि ते करीत असत. हें काम करीत असतांनाच दुसऱ्यानें लिहिलेल्या एका लेखाबद्दल संपादक या नात्यानें वामनरावांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना तीन वर्षांची कैद भोगावी लागली.

१९११ सालीं कैदेंतून सुटून आल्यावर पुढील सातआठ वर्षें वामनरावांस अत्यंत अस्थिरतेचीं गेलीं. राजद्रोहाची शिक्षा झालेल्या अनेक देशभक्तांस त्या काळीं आलेला बिकट अनुभव त्यांच्या वांट्यास आला. सरकारी नोकरी मिळण्याची तर आशाच नव्हती, परंतु खाजगी नोकरीहि मिळणें कठीण होऊन बसलें. 'केसरी–मराठा' संस्थेंत 'मराठा' पत्राचे उपसंपादक म्हणून त्यांनीं कांहीं काल काम केलें, परंतु तेथेंहि मतभेद उत्पन्न होऊन त्यांना राजीनामा देणें भाग पडलें. त्यानंतर मुंबईस कै. अच्युतराव कोल्हटकर यांच्या 'मेसेज्' या इंग्रजी पत्रांत ते संपादकाचें काम पाहूं लागले. परंतु तेथेंहि अच्युतरावांच्या अव्यवस्थित कारभारास कंटाळून त्यांनीं राजीनामा दिला. या सुमारास पुणें येथील श्री. कर्वे यांच्या महिला विद्यापीठांत त्यांची प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. यापुढें त्यांच्या आयुष्यास कांहींसें स्थैर्य आलें. या संस्थेंत त्यांनीं सुमारें २५ वर्षें काम केलें व मृत्यूपूर्वीं दोन वर्षें ते कॉलेजचे प्राचार्य म्हणून काम पाहात होते.

१९११ नंतरच्या हलाखीच्या काळांतच त्यांच्या लेखनास प्रारंभ झाला व त्यांचीं कित्येक उत्कृष्ट पुस्तकें याच काळांत लिहिलीं गेलीं. थोरले बंधु कै. महादेव मल्हार यांनीं 'केसरी'त लिहिलेल्या 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त' या लेखमालेस उत्तरादाखल 'एक जिज्ञासु' या नांवानें त्यांनीं शंका प्रसिद्ध केल्या, व दोघां बंधूंचा हा वाद त्या काळीं चांगला गाजला. ज्या 'रागिणी'नें त्यांना मराठी लेखकांच्या पहिल्या श्रेणींत आणून बसविलें, ती कादंबरी

याच काळांत 'मासिक मनोरंजनां'त प्रकरणशः प्रसिद्ध होऊं लागली, व तींतील खुसखुशीत संवादांनीं व नर्म विनोदानें त्यावेळीं मराठी वाचकांचें लक्ष वेधून घेतलें. वस्तुतः या कादंबरीचें स्वरूप काव्यशास्त्रविनोदात्मक संवादांचें होतें. सर आर्थर हेल्प्स् या ग्रंथकाराच्या 'Friends in Council' या ग्रंथाच्या धर्तीवर लेखन करण्याचा वामनरावांचा हेतु होता, व त्या दृष्टीनेंच त्यांनीं या ग्रंथास 'रागिणी अर्थात् काव्यशास्त्रविनोद' असें शीर्षक दिलें होतें. पुढें या संवादास कथानकाचें स्वरूप दिलें व त्यांचा कादंबरीग्रंथ होऊन पुढें दोन भागांत पुस्तक रूपानें तो प्रसिद्ध झाला. या कादंबरीनें मराठी कादंबरीवाङ्मयांत नवें युग सुरू झाल्यासारखें वाचकांस वाटलें; हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतील स्त्री घरगुती वातावरणांत वावरणारी, क्वचित् कामानिमित्त पडवींत पुरुषांच्या बैठकींत डोकावून जाणारी, व एकंदरींत इंग्रजी शिक्षणाच्या संस्कारापासून अलिप्त, अशी होती. वामनरावांच्या 'रागिणीं'त पुरुषांच्या बरोबर सहली काढणाऱ्या व क्वचित् त्यांस वादविवादांत नामोहरम करणाऱ्या उत्तरेसारख्या तरुण सुशिक्षित स्त्रिचें दर्शन घडल्याबरोबर स्त्रीजीवनांतील एक नवीन दृश्य आपण पहात आहोंत, असें महाराष्ट्रीय वाचकांस वाटलें. काव्यशास्त्रविनोदात्मक 'रागिणी'ची रचना कांहींशी विष्कळित असली तरी तींतील आकर्षक संवाद, नर्म विनोद, सूक्ष्म मनोविश्लेषण व गंगेसारखें पावन वातावरण, इत्यादि गुणसंनिपातांत तींतील दोष निमज्जन पावून वाचकवर्गांत या कादंबरीचें कल्पनेपलीकडे स्वागत झालें. 'रागिणी' कादंबरी युगप्रवर्तक ठरली. पुढील कांहीं वर्षांत या कादंबरीचीं गुजराती व हिंदी भाषांत भाषांतरें झालीं, यांवरून 'रागिणी'च्या लोकप्रियतेची कल्पना येईल.

'रागिणी'नंतर प्रसिद्ध झालेल्या 'आश्रमहरिणी', 'नलिनी', 'सुशीलेचा देव' व 'इंदु काळे आणि सरला भोळे' या कादंबऱ्यांनीं वामनरावांच्या कीर्तींत भरच घातली. या सर्वच कादंबऱ्यांत प्रत्यक्षपणें वा अप्रत्यक्षपणें तत्कालीन राजकीय, सामाजिक, नैतिक प्रश्नांची चर्चा आली असून त्यांत महाराष्ट्रीय स्त्रीच्या प्रगत जीवनाचें दर्शन घडविलें आहे. 'नवपुष्पकरंडक' हा त्यांच्या कथांचा संग्रह १९१६ सालीं प्रसिद्ध झाला. यांतील सर्वच कथा लघुकथेच्या तंत्रांत बसण्यासारखा नसल्या तरी त्यांत कल्पनावैचित्र्य, विचारविलास, खुसखुशीत नर्म विनोदात्मक संवाद, इत्यादि वामनरावांच्या लेखनशैलीचे सर्व गुण प्रकर्षानें आढळतात. 'स्मृतिलहरी' हें काल्पनिक आठवणीवजा पुस्तक

त्यांनीं अखेरीअखेरीस प्रसिद्ध केलें, तेंहि अत्यंत कोमल आहे. ' विस्तवाशीं खेळ ' या नांवाचें एक नाटकहि वामनरावांनीं लिहिलें होतें, परंतु रंगभूमीवर प्रयोग न झाल्यामुळें तें विशेष लोकप्रिय झालें नाहीं.

कथा कादंबऱ्यांव्यतिरिक्त वामनरावांचें इतर लेखनहि विपुल आहे. लो. टिळकांच्या ' गीतारहस्या 'वर 'A Gist of the Gita Rahasya ' या नांवाचें एक छोटेंसें पुस्तक त्यांनीं इंग्रजींत लिहिलें आहे. ' सॉक्रेटिसाचे संवाद', ' नीतिशास्त्रप्रवेश ' हे दोन ग्रंथ तत्त्वज्ञानात्मक आहेत. त्यांच्या विविध निबंधात्मक लेखांचे चार संग्रह ' विचार–विलास', ' विचारसौंदर्य ', ' विचार-विहार ' व ' विचारलहरी ' या नांवानें प्रसिद्ध झाले आहेत. यांत तात्विक विषयांवरील निबंधाव्यतिरिक्त कांहीं उत्कृष्ट ग्रंथपरीक्षणें आहेत. कोल्हटकरांच्या ' दुटप्पी कीं दुहेरी ' व प्रि. भाटे यांच्या ' प्रेम कीं लौकिक ' या कादंबऱ्यांचीं परीक्षणें मराठी भाषेंतील उत्कृष्ट ग्रंथपरीक्षणाचे नमुने म्हणून मान्यता पावलीं आहेत.

वामनरावांच्या वाङ्मयविषयक कामगिरीचा या ठिकाणीं यापेक्षां अधिक तपशीलवार परामर्ष घेणें स्थलसंकोचामुळें शक्य नाहीं. वामनरावांचें सारें आयुष्य तत्त्वचिंतनांत गेलें. त्या योगानें त्यांच्या समग्र वाङ्मयास तत्त्वचिंतनाची बैठक प्राप्त झाली आहे. त्यांच्या व्यक्तित्वांतील निरागसता, विशुद्ध भाव, चिकित्सक व न्यायी वृत्ति, अभिजात रसिकता, इत्यादि गुणविशेषांचा ठसा त्यांच्या प्रत्येक वाङ्मयकृतींत उमटला आहे. कुशल शिक्षक म्हणून वामनराव त्यांच्या विद्यार्थिनींत अत्यंत मान्यता पावले होते. हें त्यांचें अंग महाराष्ट्रीय जनतेस फारसें परिचित नाहीं.

ग्रंथकार या नात्यानें वामनरावांची योग्यता काय असेल ती असो, परंतु व्यक्ति म्हणून ज्या लोकांचा त्यांच्याशीं निकट संबंध आला, त्यांना वामनराव ही व्यक्ति त्यांच्या ग्रंथकृतींपेक्षां निःसंशय श्रेष्ठ होती, असाच प्रत्यय आला असेल.

वामनरावांची मूळची प्रकृति सुदृढ, परंतु पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांची काळजी घेणारें कोणी न राहिल्यामुळें, व कांहींसें त्यांच्या स्वतःच्या हलगर्जीपणानें शेवटीं कांहीं वर्षें त्यांची प्रकृति खालावली होती. जुलै १९४३ मध्यें प्रकृति नादुरुस्त असतां संस्थेच्या एका महत्त्वाच्या सभेसाठीं मुंबईस जात असतांना गाडींतच त्यांस मूर्च्छा आली. मुंबईस आल्यावर ते अंथरुणास खिळले, आणि

थोड्याच दिवसांच्या दुखण्यानंतर, मुंबईतील उत्तम डॉक्टरांचे उपचार चालू असतांहि, २० जुलै १९४३ रोजीं त्यांस देवाज्ञा झाली !

त्यांचे दोघे वडील बंधू, शाळेतील कांहीं शिक्षक व कॉलेजमधील त्यांचे कांहीं प्रोफेसर या सर्वांच्या सहवासाचे संस्कार तात्यांच्या स्वभावावर झालेले असून या सर्वांना त्यांच्या जीवनांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. ‘ माझ्यांत तुम्हांला जें कांहीं चांगलें दिसतें तें सर्व मला या सर्वांकडून मिळालें आहे.’ असें ते आपल्या विद्यार्थिनींशीं गप्पा मारतांना सांगत. तात्यांची आई १९११ सालीं, तात्या तुरुंगांतून सुटून येण्यापूर्वी चार महिने अगोदर, जुनागडला वारली. आपल्या आईची आठवण होऊन गहिंवरून येण्याचे कितीतरी प्रसंग तात्यांच्या सान्निध्यांत आलेल्यांच्या पाहाण्यांत आले आहेत. १९३० सालीं तात्या गोव्याला साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष असतांना तेथील मंडळींनीं त्यांची थाटाची मिरवणूक काढली. परंतु निवासस्थानांत आल्यावर आईच्या आठवणींनीं तात्या अश्रुविमोचन करीत असतांना कांहींजणांना दिसून आले. त्यांच्या एकसष्टी–समारंभाचे वेळीं पहिलें वाक्य आलें तें म्हणजे ‘ माझा हा मानसन्मान पाहायाला आज माझी आई असती तर–पण ! ’ हिंगण्याला यशवंत कवींचें काव्यगायन चालू असतांना ‘आई’ ही सुप्रसिद्ध कविता ते म्हणत होते. ‘वात्सल्य माउलीचें, आम्हां जगांत नाहीं, दुर्भाग्य या विना कां ? आम्हांस नाहिं आई’ हे हृदयाचा ठाव घेणारे शब्द यशवंतांच्या गळ्यांतून बाहेर पडल्याबरोबर तात्या तेथून बाहेर पडले व एका बाजूला येऊन रडूं लागले. त्यांचे मित्र ना. म. पटवर्धन यांनीं तें पाहिल्याबरोबर ते तेथें गेले, तेव्हां तात्या म्हणाले, ‘ कवीची कला असो, गायकाचें कसब असो, नाहीतर बालपणींच्या त्या रम्य आठवणी असोत, अजूनहि आपलं असं होतं खरं; बाकी आमची आई होतीहि तशीच प्रेमळ.’ आणि त्यांची आई होतीहि तशीच. व्यवहारांत दक्ष, मनाची प्रेमळ व वृत्तीनें त्यागी होती. पतिनिधनानंतर चार वर्षांनीं ती दहा-बारा वर्षांच्या तात्यांना घेऊन पुण्यास अण्णांकडे आली. शेवटीं १९०८ च्या सुमारास रत्नागिरीस तात्यांचे वडील बंधू नाना यांचेकडे असतांना तात्यांच्या खडतर शिक्षेची वार्ता ऐकून तिची कंबर खचली व पुढें जुनागडला अण्णांकडे ‘ वामन वामन ’ करीत तिनें प्राण सोडला.

आपल्या जीवनांत विशेष प्रेम करणारे तीन अण्णा आहेत असें तात्या नेहमीं म्हणत. पहिले अण्णा कर्वे, दुसरे अण्णा विजापूरकर व तिसरे अण्णा जोशी. शिक्षणाची सर्व जबाबदारी त्यांच्या बंधूंनीं–अण्णांनीं पत्करल्यामुळें त्यांना

त्यांचेविषयीं वाटणारा आदर व प्रेम वृद्धिंगत होणें अपरिहार्य होय. अण्णांचा भव्य देह, पोषाखाची जुनी पुणेरी पद्धत, बोलण्यांतील आवेश, संस्कृत, मराठी व इंग्रजी वाङ्मयाचा सखोल अभ्यास, सनातनी असूनसुद्धां सुधारकी बाणा, त्यागी वृत्ति, वगैरे कितीतरी गुण अण्णांमध्यें असल्यामुळें लोकांच्या मनावर त्यांची कायमची छाप पडत असे. त्यांचा बाणेदारपणा असा कीं एम. ए. पर्यंतच्या सर्व परीक्षांतील संस्कृतचीं सर्व पारितोषिकें त्यांना मिळालीं असतां व संस्कृतचे विद्वान प्राध्यापक असा सर्वत्र लौकिक असतांनासुद्धां त्यांनीं परीक्षकाचे जागेकरितां एकदांहि अर्ज केला नाहीं. अण्णांच्यासंबंधीं काकासाहेब कालेलकर म्हणतात, ' जुनागड येथें दोनदां त्यांच्या घरीं त्यांचा पाहुणा म्हणून मी राहिलों होतों. रसिकशिरोमणी महाकवि कालिदासाची मूर्ति कशी असेल, याचें कल्पनाचित्र जेव्हां जेव्हां मनामध्यें रेखाटण्याचा मीं प्रयत्न केला आहे तेव्हां तेव्हां त्या आदर्शभूत गृहस्थाश्रमी व सात्विक महादेव मल्हारांच्या मूर्तीशीं तिचें साम्य असल्याचें माझ्या ध्यानांत आलें आहे.' अण्णांच्या स्वभावाचें वर्णन इतक्या विस्तारानें करण्याचें कारण कीं, अण्णांचा स्वभाव व जीवन समजल्याशिवाय तात्यांच्या थोड्याशा विचित्र जीवनाचें योग्य आकलन नीटसें होत नाहीं. तात्यांना पुढें लौकिक मिळाला त्याचें बरेंचसें श्रेय अण्णांना आहे, हें विसरून चालणार नाहीं.

अ. प. जोशी

ग्वाल्हेर

# प्रकाशकाचे चार शब्द

‘ रागिणी ’नंतर अवघ्या सहा महिन्यांतच कै. वामन मल्हार जोशी यांची ‘ सुशीलेचा देव ’ ही कादंबरी प्रसिद्ध करतांना आम्हांस एक विशेष आनंद होत आहे. या दोन कादंबऱ्यांच्या लेखन-कालांत सुमारें एक तपापेक्षां अधिक काळ लोटला होता. त्यामुळें ‘ रागिणी’पेक्षां ‘ सुशीलेचा देव ’ अधिक कला-त्मक झाली आहे, हें स्पष्ट दिसतें. तसेंच रचनेच्या सफाईपेक्षांहि या कादंबरींत वामन मल्हारांच्या मतांचा कांटेकोरपणा अधिक आढळून येतो. याला कारण एक तपाचें चिंतन हें तर आहेच, परंतु ‘ रागिणी’च्या वेळची जीवनाची अस्थिरता ‘ सुशीलेच्या देवा ’चे वेळीं नव्हती, ही गोष्ट मुद्दाम लक्षांत घेतली पाहिजे. दोन्ही कादंबऱ्या क्रमशः प्रसिद्ध झालेल्या, पण लेखकाच्या जीवन-स्थितींतील फरकानें दोहोंत सर्वच दृष्टींनीं कितीतरी फरक आढळतो.

वामन मल्हारांच्या साहित्याला पुरस्कार–प्रस्तावना यांची आवर्जून जोड देण्याचें ‘ रागिणी’चे प्रकाशनाचे वेळीं आम्हीं ठरविलें. ही योजना रसिक टीकाकारांस मान्य झाल्याचें दिसतें. ‘ सुशीलेचा देव ’ ही कादंबरी अनेक वेळां विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत नेमली जाते. या आवृत्तीचे वेळीं तिचा ‘ पुरस्कार ’ महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भारतांत विचारवादी धर्मज्ञ म्हणून नाणावलेले **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** यांनीं मार्मिक व मूलग्राही शैलीनें केला आहे. खरोखरच ‘सुशीला’ भाग्यवान् समजावयास हवी असा हा योग **प्रि. कु. पाणंदीकर** यांच्या प्रस्तावनेनें द्विगुणित झाला आहे. कु. पाणंदीकरांच्या विस्तृत व रसोद्ग्राही वाचनाचा व अनुभवाचा मराठी साहित्यास व्हावा तसा फायदा झालेला नाहीं. अनेक निकडीचीं कामें पाठीं असतांहि कु. पाणंदीकर यांनीं मार्मिक प्रस्तावना लिहून दिली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. तर्कतीर्थ जोशी यांनीं, विशेष अगाऊ सूचना नसतांहि, पुरस्कार लिहिण्याचें मान्य केलें व कल्पनेबाहेर जलद तो आम्हांस पोंचविला–त्यांचे आभार मानणें कठीण आहे. वामन मल्हारांची साहित्यसेवा एवढी मोलाची आहे, कीं त्यांच्याच पुण्याईनें ‘ सुशीलेचा देव ’ पुरस्कार व प्रस्तावना मिळविण्यांत अपक्षेबाहेर यशस्वी ठरला.

वामन मल्हारांच्या साहित्याची चिकित्सा आजवर पुष्कळच झाली आहे. त्यांच्या तत्त्वज्ञान आणि साहित्यगुणांचा गौरवहि झालेला आहेच. परंतु वामन मल्हारांच्या

साहित्यांत आढळणारी राजकीय चर्चा व त्याबद्दलची त्यांची एकंदर बैठक विशेष चर्चिलेली आढळत नाहीं. जुन्या पिढींतील तत्त्वज्ञ जीवनाच्या सर्वांगांचा मूलगामी अभ्यास व चिंतन करीत, आणि राजकारण हें जीवनाचें महत्त्वाचें अंग असल्यानें तत्त्वज्ञांची राजकारण-चर्चा अधिक मूलगामी व प्रभावी असे. आपले तत्त्वज्ञानी उपराष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् आणि वामन मल्हार यांची तुलना कित्येकांना अवास्तव वाटेल, पण वामन मल्हारांची 'सुशीलेचा देव' ही कादंबरी साहित्य आणि तत्त्वज्ञान यांचा पगडा बाजूस सारून वाचणारास मात्र त्यांत अतिशयोक्ति वाटणार नाहीं. वामन मल्हारांच्या साहित्याची अशी चर्चा व समीक्षा आतां व्हावयास हवी.

प्रस्तुतच्या ५ व्या आवृत्तीचे प्रकाशनाची संधि दिल्याबद्दल श्री. ग. वा. जोशी, परिचय-लेखक प्रा. अ. म. जोशी, तसेंच प्रा. स. गं. मालशे, प्रा. द. के. केळकर, 'यशवन्त' मासिकाचे संपादक श्री. गो. वा. पाध्ये यांचे आम्हीं अत्यंत आभारी आहों. नेहमींच्या लौकिकाप्रमाणें, छपाईचें काम योग्य मुदतींत व उत्कृष्ट करून दिल्याबद्दल रामकृष्ण प्रेसचे मालक श्री. बाबूराव सापळे व फोरमन श्री. बाळ वेतकर, पुस्तकाच्या अंतरंगाला साजेशी वेष्टनाची सुंदर सजावट करून दिल्याबद्दल चित्रकार श्री. वि. आ. बुवा या सर्वांचे आम्ही आभारी आहों.

—प्रकाशक

— मराठी साहित्याचें एक अनमोल लेणें —

काल्पनिक सुखसंवादांच्या सृष्टींतून,
प्रत्यक्षांतील काव्य-शास्त्र-विनोदाच्या प्रांगणांत
मराठी कादंबरीला मानाचें स्थान मिळवून देणारी

कै. वामन मल्हार जोशीकृत

# रागिणी

अथवा

## काव्य–शास्त्र–विनोद

आवृत्ति ५ वी, पृष्ठसंख्या ५६८

पुरस्कार : बाळ गंगाधर खेर
प्रस्तावना : प्रा. ह. रा. दिवेकर
जीवन-परिचय : प्रा. अ. म. जोशी

किंमत ७ रु., ट. ख. निराळा

बलवन्त पुस्तक भाण्डार, मुंबई ४

कै. वा. म. जोशी

यांची

# ग्रंथ–संपदा

– कादंबऱ्या –

रागिणी

नलिनी

सुशीलेचा देव

आश्रमहरिणी

इंदू काळे–सरला भोळे

नव-पुष्पकरंडक ( कथा )

– लेख –

विचारसौंदर्य

विचारविलास

विचारविहार

विचारलहरी

स्मृतिलहरी

नीतिशास्त्र प्रवेश

सॉक्रेटिसाचे संवाद

विस्तवाशीं खेळ ( नाटक )

– शालेय –

वाङ्मयमाला : १–२

Gist of Gita Rahasya



प्रा. वामन मल्हार जोशी, एम्. ए.

जन्म — २१ जानेवारी १८८२

मृत्यु — २० जुलै १९४३

# सुशीलेचा देव

## १ : शहाण्यांना वेड लावणारें कोडें

सुशीला ही खरोखरीच सुशील ( चांगल्या शीलाची ) आहे किंवा नाहीं हें मला सांगतां येत नाहीं. 'सुशीला' याचा कोशांतला किंवा व्यवहारांतला अर्थ समजणें सोपें आहे; पण तत्त्वतः तो अर्थ निश्चित करणें जरासें कठीणच आहे. तिच्याविषयीं लोकापवाद पुष्कळ होते व आहेतहि. कांहीं लोक तिला 'चटक-चांदणी' म्हणतात; पण तिच्या पतीला तिचें तेज व पावित्र्य हीं आकाशांतल्या चांदण्यांना लाजवतील इतकीं दिव्य आहेत असें वाटतें. कुचेष्टेखोर लोक तिला 'दिव्य'च म्हणतात. पण निराळ्या अर्थानें ! तिचें बोलणें मित्रांना मार्मिक वाटतें; पण तेंच तिच्या शत्रूंना मर्मभेदक वाटतें. तिचें मन फार मोठें आहे–आकाशापेक्षांहि विशाल आहे–असें तिच्या चाहत्यांनीं म्हटलें, कीं तिचे दूषक व निंदक लगेच म्हणतात, कीं " खरें आहे; तिच्या मनोरूपी आकाशांत एकच नव्हे, तर अनेक चिमणे व अनेक राजहंस विहार करतात; तेव्हां मन 'मोठें' आहे खरेंच ! " लपंडाव, लपवाछपवी, छक्केपंजे, सोंगढोंग, तिला कांहीं ठाऊक नाहीं असें तिच्या मनाचा ठाव घेणारा तिचा एक चाहता म्हणतो; मस्तानीच्या गोरेपणाविषयीं जसें म्हटलें आहे, कीं 'तिनें विडा खाल्ला तर खाल्लेल्या विड्याचा लाल रंग तिच्या गळ्यांतून उतरतांना कातडींतून बाहेर दिसत असे' तसेंच हिचे मनोविकार हिच्या चेहऱ्यावर तात्रडतोब स्पष्ट उमटतात, इतकें तिचें मन शुद्ध व निष्कपटी आहे असें तिच्या मित्रांना व भक्तांना वाटतें; पण कांहीं लोक तिला मस्तानीचीच पण निराळ्या भावनेनें उपमा देतात ! हल्लींच्या 'सुशिक्षितां'ची व त्यांच्या 'सुशिक्षणा'ची ती कित्येक वेळां चेष्टा करते; जन-सेवा–व्रताची व असल्या व्रतनिष्ठ लोकांचीहि ती बाकी ठेवित नाहीं; जगांतील धर्मांची व धर्मतत्त्वांची, नीतिनिष्ठेची व नीति-कल्पनांची, विद्येची व

विद्वत्कीर्तींची ती कुचेष्टा करते. तथापि कांहीं धर्मनिष्ठ, नीतिनिष्ठ, विद्याभिमानी विद्वान् व विदुषीहि तिला मान देतात. तिचे अगदीं जवळचे नातलग म्हणतात, कीं " ही डोकींतली ऊ द्यायची नाहीं फुकटची, ही कसली समाजसेवा करते आहे ? सगळीं सोंगं आहेत झालं ! " पण याच्या उलट आपला जीव व कीर्ति हीं धोक्यांत घालून एका प्रकरणांत तिनें उत्साहातिरेकानें फसलेल्या तरुणाला शिताफीनें वांचविलें अशी एक आख्यायिका तिच्यासंबंधानें ऐकण्यांत येते. सारांश, सुशीला म्हणजे एक कोडें आहे.

" जगाचें कोडें एक वेळ उलगडेल, पण हिच्या मनाचें कोडें उलगडणार नाहीं " असें सुनंद नांवाचा तिचा एक मित्र व भक्त एखादे वेळेस जें म्हणतो तेंच खरें दिसतें. पण मत निश्चित ठरविण्यापूर्वी ती कोण, कुठली, तिनें काय केलें, इत्यादि हकीगत आमूलाग्र आपण ऐकूं या. सुदैवानें तिच्या अगदीं बालपणापासूनची इत्थंभूत माहिती सुनंदादि तिच्या मित्रांकडून व तिच्याकडून या लेखकाला मिळाली आहे; तिनें जें ' आत्मचरित्र ' अंशतः लिहिलें आहे तेंहि त्याला वाचावयास मिळालें आहे; शिवाय या लेखकानें लिहून काढलेला भाग छापण्यास देण्यापूर्वी सुशीलेनें वाचलेला व जागोजाग दुरुस्त केलेला आहे; तेव्हां हें चरित्र बरेंच विश्वसनीय आहे असें मानण्यास हरकत नाहीं. सुशीलेनें लेखकाच्या हस्तलिखित प्रतींतच फक्त लेखकानेंच वाचावेत म्हणून कांहीं शेरे मारले आहेत व कांहीं टीपा दिलेल्या आहेत, त्यांपैकीं कांहीं ( तिची परवानगी आहे असें समजून ) पुढें देण्यांत येणार आहेत. या सर्वांवरून सुशीलेविषयीं वाचकांनीं आपआपलें मत ठरवावें. एक लहानशी गोष्ट मात्र ध्यानांत ठेवावी; ती ही, कीं पुढील गोष्टींतील नांवें गांवें बदललीं आहेत. कां बदललीं आहेत हें प्रौढ वाचकांना सांगावयास नकोच.

---

## २ : बाल–नायिका

या गोष्टींतील नायिकेच्या चरित्रांतील पहिला वर्णन करण्यासारखा प्रसंग एके दिवशीं दुपारीं चार वाजतां घडला. 'सकाळची वेळ' किंवा 'संध्याकाळची वेळ' अशा प्रकारचा आरंभ करतां आला असता तर बरें झालें असतें, म्हणजे मग हंसत हंसत येणाऱ्या उषादेवीचें किंवा 'लाल लाल' झालेल्या

सूर्याचें वर्णन करतां आलें असतें व सूर्य किंवा उषा किंवा संध्यादेवी रागावल्या-मुळें किंवा रुसल्यामुळें किंवा लज्जित झाल्यामुळें किंवा अनुरक्त झाल्यामुळें त्या वेळीं जो रक्तिमा ह्यांपैकीं कोणाच्या तरी गालांवर दिसतो त्यासंबंधीं उत्प्रेक्षादिक अलंकारांनीं युक्त असें वर्णन करण्याची संधि मिळाली असती!

ठराविक पद्धतीप्रमाणें सृष्टिदेवतेचें वर्णन करण्याची सुसंधि मिळाली नाहीं तर नाहीं; आपण आपल्या सुशीलेचेंच वर्णन करूं या. ती या वेळीं बागेंत बसली होती. तिच्याभोंवतीं तीनचार पुरुषजातीय व्यक्ति होत्या. पण ती लाजत नव्हती. तेव्हां आतां वर्णन करणाऱ्यावर मोठा बिकट प्रसंग आला म्हणावयाचा! ती पदर सांवरीत नव्हती, कारण त्या वेळीं तिला पदरच नव्हता; परकरहि नव्हता. ती त्या वेळीं दहा-अकरा महिन्यांची लहानशी मुलगी होती. तिचे केंस सरळ होते का कुरळे होते हें अद्यापि निश्चित नव्हतें; पण विसकटलेले होते हें खचित. ते अर्थात् काळे होते, पण धुरळा पडून ते अनिर्वर्णनीय भुरकट रंगाचे झाले होते हें सत्यकथनार्थ सांगितलें पाहिजे. तिचें नाक सरळ रेखीव होतें; पण ती अद्यापि एखाद्या कादंबरीची नायिका पूर्णत्वानें तरी झाली नसल्यामुळें हें कबूल करण्यास हरकत नाहीं, कीं तें गोरेंपिवळें नाक काजळ लागल्यामुळें अंशतः काळें झालें होतें व साळुंकीच्या काळ्यापिवळ्या तोंडाची आठवण करून देत होतें. ओंठ गोष्टीच्या वर्णनापुरतेच नव्हे, तर खरोखरच लाल होते; कारण तिच्या वडिलांनीं तिला नुकताच तोंडांतला विडा भरविला होता! तिच्या मुखरसामुळें ओंठाच्या खालचा डावीकडला भाग व सगळी हनुवटी लालसर होऊन लालरंगी खालसा दक्षिण हिंदुस्थान व पिवळी निजामशाही यांचा तेथें लहानसा नकाशाच दिसत होता. नायिकेच्या डोळ्यांत 'एक प्रकारचें पाणी' असलेंच पाहिजे आणि अर्थात् तिच्याहि डोळ्यांत होतेंच. पावसाचें पाणी असतें त्या प्रकारचेंच, पण किंचित् क्षारयुक्त एवढेंच; कारण ती त्या वेळेस थोडीशी रडत होती! ओंठा-खालच्या भागाला नुकतेंच दक्षिण हिंदुस्थान म्हटलें, तेव्हां वरच्या भागाकडे उत्तर हिंदुस्थान आलेंच. डोळ्यांपासून उगम पावलेल्या गंगा-यमुना यांपैकीं फक्त यमुनाच काळी होती असें नव्हे, तर गंगाहि काजळामुळें काळी झाली होती. सरस्वती नदी या उत्तर हिंदुस्थानांत कोठें तरी गुप्त होऊन नासिकाक्षेत्रीं दोन द्वारांनीं प्रादुर्भूत झाली होती व तेथें गंगायमुनांचा व तिचा जो त्रिवेणीसंगम झाला होता, तो काशींतील वगैरे डबकेवजा तीर्थासारखाच शुद्ध होता असें

म्हणण्यास हरकत नाहीं. तिच्या अंगावर वस्त्र नव्हतें हें वर सांगितलेंच. अलंकार मात्र दोनतीन होते. गळ्यांत एक ताईत, केसांत गुंफलेलें व कपाळावर लोळणारें एक पिंपळपान आणि कानांत दोन सुंकलीं. नाकांत अद्यापि कांहीं नव्हतें; हातांत बांगडीदेखील नव्हती; पायांत मात्र चांदीचे वाघऱ्यांचे वाळे होते.

अशा या आपल्या बालनायिकेला मागील दाराच्या अंगणांतील तुळशी-वृंदावनाजवळ बसवून बाळू, सुनंद व रावबा या नांवाचे तीन मुलगे तेथल्याच जवळच्या लहानशा बागेंत बकुळीचीं वगैरे फुलें वेंचीत होते. बाळूनें कांहीं बकुळीचीं फुलें तिच्या चिमुकल्या हातांत दिलीं व तिला कडेवर घेऊन तुळशी-वृंदावनांतील तुळशीजवळ नेलें आणि 'देवबाप्पा' म्हटलें. त्याबरोबर तिनें तीं फुलें तुळशीवर टाकलीं व दोन्ही हात जोडून कपाळाजवळ नेले. तिला घेऊन तो मग इतर मुलांकडे गेला. पुन्हां तिच्या त्या नमस्काराचें कौतुक करण्याकरितां तो "देवबाप्पा कर" म्हणाला; त्याबरोबर तिनें पुन्हां हात जोडून त्यालाच नमस्कार केला. इतक्यांत रावबा तेथें आला आणि त्यानें "देवबाप्पा" म्हटलें तेव्हां पुन्हां तिनें हात जोडून त्याला नमस्कार केला. पुन्हां सुनंदानें 'देवबाप्पा' म्हटल्याबरोबर तिनें बाळूलाच नमस्कार केला. अशा रीतीची नमस्काराची ही कसरत पाहून त्या लहान मुलांना व तिलाहि किती तरी आनंद होत होता व तिची आई मागील दाराच्या ओटीवरून तें आपल्या मुलीचें होत असलेलें कौतुक पाहून आनंदित होत होती. पण बाहेरून तिनें बाळूला हांक मारून "पुरे झालं रे हें तुझं कौतुक. एकसारखं काय मेलं तेंच तेंच!" असें म्हटलें.

हें बोलणें बाळूला थोडेंसें लागलें. त्याची कांहीं ती सख्खी बहीण नव्हती किंवा नातलगहि नव्हती. केवळ शेजारच्या बिऱ्हाडांतील आवडती मुलगी म्हणून तो तिला घ्यावयाचा. पण त्याचें नशीब असें खडतर होतें, कीं त्यानें घेतल्यावर कांहीं वेळानें कांहीं तरी होऊन ती रडूं लागली,कीं तिच्या रडण्याची त्याच्यावरच जबाबदारी यावयाची व त्यालाच बोलणीं बसावयाचीं! आजच्या विशिष्ट प्रसंगीं सुशीला रडत नव्हती, उलट आनंदांत होती, तरी तिच्या आईकडून त्याला, सौम्य व बाह्यात्कारी अशा रागानेंच कां होईना, पण बोलणें बसलेंच. एकेकाचें नशीबच असें असतें. अस्तु.

बाळूला त्या वेळीं फुलें वेंचावयाचींच होतीं, म्हणून त्यानें त्या बालिकेला तुळशीवृंदावनाजवळ भूमातेच्या अंकावर ठेविलें व इतरांप्रमाणेंच तो फुलें वेंचूं

लागला. कांहीं वेळानें रावबा म्हणाला, " बाळू, आपण विटीदांडू खेळूं या." सुनंद व बाळू " आतां नको, सुशीलेला विटी लागायची एखाद वेळेस " असें म्हणून खेळण्याचें नाकारूं लागले; पण रावबाचा विशेष आग्रह पडल्यामुळें त्याचें मन त्यांना मोडवेना; व मग, सुशीलेला विटी न लागेल अशा रीतीनें तिला वृंदावनाच्या आड ठेवून, ते खेळूं लागले. लहानसेंच मागीलदार, त्यांत पुन्हां दोहों बाजूला थोडीशी बाग, पण त्या सात-आठ वर्षांच्या आंतबाहेरील बालकांना तेवढीच ती जागा विटीदांडूला पुरत होती! रावबाला एक पिऱ्या दिला व सुनंद आणि बाळू एका बाजूला झाले. रावबानें प्रथम कोललें व त्याची विटी झेलली गेली. लगेच तो म्हणाला, " हा डाव देवाचा ! " सुनंदाला हें आवडलें नाहीं. पण एवढ्यातेवढ्याकरितां भांडण नको म्हणून " हा डाव देवबाप्पाला " असें म्हणून तो सुशीलेकडे पाहून हंसला. 'देवबाप्पा' शब्द ऐकल्याबरोबर सुशीलेनें नमस्काराची कसरत केली व सगळ्यांना हंसविलें. रावबानें पुन्हां कोललें व डाव मग हळूहळू रंगला. रावबानें पिऱ्याचे धरून ८७ झक्कू केले. बाळूचे व सुनंदाचे ८९ झाले होते. १००ची कावड होती; म्हणजे १०० कोण आधीं करतो हें पाहावयाचें होतें. डाव रावबाचा होता. त्यानें जोरांत येऊन एक बारणी जी घेतली ती दैवदुर्विपाकानें सुशीला जराशी रांगत रांगत बाजूला सरली होती, तिला लगली. तिनें अर्थात् भोकाड पसरलें. हें पाहून रावबा जो पळाला तो शेजारच्या आपल्या घराच्या गच्चीवर जाऊन बसला. सुशीलेची आई घरांत केर काढीत होती ती तशीच केरसुणी हातांत घेऊन बाहेर आली व प्रथम सुशीलेला कडेवर घेऊन 'काय झालं, कुणीं मारलं' म्हणून तिला विचारूं लागली. ती काय उत्तर देणार ? तिला बोलतां तरी येत होतें कुठें ? सुनंदानें घडलेली खरी हकीगत सांगितली, तेव्हां लक्ष्मीबाई प्रथम " कोठें आहे तो रावबा ?" म्हणाल्या; पण तो नापत्ता झालेला पाहून ती क्रुद्ध माता बाळू व सुनंद यांवरच तोंडसुख घेऊं लागली! " तरी मी म्हणत होतें, कीं बाळू, तूं तिला घेऊं नकोस. बरं, घेतली तर घेतली, चांगली सांभाळावी कीं नाहीं ? पण तेंहि नाहीं. तिला जवळ ठेवून विटीदांडू खेळायचा ! मेल्यांचा एकसारखा विटीदांडू चालतो. आण पाहूं तो दांडू, जाळून टाकतें नाहीं तर तुझ्याच पाठींत मारतें. बोलणाराचं तोंड दिसतं, पण हा सुनंदा नंद्या आहे नुसता ! आणि हा बाळ्या त्याच्या संगतीला लागून वकट लेंड करीत असतो. शेजाऱ्यांशीं पोरांवरून भांडूं नये, पण असलीं हीं पोरं शेजारीं असलीं तर मग भांडावं नाहीं तर काय करावं ?..." इत्यादि, इत्यादि.

सुशीलेला चिटी थोडीशीच लागली असेल; पण हीं बोलणीं बाळूला व सुनंदाला फार लागलीं. तीं मुलें चोरट्यासारखीं तेथें उभीं राहिलीं होतीं. इतक्यांत सुशीलेचे वडील विनायकराव तेथें आले व "काय झालें सुशीलेला?" असें म्हणून तिला त्यांनीं युक्तीनें क्षणार्धांत उगी केलें आणि "देवबाप्पा कर, देवबाप्पा कर" असा प्रेमळपणें आग्रह करूं लागले. लगेच तिनें 'देवबाप्पा' केला. सुशीला उगी झालेली पाहून बाळू व सुनंद हे आनंदले. सुशीलाहि त्यांच्या-कडे आतां आनंदित मुद्रेनें पाहूं लागली. पण लक्ष्मीबाईच्या बोलण्यानें त्या मुलांना तिच्याकडे जाण्याची चोरीच वाटूं लागली. ते तेथून अंग काढून घेऊन घरांत जाऊं लागले, इतक्यांत घराच्या गच्चीवरून 'अंहंहं, अंहंहं' असें खांकरून रावबा 'देवबा-आ-आ-प्पा' असें लांब हेल काढून कुचेष्टेच्या विकृत स्वरानें व मोठ्यानें ओरडला. विनायकराव व लक्ष्मीबाई वळून त्याच्याकडे पाहाणार, इतक्यांत तो भिंतीच्या आड खालीं बसला. कोणी दिसत नाहीं म्हणून विनायकरावांनीं आणि लक्ष्मीबाईनीं तोंड फिरविल्यावर पुन्हां रावबा डोकें हळूच वर करून 'देवबाप्पा' असें लांब हेल काढून ओरडला. त्याबरोबर सुशीलेनें बिचारीनें कसरतींतल्या माकडाप्रमाणें हात जोडून नमस्कार केला. विनायकरावांना रावबाचा राग आला होता; पण स्वतःच्या पोरीचा तो अप्रासंगिक 'देवबाप्पा' पाहून त्या रागावलेल्या स्थितींतहि त्यांना हंसूं आलें व लक्ष्मीबाई रागावल्या होत्या त्याहि शांत झाल्या! बाळू व सुनंदा यांना अगदींच चोरट्यासारखें झालें होतें तें आतां जाऊन तेहि सुशीलेकडे अर्धस्फुट स्मितदृष्टीनें पाहात आपआपल्या बिन्हाडीं गेले. रात्रीं त्यांना सुशीलेच्या 'देवबाप्पा'चीं व रावबाच्याहि 'देवबा-आ-आप्पा'चीं स्वप्नें पडलीं असल्यास नवल नाहीं. वाचकहो, आपणहि आपआपल्या 'देवबाप्पा'चें स्मरण करून या बालनायक-नायिकांचें पुढें काय झालें असेल याचीं काल्पनिक चित्रें रंगवीत क्षणभर विसांवा घेऊं या.

---

## २ : स्पेन्सर म्हणतो, "........"

"अहो विनायकराव, या सुशीलेला दुसरा वाढदिवस म्हणून परकर नेसवला आहेत, तसं पोलकंहि कां नाहीं घातलंत? आमच्या रावबाला मी नाहीं कधीं उघडा राहूं देत."

"घालील तिची आई. माझं कांहीं लक्ष नसतं इकडे." सुशीलेचे वडील—विनायकराव—म्हणाले, "आणि खरंच सांगायचं, म्हणजे एवढ्या लहानपणीं पोलकीं करावयाचीं आहेत काय मुलांच्या अंगावर सदोदित ?"

"काय करायचीं आहेत म्हणजे ?" गिरिधरराव आश्चर्यानें उद्गारले, "तुम्ही बी. ए., एलएल्. बी. आहांत, तुम्हीं स्पेन्सरचं Education (शिक्षण) हें पुस्तक वाचलं नाहींत ?"

"वाचलं आहे; त्याचा इथं काय संबंध ?"

"स्पेन्सर म्हणतो..." गिरिधरराव मोठें गहन तत्त्व आपण सांगत आहोंत अशा अभिमानपूर्ण आविर्भावानें म्हणाले, "स्पेन्सर म्हणतो, कीं लहान मुलं जें अन्न खातात त्याचा त्यांना तीन प्रकारचा उपयोग होतो. एक जठराग्नीला खाद्य देऊन शरीराला उष्णतेचा पुरवठा करणं; दुसरा, नवीन हाडं, स्नायु वगैरे वाढण्याला द्रव्यं पुरवणं; आणि तिसरा, श्रमामुळं जीं द्रव्यं नष्ट झालेलीं असतात तीं पुन्हां उत्पन्न करणं."

"आहे, हें मला ठाऊक आहे," विनायकराव शांतपणें म्हणाले.

गिरिधरराव देशपांडे हायस्कूलचे हेडमास्तर; हे त्यांच्या परिचयाचे नुकतेच झाले होते. पण गिरिधररावांना स्पेन्सरच्या आधारें वेळीं अवेळीं फार बोलावेंसें वाटत असे व साधीं तत्त्वें मोठीं गहन तत्त्वें आहेत अशी आपली कल्पना करून घेऊन तीं लोकांना पटवून देणें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें ते मानीत असत, हें त्यांना थोडक्याच दिवसांच्या संगतींत कळून आलें होतें. तेव्हां त्यांची थोडी मौज करावी व आपलीहि वादविवादाची खुमखुमी जिरवावी म्हणून ते त्यांना चिडविण्याकरितां शांतपणा स्वीकारून व सुशीलेला जवळ ओढून मांडीवर घेऊन पुढें म्हणाले, "तुमच्या स्पेन्सरनीं सांगितलेल्या अन्नाच्या तीन उपयोगांची आतां उजळणी झाली; पण या सुशीलेनें आतां उकडत असतां पोलकं घालावं, असं त्यांत कुठं तत्त्व आलेलं आहे ?"

"तें कसं येतं तें सांगतों, ऐका. कपडे घातले तर शरीरांतली उष्णता बाहेर न जातां तिचं संरक्षण होतं आणि उष्णतारक्षणाचं अन्नाचं तेवढं कार्य झाल्यामुळं अन्न त्या मानानं कमी लागतं."

इतक्यांत बाळू तिथें आला व सुशीलेच्या व इतरांच्या हातांत पेढे देऊन

" हे सुशीलेच्या वाढदिवसाकरितां तिच्या आईनं दिले आहेत " असें म्हणून परत घरांत गेला. सुशीलेनें थोडासा पेढा खाल्ला व तेवढ्यानेंच तिचे गाल फुगले व लाळ गळूं लागली. लाळ पुसून विनायकराव म्हणाले, " अन्न कर्मी लागावं म्हणूनच कपडे घालावेत असं म्हणणं असेल, तर सुशीलेला अन्न वांच-विण्याच्या बाबतींत इतकी बारीक काटकसर करण्याची जरूर नाहीं."

" तिला जरूर नसली म्हणून काय झालं ? दुसऱ्यांना उदाहरण घालून देण्यासाठीं तुम्हीं कपडे घातले पाहिजेत. मी तर धंदेवाईक शिक्षक आहें; पण तुमच्यासारख्यांचीं उदाहरणं देखील शिक्षणाचं कार्य अप्रत्यक्षपणें करतात, हें दिसण्यांत साधं पण लोकांच्या ध्यानांत न येणारं तत्त्व तुमच्यासारख्यांनीं विस-रून कसं चालेल ?" " वाक्य उच्चारतांना आपल्या हेडमास्तरकीचं सार्थक झालं व शिक्षक ही व्यक्तिदेखील वकिलांसारख्यांवर मात करूं शकते आणि शिक्षणाचें पवित्र व समाजोपयोगी कार्य करणारा हेडमास्तर हा कांहीं सामान्य महत्त्वाचा प्राणी नव्हे अशी विनायकरावांची खात्री करून दिली, या विचारपरंपरेनें गिरिधररावांना क्षणभर धन्यता वाटली. पण ही धन्यता फार वेळ टिकली नाहीं; कारण विनायकराव वकील लगेच म्हणाले, " पण आतां दहा वाजतां उकडत असतां सृष्टिनियमांविरुद्ध कपडे घालणं चांगलं का ? तुमचा स्पेन्सर तर सृष्टि-नियमांना वेदवाक्यांहून–बायबलवाक्यांहून–अधिक महत्त्व देतो. समाजाचे कृत्रिम नियम त्याला मुळींच पसंत नाहींत. आमची सुशीला साक्षात् निसर्ग-देवता आहे. तिला थंडी वाजायला लागली म्हणजे ती कपडे मागते, उकडायला लागलं म्हणजे कपडे काढते; तेव्हां या साक्षात् निसर्गदेवतेला दोष ठेवणारे तुम्ही आम्ही कोण ?"

" अहो, पण ' Decency ' ( शिष्टाचार ) म्हणून कांहीं पदार्थ आहे का नाहीं ?" गिरिधरराव पहिला मुद्दा सोडून म्हणाले.

" स्पेन्सरचे भक्त तुम्ही म्हणवितां आणि शिष्टाचाराला महत्त्व देता ! तुमचे गुरु तर निसर्गनियमांशिवाय कांहींच वंद्य मानीत नाहींत. . . " विनायकराव म्हणाले. ते आणखी कांहीं बोलणार होते; पण इतक्यांत त्यांची साक्षात् निसर्ग देवता जी सुशीला ती त्यांना म्हणाली, " दादा, तुम्ही बांदतां ? " ( म्हणजे भांडतां ) हे बोबडे शब्द ऐकून विनायकराव हंसले व हेडमास्तर गिरिधर-रावांच्या कठोर, रुक्ष व शिस्तबाज चेहऱ्यावरहि स्मिताची छटा उत्पन्न झाली !

" पोरीला काय समजताहे वादविवादाचं ! " ते म्हणाले व आपलें स्पेन्सरचें तट्टू पुढें दामटूं लागले. " पोषाख हा शीतोष्णापासून आपलें रक्षण करण्याकरितांच आहे असें नव्हे, तर शरीर भूषविण्याकरितांहि आहे. रानटी लोक देखील आपआपल्या तऱ्हेनें आपापलीं शरीरें भूषवितातच."

" पण भूषणाच्या कल्पना भिन्न असणार हें तत्त्व तुमच्या स्पेन्सरच्या ' समाजशास्त्रांत ' आहे का नाहीं ? " विनायकराव म्हणाले व लगेच कांहीं कोटि आठवल्यामुळें किंचित् स्मित करून ते म्हणाले, " सुशील जसं अलंकाराशिवाय शोभतं तशी आमची सुशीला पोलक्याशिवाय शोभते. मोगरीच्या कळीला शोभा आणण्याकरितां रंग कोणीं लावला आहे का ? "

गिरिधररावांच्या शिस्तबाज प्रकृतीला असलें भाषण रुचलें नाहीं व विनायकराव जेव्हां गंभीर युक्तिवाद करण्याचें सोडून आपल्या मुलीचे मटामट मुके घेऊं लागले, तेव्हां तर गिरिधररावांना अब्रह्मण्यम् झाल्याप्रमाणें वाटलें. ते मग किंचित् रागानें म्हणाले, " तुमच्या शास्त्रांत ' कपडे हे लज्जारक्षणार्थ असतात ' हें तत्त्व मान्य नाहीं असं दिसतं. कपड्यांच्या अभावीं मनुष्य पशुतुल्य होईल व त्याचे मनोविकार बेफाम व अनियंत्रित होतील."

" तसंच जर पाहूं गेलं–" विनायकरावांनींहि रागास राग अशी साहजिक प्रतियोगी सहकारिता करून म्हटलें, "–तसंच जर पाहूं गेलं तर चांगले कपडे हे शृंगार अधिक उत्पन्न करतात असं माझं तर मत आहे. तसं जर नसतं तर हरतऱ्हेच्या पातळांकडे वगैरे आपलं लक्षच गेलं नसतं. आणि तुम्हांला राग येऊं देऊं नका, कांहीं संशोधकांचं असं म्हणणं आहे, कीं रानटी स्त्री-पुरुषांमध्यें लतांचीं पानं, तुरे वगैरे सुंदर वस्तु निरनिराळ्या अवयवांवर धारण करून शरीर भूषविण्याची जी रीत आहे व सुसंस्कृत लोकांमध्यें कपडे व दागिने घालण्याची जी आहे, ती रीत ज्या प्रेरणेपासून आली तिचें मूलकार्य शृंगाराला उत्तेजन देणं हें आहे, लज्जारक्षण हें नव्हे. फार काय, लज्जा ही देखील शृंगारिक आकर्षणाकरितां आहे असंहि एकजण म्हणतो. तेव्हां....."

" हात जोडतों तुमच्यापुढं महाराज ! " गिरिधरराव बाह्यात्कारीं हंसून रागाचा चढलेला पारा लपविण्याकरितां म्हणाले, " जातों आतां; आज तुम्हीं खूपच वकिली चालविली आहे. आमच्यासारखे भोळे शिक्षक या असल्या वकिलीपुढं कसले टिकतात ? " असें म्हणून त्यांनीं पगडी चढविलीच. इतक्यांत लक्ष्मीबाई

घरांतून दाराजवळ आल्या व तेथूनच म्हणाल्या, "तुमच्या रावबाला आज जेवायला बोलावलाय् आमच्याकडे, ठाऊक आहे ना?"

"आज कशाबद्दल जेवायला बोलावलाय्!" गिरिधररावांनीं विचारलें.

"मघांशीं पेढे दिले ना बाळूनं? त्या वेळेस नाहीं का त्यानं सांगितलं कशाबद्दल तें? आणि (विनायकरावांकडे पाहून) हे होते ना इथं? त्यांनीं नाहीं का कांहींच बोलूं? खरंच बाई, या पुरुषांच्यापुढं शर्थ झाली! पेढे दिले, पण कशाबद्दल तें कांहीं यांनीं सांगितलं नाहीं."

"त्यांनीं सांगितलं वहिनी, पण मीच विसरलों." गिरिधरराव म्हणाले, "आमचा वादविवाद चालला होता......"

"मग बरोबर आहे." लक्ष्मीबाइहि सौम्य होऊन गिरिधररावांना वाईट वाटूं नये म्हणून त्यांना अनुमोदन देत्या झाल्या व दारांतूनच क्षणभरानें त्या म्हणाल्या, "मग रावबाला पाठवून देतां ना लवकरच? आमचं जेवायचं होत आलंच. त्याला अंघोळबिंघोळ करायला सांगा."

"त्याची अंघोळ सकाळींच झाली आहे." गिरिधरराव म्हणाले, "६ वाजतां उठून ६॥ ला अंघोळ झालीच पाहिजे अशी माझी कडक शिस्त आहे. ६॥ पासून ७ पर्यंत नमस्कार व जोडी. नंतर ७ ते ७–५० अभ्यास, नंतर १० मिनिटं सुट्टी, नंतर पुन्हां ८ ते ८–५० अभ्यास, पुढें पुन्हां १० मिनिटं सुटी, अशा प्रकारची घड्याळासारखी आमची शिस्त आहे. स्पेन्सरनं म्हटलं आहे, कीं..."

पण स्पेन्सरनें काय म्हटलें आहे तें लक्ष्मूबाईंना कळण्यापूर्वींच गिरिधररावांकडचा अरसिक गडी शिरप्या तेथें आला व म्हणाला, "आज रावबा जेवायला यायचा नाहीं म्हणून आईसाहेबांनीं सांगायला धाडल आहे मला."

"कां रे, शिरप्या, कां नाहीं यायचा?" लक्ष्मूबाईनीं घाईघाइनं विचारलें.

"त्याची सोवळ्याची लंगोटी गंवसत नाहीं. आईसाहेबांनीं लई धुंडाळली, पण गंवसतच नाहीं." शिरप्या म्हणाला.

"लंगोटी नसली तर नसूं दे: आमच्याकडची पीतांबरी देईन त्याला मी," लक्ष्मूबाई म्हणाल्या व एव्हांपासून धोरणानें योजिलेल्या भावी जांवयाला पीतांबरी देण्याची व ती पीतांबरी नेसलेला तो बालजांवई पाहण्याची संधि मिळाली म्हणून आनंदानें त्यांचा चेहरा किंचित् विकसित होऊन विनायकरावांना देखील तो आज विशेष रम्य वाटला. बायकोला बरें वाटावें म्हणून कांहीं तरी

आपण बोलावें या हेतुस्तव ते म्हणाले, " हो, आमची पीतांबरी आहेच; आणि नसली तरी सोंवळ्याओंवळ्याची एवढी अट नाहीं आमच्याकडे.' दि.

"कांहीं तरीच बोलायचं ? सोंवळ्या ओंवळ्याशिवाय कसं चालेल ?" लक्ष्मूबाईंना पतिराजांचें बोलणें न आवडून त्या बोलून गेल्या. त्यांना वाटलें, कीं सोंवळें-ओंवळें नाहीं म्हटलें, तर आपल्या कुटुंबाबद्दल गिरिधररावांचें मत प्रतिकूल होईल ! पण गिरिधररावांना या वेळीं दुसऱ्याच विचारांनीं ग्रासलें होतें. मुलाची लंगोटी हरवली तर मुलानें शोधली पाहिजे, ती दुसऱ्यानें शोधून देणें म्हणजे त्याला लंगोटी हरवण्याला उत्तेजन देणें होय, अशा प्रकारचीं त्यांचीं स्पेन्सरपासून घेतलेलीं मतें असल्यामुळें आपल्या पत्नीला त्यांनीं बजावून सांगितलें होतें, कीं मुलानें कोणतीहि वस्तु हरविली तर ती शोधून द्यायची नाहीं, ती त्यानेंच शोधून काढली पाहिजे. पण ही शिस्त बायकोनेंच मोडली याचें त्यांना फारच वैषम्य वाटलें ! रागानें फणफणून, पण तो आवरून, ते म्हणाले, "शिस्त बिघडते ती अशी. मीं हिला शंभरदां सांगितलं, कीं स्पेन्सरच्या मताप्रमाणें हे लाड चुकीचे आहेत. पण तिला शिस्त काय आणि स्पेन्सर काय ? आमच्या बायका म्हणजे......" पुढे तें बोलणार होते, पण लक्ष्मूबाई तेथें समोरच उभ्या होत्या, त्यांना पाहून त्यांनीं आपले 'गैरशिस्त' शब्द आवरले व "बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं, झालं. बोलेल तो वाईट ठरतो" असें कांहीं तरी बडबडून स्वारी निघण्याचा विचार करूं लागली. इतक्यांत त्यांचं त्यांनाच काय वाटलं कुणाला ठाऊक, ते रात्रीची राखण करणाऱ्या शेतकऱ्यांचा बायबार जसा एकदम निघतो तसे एकदम उसळून म्हणाले, "रावबा यायचा नाहीं असं समजा. लंगोटी सांपडली तर येईल, नाहीं तर नाहीं येत असंच समजा. मी जातों आतां."

ते अंगणांत जाताहेत तोंच दुसरा गडी, संत्या, तेथें आला व म्हणाला, "रावबांची लंगोटी आईसाहेबांना गंवसली आहे, ते आतां येतील जेवायला म्हणून सांगायला पाठवलं आहे."

चमत्कार असा, कीं मुलाची हरवलेली लंगोटी सांपडली म्हणून गिरधररावांना अंमळ वाईटच वाटलें, कारण 'शिस्त' लावायला सांपडली नाहीं ! लक्ष्मूबाईंनाहि विशेष बरं वाटलं नाहीं; कारण घरांतली पीतांबरी बाहेर काढतां आली नाहीं व भावी बालजांवयानें नेसलेली पाहण्याची संधि गेली ! जग हें असें आहे ! असो.

दोन घटकांनंतर रावबा चांदीची झारी व अर्थात् सोवळ्याची केशरी रंगाची रेशमी लंगोटी घेऊन आला. मध्यंतरींच्या वेळांत सुशीलेलाहि झालरीचा चांगला झगा घालण्यांत आला होता. सुनंद, बाळू व इतर कांहीं शेजारचे मुलगे व मुलीहि जमल्या व नंतर फार वेळ न लावतां लहानमोठी मंडळी हातपाय धुऊन रंगीत पाटांवर जाऊन बसली. सुशीला माजघरांतून सैंपाकघरांत व तेथून माजघरांत एकसारखी येरझारा घालीत होती. तीहि अखेर दमली व गप्पा मारायला बाळू चांगला म्हणून त्याच्या जवळच्या पानावर जाऊन बसली; पण लक्षुमूबाईनीं तिच्याकरितां रांगोळीची मोठी वेलबुट्टी काढून केळीचें चांगलें पान व पाट ठेवला होता, तेथें त्यांनीं तिला बसण्यास सांगितल्यामुळें ती नाइलाजास्तव तेथें जाऊन बसली. तिच्या जवळच्या पानावर सुनंद बसला होता; त्याला बिचाऱ्याला कांहीं तरी निमित्तानें उठवून लक्षुमूबाईनीं तेथें रावबाला बसविलें. सुनंदाची आई विधवा, गरीब, दळणकांडण, सैंपाक करून आपलें व मुलाचें पोट भरणारी, तेव्हां तिच्या मुलाला मानअपमान कसला आला आहे? आणि त्यांतून सुनंदाचें वयहि लहान, तेव्हां त्याला एका पानावरून उठवून दुसऱ्या पानावर बसण्यास सांगण्यांत लक्षुमूबाईसारख्या सच्छीलच पण 'लक्ष्मी'च्या प्रसादामुळें किंचित् चढलेल्या स्त्रीला काय वाटणार आहे! सुनंदा वयानें लहान होता; पण गरिबीमुळें व स्वाभाविक तीव्र बुद्धीमुळें त्याला अकालींच अधिक कळूं लागलें होतें. त्याला आपला अपमान झालेला कळला व वाईट वाटलें; पण वाईट वाटणें सगळें गिळून त्यानें क्विनाईन जसें हंसऱ्या तोंडानें घ्यावयाचें त्याप्रमाणं हंसल्यासारखें करून टुणकन् उडी मारली व बाळूजवळ जाऊन तो बसला; आणि जणुं कांहीं विशेष कांहीं झालेंच नाहीं हें दाखविण्याकरितां बाळूच्या कानांत म्हणाला, "बरंच झालं; मला तुझ्याजवळ गप्पा मारायला सांपडतील!' आणि पानहि नशिबानं मोठं सांपडलं!" बाळूला तो लपंडाव सगळा कळला, पण त्या क्षणीं कांहीं न बोलतां त्यानें लवकरच दुसरें बोलणें काढलें व सुनंदाला अपमान गिळून टाकण्यास मदत केली! त्या अपमानाचें सुशीलेला कांहींच वाटलें नाहीं, किंबहुना कोणाचा कांहीं अपमान झाला हेंहि तिला कळलें नाहीं. ती निराळ्याच कारणानें रागावलेली होती; बाळूजवळ तिला बसूं दिलें नाहीं म्हणून ती फुरंगटून बसली होती! पण हें फुरंगटणें फार वेळ टिकलें नाहीं, कारण तिला कसलीशी आठवण झाली व ती रावबाला म्हणाली, "आतां देवाचं नांव घ्यायचं असतं ना ले? आतांच ना हल् हल् मादेव म्हणायचं?"

" आतां नाहीं," बाळू म्हणाला, " तूप वाढून झाल्यावर तात्यांनीं सांगितलं म्हणजे."

बाळूचे शब्द प्रमाणभूत मानून ती तूप वाढीपर्यंत थांबली व तात्यांना " तात्या, देवाचं नांव घेऊं ना आतां ? आतां हल् हल् मादेव मनूं मी ?" असें विचारून त्यांच्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन हर हर महादेवाला हांक मारती झाली. ही हांक त्या महादेवाला पोंचली असेल काय ? व तो त्या भोजनप्रसंगीं साक्षीभूत झाला असल्यास त्या त्या जमलेल्या बालकांचा व मोठ्या माणसांचाहि भविष्यकाळ ध्यानांत घेऊन त्याला आनंद झाला असेल का दुःख झालें असेल ? बाकी अंगाला भस्म लावून स्मशानांत राहणाऱ्या व अशुभ रुंडमाला धारण करणाऱ्या आणि सर्पांनीं वेष्टिलेल्या त्या शिवाला सगळेंच शिव, सगळेंच मंगल आणि सगळेंच आनंददायक वाटावयाचें ! आणि तेंहि एका अर्थी युक्तच आहे !

---

## ४ : माळ्यावरचे ते पत्ते

विनायकरावांकडे कांहीं हव्यकव्य होतें म्हणून एक दिवस सुनंदाची आई त्यांच्याकडे कामाधामाकरितां आली होती. विनायकरावांची ती दूरची नातलग हें तिला बोलावण्याचें केवळ निमित्तकारण; खरें कारण असें होतें, कीं विनायकरावांना तिची गरिबी, त्यांत पुन्हां वैधव्य, तशांत पुन्हां शाळेंत जाणाऱ्या होतकरू मुलाला संभाळावयाचें, या सर्व गोष्टी ठाऊक होत्या व म्हणून ते तिला मदत करण्याच्या हेतूनें कांहींतरी निमित्त करून अनेक वेळां घरीं बोलावीत असत व विचारपूस करून हरतऱ्हेनें सहाय्य करीत असत. दोन्ही पंगती उठून आईचेंहि जेवणखाण झाल्यावर सुनंदानें तिला मागील दारीं एकीकडे गांठलें व आईला तो म्हणाला, " ताई, मी आपला दक्षणेचा पैसा घेऊं ? "

" तुला रे कशी दक्षणा मिळाली ? " त्याच्या आईनें लगेच विचारलें, " तुझी कांहीं मुंज झालेली नाहीं; आणि तू तर घरचा ! "

" तात्यांनीं ( विनायकरावांनीं ) पहिल्या प्रथम ठेवली नाहीं; पण आम्हांस वाईट वाटलं असं पाहून त्यांनीं आमच्यापुढं मागाहून एक एक पैसा ठेवला, सुशीलेलासुद्धां दक्षणा दिली ! "

"तात्यांचं असंच आहे. उगाच कांहींतरी पैसे खर्च करावयाचे! घरच्या पोरांना आणि पोरींना कसली दक्षणा द्यायची?"

हें बोलणें झाल्यावर कांहीं वेळानें सुनंदा हळूच आईला लाडिकपणें म्हणाला, "चार पैशांना लहानशा पत्त्यांचा जोड मिळतो ना, तो आम्ही आणणार आहोंत."

त्याच्या आईला ही गोष्ट आवडली नाहीं; पण मायेमुळें ती म्हणाली, "घे पैसा आजच्या दिवस, पण आपण गरिबांनीं पत्त्यांकरितां पैसा खर्च करूं नये. आपली स्थिति कशी आहे पाहतोस ना? ते असते म्हणजे..." पुढें तिला बोलवेना. डोळे अश्रूंनीं तुडुंब भरले म्हणून आपल्या मळकट तांबड्या लुगड्याच्या पदरानें ती डोळे पुसूं लागली; तेव्हां सुनंदा लगेच म्हणाला, "मग नको मला पैसा, आम्ही नाहीं पत्ते आणीत." त्याच्या आईला त्याचा समंजसपणा पाहून बरेंहि वाटलें आणि वाईटहि वाटलें; आणि अधिकच गहिंवरून ती म्हणाली, "अरे, आजच्या दिवस घे. पण..."

"मला नको ग पैसा." सुनंदा तिचें बोलणें पुरें व्हायच्या आधींच म्हणाला; "मी आपला उगीच मागितला." असें त्यानें म्हटलें खरें; पण आईची स्थिति पाहून त्यालाहि रडूं येत होतें तें लपविण्याकरितां तो पळत बागेंत गेला आणि बकुळीचीं फुलें वेंचण्याचें कांहीं वेळ सोंग करून, रडूं आवरल्यावर, तो पुढील दारच्या माडीवर गेला. बाळू, रावबा, सुशीला हीं तेथें होतींच. त्यांना पाहून बाळूकडे वळून तो म्हणाला, "बाळू, पत्ते नकोत, कांहीं नकोत; आपण दुसरा कांहींतरी खेळ खेळूं या."

"नको कां! चार पैशांना लहान जोड मिळतो. माझा एक, तुझा एक आणि रावबाचा एक..."

"मी नाहीं रे बाबा द्यायचा," रावबा मध्येंच म्हणाला, "बाबांना विचारल्याशिवाय मी नाहीं द्यायचा! बाबांची मला सक्त ताकीद आहे, कीं मिळालेला पैसा विचारल्याशिवाय खर्चायचा नाहीं."

"मग विचारून ये" सुशीला म्हणाली. ती आतां चारपांच वर्षांची झाली होती; व बोबडें पण चुरुचुरू बोलूं लागली होती.

"मी नाहीं रे बाबा जायचा," रावबानें उत्तर दिलें. "त्यांच्यापुढें गेलों, कीं सकाळचा अभ्यास झाला कीं नाहीं म्हणून मला विचारतील आणि मला छळतील. त्यांना तोंड दाखवावंसं नाहीं वाटत मला."

" वडलांना काय भ्यायचं ? " बाळू म्हणाला.

" अरे, तुला काय ठाऊक ! " रावबानें उत्तर दिलें. " त्यांचा तो स्पेन्सर-साहेब आहे ना, त्याच्या म्हणण्याप्रमाणें ते वागतात आणि आम्हांला सगळ्यांना छळतात."

" मग तुझा पैसा नाहीं ना देत तूं ? " बाळूनें सहानुभूतिपूर्वक पण निक्षून विचारलें.

" नाहीं बाबा ! " रावबानेंहि निश्चयपूर्वक सांगितलें.

विचारल्याशिवाय दक्षणेचा पैसा खर्च करावयाचा नाहीं अशी गिरिधररावांची शिस्त होती खरी; पण त्यांनींच दोन आणे खाऊकरितां किंवा वाटेल तसे खर्च करण्याकरितां त्याजजवळ देऊन ठेविले होते व या दोन आण्यांपैकीं अद्यापि त्याच्याजवळ चार पैसे शिल्लक होते आणि त्यानें मनांत आणलें असतें तर तो एकटादेखील पत्त्यांचा जोड विकत घेऊं शकता. दिलेल्या दोन आण्यांचा रावबानें काय खर्च केला हें त्यानें वडिलांना सांगणें आवश्यक होतें; पण गिरिधररावांना सांगण्याची भीति वाटत होती म्हणून केवळ रावबानें पैसे देण्याचें नाकारलें असें मात्र नाहीं. त्यानें निश्चयानें नाहीं म्हटलें, सुनंदानें तर आधींच नाहीं म्हटल होतें, तेव्हां पत्ते विकत आणून खेळण्याचा बेत राहिलाच व तीं मुलं खट्टू होऊन बसलीं. त्यांच्या हा संवाद शेजारच्याच खोलींत असलेल्या विनायकरावांच्या कानांवर पडत होता, तेव्हां त्याचा असा अंत झालेला पाहून त्यांच मन द्रवलें व खोलीच्या बाहेर येऊन त्यांनीं म्हटलें, " अरे, पत्ते का पाहिजेत ? हे घ्या दान ढब्बू आणि जा बाजारांतून आणा. पण जपून ठेवले पाहिजेत हो ते; आणि खेळतांना भांडायचं नाहीं. आणि सुटीच्या दिवशींच एखादा तास खेळायचं; आहे कबूल ? नसलं तर आमचे आपले पैसे आणा परत."

सुशीलेला या अटींचा अर्थ चांगलासा कळला नाहीं, म्हणून ती ' लविलाली खेलायचं ना ? मला खेलायला घ्यायचं ना ?' असें कांहीं तरी बोलूं लागली. तीनहि मुलग्यांनीं मात्र अटी पाळायचें अर्धवट मूकभाव स्वीकारूनच कबूल केलें. विनायकरावांनाहि अधिक स्पष्ट करारमदारांची जरूर नव्हती. तेव्हां मग काय, पत्ते आणायचें ठरलच. आणायचे कोणीं हाच तेवढा प्रश्न राहिला. रावबा श्रीमंत व शिष्ट, तेव्हां ते कांहीं जायचे नाहींतच; शिवाय पत्ते स्वतः बाजारांत

आऊन विकत घेऊन येण्यांत व जातां येतां गप्पागोष्टी सांगण्यांत जी मौज लहान मुलांना वाटते ती त्याच्या कल्पनेलादेखील शिवली नव्हती. सुनंदानें एकंदर तानमान पाहून पत्ते आणण्याचें काम आपल्याकडे घेतलें. पण बाळू त्याला एकट्याला जाऊं देणें शक्यच नव्हतें. ते दोघे निघाल्यावर सुशीलाहि निघालीच आणि विनायकरावांचाच थोडासा उठाव असल्यामुळें तिलाहि तिच्या आईकडून त्या दोघांबरोबर बाजारांत जाण्याची परवानगी मिळाली.

वाटेंत जातां जातां त्या दोघांचें बोलणें जवळच आलेल्या दिवाळीच्या सुटीबद्दल चाललें होतें. तें ऐकून सुशीलेनें मध्येंच प्रश्न केला, "दिवालीची सुत्ती केव्हां ले?"

"अजून पुष्कळ लांब आहे," सुनंदा म्हणाला.

"कालच्या पलवां ना?" सुशीलेनें विचारलें. 'कालच्या पलवां' म्हणजे काय याचा शब्दशास्त्री काय अर्थ करतील तो करोत; पण सुशीलेचा अर्थ आणि तो अर्थ एक खास नव्हता. बाकी सुशीलेचा अर्थ काय होता हें तरी निश्चितपणें कोण सांगणार? एवढी गोष्ट खरी, कीं बाळूला तो अर्थ थोडाबहुत कळला असावा. कारण तो म्हणाला, "कालच्या पलवां नाहीं, उद्यांच्या पलवांच्या पलवांच्या पलवां."

दुसऱ्या कोणाला याचा अर्थ कळो न कळो, सुशीलेला तो थोडाबहुत कळला. तिचें समाधान झालें असें नाहीं; पण अर्थ समजला तेवढा बस्स झाला असा पोक्त विचार करूनच कीं काय तिनें लगेच दुसराच प्रश्न काढला व म्हणाली, "काय ले बाळू, आज तात्यांनीं जेवतांना पैसा कां दिला ले?"

"दक्षणा दिली ती." बाळूनें उत्तर दिलें.

"कशाला दश्शना ती?"

"तुझ्या आजीच्या श्राद्धाची." सुनंदानें सांगितलें.

"माझी आजी ती तुझी कोण?"

"माझी पण आजीच."

"आणि तुझी काण रे ती बाळू?"

"माझी कोणी नाहीं." बाळूनें उत्तर दिलें.

"कोणी नाहीं कशी? मग माझी कशी ती आजी?"

"मूर्ख आहेस तूं. कांहीं तरी बोलत असतेस, झालं."

पण या बोलण्यानें तिची जिज्ञासा थोडीच शमणार होती! ती सुनंदाकडे वळली आणि म्हणाली, "तूं सांग ले नंदा; तूं सांग."

"त्याची कनी, ती सासू लागते हो, आजेसासू." सुनंदा कांहीं तरी बोलायचें म्हणून थट्टेनें म्हणाला.

या उत्तराचा पुरता अर्थ सुनंदालाहि कळत नव्हता, तर मग सुशीलेला कोठून कळणार? पण उत्तराचा अर्थ समजला नाहीं म्हणून तिचे प्रश्न थांबताहेत का काय! 'आजी आतां काय कलीत असेल ले, नंदा?" हा प्रश्न लगेच सुनंदाच्या पुढें आलाच.

तोहि थट्टा करण्याच्या भरांत म्हणाला, "हरभरे दळीत असेल."

"हलभले कशाला?"

"भजीं करायला." विनोदांत भर घालण्याच्या हेतूनें बाळू म्हणाला, "आज तुझ्याकडे नव्हतीं का केलीं, तशीं भजीं करायला."

"देवाकले हलभले कुठले पण! आभालांत हलभल्याचीं झालं असतात?"

"हो, आणि त्यांच्यावर तुला चढवायचं असतं." सुनंदा कांहीं तरी कोटि करून म्हणाला.

तिला तें खरेंच वाटलें; व कसें चढवायचें हा गूढ व गहन प्रश्न ती मनांत सोडवूं लागली!

कल्पना करतां करतां तिला वाटलें, कीं आभाळांत देव आहे तो त्या हरभऱ्याच्या झाडावर आपणांला चढवीत असेल. (हरभऱ्याचें झाड किती उंच असतें याची तिला कल्पना नव्हती.) शंकेचें समाधान व्हावें म्हणून ती बाळूला म्हणाली, "बाळू, देव म्हणजे आपल्या तात्यांसालखा ना?"

"हो." बाळू म्हणाला

"त्याला आईसालखी बायको आहे का ले?"

"मला नाहीं ठाऊक." बाळूनें हंसूनच पण किंचित् तुसडेपणानें उत्तर दिलें, "कांहींतरी विचारीत असतेस झालं."

"कांहींतरी कसं रे?" सुनंदा म्हणाला. तो वयानें बाळूएवढाच; पण बुद्धीनें जरा सामान्य मुलापेक्षां अधिक चलाख होता, किंबहुना तो सापेक्षतः अकाल-परिपक्व होता. "आपल्याला उत्तर देतां येत नाहीं म्हणून तिचे प्रश्न कांहीं तरी म्हणावयाचे कीं काय!"

या प्रश्नाचें उत्तर देण्याची बाळूला जरूरच पडली नाहीं, कारण खुशालशेठ गुजराचें दुकान तेवढ्या वेळांत आलेंच व तो दुकानांत शिरला. सुनंदा व सुशीला हीं मागोमाग गेलींच. पत्ते घेऊन बाहेर पडण्यापूर्वी सुशीलेच्या हातावर पेपरमिटाची एक वडी खुशालशेठनें ठेवली. तेवढ्यानेंच तो शेठ तिला किती तरी चांगला वाटला; व वाटेनें जातां जातां, आभाळांत राहाणारा व आपल्या वडिलांसारखा असलेला देव किंवा आपल्या आईसारखी त्याची बायको यांना अजिबात विसरून ती खुशालशेठ गुजराच्याच दातृत्वाच्या मोठेपणाच्या गोष्टी सांगूं पाहात होती. बाळू व सुनंदा यांचें आतां बोलण्याकडे विशेष लक्ष नव्हतें; तर स्वतः विकत घेतलेले लहानसेच कां होईनात, पण कोरेकरकरीत पत्ते पाहाण्यांत व शाळेच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलण्यांत ते दंग झाले होते.

पत्ते आगल्यावर खेळायचें कोठें हा प्रश्न निघाला. बाळूची बिऱ्हाडाची जागा लहानशीच; तेथें कांहीं विशेष एकान्तच नव्हता सुशीलेचें घर मोठें; पण त्या दिवशीं वर्षश्राद्ध म्हणून जिकडेतिकडे गर्दी होती. सुनंदाच्या घरांत कोणीच नव्हतें म्हणून त्याच्या आईनें कुलुप लावलेलें. रावबांचें घर मोठें आणि स्वतःच्या मालकीचें; पण गिरिधररावांच्या शिस्तीमुळें तेथें जाण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. शिवाय रावबा कांहीं 'माझ्या घरीं चला' म्हणून म्हणालाच नाहीं! शेवटीं सुनंदाच्या सुपीक डोक्यात कल्पना आली, कीं शेजारच्या रामाच्या देवळांत जाऊन कोंपऱ्यांत कोठेंतरी, नाहीं तर माळ्यावर खेळावें. सुशीलेला न्यायचें का नाहीं हाहि लगेच प्रश्न उत्पन्न झाला. बाळू म्हणाला, 'नेऊं या'. सुनंदा म्हणाला, 'नको, लक्ष्मूबाईंचीं उगीच बोलणीं बसतील.' सुशीलेनें ही भवति न भवति ऐकली, तेव्हां ती मी येणार म्हणून आग्रह धरून बसली. तिला गुंगारा देऊन देवळाकडे निघून जावें, या हेतूनें व थोडेंसें सद्भावानें "आईला जा विचारून ये" असें बाळू तिला म्हणाला. पण ती हलतेय् कशाला? ती तशी वस्ताद झाली होती. "मला ठाऊक आहे शगलं, मी तिकले गेलें मनजे पळून जायचाय्, खल ना?" असें जेव्हां ती मान हालवून म्हणाली तेव्हां 'काय पोरटी वस्ताद झाली आहे!' अशा अर्थाचे बाळू आणि सुनंदा या दोघांनींहि एकदम उद्गार काढले. तिला घेऊन गेल्याशिवाय गत्यन्तर नाहीं असें पाहून अखेर त्यांनीं 'देऊळ जवळच आहे, घेऊन जावं झालं' असा विचार केला व तिला ते घेऊन गेले.

देऊळ जवळच हाकेवर होतें. आडशहरांतलें तें, तें कितीसें मोठें असणार? १००-१५० पुरुष गाभ्याच्या पुढें व गाभ्याच्या दोन्ही बाजूंना शभर एक

बायका बसतील एवढी जागा; लहान मुलांना कीर्तनाच्या वेळीं वगैरे बसण्याकरितां पुढें दोन माळे केलेले होते. त्या वेळीं अर्थात् तेथें एखादी शिडी लावण्यांत येई. आतां मात्र शिडी तेथें नव्हती. देवळांत गेल्यावर इकडे तिकडे पाहून सुनंदा म्हणाला, "या कोंपऱ्यांत बसून खेळूं या." बाळू म्हणाला, "खालीं नको, वरच्या माळ्यावर खेळूं या." सुनदाला ही कल्पना पटली, कारण ते कांहीं दिवसांपूर्वींच खांबावरून माळ्यावर चढायला व तेथून खालीं उड्या मारायला शिकले होते. पण सुशीलेला चढवावयाचें कसें? कोणाचें कांहीं डोकें चालेना. इतक्यांत देवळाच्या एका कोंपऱ्यांत मृदंग ठेवायची उंच घोडी सुनंदाला दिसली व तिच्यावर सुशीलेला आधीं चढवून व आपण माळ्यावर चढून मग तिला माळ्यावर हात धरून वर उचलून घेतां येईल अशी कल्पना त्याला सुचली. सूचना बाळूला अर्थात् पसंत पडलीच व लगेच अंमलबजावणीलाहि सुरुवात झाली. ती मोठी जड घोडी दोघांनीं मिळून माळ्याखालीं आणली आणि सुशीलेला ते तीवर चढवूं लागले. चढवतांना सुशीलेचे कितीतरी हाल झाले; पण तिला त्यांतच मौज वाटली! ती चढल्यावर बाळू खांबावरून माळ्यावर चढला व सुनंदा हळूच घोडीवर चढून सुशीलेचा हात बाळूच्या हातांत देऊन वर उचलण्यास मदत करूं लागला. या खटपटींत खरें म्हटलें म्हणजे ती खालीं पडायचीच; पण देवळांतील रामानें तिला वांचवलें म्हणायचें!

ती वर आली खरी; पण रावबाला कसें वर घ्यायचें? तो वयानें सगळ्यांत मोठा; पण असल्या कामांत तो अगदीं मेंग्या होता, कारण स्पेन्सर-भक्त गिरिधररावांच्या शिस्तबाज तालमींत तो वाढलेला. तो आपण होऊन कसा तरी घोडीवर चढला; पण तेथून वरच्या फळीवर चढण्याची त्याला छाती होईना. अखेर जेमतेम मित्रांच्या साहाय्यानें तो वर गेला आणि कपडे मळले होते ते साफसूफ करून पत्ते खेळण्याकरितां सज्ज झाला.

वास्तविक ती जागा आकुंचित, हवा कांहीं चांगली नाहीं, अर्धवट काळोखच; पत्ते लहान, गुळगुळीत नाहींत; पण ते तसे पत्ते घेऊन तेथें खेळत बसण्यांत व मधून मधून सुशीलेशीं बोलण्यांत ते इतके दंग झाले, कीं विचारूं नका. बाळूच्या वडिलांनीं त्याला दोनतीनदां एक–आणा–वाले पत्ते घेऊन दिले होते; पण ते एकदोन दिवसांतच फाटले! पुष्कळ दिवसांनीं मिळालेला स्वतःचा पत्ते-जोड घेऊन व पूर्ण स्वतंत्रतेनें खेळण्यांत मुलांना काय वाटतें तें मुलांनाच ठाऊक! मोठ्यांना त्यांतली मौज कळावयाची नाहीं.

एक दुरी काढून ठेवून तिघे 'पानलागी' खेळूं लागले. सुशीला बाळूजवळ बसली व त्याच्याशीं संगनमत करूं लागली. मधून मधून 'हा लाजा ना? हा गुलाम ना?' असें ती विचारीत असे व बाळू तिला कधीं शान्तपणें व प्रेमानें, तर कधीं बेफिकिरीनें व तिरसटपणानें, सांगावयाचें तें सांगत असे. त्याचे हात उचलण्याचें काम अर्थात् तिच्याकडे होतें. रावबानें हातांत पानें चोरून ठेवून दोनतीन डाव जिंकल्यावर सुनंदानें त्याच्या पानांवर नजर ठेवून चोरपान ठेवून हुकूम मारण्याच्या पापाचें माप त्याच्या पदरांत घातलें व रागानें त्याच्या अंगावर पत्ते फेंकले. शिवीगाळी लवकरच सुरू झाली. रावबा चिडला, पण करतो काय? भांडला तरी पिसणी अखेर करावी लागलीच. 'पिसणी करतों, पण चोरबीर म्हणूं नकोस. तुझ्यासारखे भिकारडे चोर असतील. तुझी आई लोकांकडे काम करते ती चोर असेल' इत्यादि शेलकीं दुरुत्तरें रावबाच्या मुखांतून बाहेर पडूं लागलीं. सुनंदाचा राग ओसरूं लागला होता म्हणून बरें झालें. 'मूर्ख आहे बेटा' असें तो अर्धवट मनांत व अर्धवट मोठ्यानें म्हणाला व सुशीला जी या भांडाभांडींत घाबरून रडायला लागली होती, तिची तो समजूत करूं लागला. कालान्तरानें खेळ पुन्हां सुरू झाला व तो इतका रंगला, कीं पांच वाजले तेंदेखील त्यांना कळलें नाहीं.

इकडे बाळूच्या आईला—अन्नपूर्णाबाईंना—बाळू कोठें आहे म्हणून काळजी लागली व त्या सुशीलेच्या आईकडे चौकशीकरितां (व जायला कांहींतरी निमित्त पाहिजेच होतें म्हणूनहि!) गेल्या. त्याहि सुशीलेचीच वाट पाहात विवंचनेंत होत्या. 'मुलें बाजारांत गेलीं होतीं व पत्ते घेऊन आलीं' एवढा पत्ता लागला, पण पुढें कोठें गेलीं हा पत्ता नव्हता. "काय बाई, कुठें गेलीं हीं? कसलीं पोरटीं तरी आहेत हीं? तो सुनंदा मेला द्वाड आहे..." इत्यादि भाषा सुरू झाली. अखेर मुलें देवळांत आहेत का म्हणून पाहण्याकरितां त्या दोघी देवळांत आल्या. तों तेथें माळ्यावर हीं पोरें खेळांत दंग झालेलीं! त्यांची समाधि मोडण्याला अर्थात् फार अवकाश लागला नाहीं. सुनंदा व बाळू यांनीं पत्ते गोळा केले; पण भीतीमुळें ते खालीं उतरेनात. रावबा तेथून उतरेना, कारण त्याला उतरतांच येईना! सुशीला रडूं लागली, पण तिला खालीं घ्यायची कशी? अखेर आरडा-ओरड झाल्यावर रावबाला व सुशीलेला गांवचे रिकामटेकडे शिष्ट जे तेथें गोळा झाले होते त्यांनीं उतरविलें. बाळूनें व सुनंदानें वेळ साधून वरूनच उड्या मारल्या व तेथून एकदम पोबारा केला! त्यांच्या उड्या पाहून बाळूच्या आईला

कौतुक वाटलें, पण बाहेरून तिनें " काय मेला हा खेळ ? पाय मोडून का घ्यायचे आहेत ? काय मेलीं अगोचर पोरं हीं " इत्यादि भाषा सुरू केली.

बोलण्याची सरबत्ती थांबल्यावर सुशीलेला घरीं न्यायच्या वेळेस तिच्या आईला दिसून आलें, कीं कौतुकानें भला मोठा रेशमी कांठ लावलेला तिचा शुभ्र पांढरा परकर धुरळ्यानें भरला आहे आणि एके ठिकाणीं फाटला आहे. रावबाचाहि परीटघडीचा शर्ट मळला होता व फाटला होता. मुलांनीं कपडे मळवले तर ते त्यानांच धुवायला सांगावेत आणि फाडले तर ते त्यांनाच शिवायला सांगावेत, या स्पेन्सरी तत्त्वानुसार त्याला तो धुवावा व शिवावा लागला. फराळाची वेळ टळली होती, म्हणून त्याला वरील तत्त्वानुसार फराळाशिवाय राहावें लागलें. सुशीलेला ही 'स्वाभाविक' शिक्षा मिळाली नाहीं, तर दोनतीन धपाटे मिळाले व नंतर दूधसाखर मिळाली ! बाळूला बोलणीं बसलीं, पण नंतर दहींपोहेहि मिळाले, सुनंदाला बिचाऱ्याला खायला कांहीं मिळालें नाहीं, कारण बाळूनें बोलावलें तरी तो त्याच्याकडे जाईना; इतरांनीं खाण्याला द्यावयाच्या ऐवजीं त्यालाच बोलून खाल्लें !

---

## ५ : देवांची कुस्ती

रंगानें काळासांवळा, अंगानें हडकुळाच पण काटक व निरोगी, तोंड लांबोडें, डोळे विलक्षण–विलक्षण म्हणजे विलक्षणच तेजस्वी, चेहरा आनंदी पण औदासीन्याची छाया तेथें गूढ असलेली, कपडे गरिबीचेच, पायांत कांहीं नाहीं, एका हातांत वह्या व पुस्तकें आणि दुसऱ्या हातांत दोरी बांधलेली दौत, अशा थाटांत सुनंदा शाळेंत जाण्याच्या वेळेला म्हणजे १०॥ च्या सुमाराला आला होता. त्याला आतां बारावें वर्ष लागलें होतें; बाळू दहा वर्षांचाच, पण त्यांची अगदीं लहानपणापासून दोस्ती आणि बाळूचें घर शाळेच्या वाटेवर म्हणून सुनंदा बाळूकडे रोज यायचा; त्याप्रमाणें आजहि आला होता. बाळूचें जेवण नुकतेंच झालें होतें व तो कपडे करीत होता. त्याचे वडील विश्वासराव हे पत्नीनें आणून दिलेला विडा खात शर्टाला बटणें लावीत होते. आज ते, गिरिधरराव व विनायकराव असे तिघेजण गांवांतल्या मराठी व अँग्लोव्हर्नाक्युलर स्कूलची, मॅनेजिंग कमिटींतले मेंबर या नात्यानें तपासणी करण्यास जाणार होते. त्या निमित्तानेंच आज इस्त्रीचा नवा शर्ट व परीटघडीचा नवा कोट विश्वासरावांनीं

बाहेर काढला होता. शर्टला बटनें लावावयाचीं म्हणून ते बटनें शोधूं लागले, पण दोन बटनें कमी पडूं लागलीं; तेव्हां अन्नपूर्णाबाईवर–पत्नीवर–थोडासा राग काढून व 'तुझ्यावर रागावण्यांत काय अर्थ आहे, माझीच चूक' असें म्हणून त्यांनीं अखेर निराळ्या रंगाचीं विजोड बटनें कोटाला लावलीं व ड्रेस करण्यास सज्ज होऊन, "सुनंदा, जा रे, निघायची तयारी करावयाची का म्हणून विनायकरावांना विचारून ये" असें ते म्हणाले. सुनंदा घरच्यासारखाच झाला असल्यामुळें त्याला काम सांगण्यास त्यांना कांहीं विशेष वाटलें नाहीं. सुनंदा शेजारच्याच बिऱ्हाडांतल्या विनायकरावांकडे गेला व 'जायची तयारी करावयाची का, म्हणून विश्वासरावांनीं विचारलें आहे' असें म्हणाला. 'घटका-भरानें निघूं म्हणून सांग' असें विनायकरावांनीं उत्तर दिलें व ते कामाला लागले. माडीवरून खालीं येताना सुनंदाला, सुशीलाहि गुलाबी झगा घातलेली व वेणीफणी ऐटींत केलेली अशी दिसली. ती आतां पांचएक वर्षांची झाली होती व हातांत पाटी–पुस्तक घेऊन 'इन्फन्टी'च्या वर्गाला जात होती. घरचा गडी 'किसन्या' हिंवतापानें फणफणला होता, म्हणून तिला शाळेंत पोंचविण्याकरितां सोबत कोणाला द्यावें या विचारांत लक्ष्मीबाई होत्या. सुनंदा दिसल्याबरोबर देवच पावला असें वाटून त्यांनीं सुशीलेला त्याच्या स्वाधीन केलें. आपल्यावर एवढा विश्वास टाकल्याबद्दल सुनंदालाहि मोठा आनंद झाला व तो सुशीलेला घेऊन बाळूकडे गेला. त्याची निघण्याची तयारी झालीच होती.

विश्वासरावांनीं सुशीलेला पाहून "आहे बुवा ऐट आज! इन्स्पेक्शन म्हणून वाटतं आईनं सजिवलीय् गौर! पण मी येणार आहें तुझ्या वर्गावर; मी तुला नापास करून टाकीन!" असें म्हटलें, तेव्हां सुशीला म्हणाली, "मीं देवाला सांगितलंय् काल रात्रीं मला पास कर म्हणून; तो मला पास करील."

"कोणत्या देवाला?" विश्वासरावांनीं गांभीर्य कायम ठेवण्याचा प्रयत्न करून व अर्धवट हंसून भिवया वर करून विचारलें. "मीं आपल्या देवाला सांगितलं आहे, कीं सुशीलेला नापास कर; तो तुला नापास करील!"

"नाहींच मुळीं. आमचा देव चांगला आहे, तो पास करील."

"पण आमचा देव नापास करील ना!"

सुशीला कांहींच बोलली नाहीं. विश्वासराव थट्टा करताहेत हें तिला त्यांच्या चेहऱ्यावरून थोडेंबहुत समजलें; पण तिच्या हृदयांत नापास होण्याची थोडीशी

धास्ती बसली खरी. शाळेंत जातांना रस्त्यांत तिनें बाळूपाशीं हळूच ही गोष्ट काढली. (तिच्या दृष्टीनें, आई व वडील यांच्या खालोखाल बाळूच्या शब्दाला प्रामाण्य होतें!) बाळूनें तिला सांगितलें, कीं "बाबा (विश्वासराव) थट्टेनं बोलले, त्यांचं बोलणं कांहीं खरं धरायचं नाहीं."

सुशीलेला या भाषणानें धीर आला; पण विश्वासरावांचा देव आपल्या देवापेक्षां शक्तिमान् आहे कीं काय ही शंका तिच्या मनांतून पार निघून गेली नाहीं.

सुनंदानें तें ओळखलें व तो तिला आश्वासन देऊं लागला, कीं "तूं पास होशीलच. बाबा आपले उगीच तुला चिडवण्याकरितां म्हणाले."

"पण काय रे, सुनंदा, बाबांच्या देवाला आमचा देव पाडील का नाहीं रे? आमचा देव सगळ्यांत मोठा आहे; तो खात्रीनें बाबांच्या देवाला पाडील. आई म्हणाली, कीं आपल्या देवाइतकं बळ कुणामध्यें नाहीं. पन्नास पोलीस शिपाई आले तरी देव एकटा त्यांना पाडून टाकील. असं ती म्हणाली."

"मला पाडून टाकील?" सुनंदा तिची मौज करण्याकरितां गालांतल्या गालांत हंसत म्हणाला.

"हो, हो! तुला तर सहज पाडून टाकील. आमच्या तात्यांहून देव बलवान् आहे; मग तुझी काय कथा?"

हें बोलणें होतें आहे, तोंच रावबा पाठीमागून आला. बूट–विजार वगैरे चढविलेली आहे, गळ्यांत कमावलेल्या कातड्याची उत्तमशी पिवळी पिशवी लटकावलेली आहे, हातांत जर्मन सिल्व्हरच्या झांकणाची तऱ्हेदार दौत घेतलेली आहे, डोकीवर जरीची टोपी चकाकत आहे, अशा थाटांत स्वारी येऊन, "काय चाललाय् देवाबद्दल वाद? नेहमीं तूं देवाबद्दल कांहींतरी बोलतेस. अग, कसला आला आहे देव नि कसलं काय? देव वगैरे कांहीं नाहीं असं आमचे 'दादा' (वडील) नेहमीं म्हणत असतात. स्पेन्सरहि असंच म्हणतो असं ते सांगतात."

"देव नाहीं काय म्हणतोस? देव आहेच मुळीं. आईला विचार आमच्या;– आणि मास्तर नाहीं का सांगत..."

रावबा हें ऐकून खूप हंसला. सुनंदालाहि सुशीलेचा भाळसटपणा पाहून हंसूं येत होतें; पण तिचा भोळा भाव पाहून तिची कुचेष्टा करावी हें त्याला त्या वेळीं बरें वाटलें नाहीं; पण रावबाचें तो बिचारा काय करणार?

सुशीलेची बिचारीची भलत्या वेळीं कुचेष्टा करूं पाहाणाऱ्या रावबाचा राग त्याला आला व त्याच्याशीं तो कांहीं रागारागानें शब्दाशब्दी करूं लागला, इतक्यांत पाठीमागून एक चौचाकी गाडी आली. आमच्या 'सुवर्णग्रामा'चे म्हणजे प्राकृत भाषेंत 'सोनगांव'चे रस्ते कांहीं पुण्यामुंबईकडच्या सारखे नव्हते, कीं गाडी गेल्याचें पोराबाळांनासुद्धां कांहीं वाटूं नये. आमचे रस्ते म्हणजे काय, तर गाडी मधून जायची म्हणजे लोकांनीं भिंतीच्या किंवा कुंपणाच्या बाजूला अगदीं चिलगून उभें राहावें तेव्हां जीव बचावण्याची खात्री! गाडी सावकाशच चालविलेली होती; पण सुशीला घाबरली. तिच्या उजव्या बाजूला सुनंदा होता त्याच्याकडे जावेंसें तिला वाटलें. पण इतक्यांत बाळूनें गाडीखालीं सांपडेल म्हणून तिला आपलेकडे ओढलें. त्याच्याकडे ती जाणार इतक्यांत पाठीमागें उभा असलेला रावबा किंचित् आधीं सुनंदाच्या बाजूला म्हणजे उजवीकडे गेला होता तो तिला आपल्याकडे बोलावूं लागला; आणि सुशीलेला काय वाटलें कुणास ठाऊक, ती तिकडे जाण्यास निघाली; पण बाळूनें प्रसंगावधान ठेवून तिला जोरानें ओढून घेऊन डावीकडच्या भिंतीवर अर्धवट लोटलेंच म्हणून बरें झालें; नाहींतर मोठा अपघातच व्हायचा. या धांदलींत भिंतीवर लोटल्यामुळें तिला थोडेंसें लागलें, तिचा झगा मळला व तिची पेन्सिल (तिच्या दृष्टीनें ही सर्वांत मोठीच आपत्ति!) हरवली! बाळूच्या अंगाला गाडीचें चाक चाटून गेलें व तोहि तोंडघशीं पडला; पण ईश्वरकृपेनें कोणालाच फार मोठा अपघात झाला नाहीं म्हणून ठीक झालें. सुशीलेचा झगाबिगा मुलांनीं झाडल्यावर तिनें पाटी उचलली; पण पेन्सिल हरवलेली लगेच कळल्यामुळें तिला रडूं आवरेना. बाळूच्या दांतांतून थोडेसें रक्त येत होतें तें पाहिल्यावर मात्र तिला कसेंसेंच झालें व सुनंदाजवळ जाऊन "बाळूचा दांत पडला का रे? दांत नाहीं ना पडला? उद्यां बरा होईल ना? दांत पडला तर पुन्हां येतो का रे?" असेंतसें पुष्कळ विचारूं लागली. पण मंडळीचा घोळका पुष्कळ जमला होता व ती वेळ सुशीलेसारख्या सर्वांच्या आवडत्या मुलीच्याहि प्रश्नांचीं उत्तरें देत बसण्याची नव्हती; म्हणून सुनंदानें 'मग सांगेन, मग सांगेन' असें कांहींतरी म्हणून तिला गप्प बसविलें.

गप्प बसल्यावर साहजिकपणें मनाशीं ती विचार करूं लागली आणि 'नापास करीन' म्हणून विश्वासरावांनीं जी दहशत घातली होती तिची तिला क्रमाक्रमानें आठवण झाली. 'तुमच्या देवाला आमचा देव पाडील' या आशयाच्या

बोलण्याचीहि तिला आठवण झाली व तिला कसेंसेंच वाटूं लागलें. सुदैवानें शाळेत गेल्यावर बाळूनें तिला पेन्सल दिली व रावबानेंहि दुसरी एक दिली आणि तिच्या वर्गांत जेव्हां विश्वासराव, गिरिधरराव व विनायकराव 'इन्स्पेक्शन' करितां आले तेव्हां तिला "तूं पास—'इन्फंटी' वर्गांतल्या सगळ्या मुली पास" असें सांगितलें; त्यामुळें घोडागाडीमुळें झालेल्या अपघाताचें दुःख ती पार विसरून गेली व 'आई, मी पास' असें आईला घरीं जाऊन केव्हां सांगेन असें तिला झालें. वास्तविक तिची किंवा तिच्या वर्गाची परीक्षा कोणी कांहींच घेतली नाहीं. फक्त एका कोपऱ्यांत भिंतीवर शाईचे काळे डाग पडले होते तेवढे मात्र हेडमास्तर गिरिधरराव यांनीं वर्गमास्तरांच्या लक्षांत आणून दिले व लहान मुलांना स्वच्छतेचें व व्यवस्थितपणाचें शिक्षण वर्गाच्या भिंतीपासून मिळतें असें गहन तत्त्व सांगून व त्या मास्तरांचा थोडासा—अबुद्धिपुरःसर का होईना—अपमान करून ते दुसऱ्या वर्गांत शिरले. प्राथमिक शाळेच्या प्रत्येक वर्गांत थोडीशी चांचणी करून व कानाकोंपऱ्यांत कोठें जाळींजळमटें आहेत का काय हें पाहून इन्स्पेक्शनकरितां आलेली मंडळी त्याच आवारांत असलेली 'अँग्लो-व्हर्नॅक्युलर' शाळा पाहाण्यास गेली. बाळू, सुनंदा आणि रावबा हे इंग्रजी दुसरींत होते; त्यांना रावबाचे वडील इन्स्पेक्शनला येणार म्हणून एक प्रकारें धन्यता व एकप्रकारें भीति वाटत होती. त्यांच्या वर्गांची गणिताची चांचणी गिरधररावांनीं जरा कसून घेतली. बरींच मुलें पास झालीं म्हणून गणित-शिक्षकांस फारच धन्यता वाटली आणि गिरधररावांना किंचित् वाईट वाटलें! उत्तरें बरोबर असतां देखील मुलांना नापास करावें इतके ते दुष्ट नव्हते; इतकेंच नव्हे, तर मुलांना येथें चांगलें शिक्षण मिळतें म्हणून त्यांच्या हृदयांतल्या आंतल्या कोशांत त्यांना खरोखर बरेंच वाटलें. ते किंचित् आढ्यतेखोर व आपल्या मताचा आग्रह धरून बसणारे असले, तरी दुष्ट व अन्यायी नव्हते. किंबहुना न्यायाविषयीं फारच पुस्तकी कल्पना असणें हाच त्यांचा दोष. एखाद्याला गुण म्हणावयाचा असेल तर हा त्यांचा गुण त्याच दिवशीं त्या शाळेंत एका घटकेच्या आंत स्पष्टपणें दिसून आला. एका मुलाला त्यांनीं कोठलासा प्रश्न विचारला. तो त्याला येईना. रावबा त्याच्या जवळ बसला होता; त्यानें आपल्या मित्राला हळूच उत्तर सांगितलें. आपल्या मुलाचें हें कृत्य कर्मधर्मसंयोगानें गिरधररावांच्या लक्षांत आलें. मग काय विचारतां? भर वर्गांत त्यांनीं आपल्या मुलाची अशी फजिती केली व त्याला फडाफड इतके बोलले, कीं बाहेरच्या एखाद्याला वाटलें असतें, कीं या मुलानें चोरी

नाहीं तर याहून अधिक मोठा गुन्हा केला असला पाहिजे! रावबाला तर त्या दिवशीं असें वाटलें कीं आपले वडील हे आपल्याला छळण्याकरितांच जन्माला आले आहेत. "सांगू नये पण सांगितलें मैत्रीकरितां, म्हणून कांहीं इतकं बोलायला नको होतं. दुसऱ्या मुलानं हेंच केलं असतं तर त्याला कांहीं बोलले नसते इतकं. पण माझा अपराध सांपडल्यावर जणूं कांहीं त्याच्या अंगांत भूत येतं" असें तो शाळा सुटल्यावर बाळूजवळ बोलत होता. बाळूहि त्याला हो हो म्हणत होता व मधून मधून 'मुलाला बोलले नसते तर लोकांनीं त्यांच्यावर पक्षपाताचा आरोप केला असता' अशा अर्थाचें तो थोडेंसें समर्थन करीत होता. पण त्यानें किंवा सुनंदानें किती सांगितलें तरी भर वर्गांत आपल्या पित्याकडून झालेला हा अपमान रावबा कसा विसरणार? तो विसरला नाहीं तरी त्याच्यावरील या प्रसंगामुळें बाळू व सुशीला यांना आपल्या दुखापतीची फारशी आठवण झाली नाहीं हा त्यांतल्या त्यांत लाभच म्हणावयाचा! हा लाभ अर्थात् कांहीं थोडा काळच टिकणार होता. कारण दुसऱ्या दिवशीं बाळूचें अंग जागोजाग ठणकूं लागलें व सुशीलेला त्याच रात्रीं अनेक स्वप्नें पडून तिचा देव व दुसऱ्यांचे देव यांमधील कुस्त्या, घोडागाडी उडविणारे राक्षस, शाळेची परीक्षा घेणारे कावळे, बाळूला बोलणारी आई, रावबाला मारणारे त्याचे वडील, इत्यादि किती तरी भयंकर देखावे दिसले. पण वेळोवेळीं ती जागी होई, तेव्हा मातृदेवतेनें तिचें सांत्वन केल्यामुळें व शरीर आणि मेंदू अगदीं थकून गेल्यामुळें तिला मधून मधून पुष्कळ झोंप मिळत होती व दुसऱ्या दिवशीं सकाळीं ती जागी झाली तेव्हां देवांच्या कुस्त्यांच्या अस्पष्ट देखाव्याशिवाय तिला स्वप्नांतलें कांहींच आठवलें नाहीं.

---

## ६ : आनुवंशिक संस्कार

"आज बाळूनें आपल्या मित्रांना गौर पाह्यला बोलावलं आहे. कांहीं मोठी पुरुष मंडळीहि यायची असतील ना?" अन्नपूर्णाकाकू आपल्या पतिराजांना म्हणाल्या. पण आज विश्वासरावांना काय झालें होतें कोणाला ठाऊक, ते थोडेसे उदासीन व चिडखोर झाले होते.

"बाळूनं आपले मित्र बोलावलेन् म्हणून मीं आपले मित्र बोलवावेत, असं

कुठं शास्त्र आहे?" ते किंचित् तिरसटपणानें प्रिय पत्नीला म्हणाले. पण आपल्या पत्नीवर आपण उगाच रागावलों असें लगेच मनांत येऊन ते म्हणाले, "खरं सांगू का, मला आतांशा चार मंडळींत जावंसं वाटत नाहीं आणि आपल्याकडे चार मंडळी यावीशीहि वाटत नाहीं. चार मंडळींत सगळेजण उगाच तोंडदेखलं बोलतात आणि हंसतात,–कोणी कांहीं खर बोलत नाहीं. खरं संभाषण दोन माणसांतच होतं,–पण त्यांतहि थोडासा आडपडदा पुष्कळ वेळां असतो. अगदीं खरं बोलायचं, म्हणजे मनुष्य आपल्याशीं तेवढं खरं बोलतो, नव्हे, पुष्कळ वेळां तो स्वतःशीं देखील खरं बोलत नाहीं! स्वतःलाच मनुष्य पुष्कळ वेळां फसवितो. मग लोकांना फसवील यांत नवल काय?"

"गौर पाह्यला चार मंडळी बोलवायची त्यांत फसवत आहे कोण आणि कशाला? आणि हें व्याख्यान कशाला एवढ्याशा गोष्टीबद्दल? म्हणे मनुष्य स्वतःलाच फसवतो! कांहीं तरी डोक्यांत मधून मधून वेडं घ्यायचीं आणि..."

"मी वेडा आहें, झालं ना?" विश्वासराव आतां रागानें नव्हे, तर हंसत हंसतच म्हणाले. "तुला ठाऊक आहे ना, कीं मधून मधून मला असल्या वेडाचा झटका येतो म्हणून? मग कां उगाच वाद घालतेस? मला आज कोणाशीं बोलावंसं वाटत नाहीं—एकान्तांत जावंसं वाटतं–तूं देखील नकोस."

"मी केव्हां हवी होतें तर आतांच नकोशी झालें आहें म्हणायचं? लहानपणीं आईबापांनीं गांठ बांधून दिली आहे ती तोडायची नाहीं, म्हणूनच मला जवळ राहूं दिली आहे, हें मी ओळखून नाहीं असं नाहीं कांहीं! मेलं मला मरणसुद्धां येत नाहीं; तें आलं असतं म्हणजे मग तुम्हांला चांगली सुशिक्षित कशी हवी तशी बायको करून घेतां आली असती!"

अन्नपूर्णाबाई आणखी पुढें कांहीं बोलणार, इतक्यांत बाळू तेथें आला आणि म्हणाला, "आई, मी आपल्या वर्गांतल्या मुलांना बोलावूं का? आणखी आमच्या क्रिकेटक्लबाच्या मुलांना? फार नाहींत कांहीं, २०–३० होतील सगळीं मिळून."

"कुणाला बोलावूं नकोस." अन्नपूर्णाकाकू त्याच्या अंगावर ओरडून म्हणाल्या व रडूं लागल्या. बाळूला आपल्या आईच्या या ओरडण्याचा व रडण्याचा अर्थच कळेना. तो भांबावल्यासारखा झाला व ओशाळला. इतक्यांत विश्वासराव म्हणाले, "बोलाव रे बाळू तूं आपल्या सोबत्यांना. सहज मी

कांहींतरी बोललों, तर रागावली आहे. माझ्यावरचा राग मुलांबाळांवर कां काढायचा? मुलांबाळांची हौस आपण पुरवायची नाहीं तर कोणीं?"

"कशाला पाहिजे ती मुलांची हौस पुरवायला?" अन्नपूर्णाकाकू मुद्दाम वेड पांघरून पतिराजांवर मोठा विजय मिळविला अशा आवाजानें म्हणाल्या. "सगळीं माणसं लुच्चीं-फसविणारीं आहेत!—मनुष्य स्वतःलाच फसवतो!—मग मुलंबाळं तर फसवायचींच! आणि मी अन् बाळू तर फसवायला आणि छळायलाच आलेलीं आहों जन्म घेऊन!"

"उगाच भलतं बोलूं नकोस, अर्थाचा अनर्थ करून. मी कोठल्या अर्थानं बोललों आणि तूं कोणत्या अर्थानं बोलतेस! मी आपला उदास होऊन सर्वसामान्य सिद्धांत सांगितला. तुला व्यक्तिदृष्ट्या का मीं वाईट म्हटलं?"

"मला नाहीं तुमचे 'सर्वसामान्य सिद्धान्त' समजत. कोणाला बोलवायाचं आहे का म्हणून विचारायला आलें, तर 'कोणी कोणाशीं खरं बोलत नाहीं. सगळे लोक फसवणारे आहेत' अशी भाषा; मग माणसाला राग येईल नाहीं तर काय होईल?"

"माणसाला राग यावा, पण बायकोला नये येऊं." विश्वासराव कांहींतरी बोलून या सगळ्या प्रकाराचा हास्यांत अंत करण्याच्या उद्देशानें म्हणाले.

"म्हणजे? बायकोची माणसांत गणना नाहीं वाटतं होत?" अन्नपूर्णाकाकूंनीं पतिराजांचा सद्धेतु ओळखून व प्रकरण न लांबविण्याच्या हेतूनें स्मितयुक्त मुखानें विचारलें.

"तस नाहीं. पत्नी म्हणजे 'देवता'. '**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते**'—ठाऊक आहे ना?"

"अशीच ना पूजा बायकांची करायची!"

"काय बरं वाईट केली पूजा? दरवर्षी नवीन दागिन्यांचीं फुलं वाहतों, खाद्यपेयांचा रोज सुग्रास नैवेद्य दाखवितों; आणखी कशी या गृहदेवतेची पूजा करायची? आणि या अशा पूजेनं संतुष्ट होऊन बाळूसारखा प्रसादहि या देवतेनं दिला आहे; आणि..."

"पुरे झाली ही थट्टा. बाळूच्या देखत तरी असली थट्टा नये करूं. त्याला आतां बारावं वरीस लागेल..."

"आणि सुशीलेला सातवं कां आठवं लागेल ना!—या दोघांचीं वयं तुला पाठ आहेत म्हणून विचारतों..."

" हो, खरंच. सांगायचं राह्यलं. आपल्याकडे कोणी मुलगी नाहीं हाताखालीं काम करायला, म्हणून सुशीला येणार आहे आणि तिची आई पण येणार आहे."

" सुशीला कशाला ?–तुला मदत करायला वाटतं ? कांहीं वाईट नाहीं कांहीं; पुढं मागं सून झाली तर..."'

" आतां थट्टेची लहर आल्येय् वाटतं ? मघाशीं रानांत जायची लहर आली होती आणि आतां हें कांहीं तरी भलभलतं बोलायची लहर ! पुरुषांचं मन वाऱ्यासारखं असतं म्हणतात, तें कांहीं खोटं नाहीं."

" आमचं मन वाऱ्यासारखंच; पण रात्रीच्या गार वाऱ्यासारखं असतं. तुमचं चैत्रांतल्या या दोन वाजायच्या सुमारच्या झळीसारखं असतं–एवढाच पुरुषांतला आणि बायकांतला फरक ! "

अन्नपूर्णाकाकू यावर फार कांहीं बोलल्या नाहींत; केवळ ' कांहींतरी बोलायचं झालं ' असा आशय सुचविला जाईल अशा रीतीनें मान हलवून त्या तेथून निघाल्या. बाळूहि त्यांच्या पाठोपाठ जात होता, पण त्याला विश्वासरावांनीं " अरे, बाळू, जरा थांब; थोडंसं काम आहे " असें म्हणून थांबवून घेतलें. तो थांबल्यावर त्यांनीं गिरिधरराव हेडमास्तर व विनायकराव वकील यांना आणि आपल्या शाळेंतील दोनतीन मास्तरांना गौर पाहण्यास बोलवावयाचें आहे म्हणून बाळूला सांगितलें व " सुनंदाला बोलावणार आहेस ना ? त्याला आज राह्यलाच बोलाव त्याच्या आईला पण बोलाव " असें म्हणून ते पुस्तक वाचूं लागले. बाळूला तेंच पाहिजे होतें. लगेच कोटटोपी चढवून तो खालीं स्वयंपाकघरांत आईकडे गेला व " बोलावणीं करायला मी बाहेर जातों आहें, बाजारांतून तुला कांहीं आणायचं आहे का ? " म्हणून त्यानें तिला विचारलें.

" हो, बरं विचारलंस. लिंबं आणायचीं आहेत आणखी." अन्नपूर्णाकाकू म्हणाल्या. " आणि बाळू, जरा थांब; चहा ठेवला आहे, तो पिऊन मग बाहेर जा."

बाळू बोलावणीं करावयास बाहेर पडला व विनायकरावांना बोलावणें करून गिरिधरराव हेडमास्तरांकडे गेला व नम्रतेनें बोलावणें करून रावबाला इकडे तिकडे पाहूं लागला.

" रावबा का पाहिजे ? तो आतां निजला असेल; त्याची ही विश्रांतीची वेळ आहे." हेडमास्तर म्हणाले. बाळूनें ' त्याला पण बोलवायला मी आलों होतों '

असें म्हणून व जरा थांबून त्या उग्र हेडमास्तरच्या घरांतून पाय बाहेर काढला. अर्थात् तो मग सुनंदाकडे गेला व त्याला घेऊन इतरांकडे बोलावणीं करूं लागला. वाटेंत बाळू सुनंदाला म्हणाला, "रावबाला मघाशीं बोलावणं केलं, पण त्याला कांहीं बोलवायचं माझ्या मनांत नव्हतं. त्याचा क्रिकेट-क्लबहि सोडून द्यावासा वाटतो आहे मला."

"माझ्या मनांत किती दिवस हें येतं आहे. पण तो क्रिकेट-क्लब सोडला तर आपल्याला क्रिकेट खेळायला कसं मिळेल?"

"नाहीं मिळालं तरी हरकत नाहीं; पण त्याचा तो उमटपणा नको."

"आपण वर्गणी काढून क्रिकेट-क्लब काढूं या. तुझे बाबा तुला बॅट् आणि स्टंपा खात्रीनं घेऊन देतील."

"तेंच माझ्या मनांत येतं आहे."

"पण रावबासारखं तूं नाहीं ना करणार, कीं माझी बॅट आहे म्हणून मी आधीं खेळणार आणि मी औट झालों तरी औट धरायचं नाहीं..."

"मी असं करीन असं तुला वाटतं का, सुनंदा?" बाळूनें विचारलें.

"वाटत नाहीं, पण म्हणतात ना —लक्ष्मी काय करील आणि काय नाहीं."

"लक्ष्मीचं उगाच नांव झालं आहे; सरस्वती कांहीं कमी उन्माद आणीत नाहीं! तुझंच पाहा ना, आपण मोठे बुद्धिमान आणि वर्गांत पहिला नंबर म्हणून तुला कितीतरी गर्व झाला आहे!"

"मला गर्व आहे हें तूं वादाकरितां कांहींतरी बोलतो आहेस, हें मी ओळखून आहें; पण तूं म्हणतोस तें कांहीं खोटं नाहीं. लक्ष्मीपेक्षां सरस्वतीच अभिमान उत्पन्न करते."

"सरस्वती ही बोलकी आहे आणि लक्ष्मी मुकी आहे म्हणून लक्ष्मीची इतके दिवस निंदा होत आलेली आहे, दुसरं कांही नाहीं." बाळूनें सुनंदाचा अनुवाद केला.

"लक्ष्मी मुकी कशानं आहे? '**मूकं करोति वाचालं**' असं आहे तिचं सामर्थ्य!" सुनंदा म्हणाला.

"हो, तेंहि खरं आहे. '**स एव वक्ता स च दर्शनीयः**' असं म्हटलंच आहे.' बाळूनें उत्तर दिलें.

आपण इंग्रजी पहिल्या इयत्तेपासूनच सोपीं संस्कृत सुभाषितें सामान्य अर्थ

सांगून बाळूकडून व सुनंदाकडून जीं पाठ करून घेतलीं, त्यांचा असा हा उपयोग झालेला पाहून विश्वासरावांना मोठा आनंद झाला असता ! अस्तु.

अशा रीतीनें भांडण न करितां मौजेंत वादविवाद करीत ते जात असतां सुनंदानें रावबाला आपण क्लब सोडतों आहोंत हें केव्हां कळवावयाचें असें बाळूला विचारलें.

" केव्हां म्हणजे ? आजच." बाळू म्हणाला.

" नाहीं, नाहीं. आज त्याला आपण बोलावलं आहे,—आज नाहीं ही गोष्ट काढायची."

" बरं आहे; तूं म्हणतोस तसं का होईना ! " बाळूला मित्राचें म्हणणें योग्य वाटून त्यानें अनुमोदन दिलें. "एकंदरींत बाबा म्हणतात तेंच खरं, कीं सामाजिक समारंभ म्हणजे कृत्रिमपणा आणि खोटेपणा."

" तुझ्या बाबांचं म्हणणं अगदीं खरं आहे. वास्तविक हेडमास्तर त्यांना कांहीं आवडत नाहींत; पण ते 'हेडमास्तर' पडले, पुष्कळ दिवस एका गांवीं राहिलेले, म्हणून त्यांना बोलवावं लागल. बोलावल्यावर आदरातिथ्य आणि गोडगोड बोलणीं झालींच पाहिजेत; पण पोटांत कांहीं खरं प्रेम नसतं."

" तसंच पाहिलं, तर जगांत खरं प्रेम नाहींच मुळीं." बाळू विषय बदलण्याच्या उद्देशानें म्हणाला.

"कां, प्रेम कां नाहीं ? तुझ्या—माझ्यामध्यें नसेल एक वेळ; पण सुशीला आणि तूं—"

" आमचं प्रेम खरं; पण तुझं आणि माझंहि तितकंच खरं आहे." बाळू म्हणाला.

सुनंदाच्या मनांत सुशीलेचें नांव घेऊन बाळूची चेष्टा करावयाची होती; पण बाळू आतां केवळ बारा एक वर्षांचा आणि निष्कपटी, तेव्हां सुनंदाच्या चेष्टेची खोंच त्याच्या ध्यानांत आली नाहीं. सुनंदानेंहि शहाणपणानें तो विषय सोडला आणि मित्रमंडळींना वगैरे बोलावणीं करून ते घरीं आले.

घरीं आल्यावर सुशीला जांभळ्या निळ्या रंगाचा मोठ्या कांठाचा परकर व जरीकाठी खणाची चोळी घालून घरांत वावरताना दिसली. अन्नपूर्णाकाकूंनीं गौरीची मांडामांड आपल्या ऐपतीप्रमाणें केलीच होती. बैठकीहि मांडून झाल्या होत्या. तेव्हां मुलांना आतां काम राहिलेंच नव्हतें. बाहेरून दमून आले होते,

म्हणून बाळूला व सुनंदाला थोडें थोडें पन्हें, आंब्याची डाळ व कलिंगड मिळालें. सुशीलेला हे पदार्थ मिळाले का नाहीं हें सांगावयास नकोच. एक गोष्ट मात्र सांगितली पाहिजे, कीं "आपण भातुकली खेळूं या, आम्ही दोघे ब्राह्मण" असें म्हणून सुनंदानें व बाळूनें तिची डाळ आपल्या बशींत घेण्याला सुरवात केली व "आतां भाजी वाढ, आता लाडू, आतां मागूनचा भात, आतां ताक" असें करतां करतां सबंध डाळ संपवीत आणली! आपली डाळ संपत आली, तेव्हां कुठें तिच्या ध्यानांत आलें कीं आपण फसलों! पण हें तिच्या ध्यानांत आल्यावर त्या दोघांनीं घेतलेल्यापेक्षां अधिक डाळ जेव्हां तिला परत दिली व कलिंगडाच्यावरचा गोड तांबडा भागहि थोडा थोडा दिला तेव्हां तिला यांच्यावर खोटं-खोटं रागवावं, का 'तुम्ही मला फार आवडतां' म्हणून सांगावं, हें क्षणभर कांहींच सुचेना आणि म्हणून ती नुसती डोळे मोठे करून थोडेंसें स्मित करून त्यांच्याकडे पाहातच राहिली. "माझी डाळ आधीं कां घेतलीत फसवून? आतां नको डाळ मला जा!" असें म्हणून अखेर तिनें रुसण्याचें सोंग केलें व डाळ आणि कलिंगडहि दूर लोटून दिलें. ती रडायला लागली तर आई व बाबा रागावतील म्हणून मग बाळू व सुनंदा हे तिला आणखी कलिंगड देऊं लागले व त्यांनीं पन्हेंहि तिच्या पेल्यांत आणखी घातलें; पण तिचा रुसवाफुगवा राहीना, तेव्हां त्या बिचाऱ्यांना फार वाईट वाटलें व ते अगदीं गयावया करूं लागले. अखेर ती बालदेवता त्यांना एकदां प्रसन्न झाली व मौज अशी, कीं त्या देवतेनें उदार बुद्धीनें आपल्या भक्तांना डाळकलिंगडाचा प्रसाद आणि पन्ह्यानें तीर्थ स्वहस्तानें देऊन आपणहि त्यांच्याबरोबर प्रसाद ग्रहण करण्याचा अनुग्रह केला.

"गौर रोज केली तर किती मौज होईल!" सुनंदा आनंदातिशयाच्या भरांत म्हणाला.

"गौर कांहीं रोज करायची नसते." सुशीला आजीबाईप्रमाणें पोक्तपणें म्हणाली.

"कां? रोज गौर केली म्हणजे ती रुसते का काय तुझ्यासारखी?" बाळूनें सुनंदाकडे डोळे मिचकावून विचारलें.

"रुसत नाहीं रे," सुशीला गंभीरपणानें म्हणाली. "पण गौर कांहीं रोज करायची नसते, आई म्हणाली. लोकांकडे देखील रोज गौर करीत नाहींत कांहीं."

"लोक करीत नसतील; पण गौर ही देवी आहे ना, तिला रोज आपण बोलावली तर ती येणार नाहीं का काय?" सुनंदानें खोडसाळपणानें विचारलें.

"येईल तर काय झालं, पण असं रोज रोज गौरीला बोलवायचं नसतं." सुशीलेनें उत्तर दिलें. "तुझ्या आईला विचार पाहिजे तर, तिला अधिक समजतं का तुला? तुझ्या आईला मीं आज सकाळींच विचारलें, तेव्हां ती म्हणाली, कीं गौर सजवतों ती कांहीं खरी गौर नसते कांहीं; पण पूजा केली म्हणजे खरी गौर येते तिथें, आणि तिला रोज रोज बोलवायचं नसतं कांहीं."

सुनंदा आणखी वाद वाढविणार होता; पण इतक्यांत कांहीं बायकामंडळी हलुहळ येतांना दिसली, तेव्हां तो व बाळू माडीवर गेले. अन्नपूर्णाकाकू, लक्ष्मीबाई आणि सुशीला आतां इकडून तिकडे मिरवूं लागल्या. बायकामंडळींची ये-जा बरीचशी कमी झाल्यावर संध्याकाळच्या अगदीं थंड वेळीं हेडमास्तर गिरिधरराव व विनायकराव वकील आले. इकडच्या तिकडच्या हवापाण्याच्या गप्पा झाल्यावर हेडमास्तरसाहेब म्हणाले, "विश्वासराव, तुमचं आम्हांला 'व्होट' पाहिजे हां! आणि तुमचं पण विनायकराव!"

"कसलं व्होट?" दोघांनीं एकदम विचारलें.

"मी म्युनिसिपालिटीकरितां उमेदवार उभा राहाणार आहें."

"काय म्हणतां? पण आमचं व्होट नाहीं तुम्हांला मिळायचं." विश्वासराव एकदम उद्गारून गेले. आपण आपल्या वरिष्ठाला असं एकदम बोललों ही चूक झाली–नेहमीच्या आपल्या स्वभावाप्रमाणें आपली ही चूक झाली–हें ध्यानांत येऊन आपल्या धोरणरहित तडकाफडकी स्वभावाचा त्यांना स्वतःलाच तिट्कारा आला; पण स्वतःच्याच स्वभावापुढें कोण काय करणार?

त्यांच्याप्रमाणेंच गिरिधररावांनाहि चमत्कारिक वाटलें. कारण आपले असिस्टंट एकदम असें नकारात्मक उत्तर देण्याचं धाडस करतील असें त्यांना वाटलें नव्हतें. विनायकराव वकील मात्र त्यांतल्या त्यांत शान्त होते. ते बोलण्याला पुन्हा सुरवात करून द्यावी या उद्देशानें म्हणाले, "कोणत्या पक्षाचे म्हणून उभे राहाणार?"

"अर्थात् मॉडरेट ऊर्फ प्रागतिक."

"पण मी जहाल पक्षाचा आहें." विश्वासराव म्हणाले.

"तें खरं, पण आपण आपले पक्षभेद मनांत आणूं नयेत. स्पेन्सर म्हणतो, कीं हल्लींच्या समाजाच्या विकसनावस्थेंत बरेच लोक अविचारी व पक्षान्ध असावयाचेच; पण प्रत्येक गांवीं कांहीं थोडे तरी स्वतंत्र बुद्धीचे लोक असले तरच समाजाची उन्नति होईल. म्हणून म्हणतों, कीं तुम्ही पक्षाभिमानी होऊं नका!"

"कां ? तुम्ही जर अमुक एक पक्षाचे म्हणून उभे राहाणार, तर आम्हीं पक्ष कां मनांत आणूं नये ?"

"त्याच्याबद्दल मागून वाद करूं." विनायकराव वाद विकोपाला जाऊं नये म्हणून म्हणाले. "आधीं हें तर सांगा, तुमचं नांव सुचवलं आहे कुणीं ? दुजोरा कोणीं दिला ? केव्हां अर्ज केलात ?"

"तें सगळं सांगतों मी; पण आज यांचं बस्तान जरा बिघडलेलं दिसतंय्. असे एकदम तिरिमिरीवर हे सहसा येत नाहींत."

"होय, तसं झालं आहे खरंच. व्यवहारांतल्या कृत्रिमपणाला कंटाळून कांहीं दिवस रानांत जावंसं मला वाटूं लागलं आहे, पण मुलाबाळांचा मोह सुटत नाहीं. तेव्हां मनांतला रुसवा केव्हां तरी कसा तरी बाहेर पडला आणि मघाशीं आपल्याला मीं एकदम 'नाहीं' म्हटलं. मला कोण कोण उमेदवार आहेत हें ठाऊक देखील नाहीं, मग एकदम अमक्याला नाहीं म्हणून म्हणण्यांत कांहीं अर्थच नाहीं."

"तें आतां सांवरून घेऊं नका. पहिल्या प्रथम एकदम 'नाहीं' म्हणून म्हणालेत तें तुमचं खरं मत. आतांचा हा प्रकार आपला सारवासारवीचा."

"तसं का म्हणा ना ?" विश्वासराव म्हणाले, व "बाळू, अरे बाळू, कलिंगड, पन्हें वगैरे आणखी आण" असें तेथें अदृश्य असलेल्या बाळूला उद्देशून म्हणाले. बाळू व सुनंदा खाद्यपेयांसह लवकरच तेथें हजर झाले आणि त्यांच्या पाठोपाठ रावबाहि क्रिकेटची बॅट हातांत घेऊन आला. "बाळू नि सुनंदा क्रिकेटचा आपला क्लब सोडून दुसरा क्लब काढताहेत" असें रावबानें आपल्या वडिलांना म्हटल्यावर "दोघां वडलांचें पटलें नाहीं, तर मुलांचें तरी कसें पटावें ?" असा कांहीं तरी विनोदवचनाचा कृत्रिम प्रयत्न करून गिरिधररावांनीं पन्हें थोडेंसें घेतलें व त्याबरोबर सगळे विचार गिळून टाकून पुढें फारसें न बोलतां ते तेथून बाहेर पडले !

रस्त्यावर गेल्यावर मागें वळल्यासारखें करून 'या विश्वासरावाचा राष्ट्रीय पक्षाचा अभिमान चांगलाच जिरवून काढला पाहिजे. लेकाचा व्होट देणार नाहीं म्हणून एकदम म्हणतो मला ! आणि त्याच्या पोराला आणि सुनंदालाहि चांगला हात दाखवला पाहिजे ! पण पोरं आहेत शिंचीं चांगलीं. उगाच शिक्षा करण्यांत अर्थ नाहीं. आपल्या रावबाचीच कांहींतरी चूक असली पाहिजे. एवढी शिस्त लावतों आहें मी, पण मूर्ख बेटा कांहीं तरी वाह्यात बोलत असतो आणि करीत असतो ! बुद्धिमान् आहे लेकाचा, पण हट्टी-एककली-आहे. बापासारखाच

आहे–असं त्याची आई म्हणते तेंच खरं.' हा शेवटला विचार मनांत येऊन चेहऱ्यावर एक प्रकारचं कटु हास्य निर्माण झालें, तें त्या वेळच्या चंद्रिकेमध्यें कोणाला दृग्गोचर झालें नाहीं; ' पण हंसावं का रडावं या आनुवंशिक संस्कारांच्या नियमाकडे पाहून ' असें ते जें पुटपुटले, तें मात्र त्यांच्या पाठोपाठ येणाऱ्या रावबाच्या कानीं अर्धवट पडलें. पण त्याचा अर्थ त्याला त्या वयांत काय कळणार ?

---

## ७ : अचलेश्वरीचें देऊळ

"आई, आज संध्याकाळीं अचलेश्वरीला जाऊं येतां ?" सुशीलेनें लाडिकपणानें आईला विचारलें.

"जाऊं हो ' त्यांनीं ' परवानगी दिली तर." लक्ष्मीबाईनीं आपल्या आवडत्या मुलीला आश्वासन दिलें. पण डाळिंब्या निवडून निवडून हात दुखूं लागल्यामुळें त्या थोड्याशा वैतागून गेल्या होत्या, तेव्हां त्यांचा राग जवळ असलेल्या मुलीवरच निघाला आणि त्या चिडखोरपणाच्या स्वरांत म्हणाल्या, "नेईन तुला, पण वालाच्या डाळिंब्या जरा काढायला ये. आतां कांहीं लहान नाहींस तूं. तुझ्याएवढीच मी होतें नऊ–दहा वर्षांची लग्नाच्या वेळीं." लक्ष्मीबाई म्हणाल्या.

"तुमच्या वेळेस शाळा नव्हत्या कांहीं." सुशीला ' एन् ओ टी नॉट् म्हणजे नाहीं ' असें पाठ करतां करतां मध्यें जरा थांबून म्हणाली.

"चवथीच्या परीक्षेंत पहिला नंबर आलाय् म्हणून एवढी ऐट नको यायला कांहीं. उद्यां लग्न झाल्यावर तुझा पहिला नंबर नाहीं उपयोगी पडायचा."

"पण मला लग्नच करायचं नसलं तर ?" सुशीला आईला म्हणाली.

लक्ष्मीबाई यावर कांहीं बोलणार, इतक्यांत विनायकराव माडीवरून खालीं आले आणि रागावल्याचा आव आणून सुशीलेला म्हणाले, "सुशीले, त्या चहाच्या कपबशा विसळून ठेवल्यास तर पाप लागेल वाटतं ? एवढी घोडी झालीस, पण काडीइतकें देखील समजत नाहीं."

"तिला कां उगीच रागावतां ?" लक्ष्मीबाई मुलीचा कड घेऊन म्हणाल्या. "कपबशा नको विसळायला ती. मी विसळीन. चांगला अभ्यास करतेय् तर उगाच बोलायचं ?"

" अभ्यास करतेय् डोंबलाचा. एक अक्षर येईल तर शपथ ! " विनायकराव रागाचें सोंग कायम ठेवून म्हणाले.

" पहिला नंबर आलाय् चवथीच्या परीक्षेंत आणि दोन खण बक्षीस मिळाले, तरी नाहींच का कांहीं येत ? आपल्या मुलीचं कौतुक तर नाहींच व्हायचं....."

" अग, कौतुक व्हावं म्हणूनच इतका वेळ तिच्याविरुद्ध बोललों ! माडीवरून तुझं पहिलं रागावणं—जाजावणं ऐकलं आणि तिला बिचारीला अभ्यास करतांना बोलूं लागलीस म्हणून तर हें सोंग केलं आणि ती कांहीं वाईट नाहीं हें तुझ्या-कडूनच काढून घेतलं ! "

विनायकरावांचा डाव लक्षांत आल्यावर लक्ष्मीबाई थोड्याशा ओशाळल्या. पण नवऱ्यानें आपली अशी थट्टामस्करी केलेली पाहून त्यांना आनंद अगदींच झाला नाहीं असेंहि नाहीं. " मुलीला रीत लागावी म्हणून मी बोललें, त्यांत काय वाईट केलं ? " त्या डाळिंब्या निवडतां निवडतां म्हणाल्या. " लग्न झाल्यावर पहिला नंबर नाहीं उपयोगी पडायचा कांहीं."

" लग्नाशिवाय दुसरा विचार तुझ्या मनांत येतो का तरी कधीं ? " विनायक-रावांनीं विचारलें व उत्तराची वाट न पाहातां आपणच म्हणाले, " कादंबरीकार आणि मुलीची आई, त्यांना मुलींच्या लग्नाशिवाय दुसरा कांहीं विषयच दिसत नाहीं ! मला तर असं वाटूं लागलंय्, कीं जगांत धर्म, राजकारण, शिक्षण हे खरे विषयच नाहींत ! "

" नेहमीं नेहमीं टिळक नि गोखले, धर्म नि इलेक्शन करून संसार नाहीं होत कांहीं. मध्यान्हीच्या वेळीं तोंडांत चार घांस पडायचे असले, तर तुमचीं तीं इलेक्शनं नाहीं उपयोगी पडायचीं आणि तुमचे टिळक-गोखले कांहीं मुलींबाळींचीं लग्नं जुळवायला नाहीं यायचे ! "

" म्हणून तर मी म्हणतों, कीं रात्रंदिवस आपण कादंबरीकारापेक्षां एकताननेनं सुशीलेच्या लग्नाचा विचार करूं या. आणि विचाराचा हा त्रास मिटवायचा असला तर असं करूं या, कीं सुनंदासारखा एखादा गरीब पण हुषार मुलगा घरजांवई करून घेऊं."

" माझी मुलगी कांहीं वाटेवर नाहीं पडलेली, पाहिजे त्या गरीबाला देऊन टाकायला ! " लक्ष्मीबाई रागानें ( कृतक रागानेंच ) म्हणाल्या.

" गरीब असला, तरी दरवर्षी परीक्षेंत पहिला नंबर येतोय् ! शिवाय त्याची आई इथंच राह्यला आली तर तीहि तुला उपयोगी पडेल."

" काय पण विहीण काढल्येयू शोधून ! " लक्ष्मीबाई पाटावरच्या सगळ्या डाळिंब्या ताटांत झटक्यासरशीं लोटून म्हणाल्या व त्या आणखी कांहीं बोलणार, तोंच त्यांचे पतिराज म्हणाले, " खरंच, तुला विहीण म्हणजे नाकदुऱ्या काढायला लावणारी पाहिजे, गरीब चालायची नाहीं, मी चुकलों खराच."

" बरं झालं चुकलेत तर, " लक्ष्मीबाई दुसरें उत्तर कांहीं न सुचल्यामुळें म्हणाल्या. " आमच्या बायकांत यावं कशाला पुरुषांनीं ? तुमचे टिळक–गोखले मेले नाहींत ना अजून !—आणि मेले असले तर इलेक्शनं नि पोट-इलेक्शनं आहेतच."

इतकें बोलून त्यांनीं पाटावरून एकदां जोराचा हात फिरवून पाट हापटून भिंतीशीं उभा केला व डाळिंब्यांच्या साली झाडण्याकरितां केरसुणी हातांत घेऊन सुशीलेला म्हणाल्या, " सुशीले, फुलं तेवढीं आणतेस का पूजेचीं ? अभ्यास नको नाहीं म्हणत मी, पण फुलें तेवढीं आण."

" ही पहा चाललेंच मी " असें म्हणून सुशीलेनें पुस्तक मिटलें आणि परडी घेऊन ती मागील दारीं गेली. विनायकरावहि अर्थात् पाट हापटण्याची व हातां-तल्या केरसुणीची नोटीस मिळाल्यावर माडीवर जाऊं लागले. इतक्यांत लक्ष्मी-बाईंना एकदम कसलीशी आठवण होऊन त्या उद्गारल्या, " हो. खरंच, आज द्वादशी आहे. अचलेश्वरीला सुशीलेला घेऊन जावं म्हणतें."

" म्हणजे तांगा करण्याची परवानगी पाहिजे, एवढाच ना याचा अर्थ ! खुशाल तांगा करून जा."

" तांगा नको कांहीं करायला. पार्वतीकाकू आणि रावबा जाणार आहेत त्या आपल्या तांग्यांतून, त्यांनीं मला नि सुशीलेला बोलावलं आहे."

" उत्तम. बरं, मी आतां बाहेर जातों इलेक्शनच्या कांहीं कामासाठीं; अकरा वाजतां येईन. सुशीलेचं जेवण करून घ्या आणि तिला जाऊं द्या शाळेंत. पण बाळू आणि सुनंदा अजून कां येत नाहींत ? ते आमचे खास व्हॉलंटिअर आहेत." विनायकराव असें म्हणताहेत, तोंच नाटकांत जशीं नेमक्या वेळीं तीं तीं पात्रें हजर असतातच, त्याप्रमाणेंच ते दोघे व्हॉलंटिअर्स तेथें येऊन उभे राहिले.

"अरे, आज एवढंच काम तुमचं," विनायकराव त्यांना म्हणाले, " कीं म्युनिसिपालिटींत जाऊन टेबलावर चिठ्ठी लिहिली आहे ती द्यायची आणि मत-

दारांची यादी घेऊन यायची; आणि संध्याकाळीं आपल्या स्वयंसेवकांची सभा बोलवायची."

'बरं आहे' असें दोघांनीं म्हटल्यावर विनायकराव माडीवर गेले व कपडे करून आपल्या कामाकरितां बाहेर पडले. बाळू व सुनंदाहि बाहेर पडूं लागले. तेव्हां लक्ष्मीबाईनीं त्यांना "थांबा, रात्रीचं थालिपीठ देतें तुम्हांला आणि सुशीलेला, तें खा आणि मग जा" असें सांगितलें व सुशीलेला त्या हांका मारूं लागल्या. ती लवकर आली नाहीं, म्हणून बाळू व सुनंदा मागील दारीं तिला बोलावण्याकरितां गेले. ती एका कोपऱ्यांत एका तांबड्या दगडाला फुलें वाहण्यांत गुंग झालेली दिसली. मागून कोणी आपल्याकडे पाहात आहे याचें तिला भानहि नव्हतें. तिची ती एकाग्रतेची पूजा पाहून दोघांनाहि क्षणभर मौज वाटली व ते तटस्थपणें त्या दगडाच्यापूजेकडे लक्ष देऊन पाहूं लागले. इतक्यांत बाळूला काय बुद्धि सुचली कोणाला ठाऊक, त्यानें तिचे डोळे झांकले!

झालें! तिच्या समाधीचा भंग झाला व आपण आपल्या देवाशीं हितगुज बोलत असतां विघ्न करणारा हा बाळू म्हणजे शुद्ध राक्षस आहे असें तिला वाटलें! बाळूचा राग येण्याचें आणखी कारण असें, कीं त्यानें तो फुलें वाहिलेला दगड हातांत घेऊन हातांतल्या हातांत झेलण्यास आरंभ केला व "हा का तुझा देव? याचं नांव काय? आणि याला मुंग्या कशा लागल्या? देवाच्या अंगावर मुंग्या?" अशा प्रश्नांचा भडिमार केला. सुनंदानेंहि त्या देवाची चेष्टा करण्यास मदत केली.

"शंकराच्या अंगावर साप असतात ना तसंच सुशीच्या देवाच्या अंगावर मुंग्या खेळताहेत," तो म्हणाला.

"शंकर नाहीं हा. हा गणपति आहे—याचं हें पोट कसं फुगलं आहे तें पाहा ना!" बाळू म्हणाला,

सुशीला बिचारी कांहींच बोलली नाहीं. तिच्या जिवाला आजच्या या कृत्यानें मोठा धक्का बसला. तो दगड म्हणजे तिचा देव होता; त्याच्याशीं ती किती वेळ तरी मनांतल्या मनांत हितगुज करायची. कितीदां तरी तिनें त्याला नवस केले होते व तोहि नवसाला पावला होता! क्वचित् प्रसंगीं तो नवसाला पावला नव्हता, तेव्हां ती कितीदां तरी त्याच्याशीं भांडली होती आणि "सुशीले, तूं अमुक अमुक केलं नाहींस, अमुक अमुक वेळीं आईचं ऐकलं नाहींस, अमुक वेळीं बापाचं ऐकलं नाहींस, म्हणून मी तुझ्या नवसाला

पावलों नाहीं; तूं चांगली वाग म्हणजे तुझ्या नवसाला मी पावेन" असें तिच्या देवानें तिचें तिलाच कळेल अशा रीतीनें कितीदां तरी सांगितलें होतें व तिचें सांत्वन आणि समाधान केलें होतें. बाळूला व सुनंदाला जो केवळ तांबडा दगड वाटत होता, तो सुशीलेला जिवंत देव वाटत होता. पण तें सगळें आतां क्षणार्धात गेलें. आपला देव-ज्याची आपण इतके दिवस कोणाला बातमी लागूं दिली नाहीं-आईलादेखील ज्याबद्दल कांहीं सांगितलें नाहीं आणि ज्याच्याशीं आपण आपल्या हृदयींचें हितगुज वर्ष दीड वर्ष बोलत होतों व ज्याच्याकडून आपल्याला हरतऱ्हेचें आश्वासन मिळत होतें तो देव-आतां बाळूच्या आणि सुनंदाच्या स्पर्शानें त्या दगडांतून गेला हें तिला अत्यंत दुःखदायक झालें. 'देव दगडांतून गेला हें तिला दुःखदायक झालें' असें आतां म्हटलें; पण वाक्य जरा बदललें पाहिजे. दगडांतून देव रागारागानें गेला असतां तर सुशीलेनें त्याला पुन्हां बोलावून आणलें असतें; पण त्या दगडांत देव नव्हताच मुळीं असें बाळूच्या व सुनंदाच्या कुचेष्टेनें तिचें तिला वाटूं लागलें-तिला तें पटलें, तिला तें खरें वाटूं लागलें, हीच तिची मोठी हानि झाली! 'इतके दिवस मी वेडी कशी या दगडाची पूजा करीत होत्यें' असें मनांत येऊन तिची तिलाच लाज वाटूं लागली. बाळू व सुनंदा आपल्याला हंसताहेत हें बरोबर आहे, आपणच वेड्या, आपण दगडाची वेड्यासारखी इतके दिवस पूजा केली, आपलें वेड बाळूनें दवडलें हें चांगलेंच केलें, बाळू फार चांगला, त्याला आपल्यापेक्षां पुष्कळ समजतें, त्याचें आपण नेहमीं ऐकत जावें, अशा प्रकारचे विचार मनांत येऊन बाळू तिला प्रिय होऊं लागला आणि पूर्वी सांगितल्याप्रमाणें तो अप्रियहि झाला. अर्थात् ती रडूं व हसूं लागली आणि बाळू व सुनंदा यांनीं पोराच्या जातीला अनुसरून तिला मग अधिकच चिडविण्यास आरंभ केला. या प्रकाराची अखेर नेहमींप्रमाणेंच झाली, म्हणजे बाळूला आणि 'नंद्या'ला लक्ष्मीकाकूंनीं चांगलेंच झाडलें आणि थालीपीठ व लोणी जरी दिलें, तरी तें त्यांच्या अंगीं लागूं नये असें केलें! आपल्या मूर्खपणामुळें आपल्या सोबत्यांना बोलणीं खावीं लागलीं हें पाहून सुशीलेला वाईट वाटलें; पण ती काय करणार बिचारी? ती रडूं लागली. पण रडण्याचें खरें कारण ध्यानांत न येऊन लक्ष्मीबाई त्या मुलांना आणखी बोलूं लागल्या! मुलीचें रडणें तेवढ्यानें थांबलें नाहीं, म्हणून "खरंच, सुशीले, आज 'अचलेश्वरी'ला जायचं आहे बरं का रावबाच्या टांग्यांत. शाळा सुटल्याबरोबर घरीं ये. उगाच रेंगाळत बसूं नकोस" असें त्या मग म्हणाल्या. अचलेश्वरीच्या दर्शनाच्या लालसेनें नव्हे,

तर त्यासंबंधीं दुसऱ्या गोष्टी निघून सुशीलेचें रडणें थोड्याच अवधींत थांबलें व तें प्रकरणहि तेथेंच थांबलें.

कादंबरीचें प्रकरण मात्र येथें थांबवितां येत नाहीं. कारण अचलेश्वरीच्या देवालयांत जातांना जी एक कानगोष्ट झाली तिच्यामुळें सुशीलेच्या जीवित-प्रवाहाला एक विशिष्ट वळण मिळालें व दुसऱ्याहि व्यक्तींच्या जीवितावर त्याचा परिणाम झाला. 'कानगोष्ट' म्हणजे विशेष कांहीं नाहीं; पण जगांत लहान गोष्टींचाच कित्येक वेळां मोठा परिणाम होतो! अस्तु.

गोष्ट अशी झाली, कीं 'अचलेश्वरी'च्या पायथ्याशीं तांगा गेल्यावर पार्वतीबाई, सुशीला व रावबा हे उतरले आणि पायींपायीं जाऊं लागले. मुलांना उत्साह भारी म्हणून तीं पुढें गेलीं. वाटेंत दुकानदारांचीं कांहीं दुकानें जेथें लागतात तेथें दोनतीन कुत्रीं त्यांच्या अंगावर भुंकूं लागलीं व एक तर लहानसें पिलूं धांवूनहि आलें. सुशीला इतकी घाबरली, कीं तिनें रावबाला घट्ट धरलें. तोहि अशा बाबतींत धीट होता. त्यानें हातांतली छडी उगारली व त्या पुढें पुढें येणाऱ्या व मनांत भिणाऱ्या कुत्र्याच्या पिल्लाला जागच्या जागीं थोपवून धरलें. इतक्यांत कुत्र्यांच्या मालकांनींहि कुत्रीं बोलाविलीं व आवरलीं. सुशीलेची भीति मात्र लगेच गेली नाहीं. ती रावबालाच चिकटून राहिली; पण क्षणार्धानें तिची मिठी हळुहळू सुटूं लागली. रावबानें सोडविल्यामुळें त्याच्याबद्दल तिला फार आदर वाटूं लागला; कृतज्ञताहि वाटूं लागली. रावबानें त्या वेळेस बूट वगैरे घालून छानदार पोषाख केलेला, त्याचा वर्ण गोरा, अंगकाठी उंच व मजबूत, चेहरा रुबाबदार, तेव्हां त्या स्थितींत तिला रावबा अत्यंत प्रिय होणें साहजिक होतें. तिच्या त्या वयांत शृंगारिक कल्पनांचा तिला अर्थहि कळत नव्हता, तेव्हां अर्थात् आदर, कृतज्ञताबुद्धि, प्रेम इत्यादि उपरिनिर्दिष्ट भावनांमध्यें शृंगारगर्भ आशयाची यत्किंचित् देखील छटा नव्हती. रावबाचें मन इतकें शुद्ध नसेल,—नव्हतेंच, म्हणजे त्याला शृंगारविषयक कल्पनांचा अर्थ कळत होता; तथापि तो ज्या वेळीं बोलण्याच्या भरांत येऊन सुशीलेच्या कानाशीं लागला व सुशीलेला "तूं किती चांगली आहेस! तूं माझी बायको होशील का?" असें म्हणाला त्या वेळीं त्याला आपल्या बोलण्याचा पुरतेपणीं अर्थ कळत होता असें समजायचें नाहीं. सुशीलेनें 'हो' म्हटलें त्यांत तर विचाराचा कांहींच भाग नव्हता व भावनेचा जो भाग होता तो उपरिनिर्दिष्ट शृंगारशून्य आदराचा व प्रेमाचा होता. पण हा 'हो'कार आपण 'अचलेश्वरी' देवीच्या देवळाजवळ

दिलेला आहे हें तिच्या ध्यानांत दोनचार वर्षांनंतरहि राहिलें व अर्थात् थोडेंबहुत समजूं लागल्यावर या 'अचलेश्वरी'समक्ष दिलेल्या 'हो'काराला तिच्या दृष्टीनें विशेष महत्त्व आलें! पार्वतीबाई व लक्ष्मीबाई मागाहून येत होत्या व त्यांच्या मागून कांहीं वेळानें बाळू व सुनंदाहि आले; पण त्यापैकीं कोणालाहि वरील कानगोष्ट त्या वेळेसच नव्हे तर पुढेंहि कांहीं वर्षें कळली नाहीं. पण त्यांना कळली नाहीं, तरी सुशीलेच्या हृदयावर परिणाम करण्यास ती राहिली का काय! §

---

## ८ : उषेची बाहुली

"यामुळें तर बोटीचा प्रवास नकोसा होतो. आगगाडींत आपलं चांगलं." लक्ष्मीबाई म्हणाल्या.

"चांगलं आहे पुष्कळ—" विनायकराव आपल्या पत्नीला म्हणाले, "पण आगगाडी आली पाहिजे ना आपल्या कोकणांत!"

"येणार आहे ना?" बाळूनें विचारलें. "परवां तर मीं 'केसरीं'त वाचलें, पहाणी करताहेत म्हणून!"

"पहाणी पुष्कळ दिवस करताहेत." विनायकराव म्हणाले, "पण पहाणीवर काय आहे? आमची 'ही' सुद्धां सुशीलेकरितां किती दिवस स्थळं पाहते आहे, पण जमतंय् कुठं?"

"भलतं भलत्या ठिकाणीं आणलेलं मला नाहीं आवडत?" लक्ष्मीबाई मान वेळून म्हणाल्या. "आपण तर पाहायचं नाहीं आणि दुसऱ्याला पाहूं द्यायचं नाहीं."

"नाहीं कोण म्हणताहे पाहायला? आपल्या या उषेलासुद्धां एव्हांपासून पाहायला लाग; चांगली ५-६ वर्षांची झाली आहे."

उषेचें नांव घेतल्याबरोबर लक्ष्मीबाईचें उषेकडे लक्ष गेलें. तिनें आपल्यापुढें आपली कापडी बाहुली घेतली होती व सुशीलेच्या मांडीवर डोकें ठेवून झोंपी

---

§ "ही कानगोष्ट कादंबरीकाराला कोणाकडून कळली असेल याबद्दल मला अटकळ आहे; पण यासंबंधीं आतां कांहीं लिहीत नाहीं." (सुशीलेची हस्त-लिखित टीप.)

जाण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु अखेर व्हायचें तें झालेंच ! कारण बोट लागून जी एकदम भडभडून ओकारी आली ती कांहीं पुसूं नका. तिनें विचारानें आपल्या-कडून दाबण्याचा प्रयत्न केला, पण तिचा इलाज नव्हता; सगळी घोंगडी भरून गेली, झगा घाणेरडा झाला व तिच्या दृष्टीनें सगळ्यांत वाईट गोष्ट म्हणजे तिची बाहुलीहि ओकारीनें भरून गेली !

"बाहुली आतां सोड हातांतली" लक्ष्मीबाई रागारागानें म्हणाल्या व आपल्या मुलीच्या हातांतून बाहुली हिसकावून घेऊन तिला सांभाळून धरूं लागल्या. उषेला बिचारीला आधींच बोट लागलेली, शिवाय नाकाडोळ्यांतून त्या वेळीं पाणी येत होतें, डोकें कसेंसेंच झालें होतें, पोटांत ढवळत होतें व मधून मधून ओकारी येईल असें वाटत होतें. घोंगडी, झगा आणि आपली बाहुली ओकारीनें भरल्यामुळें तिचें तिलाच आधीं ओशाळल्यासारखें झालें होतें, त्यांत पुन्हां आईनें बाहुली हिसकावून घेऊन रागारागानें बाजूला फेंकली, तेव्हां ती अधिकच रडूं लागली. याच वेळीं एकदम ओकारीची पुन्हां उबळ आली व मग तेथें जो प्रकार झाला आहे त्याचें वर्णन मी करीत नाहीं; कारण एक तर लोकांना तें आवडावयाचें नाहीं; आणि दुसरें असें, कीं त्याच वेळीं पाऊस येऊं लागून आपल्या ओळखीच्या या उतारूंचीच नव्हे, तर सर्वांची इतकी धांदल उडाली आणि तेथें इतका गोंधळ व इतकी घाण झाली, कीं ती बोटीचा प्रवास करणाऱ्यांनाच समजेल व त्यांनाच तें वर्णन पटेल; पण त्यांना तर अनुभव असल्यामुळें या वर्णनाची जरूरच नाहीं, आणि इतरांना वर्णन करून तें समजा-वयाचें नाहीं.

कालांतरानें त्यांतल्या त्यांत सामसूम होऊन थोडीबहुत व्यवस्थाहि झालीच. पाऊस पडतच होता, बोटीवर आच्छादन म्हणून पसरलेल्या ताडपत्रींतून थेंब गळतच होते, मधून मधून उसळणाऱ्या लाटांचे फवारेहि 'डेक्'वर येत होते; पण सों सों वाहाणारा वारा आतां थोडासा थांबला होता व मुलाबाळांची रडा-रडहि थोडीशी बंद होती; कारण ज्याच्या त्याच्या पालकानें त्यांतल्या त्यांत सोय करून त्यांना अंथरुणावर निजविलें होतें. निजतात कसलीं म्हणा; पण तीं अंथ-रुणावर पडलीं होतीं आणि ओकारी येईल तेव्हांच उठत होतीं. लहान मुलेंच कशाला, लक्ष्मीबाई, अन्नपूर्णाकाकू, यांच्यासारख्या बायकाहि जेमतेम जागा करून घेऊन पडल्या होत्या. मधून मधून ओकणाऱ्या मुलांना सांवरून धरण्या-

करितां किंवा रडणाऱ्या मुलांना आलें-सुंठ देण्याकरितां त्यांना उठावें लागत होतें हें वेगळें. पण एकंदरींत आतां थोडेंबहुत सामसूम झालें होतें ही गोष्ट खरी.

बाळू, सुनंदा व राबबा हे निजले नव्हते, तर डेकवर जाणाऱ्या जिन्याच्या समोरच्या बांकावर बसून किंवा बाजूच्या कठड्याकडे मधून मधून जाऊन समुद्राची व आसपासची मौज पाहात होते. विनायकराव, विश्वासराव व गिरिधरराव यांनीं जिन्याच्या मागच्या बाजूचें बांक पटकावलें होतें व ते त्या बांकावर गप्पा मारीत बसले होते. मधून मधून, अर्थात् ओकारीच्या वेळीं जरूर पडेल तेव्हां, ते सुशीला, उषा वगैरे मुलांना (किंवा प्रसंग विशेषीं मोठ्या बायकांनाहि) सांवरून धरण्यांत व पाणी, आलें, सुंठ देण्यांत बाळूला व सुनंदाला मदत करीत होते. हीं दोन पोरें मात्र अर्धवट चैनींत दिसलीं. मुलाबाळांचे व बायकामाणसांचे हाल होत नसते, तर त्यांना पूर्णपणेंच चैन वाटली असती; कारण त्यांना कांहीं बोट लागत नव्हती आणि पावसानें भिजण्याची वगैरे त्यांना पर्वा नव्हती. आसपासची घाण त्यांना आवडत नव्हती; पण लोक कसे बावळे व घाणेरडे आणि आपण कसे हुषार व स्वच्छ सुटसुटीत, ही भावना जागृत होऊन त्यांना स्वतःविषयीं कौतुक वाटत होतें; फार काय मुलेंबाळें, बायाबापड्या, म्हाताऱ्याकोताऱ्यांहूनच नव्हे, तर विनायकराव, गिरिधरराव, विश्वासराव वगैरे मंडळीहूनहि आपण कांहीं बाबतींत विशेष आहों असें त्यांना वाटत होतें. कारण या वडील मंडळींना बोट जरी लागली नव्हती, तरी पोटांत व डोक्यांत थोडीबहुत अस्वस्थता उत्पन्न झाली होती खचित, आणि मुलाबाळांच्या काळजीमुळें मनहि अस्वस्थ झालें होतें. पोरांना मात्र यांतलें कांहीं नव्हतें. उलट पाऊस, समुद्राच्या लाटा, समुद्रांत मधून मधून डोकावणारे म्हशीएवढाले मासे, तांडेलांची धांदल, मधून मधून बंदरें येत तेव्हां मचव्यांवरून बोटींत चढणारांची व बोटींतून मचव्यांत उतरणारांची तारांबळ या सगळ्याची मोठी मौज वाटत होती. सुनंदा तर बाल-तत्त्वज्ञानीच! तो त्या देखाव्यासंबंधीं हरतऱ्हेचे विचार करण्यांत व मधून मधून ते उद्गारून दाखविण्यांत गुंग झाला होता. वय कांहीं मोठें नव्हतें; पण तो म्हणजे सोळाव्या वर्षींच ज्ञानी झालेला दुसरा शंकराचार्यच व्हावयाचा! दुर्दैव असें, कीं बिचारा विसाव्या शतकांत जन्माला आला! थोडीशी वाण होती म्हणूनहि थोडेंसें बिनसलें, नाहीं तर सुनन्दाचार्यांचें एक सुनन्दभाष्यच १९०८

च्या सुमाराला आर्यभूमीला व आर्यसंस्कृतीला अलंकृत करावयाचें ! कोणाला खोटें वाटत असेल तर त्या लहान वयांत तो बाळूला काय म्हणतो तें ऐका—

" बाळू, ती बाहुली पाहिलीस का उषेची ? "

"हो, ती तिनें आपल्यापुढें ठेविली आहेन् ती ना ? त्यांत काय पाहायचं आहे ? "

" पाहा तर खरी ती–मघाशीं अंगावर ओकारी पडलेली, एक हात गळलेली, एक पाय मोडलेली, डोक्यावरचे केंस गळलेली आणि डोकं धडापासून अर्धवट वेगळं झालेली–ती बाहुली पाहा आणि या अशा बाहुलीचं प्रेमानं रक्षण करणारी ती उषा पाहा. आधीं या बाहुलीचं रक्षण करायचं कशाला आणि ही चिटुकली उषा तिचं रक्षण करणार काय ! पण मौज अशी, कीं या असल्या बाहुलीला ती नेहमीं अंगाखांद्यावर वागविते आणि तिला वाटतं आहे कीं आपल्याला जशी आई सांभाळते आहे तसं आपण हिला सांभाळावं. एक क्षणभरदेखील ती विसंबत नाहीं त्या बाहुलीला ! आणि दुसरी मौज पाहिलीस का –ती सुशीला उषेला आपल्या जवळ घेऊन तिच्या अंगावर हात ठेवून निजली आहे ! ओकाऱ्यांनीं प्रत्येकीचा जीव झाला आहे बेजार आणि या दुसऱ्यांना संभाळणार ! उषेनें बाहुलीला संभाळायचं त्यांतलाच हा सगळा प्रकार ! "

बाळूला आणि रावबाला सुनंदाच्या असल्या व्याख्यानांची संवय होती, तेव्हां ते कांहीं या व्याख्यानामुळें आश्चर्यचकित झाले नाहींत; उलट रावबा थोडीशी करमणूक होईल या आशेनें आणि बाळू, सुनंदाशीं संभाषण करण्याच्या हौशीनें दोघेहि आपापल्या परीनें त्याच्या व्याख्यानपर्जन्याला प्रश्नात्मक वायूची प्रेरणा देऊं लागले.

" म्हणजे तुला म्हणायचं आहे काय ? कोणीं कोणाचं संरक्षण करूं नये असें का म्हणायचं आहे तुला ? " बाळूनें विचारलें.

" तसं नाहीं, " सुनंदा म्हणाला. " मला एवढंच सांगायचं आहे, कीं जग हें असं आहे. बाहुलीला उषा सांभाळते आहे, उषेला सुशीला, सुशीलेला तिची आई, तिला यजमान, त्यांना या बोटीचा कॅप्टन –कारण तो समजतो आहे कीं आपण आहों म्हणून ही मंडळी सुरक्षित आहेत ! अकस्मात् वादळ होऊन एकदम बोट बुडेल तेव्हां समजेल ! कॅप्टनला वाटतं आहे, कीं आपणच यांचं रक्षण करीत आहों ! "

" आणि या कॅप्टनला कोण सांभाळतो आहे ? " रावबानें विचारलें.

"त्याला होय? –त्याला त्याचा बाप. –आणि त्याचा बाप नसला, तर 'आकाशांतला बाप' आहेच!"

"तूं ख्रिस्ति लोकांची भारी चेष्टा करतोस हां, हें चांगलं नाहीं." बाळू म्हणाला.

"मी ख्रिस्ति लोकांची नाहीं चेष्टा करीत. 'आकाशांतला बाप' सहज तोंडांतून आला, एवढंच. मला सगळ्यांचं रक्षण करणाऱ्या देवाबद्दल बोलायचं होतं. हा देव आकाशांत, नाहीं तर स्वर्गांत, नाहीं तर क्षीरसमुद्रांत, नाहीं तर कैलासावर बसून सगळ्या जगाचं रक्षण करूं पाहातो आहे; पण मला मळक्या फाटक्या बाहुलीचं रक्षण करूं पाहणाऱ्या उषेहून त्याचा प्रकार कांहीं निराळा वाटत नाहीं! संसार हा असा वेडेपणाचा–मिथ्या आहे. माया म्हणतात ती हीच!"

"अस्सं, अस्सं!" रावबा उद्गारला. "तुम्ही आमच्यासारखे नास्तिक व्हायला लागलांत म्हणायचें! आमच्या वडिलांच्या स्पेन्सरला इतके दिवस हंसलेत आणि आतां शेवटीं आलेत नास्तिक्यावर!"

"मी नास्तिक कुठं आहें?" सुनंदा गालांत हंसत म्हणालाच, "देव आहे; इतकंच नाहीं, तर देवाचं रक्षण करणारा महादेव आहे, त्याचं रक्षण करणारा अति–महा–देव आहे, त्याचं रक्षण करणारा अत्यति–महादेव आहे, त्याचं रक्षण करणारा—"

"पुरे झालं, महाराज!" बाळू म्हणाला. "तुमच्यापुढं आम्हांला बोलतां येत नाहीं; पण तुमचं लक्षण कांहीं ठीक नाहीं दिसत."

"तूं आहेस ना माझं रक्षण करायला! आणि तूं नसलास, तरी आकाशांतला देव आहेच! आणि त्यानं दुर्लक्ष केलं, तर त्या देवाचा देव तर कुठं गेला नाहीं?"

"बास, बास, पुरे झालं महाराज! लोकांनीं ऐकलं तर काय म्हणतील?" बाळूनें त्याला अशा रीतीनें दाबलें व पुढें तो कांहीं म्हणणार, इतक्यांत सुशीला उठली व "काय रे सुनंदा, एकसारखी वटवट लावली आहेस? अगदीं झोंप येऊन देत नाहींस. डोकं उठून गेलं या कटकटीनं" असें म्हणाली आणि डोकीवर पांघरूण घेऊन अंथरुणावर पुन्हां पडणार, इतक्यांत तिच्या पोटांत कसंसंच होऊन तिला एकदम ओकारीच आली. सुनंदानें तिचें डोकें धरलें. तिला चूळ-भरण्यास पाणी दिलें. बिचाऱ्यानें तिच्या साडीवर सांडलेली (ती आतां मधून मधून साडी नेसायला लागली होती.) ओकारीहि पुसली, पण कांहीं

इलाज चालेना. तिची ओकारी आणि तिचें कपाळ दुखणें कांहीं थांबेना. कारण काय असावें बरें? बोटीच्या हेलकाव्यांमुळें आणि ओकाऱ्यांमुळें डोकें जड झालें असेलच, पण आतां वर्णिलेला देवाबद्दलचा वाद व त्यांतलें नास्तिक्य तिच्या कानांवर पडून आधींच भ्रमण करणाऱ्या डोक्यांत अधिकच भ्रांति उत्पन्न झाल्यामुळें व पोटांतल्या शंकांना बाहेर वाव न मिळाल्यामुळें ती आतां विशेष अस्वस्थ झाली असेल काय? कोणास ठाऊक! * एवढें मात्र खरें, कीं कांहीं वेळानें तिला अर्धवट गुंगी आली व ती 'देव, देवाचा देव' असें कांहींतरी स्वतःशींच बडबडूं लागली. ही बडबड ऐकून उषा उठली व आपल्या बाहुलीला हातांत घेऊन "आई, मी तुजजवळ येतें" असें रडत रडत म्हणाली; व तिच्या आईनें सुशीलेला जरा बाजूला सारून तिला जवळ घेतलेंहि. आईनें लोटल्यामुळें ती जागी झाली व डोळे उघडून पाहूं लागली; तेव्हां देवबीव कोणी नसून समोरच्या बांकावर रावबा, बाळू व सुनंदा बसले आहेत असें तिला दिसलें. स्वप्नांतले देव खोटे आहेत, हे मुलगे खरे, हें तेव्हां तिच्या लक्षांत आलें!

'यांतला नवरदेव कोण होतो हाच काय तो प्रश्न आहे!' असा विचार तिच्या मनांत आला आणि तिचें तिलाच हंसूं आलें. तिच्या आईचा ओढा रावबाकडे होता, तिच्या बापाचा बाळूकडे व तिचा कोणाकडे होता, हें तिचें तिलाहि ठाऊक नव्हतें. कारण सुनंदा तिला आदरणीय होता, बाळू प्रिय होता व रावबा आकर्षक होता; कारण तो श्रीमंत होता, देखणा होता आणि शिवाय अचलेश्वरीच्या देवळाला जातांना त्याला वचन दिलेलें होतें. या बाबतींत व इतर बाबतींतहि तिच्या मनांत त्या वेळीं हरतऱ्हेचे जे विचार आले, ते शांतपणें मनांत घोळण्यास—त्या स्थितींत जितक्या 'शांतपणें' घोळतां येतील तितक्या 'शांतपणें' घोळण्यास—तिला सोडून आपण विनायकराव, गिरिधरराव, विश्वासराव वगैरे मंडळीकडे वळूं या व हे कोणीकडे, कां जात आहेत हें पाहूं.

---

* बोटीवरील गोंगाट व बोटीच्या एंजिनाची घरघर यांमुळें वर वर्णन केलेला वादविवाद मला स्पष्टपणें ऐकूं येत नव्हता; पण माझे कान तिकडे लागून राहिले होते हें मला आतांदेखील स्पष्टपणें आठवत आहे. (सुशीलेची टीप.)

# ९ : मवाळ, जहाल, ज्वलज्जहाल

इतका वेळ आपण सामान्यतः संभाषणाच्या द्वारेंच ज्यांचा परिचय करून घेतला, त्या सोनगांवकर मंडळींचा आतां आपण जरासा अधिक परिचय करून घेऊं या. बोटीच्या डेकवर जाणाऱ्या जिन्याच्या पाठीमागल्या बांकावर बसलेल्या तिघांपैकीं मधले गृहस्थ विनायकराव हे वकील असून त्यांची वकिली त्या गांवच्या मानानें उत्तमच होती पुण्या-मुंबईकडच्या लोकांना त्यांची विशेष किंमत नव्हती, पण त्या जिल्ह्यांत विनायकराव म्हणजे कांहीं सामान्यांपैकीं व्यक्ति नव्हती. त्यांचे वडील वकीलच होते व त्यांची मूळची व वडिलांनीं भर घालून वाढविलेली इस्टेट आतां साठ खंडी भाताची शेती, एक दुमजली घर आणि चारपांच हजार रुपयांचे कांहीं कंपन्यांचे शेअर्स, एवढी होती. पुण्या-मुंबईच्या पुढाऱ्यांना विनायकरावांची विशेष किंमत नव्हती असें मीं म्हटलें, पण एका दृष्टीनें हें खरें नव्हे; कारण बाहेरच्या जिल्ह्यांतल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांकडून एखादें कार्य करून घ्यावयाचें असलें, म्हणजे त्यांना अगत्य बोलावण्यांत येई व ते आतां अशा एका कार्याकरितांच पुण्यास जात होते.

लोकमान्य टिळकांवर अद्यापि खटला भरण्यांत आलेला नव्हता. सन १९०७ ची सुरतेची राष्ट्रीय सभा उधळली गेल्यानंतरचा धुराळा अद्यापि जमिनीवर बसलेला नव्हता. बाचाबाचीनंतरच्या उखाळ्या-पाखाळ्या अद्यापि थांबल्या नव्हत्या. कोणाला पुढचा मार्ग स्पष्ट दिसत नव्हता. टिळकांना कदाचित् दिसला असेल; कारण त्यांना नेमस्त पक्षाशीं भांडणें जरी आवश्यक वाटत असलें, तरी नेमस्त पक्षाची निराळी कॉंग्रेस व राष्ट्रीय पक्षाची निराळी कॉंग्रेस, हा प्रकार त्यांना इष्ट वाटत नव्हता. दोन पक्षांची अशी फाटाफूट झाली, तर सरकार राष्ट्रीय पक्षाला चिरडून टाकील व नेमस्त पक्षाला धाब्यावर बसवील आणि एकंदरींत राष्ट्राची प्रगति थांबेल हें ते ओळखून होते. कॉंग्रेस मोडण्यापर्यंत भांडण विकोपाला जावें असें त्यांना केव्हांहि वाटत नव्हतें व पुढें सातआठ वर्षांनीं तुरुंगांतून सुटून आल्यावर त्यांना कॉंग्रेसचीं दोन शकलें सांधण्याचा इतका निदिध्यास लागला, कीं त्यापुढें ‘ गीतारहस्य ’ हा त्यांचा आवडीचा विषयहि एखादे वेळेस मागें पडायचा. एकीकरितां त्यांनीं आपल्या राष्ट्रीय पक्षाच्या कांहीं मित्रांचीं व भक्तांचीं मनेंहि दुखविलीं व फसेंहि करून

एकदांची एकी घडवून आणली आणि नंतर लखनौस कॉंग्रेस कार्बीजहि केली. पण हा प्रकार नंतरचा.

सन १९०८ सालीं एप्रिल महिन्यांत खटलाहि झालेला नव्हता. त्या वेळीं मघाशीं म्हटल्याप्रमाणें उखाळ्या-पाखाळ्या चाललेल्या होत्या. टिळकांनींच कॉंग्रेस मोडली व मोडण्याचा त्यांचा इरादा होता, याकरितां त्यांनीं गुंड लोक सुरतेस नेले होते, इत्यादि आरोप त्यांच्यावर होत होते. फेरोजशहा मेथा, नामदार गोखले वगैरे नेमस्त मंडळी अरेरावी आहेत, त्यांना टिळकांची लोकप्रियता पाहवत नाहीं, ते आराम-खुर्चीवर बसून राजकारणाच्या पोकळ गप्पाच मारणारे आहेत, सरकारचे बगलबच्चे आहेत, ते ( विशेषेंकरून गोखले ) सरकारच्या कानाशीं लागून टिळकांबद्दल सरकारचें मन कलुषित करतात, त्यांना स्वतःचा बडेजावच पाहिजे, त्यांनींच सुरतेला गैर-सनदशीर गोष्ट करून कॉंग्रेस मोडण्याचें पाप पदरीं घेतलें, त्यांना स्वार्थत्याग नको, ' even at a sacrifice ' हे शब्द ' स्वदेशी 'च्या ठरावांत घालण्याला कलकत्त्याच्या सन १९०७ च्या कॉंग्रेसमध्यें किती तरी प्रयास पडले, अशांना बहिष्कारयोग पटायचाच नाहीं, 'राष्ट्रीय' शिक्षणाचें देखील यांना वावडें, या ' मवाळां'चें किंवा ' गबाळां 'चें लोकनायकत्व आतां हिसकावून घेतलेंच पाहिजे, अशा प्रकारची भाषा 'राष्ट्रीय' म्हणविणाऱ्या लोकांच्या तोंडून नेमस्त पक्षाबद्दल निघत असे. ' आम्ही जर इतके वाईट अ.हों तर आमची निराळी कॉंग्रेस, तुमची निराळी कॉंग्रेस. आमचें Creed ( म्हणजे आमचें आद्यतत्त्व ) ज्यांना मान्य असेल त्यांनीं आमच्या कॉंग्रेसमध्यें यावें, तुमचें तत्त्व मान्य असेल त्यांनीं तुमच्या कॉंग्रेसमध्यें जावें; यांत काय वाईट आहे ? ' असें नेमस्त लोक जहालांना व ' ज्वलज्जहालां'ना विचारीत. टिळकांना दोन राष्ट्रीय सभा नको होत्या, म्हणून ते दोघांचें एकीकरण कसें करतां येईल या खटपटींत होते. त्यांचे हेतु कांहींहि असोत, ते या खटपटींत होते खरे. अशी परिस्थिति असतांना निरनिराळ्या जिल्ह्यांतल्या आपल्या पक्षांतल्या पुढाऱ्यांना गायकवाड वाड्यांत खाजगी चर्चेला बोलावून समेटाच्या आपल्या कल्पनेला त्यांचें मत कितपत अनुकूल होतें हें अजमावून घ्यावयाचें व तें तसें नसल्यास अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न करावयाचा, या हेतूनें टिळकांनीं कांहीं पुढाऱ्यांना बोलावलें होतें व त्यांपैकींच सोनगांवचे विनायकराव हे होते. त्यांच्या पत्नीचें माहेर पुण्यासच असल्यामुळें ती सुशीला व उषा या आपल्या मुलींसह पुण्यास येत होती.

गिरिधरराव हेडमास्तर नेमस्त होते हें मागें आलेंच आहे. ते सोनगांवच्या म्युनिसिपालिटीचे कांहीं वर्षें सरकारनें नेमिलेले सभासद व अलीकडे अध्यक्ष होते. त्यांचीं मतें कशींहि असोत, ते म्युनिसिपालिटीचें काम उत्तम तऱ्हेनें करीत होते. विशेषेंकरून स्वच्छता व आरोग्य यांकडे त्यांचें फार लक्ष असे. स्वच्छता, आरोग्य, शिक्षण व चोर-दरोडेखोर यांपासून रक्षण, याव्यतिरिक्त म्युनिसिपालिटीचेंच काय, सरकारचेंहि फारसें कर्तव्य नाहीं, इतर बाबतींत पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य असावें, अशा मताचे ते होते. राजाकरणांत ते फारसे पडत नसत; पण त्यांचा ओढा नेमस्तांकडे होता हें सर्वांना ठाऊक होतें. ते सरकारला मान्य असे अध्यक्ष होते, याचें कारण त्यांची सचोटी व आरोग्याविषयींची वगैरे दक्षता, हें तर होतेंच; पण नेमस्तपक्षाकडचा त्यांचा ओढा हेंहि कारण नव्हतें असें नाहीं. त्यांचें पुण्यास 'वसंतव्याख्यानमाले'मध्यें 'व्यक्ति विरुद्ध समाज' या विषयावर एक व्याख्यान व्हावयाचें होतें व त्याला जरी पांचसात दिवस अवकाश होता, तरी ते आपल्या एका नेमस्त आणि सुधारक अशा मित्राकडे मे महिन्याच्या सुटींत राहाण्याकरितांच येत होते. मित्राकडे घरोबा असल्यामुळें त्यांची पत्नीहि त्यांच्याबरोबर आली होती. तिचा दुसरा एक हेतु होता, तो म्हणजे रावबाला पुण्याच्या दोनतीन मुली ज्या सांगून आल्या होत्या, त्या सध्यां नुसत्या पाहून ठेवावयाच्या आणि चांगलेंच स्थळ असल्यास लग्न जमवून टाकावयाचें व उरकूनहि घ्यावयाचें. लग्नाची इतकी घाई करण्यास यजमान तयार नव्हते; पण पत्नीच्या इच्छांना, कशास कांहीं ठिकाणा नसतांना, सध्यां विरोध करणें म्हणजे उगीचच्या उगीच गांधीलमाशांना डिंवचून स्वतःला नसता त्रास करून घेतल्यासारखें आहे, हें ते ओळखून होते व या बाबतींत ते पत्नीजवळ फारसें प्रतिकूल बोलत नसत आणि अनुकूलताहि विशेष दाखवीत नसत.

त्यांचे असिस्टंट विश्वासराव हे सरकारमान्य हायस्कुलांत शिक्षक असले तरी ते राष्ट्रीय किंवा जहाल पक्षाचे होते. ते बहिष्काराचा व स्वदेशीचा पुरस्कार करणारे होते. Even at a sacrifice (स्वार्थत्याग करूनहि) स्वदेशी वस्तू वापराव्यात असें आग्रहानें म्हणणारे ते होते व Sacrifice (स्वार्थत्याग) करीतहि; पण एखादे वेळीं विलायती माल घेणें त्यांना विशेष पापाचें वाटत नसे. 'राष्ट्रीय शिक्षणा'चे ते पुरस्कर्ते होते; पण या बाबतींत बरीचशी वर्गणी देण्यापलीकडे त्यांनीं कांहीं कार्य केलें नव्हतें. स्वतः ते सरकारमान्य हायस्कूलच्या 'गटारां'तच काम करीत होते व स्वतःच्या मुलाला, म्हणजे बाळूला, त्यांनीं तळेगांवच्या समर्थ-विद्यालयांत

कांहीं घातलें नव्हतें. वरती 'गटार' शब्द घातला, तो त्यांच्या—व त्या वेळच्या बऱ्याच लोकांच्या—तोंडांतला आहे. सरकारमान्य शाळेंतली विद्या म्हणजे 'गटारांतील गंगा' असें त्या वेळीं म्हणण्यांत येत असे, त्याप्रमाणें हेहि म्हणत. पण या गटारगंगेचें गंगाजळ म्हणून काम करून दक्षिणा मिळविण्याचें व हें गटार-तीर्थ इतरांच्याच काय, स्वतःच्याहि मुलांना पाजण्याचें त्यांना कांहीं विशेष वाटत नव्हतें! 'विशेष कांहीं वाटत नव्हतें' हें म्हणणें अतिशयोक्तीचें असेल कदाचित्. आपाततः भासमान होणाऱ्या त्यांच्या या विसंगतीमध्यें सहानुभूति-पूर्वक पाहाणाऱ्यांना कदाचित् सुसंगति दिसेल. दिसेल कशाला? होतीच मुळीं. परंतु त्याची चर्चा आतां नको. ते बोटींतून मुंबईकडे कां चालले होते हें आपण पाहात होतों, तिकडेच वळूं या. त्यांची पत्नी अन्नपूर्णाकाकू यांना बाळू हा मुलगा झाल्यानंतर चारपांच मुलें झालीं, पण तीं अकालीं जन्म घेत व अर्थात् मरत. अन्नपूर्णाकाकूंचा बाळूवर किती जीव असेल हें पुत्रवती मातांना सांगावयास नकोच. आणखी एखादें तरी मूल आपणांस असावें व मुलगी झाली तर फारच उत्तम, असें अन्नपूर्णाकाकूंना तीव्रपणें कां वाटावें हेंहि बहुधा मातांना सांगतां येईल. चारपांच मुलें होऊन तीं अकालीं मृत्युवश होणें या आपत्तीचा विचार देखील आपणास कसासाच वाटतो; मग प्रत्यक्ष त्या मातांना काय होत असेल हें त्यांचें त्यांनाच ठाऊक. अन्नपूर्णाकाकूंनीं सोनगांवच्या वैद्यांचीं व डॉक्टरांचीं औषधें पुष्कळ घेतलीं, अंगारे लावले, व्रतवैकल्यें केलीं, नवस झाले, प्रदक्षिणा झाल्या, बुवांचे अंगारे झाले, पण सहाव्या-सातव्या महिन्यांत मूल गमावायचें हें कांहीं थांबेना. अखेर तेथें अनायासें आलेल्या एखाद्या मुंबईच्या डॉक्टरणीकडून तपासून घेतल्यानंतर ऑपरेशन करण्याचें ठरलें व करूं करूं असें दोनतीन वर्ष करतां करतां त्या मिरजेस वानलेससाहेबांकडून ऑपरेशन करून घेण्याकरितां चालल्या होत्या. त्यांच्याबरोबर सेवेला कोणी असावें म्हणून सुनंदाच्या आईला विश्वासरावांनीं चांगलें गौरवून विनवलें होतें व त्या माऊलीनें थोडेंसें आपल्या गरीब परिस्थितीकडे पाहून व थोडेंसें—थोडेंसें कां बरेंचसें—अन्नपूर्णाकाकूंना उपयोगी पडावें या हेतूनें येण्याचें कबूल केलें होतें. सुनंदाची आणि बाळूची मैत्रीहि तिनें थोडीबहुत विचारांत घेतली असेलच. सुनंदाला मिरजेस न्यायला विश्वासराव तयार होते, पण त्याला पुण्यास राहून वसंत-व्याख्यान-मालेंतलीं व्याख्यानें ऐकण्याची आणि उपवक्ता म्हणून बोलण्याचीहि त्या बालवयांत मोठी हौस होती, म्हणून तो पुण्यासच आपल्या

एका सोनगांवकर मित्राकडे राहाणार होता व आईजवळ विशेष पैसे नाहींत हें जरी त्यास समजत होतें, तरी व्याख्यानमालेच्या हौशीमुळें व स्वातंत्र्यप्रियतेमुळें त्यानें खाणावळींत जेवण्याचें योजिलें होतें. आईचे काबाडकष्टाचे पैसे आपण उधळून तर टाकीत नाहीं ना, असा त्याचा त्यालाच प्रश्न उत्पन्न होई; परंतु ज्ञानलालसे-पुढें हा विचार मागें पडे. पुण्यास येऊन राहाण्याचें आणखी एक कारण असें होतें, कीं त्याला आपल्या सोनगांवकर मित्राशीं कांहीं राजकारणांतलें खलबत करावयाचें होतें. सन १९०७–८ सालच्या बाराबारा पंधरापंधरा वर्षांच्या महाराष्ट्रीय मुलांशीं ज्यांचा निकट परिचय झाला असेल त्यांना कांहीं मुलांच्या—अर्थात् कांहीं अगदीं थोड्या अपवादात्मक मुलांच्या—मनांत कोणते विचार येत होते व ते विचार त्यांच्या आंतड्यांना पीळ पाडून एखादे वेळेस कसे बाहेर पडत, हें आतां आठवेल व ते तरी 'लहान मुलांना कसलं आलं आहे राजकारण' असला प्रश्न विचारणार नाहींत आणि पुढें दिलेलें संभाषण शक्य आहे; इतकेंच नव्हे, तर असलीं संभाषणें आम्हीं ऐकलीं आहेत, किंबहुना आपापल्या परीनें आम्हीं त्यांत कोठल्या तरी राजकीय पक्षाचे म्हणून अनुकूल किंवा प्रतिकूल भागहि घेत होतों हेंहि कबूल करतील. राजकारणाशीं आपणाला कांहीं कर्तव्य नाहीं, कोणता पक्ष खरा व कोणता खोटा हें आपणांस पहावयाचें नाहीं, तर कोणत्या वातावरणांत सुशीला, बाळू, सुनंदा वगैरे मंडळी वाढलीं एवढेंच आपणांस पाहावयाचें आहे; हें मात्र आपण मनाच्या एका कोंपऱ्यांत नेहमीं वागविलें पाहिजे.

विनायकराव, गिरिधरराव व विश्वासराव बांकावर बसले होते; आणि बाळू, सुनंदा व रावबा हे सुशीलेच्या मागें वर्णिलेल्या ओकारीच्या प्रकारानंतर इकडे तिकडे हिंडायचें सोडून त्या बांकाजवळच खालीं, रावबा व बाळू दोन ट्रंकांवर व सुनंदा वळकटीवर, असे बसले होते. त्यांच्या आसपास कांहीं पांढरपेशी मंडळी आपआपल्या घोंगड्यांवर, नाहीं तर सत्रंज्यांवर बसली होती व तिघांचा संवाद मूकपणें ऐकत होती. त्यांची बहुतेकांची सहानुभूति विनायकरावांकडे होती; पण गिरिधरराव हे कांहीं त्या प्रांतांतलें लहानसहान प्रकरण नव्हतें आणि त्यांचा पोषाख, त्यांचा रुबाब व त्यांची ठांसून बोलण्याची ऐट, यामुळें त्यांच्याहि बोलण्याकडे लोकांचें लक्ष लागत असे. गिरिधररावांना भर मंडळींत वादविवाद करावयाचा नव्हता, म्हणून ते प्रथम प्रथम टाळाटाळीचीं उत्तरें देत होते; पण शेवटीं तेदेखील भोंवऱ्यांत सांपडलेच.

'तुमच्या पक्षाचं आणि आमच्या पक्षाचं कधीं पटायचं नाहीं विनायकराव, हें आपण पाहातों आहोंत; मग तुम्ही आपली निराळी कॉंग्रेस कां काढीत नाहीं ?'

'आम्हांला तुम्ही पाहिजे आहांत. आम्हांला एकी पाहिजे आहे. तुम्हीं मोडलंत तरी आम्हांला जोडावयाचं आहे म्हणून.'

'टिळकांना म्हणे एकी पाहिजे आहे!' गिरिधरराव उद्गारले. 'ते आतांपर्यंत कोठें गेले आहेत आणि एकीची त्यांनीं बेकी केली नाहीं असं झालं आहे का ? नेमस्त पक्षापाठीमागें लपून सरकारपासून आपलं रक्षण करून घ्यायचं आहे म्हणून त्यांना एक कॉंग्रेस पाहिजे आहे, दुसरं काय ? अगस्ति ऋषीच्या सुदर्शन-चक्रापासून रक्षण करून घेण्याकरितां मार्कंडेयानें जसा शिवलिंगाचा आश्रय केला, तसा टिळक-पक्ष गोखले-पक्षाचा आश्रय करतो आहे !'

उपमेनें आपण मोठाच जय मिळविला असें त्यांना वाटलें व ते जयसूचक स्मित करून सभोंवतीं पाहूं लागताहेत न लागताहेत, तोंच विनायकराव म्हणाले, 'मार्कंडेयाच्या उपमेपेक्षां आम्हांला अर्जुनाची उपमा द्या. आमचा पक्ष शिखंडीच्या आश्रयानें प्रतिपक्षावर बाण मारतो आहे !'

विनायकरावांनीं नेमस्तांना अप्रत्यक्षपणें शिखंडी ठरविणारी ही कोटि केल्यावर गिरिधररावांचें जयसूचक स्मित जागच्याजागीं जिरलें; पण ते लगेच उपरोधिक स्वर काढून म्हणाले, 'हो, खरंच. लाल–बाल–पाल हे या कलियुगांतले अर्जुनच आहेत हें मी विसरलों. अरविंद घोस हे यांचे कृष्ण ! ( उपरोधिक स्वर सोडून गंभीर स्वर स्वीकारून ) अहो, अर्जुनाच्या आणि कृष्णाच्या गोष्टी कशाला बोलतां ?'

'कशाला म्हणजे, त्या आतां उपयोगी पडतात म्हणून !' विनायकरावांनीं उत्तर दिलें. 'कृष्ण हा आमचा गुरु आहे.'

'तुम्ही गुरु मानतां म्हणायचे मग ? मला वाटलं होतं, कीं नवीन युगांत गुरूच नाहींत. ( थट्टेचा स्वर सोडून ) ही आपली चेष्टा झाली, पण वडील माणसांबद्दल व गुरूंबद्दल अनादर उत्पन्न करण्याचं केसरीचं धोरण तुम्हांला आवडतं का ? कांहीं म्हणा विनायकराव तुम्ही, '**केसरी**'चं हें धोरण कांहीं आपणांस आवडत नाहीं. लहान मुलं आधींच माकडं आणि त्यांत त्यांना केसरी शिकविणार, कीं राजकारणाच्या धकाधकींत नेमस्तपक्षांतल्या पुढाऱ्यांचा कांसोटा त्यांनीं सोडला तरी हरकत नाहीं. शाळेंतले हेडमास्तर '**हे आमचे गुरुच नव्हत**,'–मग काय विचारतां ! म्हणतात ना, आधींच मर्कट—''

"पण हें खरंच आहे, कीं आपण त्यांचे खरे गुरु नाहीं. आपण पोटार्थी मास्तर!" विश्वासराव म्हणाले.

"मी नाहीं असं म्हणायला तयार!" गिरिधरराव म्हणाले. "केसरीकार आणि जहाल तेवढे खरे गुरु आणि आम्ही नेमस्त खरे गुरु नव्हे, कां तर आम्ही नेमस्त–या म्हणण्यांत कांहीं अर्थ आहे? आणि आम्ही उत्तम गुरु नसलों, तरी गुरूबद्दल मुलांच्या मनांत अनादर उत्पन्न करणं चांगलं का?"

"वाईट गुरूबद्दल अनादर उत्पन्न केला तर त्यांत काय वाईट आहे?" विनायकराव म्हणाले.

"समजेल,समजेल तुम्हांला! पुढें समजेल काय वाईट आहे तें!" गिरिधरराव म्हणाले. "आणि लहान मुलांना राजकारणांत पडायला चिथवणं व प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्ष रीतीनं मारामाऱ्या, बॉंब वगैरेकडे त्यांचं मन वळवणं हें काय चांगलं का? हा बाळू, हा सुनंदा, हे काय वाईट मुलगे, पण अलीकडे यांचं वर्तन पाहा कसं होत चाललं आहे तें."

"काय करताहेत ते?" विनायकरावांनीं विचारलें.

"करताहेत काय धोंडे म्हणा; पण उगाच मुलांच्या सभेंत भलभलतं बडबडायचं, अभ्यास सोडून 'केसरी', 'काळ', 'अमृतबझारपत्रिका' वगैरे वाचीत बसायचं..."

"पण यांत वाईट काय आहे?" विनायकरावांनीं मध्येंच अडवून विचारलें.

"वाईट असं, कीं त्यांचा अभ्यास राहातो. आतां सुनंदा हुशार आहे आणि बाळूचाहि अभ्यास बरा आहे हें सोडून द्या, पण हें कांहीं एकंदरींत बरं नाहीं. हा सुनंदा तर असला ज्वलज्जहाल झाला आहे, कीं त्याचं एकेक ऐकलं म्हणजे तुम्ही थक्क होऊन जाल. तो शिवाजीचा नवा अवतार होणार आहे आणि तुमचा बाळू म्हणजे त्याचा तान्हाजी! नाहीं तर असें म्हणूं या, कीं तुमचा बाळू हा **शिवाजी** आणि सुनंदा त्याचा **रामदास**! कारण तो मोठाच तत्त्ववेत्ता आणि वेदान्ती आहे. राजकारणांत तर तो मोठाच पंडित आहे!"

"आणि तुमचा रावबा कोण होणार?" विनायकरावांनीं हंसत थट्टेच्या स्वरांत विचारलें.

"त्याला चंद्रराव मोऱ्याची गति मिळावयाची आहे!" गिरिधररावांनींहि थट्टेच्याच स्वरांत उत्तर दिलें.

" नाहीं तर असं म्हणूं या आपण, कीं ते नवीन युगांतले लाल–बाल-पाल व्हायचे आहेत !" विश्वासराव म्हणाले.

" आमची चेष्टा करा सर तुम्ही," सुनंदा आतां मध्येंच म्हणाला, " पण 'भिक्षां देहि' करून स्वराज्य मिळत नाहीं हें आम्हांस आपलं खरं वाटतं."

" अरे, पण तूं कांहीं इतिहास वाचला आहेस का ? शास्त्रं कांहीं वाचलीं आहेस ? डार्विन, स्पेन्सर यांचीं नांवं तरी ऐकलीं आहेस ?"

" तीं नांवं रोज दहादां तरी आमच्या तोंडून तो ऐकतो." विनायकराव हंसत हंसत म्हणाले.

" थट्टा करा माझी; पण त्यांचा अधिकार आहे का राजकारणांत बोलायचा ?" गिरिधरराव शांतपणें म्हणाले.

" आमचा अधिकार नाहीं," सुनंदा म्हणाला, " पण राम, कृष्ण, शिवाजी, बाजीराव या अधिकारी व्यक्तींची शिकवण काय आहे ?"

" अरे, त्या वेळची परिस्थिति आणि हल्लींची परिस्थिति यांत कांहीं तरी साम्य ? ते नाशिकचे राम, कृष्ण, शिवाजीचे श्लोक आणि तो तान्हाजीचा पोवाडा आणि ती स्वतंत्रतेची भूपाळी पाठ करून आणि सुरावर म्हणून का स्वराज्य मिळतं ? स्वराज्य मिळवायला तयारी लागते !"

" ती तयारीच आतां करावी असं टिळक म्हणताहेत.'

" त्यांची तयारी पुष्कळ झाली आहे. तुम्ही आतां बायकांच्या वळकट्या गुंडाळून उतरायची तयारी करायला लागा, आलीच मुंबई !" असें म्हणून गिरिधररावांनीं भाषणाचा ओघच थांबविला म्हणून बरं झालं, कारण त्याच वेळीं सुशीलेला पुन्हां ओकारीची उबळ आली आणि ती भडाभडा ओकलीच ! तिची ती ओक पाहून उषा, अन्नपूर्णाकाकू, लक्ष्मीबाई, पार्वतीकाकू या सर्वांनाच मळमळूं लागलें आणि टिळक, गोखले, अरविंद घोस इत्यादि स्वर्गीय ताऱ्यांवर गेलेली त्यांची नजर समुद्राच्या खाऱ्या पाण्याकडे व बोटीवरील घाणीकडे वळली !

~ ~ ~

हा प्रकार त्या वेळचाच नव्हे, तर सगळ्या जीविताचा देखील हाच प्रकार नाहीं का ? उच्च विचार व उच्च ध्येयें सोडून आपण नेहमींच असे खालच्या घाणेरड्या वातावरणांत येत नाहीं का ? पण नको, कोरड्या तत्त्वज्ञानामध्यें शिरण्यांत अर्थ नाहीं !

---

**बाळू** आतां सोळा सतरा वर्षांचा झाला आहे. व तो सोनगांवच्या हायस्कुलांतील लहानशा सभामंदिरांत टेबलाजवळ उभा राहून '**जिज्ञासु बाल-मंडळा**'चा सेक्रेटरी या नात्यानें सन्माननीय व्याख्यात्याचे व पाहुण्यांचे आभार मानीत आहे. अध्यक्षस्थानीं अर्थात् गिरिधरराव हेडमास्तर होते. विनायकराव, विश्वासराव वगैरे संभावित मंडळी व्याख्यानाला आली होती व ती खुर्च्यांवर होती. त्यांच्यापैकीं कांहींच्या बायका व मुली ( कांहीं अगदीं लहान मुलीहि ) व्याख्यानाला आल्या होत्या व शाळेंतील ८-१० मुली जेथें बसल्या होत्या, तेथेंच त्या जाजमावर बसल्या होत्या. व्याख्यानाला बायका येण्याचें कारण असें, कीं तें धार्मिक विषयावर होतें आणि वक्ते अमेरिकेंतून आलेले व सुप्रसिद्ध होते. त्यांचा बांधा उंच व चेहरा भव्य असून त्यांनीं भगवीं वस्त्रें परिधान केलेलीं होतीं. व्याख्यान आतां आटोपलें होतें; व सुनंदा, रावबा वगैरे मुलांनीं कांहीं नास्तिक्यपर ज्या शंका स्वामीजींना विचारल्या होत्या, त्यांचीं उत्तरेंहि त्यांनीं दिलीं होतीं. अध्यक्षांनीं लहानसें भाषण करून उचित शब्दांनीं ( स्पेन्सर फारसा न आणतां ) थोडक्यांत आभार मानले होते. बाळू आतां हातामध्यें हार घेऊन वक्त्यांकडे तोंड करून ( व मधून मधून साहजिकपणेंच, न कळत, सुनंदाकडे पहात ) बोलत होता. त्याचें भाषण थोडें अडखळतच झालें, पण मुलांच्या मानानें तें बरें होतें. तें असें:

" आपल्या गुरुजनांना व आजच्या चतुर्थाश्रमी पाहुण्यांना नम्रपणें वंदन करून मी आतां माझें कर्तव्यकर्म करतों. तें कोणतें हें सांगावयास नकोच. आजचें व्याख्यान विद्वत्तेनें परिपूर्ण होतेंच; पण तें रस-( अडखळतो )-भरित होतें, ( वांग्याच्या भरताची आठवण होऊन हंशा पिकतो. ) हा त्याचा विशेष होय. याहून अधिक महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे अशी, कीं स्पेन्सर वगैरे पाश्चात्यांचीं मतें वारंवार ऐकून ईश्वर हा 'अज्ञेय' आहे, त्यावर श्रद्धा ठेवणें अज्ञानाचें लक्षण आहे असें आपणांस वाटूं लागलें होतें, तें स्वामीजींनीं कसें चुकीचें आहे हें आपल्या रसाळ व ( अडखळतो. हंशा. ) अनुभवाचा आधार असलेल्या वाणीनें सांगितलें आहे. तें आपणांस पूर्णपणें पटो किंवा न पटो, त्याचा आपल्या सर्वांच्या मनावर-निदान माझ्या तरी मनावर-विशेष परिणाम झाला आहे, आणि इतरांवरहि झाला असेल अशी माझी समजूत आहे. मूर्तिपूजा करणें अज्ञान-

मूलक आहे असें आपण अलीकडच्या पुस्तकांत वाचतों व शाळांमध्येंहि आपणांस अशा प्रकारचें शिक्षण मिळतें. पण घरीं आपण मूर्तिपूजा करतोंच ! मनांत मात्र पुष्कळ वेळां येतें, कीं मूर्तिपूजा आपण घरीं करतों हा मूर्खपणा तर नाहीं ? या प्रश्नाचें उत्तर स्वामीजींनीं हरतऱ्हेचे युक्तिवाद लढवून व उदाहरणें देऊन जें दिलें आहे तें विचार करण्यासारखें आहे व आम्ही त्याचा विचार करूंच असें स्वामीजींना नम्रपणें आश्वासन देऊन व आलेल्या सर्व पाहुण्यांचे आभार मानून स्वामीजींबद्दल आमच्या मनांत जी पूज्यबुद्धि आहे तिचें '**प्रतीक**' म्हणून ( त्यांनींच हा '**प्रतीक**' शब्द आज मला शिकविला ) ( उगीचच्या उगीच टाळया ) त्यांना गुरुजींच्या हस्तें मी सर्वांच्या वतीनें हा हार अर्पण करतों."

बाळूचें भाषण संपल्यावर हारतुरे होऊन मंडळी उठूं लागणार, इतक्यांत गिरिधरराव यांनीं खूण केल्यावरून सुशीला आपल्या जागेवरून उठली व टेबलाकडे जाऊं लागली. तिच्या हातांत लहान पेन्सिल व कागदाचा एक अष्टमांश तुकडा होता. टेबलाजवळ जाऊन, पदर सावरून, ( ती आतां बारा एक वर्षांची होती. ) ती घाबऱ्या घाबऱ्या आवाजानें, वाघ जणुं कांहीं पाठीस लागला आहे अशा आवाजांत, कागदावर लिहिलेल्या मुद्द्यांकडे मधून मधून पाहात, शून्य दृष्टीनें बोलूं लागली— " बंधुभगिनींनो व वडील माणसांनो, ( मुलांच्या टाळया. सुशीला चूक झाली असें वाटून जीभ काढते व लाजते. ) गुरुजींच्या आज्ञेवरून मी येथें जमलेल्या बायकांचे आभार मानण्याकरितां आलेली आहें. आजचे अध्यक्ष आपलेच आहेत, तेव्हां त्यांचे आभार मी मानीत नाहीं विद्वान व्याख्यात्यांचे आणि पुरुष पाहुण्यांचे आभार बाळूनें ( जीभ चावते. लोक टाळया वाजवितात. ) मानलेच आहेत. आपल्या गांवांत स्त्रिया व्याख्यानाला फारशा येत नव्हत्या. अशींच कांहीं धार्मिक व्याख्यानें झालीं, तर अलीकडे दहावीस बायका येऊं लागल्या आहेत. पण बायकांनीं खरोखर आलं पाहिजे. विद्येचं व ज्ञानाचं महत्त्व फार आहे. आपल्या इकडे स्त्री-शिक्षण फार मागासलेलं आहे. लोक आपल्या मुलींना शाळांमध्यें पाठवीत नाहींत. अलीकडे दोनचार वर्षांतच इंग्रजी शाळेंत पांचसात मुली येऊं लागल्या आहेत. तर यापुढें ही स्थिति सुधारली पाहिजे. मीं लोकांना उपदेश करणं म्हणजे लहान तोंडीं मोठा घांस आहे; पण आपण क्षमा करावी. आजच्यासारखं व्याख्यान बायकांनीं ऐकलं, तर त्यांत वाईट काय होईल ? बायकांना पुरुष अज्ञानांत ठेवतात व मग त्यांची चेष्टा

करतात. आम्ही बायका तुळशीला पाणी घालतों म्हणून कांहीं मोठे लोक बायकांची चेष्टा करतात, त्यांचें पाहून मुलगेहि चेष्टा करतात. झाडांत देव कोठला, दगडांत देव कोठला, असं तसं विचारून कांहीं मुलगे आम्हांस सतावून सोडतात. त्यांचीं नांवं मी घेत नाहीं. ( हंशा व टाळ्या. सुशीला लाजते व जीभ बाहेर काढते. ) आमची कुचेष्टा करणं सोपं आहे; पण आज स्वामीजींनीं मूर्तिपूजेचं जें मंडन केलं त्याचं खंडन करणं यांपैकीं कोणत्या मुलाला साधेल? 'प्रतीक' वगैरे जें कांहीं आज सांगण्यांत आलं, तें मला कांहीं चांगलंसं समजलं नाहीं. मला या शब्दाचा अर्थहि समजला नाहीं. ( हंशा ) पण व्याख्यान फार चांगलं झालं एवढं समजलं. ( हंशा ) ( किंचित् रागानें ) मला चांगलं बोलतां येत नाहीं; पण पाहुण्या बायकांचे आभार मानण्याची मला गुरुजींनीं आज्ञा केली होती म्हणूनच मी येथें आलें. पुन्हां एकदां आभार मानून आणि व्याख्यानांना अशाच रीतीनें वारंवार येण्याची विनंति करून मी खालीं बसतें.'

सभा बरखास्त झाल्यावर मुलें घरोघर जाऊं लागलीं. विनायकराव, विश्वासराव, गिरिधरराव व गांवांतील अशीच संभावित मंडळी स्वामीजींजवळ कांहींतरी ५-१० मिनिटें बोलून हळुहळू पांगली व कोणी फिरण्यास तर कोणी देवदर्शनास, कोणी एखाद्याकडे पानसुपारी खाण्यास तर कोणी विड्या ओढण्यास, कोणी आपल्या घरींच बायकोशीं गुलगुल गोष्टी बोलण्यास तर कोणी शिष्टपणें झोंपाळ्यावर बसून चहा पिण्यास, निघून गेले. बायकामंडळी मात्र सगळी आपआपल्या घराकडेच वळली. त्यांच्या बहुतेकांच्या बोलण्याचा विषय बाळूचें आणि सुशीलेचें भाषण हा होता. कोणी त्यांचें कौतुक करीत होत्या, तर कोणी कुचेष्टा करीत होत्या. अन्नपूर्णाकाकूंना आपल्या मुलाबद्दल व लक्ष्मीबाईंना आपल्या मुलीबद्दल कौतुक किती वाटलें असेल, याचें माप मातांच्या हृदयाला करतां येईल. बोलतांना मात्र लक्ष्मीबाई बाळूची स्तुति व आपल्या मुलीची चेष्टा आणि अन्नपूर्णाकाकू सुशीलेची स्तुति व बाळूची चेष्टा करीत होत्या. रावबाची आई दोघांचीहि स्तुतिच करीत होती.

त्यांच्या पाठोपाठ हे मुलगे व सुशीला हीं येत होतीं. रावबानें सुशीलेच्या भाषणाची उपरोधिक स्तुति करून 'बायका त्या बायकाच, अखेर घाण करायच्या' असा शेरा मारला. पण सुशीला आतां थट्टामस्करीच्या बाबतींत चार टोले घेतलेन् तर दोन तरी उलट देणारी झाली होती. ती लगेच म्हणाली, 'अखेर घाण केली खरी; पण करायचं काय! आम्हांला कोठला गोड रस आणि

रसाचं ' भरीत ' साधायला ? आम्हांला बायकांना वांग्यांचं भरीत करतां येतं, पण रसाचं कसं भरीत करायचं हें आम्हांला नाहीं ठाऊक ! " असें म्हणाली. त्याबरोबर रावबा बाळूचें समर्थन करूं लागला. सुनंदा इतका वेळ कांहींच बोलत नव्हता; कारण तो जात्याच मननशील, अंतर्मुख व सुलभविकार असा होता आणि आजच्या व्याख्यानामुळें त्याच्या विचारांत चलबिचल झाली होती. बाळूच्याहि मनांत चलबिचल झाली होती, पण ती एवढी तीव्र नव्हती. पण तो वाद करण्याला–विनोदाकरितांहि वाद करण्याला–आतां तयार नव्हता. त्यानें विषयच बदलून टाकण्याकरितां म्हटलें ' कांहीं म्हण सुनंदा, आजच्या व्याख्यानानं खरं समाधान कांहीं अजून झालं नाहीं. तुझं झालंय् काय ? आणि रावबा, तुझं ? तुला काय वाटतं ? '

' अरे, माझं मत या बाबतींत निश्चित आहे. देव वगैरे सगळं ' अज्ञेय ' आहे.' रावबानें उत्तर दिलें.

' मला वाटतं देव आहे; ' बाळू म्हणाला, ' कारण जगांत जें एवढं सौंदर्य आणि जी एवढी सुव्यवस्था दिसते आहे, ती कांहीं एरव्हीं उत्पन्न व्हायची नाहीं. सुनंदा या युक्तिवादाची चेष्टा करतो आणि मला नेहमीं विचारतो, कीं तुमच्या या व्यवस्थापक देवाचा व्यवस्थापक कोण ? पण मला जरी या प्रश्नाचं उत्तर देतां आलं नाहीं, तरी मला एवढं समजतं आहे, कीं आकस्मिक रीत्या कांहीं एवढी सुव्यवस्था उत्पन्न होणार नाहीं ! आकस्मिक रीत्या आपोआप एखादं काव्य किंवा एखादी कादंबरी जशी लिहिली जात नाहीं, तर कोणी तरी कवि किंवा कादंबरीकार आवश्यक असतो, तसंच जगद्‌रूपी ग्रंथाचं आहे. या ग्रंथाचा कोणी तरी कर्ता असलाच पाहिजे. '

' आतां कसा बाळू बोलतो आहे पाहा. ' जवळच असलेल्या लक्ष्मीबाई म्हणाल्या. ' पण मघांशीं सभेंत तो घाबरला.'

' तरी पण धीटपणं बोलला, हें काय थोडं झालं ! ' रावबाची आई म्हणाली. ' आणि तुमची सुशीला तरी काय बाई हुशार आहे ! किती चांगलं बोलली !'

' चांगलं कसलं आहे, घाबरून गेली अगदीं ' तिची आई म्हणाली. 'आपल्या बायकांना पुरुषांसारखं नाहीं बोलतां यायचं.'

' घाबरून गेली पण बोलली ना ! आणि किती तरी चांगलं बोलली ! नाहीं तर आपण मुखदुर्बळ. '

‘ आपल्या वेळीं शाळेंत कोण मुलींना पाठवीत होतं ?’ लक्ष्मीबाई म्हणाल्या. ‘ आणि आतां तरी पाठवून फायदा आहे का तोटा आहे कोणास ठाऊक ! मुली मोठ्या झाल्या म्हणजे त्यांचीं लग्नं व्हायचीं कशीं ? ’

‘ लग्नं न व्हायला काय झालं ? ’ रावबाच्या आईनें उत्तर दिलें. ‘ तुमच्या सुशीलेसारख्या मुलीला कुठंहि स्थळ मिळेल. आमच्या रावबाला अशी बायको मिळाली तर आनंदानं करीन मी ! ’

‘ मग ठरवून टाका नि काय दोघांचं लग्न— ’ बाळूची आई म्हणाली. ‘ हुंड्यापांड्याचं मागाहून ठरवतां येईल. ’

‘ ते कशाला आमच्या सारख्यांकडे मुलगी देतील ? त्यांना–’

‘ न द्यायला काय झालं, पण पत्करली पाहिजे ना तुम्हीं ? आणि पत्करलीत, तरी रावबाला आवडली पाहिजे ना ? आजकाल नवऱ्यामुलाला दाखवून त्याला आवडली तर ती करायची अशी चाल निघाली आहे ना ? ’

‘ आमच्या रावबाला आवडतेय् हो ती–म्हणजे ‘ आवडेल ती ’ असं मला वाटतं. ’

रावबाच्या आईनें गुह्य लपविण्याचा प्रयत्न केला, पण आतां तें तिच्या तोंडून अर्धवट फुटलेंच; तेव्हां सुशीलेच्या आईला किती बरें वाटलें असेल याची कल्पनाच करावी. कारण तिच्या मनांत हें स्थळ किती दिवस तरी होतें, पण पत्करतील का नाहीं ही भीति होती.

दुसरी भीति आपल्या पतीची संमति मिळेल का नाहीं अशी होती; पण या किल्ल्याला सुरुंग लावण्याचें काम एक दोन वर्षे रात्रंदिवस चाललें असल्यामुळें तो सर होण्याला थोडीशी अडचण असली तरी ती फारशी नाहीं अशी तिची कल्पना होती. तथापि तिनें सावधगिरी ठेवून ‘ आपल्या बायकांच्या हातांत काय आहे याचं, पुरुषांच्या मनांत येईल तेव्हां खरें ’ असें कांहींतरी म्हणून किल्ला सर करण्याचा बेत तिनें कायम केला; इतक्यांत त्यांचें घर जवळ आलेंच व सुशीला किती मागें आहे हें ती वळून पाहूं लागली, तों ती बाळूच्या डाव्या बाजूला चालत असून ती त्या तिघां मुलांच्या क्रिकेटच्या गप्पा ऐकण्यांत रंगून गेली आहे असें तिला दिसलें.

---

अचलेश्वरीच्या डोंगरावर तीन मोठ्या दगडांवर रावबा, बाळू व सुनंदा त्रिकोणांत बसले होते. दोन आठवड्यांपूर्वीं दोनहि पक्षांच्या क्रिकेट-क्लबांची मॅच् होती आणि तींत बाचाबाची व मारामारी होऊन दोन्ही पक्षांना खालीं मान घालण्याची पाळी आली होती. तेव्हां समेट होतो कीं काय हें पाहाण्याकरितां बाळूनें हा योगायोग जुळवून आणला होता. डोंगरावर चढतांना त्या तिघांत बोलणें फारसें झालेंच नाहीं व आतांहि फारसें होत नव्हतें. मुख्य मुद्याला कोणी कसा आरंभ करावयाचा हीच मुख्य अडचण होती व जो तो सभोंवतालच्या देखाव्याकडे पाहून आणि मधून मधून हें पहा, तें पाहा, असें कांहीं तरी बोलून मुद्याचें बोलणें टाळीत होता. सभोंवतालचा देखावाहि त्यांच्या या वृत्तीला सहाय्यच करीत होता; कारण तो खरोखरीच प्रेक्षणीय होता. श्रावणांतले ते दिवस. मॅच् झाली त्या सुमारास कांहीं दिवस जरी उघाडी होती, तरी आज आठ-दहा दिवस एकसारखा पाऊस पडत होता. तो इतका, कीं पुण्याकडच्या मंडळींना त्याची कल्पनाच व्हायची नाहीं. या पावसामुळें आसपासच्या शेतांत पाणीच पाणी होऊन गेलें होतें. किंबहुना तीं सर्व शेतें पाण्यांतच बुडून गेलीं होतीं व गांवाभोंवतीं पाण्याचा समुद्रच जणुं कांहीं झाला होता आणि अचलेश्वरीवरून पावसाळा संपल्यावर एकीकडे नदी व एकीकडे खाडीचा फांटा असा देखावा जो स्पष्ट दिसत असे तो आतां दिसेनासा होऊन नदीचें पाणी खाडींत जाऊन जणुं कांहीं सृष्टीचें मूलभूत ऐक्य तेथें स्थापन होऊं लागलें होतें. डोंगरावरून गांवांतलीं घरें कांहीं स्पष्ट दिसत नव्हतीं; कारण, तीं आंबे, कांचन, काजू, फणस वगैरे झाडांत किंवा कळकीच्या अनेक बेटांत लपून गेलीं होतीं. मधून मधून धुराचे लोट जे वर येत होते, त्यांवरूनच त्या घरांचें अस्तित्व कळत होतें. अचलेश्वरीच्या डोंगरावर वाट तेवढी तिकडच्या मुरमाच्या रंगामुळें तांबडी दिसत होती; पण सभोंवतालचा प्रदेश [illegible]स, जांभूळ, आंबे, साग, सावरी, मोह अशीं झाडें, करवंदीच्या जाळ्या व निरगुडीचीं आणि इतर कांहीं झुडपें आणि हरतऱ्हेचीं गवतें व हंगामी लहान लहान झाडें यामुळें बहुतेक हिरवागार दिसत होता. 'बहुतेक' म्हणण्याचें कारण असें, कीं जिकडे तिकडे पाण्याचे झरे जे वाहात होते, ते क्वचित् क्वचित् शुभ्र पांढरे व तांबूस रंगाचे होते. हरतऱ्हेच्या सापांना व विंचू-इंगळ्या वगैरेंना बुडाशीं थारा देणारे दगड मधून मधून जे विखुरलेले होते ते काळेकुट्ट होते आणि त्यामुळें त्या

देखाव्यामध्यें वैचित्र्य उत्पन्न झालें होतें. आकाश आज अभ्राच्छादित होतें त्यामुळें, व तिकडची हवाच तशी असल्यामुळें, आणि शिवाय डोंगरावर चढून गेल्यामुळें थोडासा थकवा आल्यामुळें त्या तिघांना उकडत होतें व ते मधून मधून हुश्श हुश्श करीत होते. हें हुश्श हुश्श करणें कदाचित् मानसिक त्रासाच फळ असेल; पण हा प्रश्नच वेगळा. संध्याकाळच्या वेळीं आकाशांत जागोजाग दिसणारा तांबुसपणा रस्त्यांच्या तांबुसपणाला, तसेंच क्वचित् स्थलीं फोडलेल्या डोंगरावरच्या कड्यांच्या तांबुसपणाला आणखी एक तांबुस पूटच देत होता. वारा फारसा नव्हता. बैठकीचे दगड गार होते; पण हवा कांहीं तेवढी गार नव्हती व मनें तर संतप्तच होतीं. रावबानें केंसांना लावलेल्या तेलाचा, हाताला लावलेल्या अत्तराचा, तसेंच कानांत ठेवलेल्या कापसाच्या लहान बोळयाचा वास तिघांच्या घ्राणेंदियांस तृप्त करीत होता. झऱ्यांच्या खळखळाटाशिवाय, पांखरांच्या किलबिलाटाशिवाय आवाज फारसा येत नव्हता; आलाच तर भुंकणाऱ्या कुत्र्यांचा किंवा डुरकणाऱ्या बैलांचा किंवा हंबरणाऱ्या गाईचा मधून मधून येत होता. अशा या देखाव्याचें थोडा वेळ निरीक्षण झाल्यावर सुनंदानें एकदोन सुस्कारे टाकले व कांहीं तरी बोलायचें म्हणून समोरची एक टेकडी दाखवून, ही इतकी वाटोळी आणि सुंदर कोणी कशी केली असेल ?– असें जणुं कांहीं हवेलाच विचारलें.

त्याबरोबर रावबानें " Nature,—natural forces " ( सृष्टीचे नियम ) असें उत्तर दिलें.

" Natural forces ( सृष्टीचे नियम ) तर खरेच; पण त्यांपासून हें सौंदर्य कसें उत्पन्न झालें हा प्रश्न आहे. सृष्टीचे नियम केले कोणी, या नियमांच्या पाठीमागें कोणी नियामक आहे का, हा माझा प्रश्न आहे. नियामक नसेल तर ी सुव्यवस्था ‌ उत्पन्न झाली व असेल तर तो विंचू, साप वगैरेंना कां त्पन्न करतो अशी माझी शंका आहे."

" या शंकांचा मागून विचार करूं." बाळू म्हणाला. " आतां आपण आजच्या प्रश्नांकडे वळूं या. रावबा, तुला बोलावण्याचं कारण असं, कीं आपले दोन क्लब जे आहेत ते एक करावेत असं आमच्या मनांत आहे. दोन क्लब असले म्हणजे चढाओढ व्हायची आणि मग भांडणं आणि माऱ्यामाऱ्याहि व्हायच्याच."

"पण त्याला उपाय काय?" रावबा तुटकपणें म्हणाला. "जगांत हेंच चाललं आहे. Struggle for existence (जीवनकलह) सर्वत्रच चाललेला आहे, हें स्पेन्सरचं तत्त्व माझे वडील सांगतात तें खोटं का आहे?"

"जीवनकलह सर्वत्र नाहीं चाललेला." सुनंदा म्हणाला. "मुलं व आईबाप, भाऊबहिणी, यांमध्यें जीवनकलह नसतो. मित्रामित्रांमध्येंहि तो नसावा असं माझं म्हणणं आहे."

"तुम्ही Sentimental आहांत. पण माझ्या वडिलांचीं तत्त्वं लहानपणापासून माझ्या मनांत बिंबलीं आहेत आणि मला कांहीं तुमचे हे कोमल विचार पसंत पडत नाहींत. मी बोलतों आहें हें कठोर वाटेल; पण कठोर सत्य अगदीं सरळपणं सांगावं व तेंच अंतीं हितकारक असतं, हें मी वडिलांपासूनच शिकलों आहें व तसा माझा अनुभवहि आहे."

"आमचा कांहीं तसा अनुभव नाहीं." बाळू म्हणाला.

"नसेल," रावबानें उत्तर दिलें. "पण ही गोष्ट लपविण्यांत अर्थ नाहीं, कीं आपले विचार, आपलीं धार्मिक मतें, आपलीं राजकीय मतें, हीं सर्व भिन्न आहेत. माझे वडील मॉडरेट आहेत, तुझे जहाल आहेत. मी अगदीं मॉडरेट आहें. तुम्ही ज्वलज्जहाल आहांत. तुम्ही आपले मित्र घेऊन येऊन या अचलेश्वरीच्या देवळांत स्वदेशीच्या शपथा घेतां, मला स्वदेशी म्हणजे 'सोदेशाई' वाटते. धार्मिक बाबतींत तुम्ही पूर्वीं विचारानें नास्तिक होत होतेत, तरी पण अलीकडे तुम्ही पुन्हां आस्तिक्याकडे वळलां आहांत. संध्येची पोथी आणून तुम्ही अलीकडे पुन्हां संध्या करायला लागले आहांत. हें सगळं मला ठाऊक आहे. तुमच्या त्या स्वामींच्या व्याख्यानाचा हा परिणाम, का स्वदेशाभिमानाचा, का कसला, हें मला सांगतां येत नाहीं; पण तुमच्या आमच्या विचारांमध्यें असा मोठा फरक आहे, कीं तुमचं आमचं जुळणं शक्य नाहीं."

"क्रिकेटमध्यें राजकारणाचा आणि धर्माचा कोठें संबंध येतो?" सुनंदानें विचारलें.

"येतो तर," रावबानें उत्तर दिलें. "ऊंस आणि भोपळे एकत्र बांधण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असं मॉडरेट पक्ष म्हणतो तेंच खरं. तुम्ही जहाल आणि हा सुनंदा तर ज्वलज्जहाल; आणि मी मवाळाग्रणी (सुनंदाचेच हे शब्द आहेत),

तेव्हां तुमचं आमचं जुळावं कसं ? सरकारनें टिळक, 'काळ'कर्ते इत्यादिकांना कैदेंत टाकलं हा तुम्हांला जुलूम वाटतो. माझ्या वडलांना आणि मला वाटतं कीं सरकारला भलभलतं बोलायचं आणि तोंडसुख घेतल्याबद्दल सरकारनं तुरुंगांत घातलं, कीं मग कुथायचं; यांत काय अर्थ आहे ? सरकारचं अगदीं बरोबर आहे. हा Struggle for existence आहे आणि Everything is fair in love aud war. राजकारण सोडून खाजगी व्यवहार पाहिले तरी तुमचं आमचं हेंच. आपण जरी मित्र म्हणवतों, तरी आपलीं लहानपणापासूनचीं भांडणं आहेत. आणि अलीकडे तर आणखी एक नवीन उत्पन्न झालं असण्याचा संभव आहे."

"तें कोणतं बुवा ?" सुनंदानें व बाळूनें एकदम विचारलें.

"खरं म्हटलं, म्हणजे माझ्या तत्त्वाप्रमाणं एकदम सांगावं; पण नाहीं सांगत झालं. Everything is fair in love and war एवढंच पुन्हां मी म्हणतों यांत काय तें समजा. Loveबद्दल मी आतां मुद्दाम बोलत नाहीं. पुढें भांडावं लागणार आहे, त्या वेळेस भांडूं. पण ही गोष्ट खरी, कीं जीवनकलहांत, राजकीय कलहांत, प्रेमविषयक कलहांत सर्वत्र मला माझा जय पाहिजे आहे. जयाकरितां जें जें करावें लागेल तें तें मी आवश्यक व योग्यच समजतों. क्रिकेटच्या मॅचचंच उदाहरण घ्या. मी L. B. W. होतों खरा; पण आमच्या अंपायरनें मला नॉट-औट दिल्यावर मी खेळलों यांत मला गुन्हा वाटत नाहीं. तुम्हांला त्यांत खोटेपणा वाटतो आणि तें तुम्हीं बोलूनहि दाखवलंत. तुमच्या आमच्या मारामारीचं हें खरं कारण; मागून झालं तें निमित्तकारण. तेव्हां एकंदरींत काय, तुमचं आमचं जुळूं नये असा योगायोग आहे. पुढंमागं आपण कॉलेजांत गेलों, तर तेथेंहि आपलीं भांडणं व्हायचीं; आणि त्याच्यापुढं राजकारणांत पडलों, तर त्या वेळींहि व्हायचीं ! नदीचं पाणी अन् खाडीचं पाणी कधीं एक व्हायचं नाही."

"आतां उथव आल्यामुळं एक होऊं पाहात नाहीं काय ?" सुनंदानें विचारलें.

"नाहीं." रावबा म्हणाला. "नदीचं पाणी वर येत आहे, पण खाडीच्या पाण्यांत फारसा बदल नाहीं. तें कांहीं वर उचलून येत नाहीं. माझं मन खाडीच्या पाण्यासारखं आहे."

"अशी भाषा वापरल्यावर मग काय, बोलणंच खुंटलं." बाळू म्हणाला व

मग बोलण्याचा ओघ दुसरीकडे कळविण्याकरितां "चला, अचलेश्वरीला नमस्कार करून आणि प्रदक्षिणा घालून घरीं परत जाऊं या." असें म्हणाला.

" नको बाबा, देवळांत नको. देवाचं आणि माझं अहिनकुलाप्रमाणं वांकडं आहे, आणि मला कामहि आहे; मी जातों जरा आधीं."

असें म्हणून रावबानें आपली छत्री घेतली व तो तांबड्या झालेल्या वहाणा घालून आणि तांबूस धोतराचा कांचा मारून खालीं जाऊंच लागला व त्या दोघांनींहि त्याला मग थांबण्याविषयीं विशेष आग्रह केला नाहीं. तो गेल्यानंतर ते देवदर्शन घेऊन व प्रदक्षिणा घालून देवळाच्या पायरीवर बसले. बोलण्याला सुरुवात सुनंदानें केली: " भांडणाचं आणखी एक कारण उत्पन्न होऊं लागलं आहे, असं रावबा म्हणाला; त्याचा अर्थ तुला समजला का ?"

" समजला थोडा बहुत." बाळू म्हणाला. " Love बद्दल त्याला कांहीं तरी बोलावयाचं होतं, पण त्यांत कांहीं अर्थ आहे का ? मला सुशीला पहिल्याप्रथम सांगून आली होती, आणि आतां ती त्याला सांगून आली आहे, आणि तिचं लग्न ठरलंहि आहे. पण यांत भांडण होण्याचं कारण काय ? युरोपियन लोकांमध्यें 'कोर्टिंग' वगैरे असतं, तेव्हां तिथं असूया असते. आपल्या इथं तो प्रकारच नाहीं आणि आपलीं वयं का आहेत कोर्टिंग करण्याचीं ? मला तर या वयांत लग्नाचे विचार आले म्हणजे माझी मलाच लाज वाटते."

" खरं आहे तुझं म्हणणं," सुनंदा म्हणाला. " पण मला पुष्कळ वेळां असं वाटे, कीं सुशीलेला विचारावं आणि तिला जर तूंच आवडत असलास..."

" Nonsense. असला मूर्खपणा करूं नकोस. तूं मला लाज आणशील हो असल्या वागण्यानं."

" अरे, माझं ऐकून तर घे. मी म्हणत होतों, कीं सुशीलेला विचारावं असं माझ्या मनांत पुष्कळ वेळां येत असे; पण तिच्या त्या निष्पाप चेहऱ्याकडे आणि सरळ वर्तनाकडे पाहिलं म्हणजे असं वाटतं, कीं हिला लग्नाचं वगैरे कांहीं अजून समजत नसेल; हिच्याशीं असल्या गोष्टी काढणं म्हणजे मूर्खपणाच नव्हे तर पाप आहे. आणि माझी कांहीं छाती होईना, बाबा! राजकारणांत मी निधड्या छातीचा आहें, नाशिकला नुकताच जसा जॅक्सनवरती बॉंब टाकला गेला तसा बाब टाकायला सांगितला तर मी टाकीन; पण सुशीलेसारख्या मुलीशीं असल्या गोष्टी काढणंच शक्य नाहीं.'

" You are right. ती आमच्याकडे आतां पूर्वीसारखी येत नाहीं, पण कधीं कधीं येते आणि माझ्याशीं थट्टामस्करीहि करते. आणि मला पुष्कळ वेळां वाटतं कीं मला जसं हिच्याशीं लग्न करावंसं वाटतं तसं हिलाहि वाटत असेल * पण लगेच विचार यायचा, कीं असले विचार मनांत आणणं हा मूर्खपणा आहे; ती बिचारी अगदीं Innocent आहे. आपण खरोखर पाप करीत आहों, तिच्याबद्दल असल्या गोष्टी बोलत आहोंत हें. चला, दुसरा विषय काढूं या."

" काढूं का एक विषय? पण घाबरशील हो!" सुनंदा बाळूच्या तोंडाकडे टक लावून पाहात म्हणाला.

" कांहीं घाबरत नाहीं." बाळू म्हणाला व हा काय सांगणार असा मनाशीं विचार करीत त्याच्या तोंडाकडे पाहूं लागला.

" सांगण्यापूर्वी शपथ घे चल–देशाची आणि देवाची." सुनंदा म्हणाला व त्याचा हात धरून त्याला देवळांत नेऊं लागला; पण बाळूनें त्याचाच हात घट्ट दाबून धरून त्याला खालीं बसविलें आणि म्हटलें, " राजकारणांतली गुप्त कटाची शपथ दिसते आहे! नको बुवा, तसल्या शपथा घ्यायला आपण तयार नाहीं."

" नाहीं तर राहलं, देशाचं काय व्हायचं असेल तें होवो!" सुनंदानें सुस्कारा टाकून म्हटलें. त्यानें म्हटलें खरें; पण त्याचें कांहीं समाधान झालें नाहीं. कारण तो मग घरीं परत जातांना बाळूशीं फारसा बोललाच नाहीं, आपल्याच विचारांत गढून गेला.

---

* माझ्या मनांत प्रेम आहे असें आतांपर्यंतच्या माझ्या आयुष्यांत तीनचार पुरुषांना तरी वाटलेलें आहे, आणि माझ्या मनांत तर त्यांच्याविषयीं तसें प्रेम केव्हांच नव्हतें! माझ्या कांहीं मैत्रिणींचाहि असाच अनुभव आहे. पुरुषांना असें कां वाटतें कोणास ठाऊक! कोणीकडून तरी त्यांचें मन मोहित करून व स्त्रियांकडे आकर्षित करून वंशवृद्धि करण्यास त्यांना प्रवृत्त करण्याचें आपलें कार्य सृष्टिदेवता त्यांच्या द्वारें साधून घेण्याचा प्रयत्न तर करीत नसेल ना?

—सुशीलेची टीप.

राघवाची मॅट्रिकची परीक्षा उत्तम तऱ्हेनें पास झाली. त्याच्या आधींच लक्ष्मीबाईनीं विनायकरावांजवळ सुशीलेच्या लग्नाची गोष्ट कशी काढली, राघवाचें स्थळ हातचें गमावूं नये याबद्दल आग्रह कसा धरला, विनायकरावांनीं सुशीलेला आणखी शिक्षण देण्याबद्दल कांहीं दिवस आग्रह धरला व पुढें मग तेहि तिच्या लग्नाला कसे अनुकूल झाले, इत्यादि गोष्टी पाल्हाळानें सांगण्यांत अर्थ नाहीं. मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यामुळें हुंड्याचें मान जरा चढलें होतें; पण हुंड्याची अडचण कशी मिटली, पत्रिकेंतील ग्रहांची पिडा कशी टाळण्यांत आली, मुहूर्त पाहातांना कोणत्या सोई-गैरसोईचा विचार झाला, जेवणावळीचा थाट कसा उडाला, बँड आणला होता किंवा नाहीं, विहिणींचीं भांडणें झालीं तीं कशीं मिटलीं, कोणकोणाला कसले खण आणि कसलीं लुगडीं मिळालीं, ओंट्या नारळानें-का कशानें भरल्या, उषेला कोणत्या खणाचे परकर केले, सुशीलेला कसलीं लुगडीं घेतलीं, तिनें दागिने कोणते अंगावर घातले होते, इत्यादि गोष्टीहि सांगत बसण्यांत अर्थ नाहीं.

गिरिधररावांनीं दक्षिणा वगैरे फार वांटली नाहीं व जेवणावळीहि घातल्या नाहींत, हें मात्र सांगितलें पाहिजे. आमच्या सोनगांवची पहिली चाल म्हणजे अशी, कीं गांवांतल्या सर्व सजातीयांना, म्हणजे अर्थात् येथें ब्राह्मणांना, जेवणावळी घालावयाच्या; पण अलीकडच्या महर्गतेच्या व दारिद्र्याच्या काळांत आळींतल्या सगळ्या ब्राह्मणांना जेवणास एकदांच बोलवावयाचें अशी चाल पडली होती; पण हीदेखील चाल गिरिधररावांनीं बाजूस ठेविली व स्पेन्सरीय मताला अनुसरून जेवणावळींत खर्च करण्याचे पैसे, म्हणजे ५०० रुपये, एका आळींत एक रॉकेलचा कंदील काळोख्या रात्रीं लावण्याकरिता म्हणून त्यांनीं म्युनिसिपालिटीच्या स्वाधीन केले व आपल्या गांवची सुधारणा आपण केली पाहिजे, सरकारवर याची जबाबदारी टाकणें योग्य नाहीं, या मताचा त्यांनीं अशा रीतीनें सक्रिय व सोदाहरण पुरस्कार केला.

दुसरी गोष्ट या लग्नांत ध्यानांत धरावयाची म्हणजे सोनगांवची राष्ट्रीय व नेमस्त या दोनहि पक्षांची मंडळी लग्नाला हजर होती. एवढासा गांव, पण तेथें पक्षभेद फार तीव्र होते. तथापि विनायकराव राष्ट्रीय पक्षाचे व गिरिधरराव नेमस्त पक्षाचे आणि दोघांबद्दल व्यक्तिदृष्ट्या सर्वत्र आदर; म्हणून या

विवाहप्रसंगीं दोनहि पक्षांची मंडळी वधू-वरांना शुभ आशीर्वाद देण्यास आली होती. दोघेहि त्याही गांवांतले श्रीमंत व बडे होते; अर्थात् या लग्नाचा मोठा बोलबाला झाला. किंबहुना त्या गांवाला कांहीं दिवस बोलण्याला दुसरा विषयच नव्हता हें सांगणें नकोच. गिरिधररावांनीं जेवणावळी घातल्या नाहींत तरी विनायकरावांनीं घातल्याच. याचें कारण त्यांना असल्या बाबतींत खर्च करणें पसंत होतें असें नाहीं, तर सुशीलेचें लग्न हौशीनें करावें, त्यांत कांहीं उणेपणा असूं नये, अशी त्या प्रेमळ पित्याची प्रबलतम इच्छा होती. त्यांच्या पत्नीची काय इच्छा होती हें सांगावयास नकोच! आर्थिक परिस्थितिहि अनुकूल, मग काय? चार दिवस पैसा पाण्यासारखा किती खर्च झाला असेल, हें लग्न करून पाहिलेल्यांना अनुभवानें स्पष्टपणें समजण्यासारखें आहे व इतरांनाहि त्याची थोडीबहुत तरी कल्पना करतां येण्यासारखी आहे.

सुशीलेच्या मनाची स्थिति मात्र काय होती हें समजणें व वर्णन करणें फार कठीण. या बाबतींत कल्पनेचा कांहीं उपयोग नाहीं असें दिसतें; कारण, कल्पनेच्या आधारावर या ग्रंथकारानें केलेलें वर्णन सुशीलेनें जेव्हां वाचलें, तेव्हां वाचतां वाचतां त्यांत इतकी दुरुस्ती व खोडाखोड केली आणि इतक्या टीपा दिल्या, कीं मूळचें प्रकरण टाकून देऊन त्याऐवजीं या टीपांपैकीं कांहीं टीपा व सुशीलेनेंच आत्मचरित्रांत लिहिलेल्या एका प्रकरणाचा कांहीं भाग जुळवून बहुतेक जसाच्या तसा घेतलेला बरा असें वाटून त्याप्रमाणें व्यवस्थाहि केली. खालीं दिलेला भाग उतरून घेण्याची परवानगी दिल्याबद्दल तिचे आभार मानलेच पाहिजेत, असे तिचे व या ग्रंथकाराचे संबंध नाहींत; पण खालीं दिलेला भाग वाचकांचा संपूर्ण वाचून झाला, म्हणजे हा भाग प्रसिद्ध करण्याची परवानगी देण्यांत सुशीलेनें फारच मनोधैर्य दाखविलें आहे असें म्हटल्याशिवाय वाचकांना राहावणार नाहीं. कांहीं लोकांना हीं मतें आवडणार नाहींत हें उघड आहे; पण तीं प्रसिद्ध करणाऱ्या ग्रंथकारालाहि तीं सर्वतोपरी मान्य आहेतच असें गृहीत धरण्याचेंहि कारण नाहीं, हें ध्यानांत धरणें आवश्यक आहे.

---

## १३ : सुशीलेच्या टीपा व तिच्या आत्मचरित्रांतील भाग

“या ग्रंथकारानें माझ्या लहानपणाची हकीगत अनेक लोकांकडून मिळवून त्यांतील त्याला मनोरंजक वाटलेला भाग बऱ्याच यथार्थतेनें वर्णन केला

आहे; पण या एकदोन प्रकरणांत फारच चुका झाल्या आहेत असें मला वाटतें. असं कां व्हावें हें मला समजत नाहीं. ग्रंथकार आज वरींच वर्षें माझ्या चांगले ओळखीचे आहेत. माझें अलीकडील कांहीं वर्षांतील अंतरंग त्यांना चांगलें माहीत आहे. माझ्या अंतरगांत त्यांनीं प्रवेश केला आहे; तेव्हां त्यांच्यापासून मी काय लपविणार ?—पण आतांच्या एकदोन प्रकरणांत ते विलक्षणच घसरले. त्यांना कल्पनाशक्ति आहे; पण ते पुष्कळ ठिकाणीं घसरले आहेत ही आश्चर्याची गोष्ट आहे. पुष्कळ पुरुष असे फसतात, असें माझ्या अनुभवाला आलें आहे !

पहिल्याप्रथम माझे पतिच घ्या. त्यांची माझ्याविषयीं कांहीं तरीच कल्पना होती ! आपल्यावर हिचें प्रेम आहे असें त्यांना वाटावयाचें ! माझें प्रेम जडलें हें खरें; पण पुढें पुढें; या वेळीं नव्हे. या वेळीं माझें कोणावरच प्रेम नव्हतें. प्रेम म्हणजे काय हें समजतहि नव्हतें. सुशीलेचें खरें प्रेम बळवंतरावांवर होतें, पण रावबाच्या रुबाबाला व सौंदर्याला सुशीला भुलली; तिच्या मनामध्यें मोठा अंतःकलह झाला इत्यादि प्रकारचें ग्रंथकाराचें जें वर्णन आहे तें अगदीं चुकीचें आहे. बळवंत-रावांशीं माझें लग्न व्हावें अशी तात्यांची (माझ्या वडिलांची) इच्छा होती व त्याप्रमाणें त्यांनीं विश्वासरावांशीं अर्धवट थट्टेत गोष्टहि काढली होती. माझ्या कानांवर ही गोष्ट आली तेव्हां मला बरें वाटलें होतें; पण कां बरें वाटलें हें मला मुळींच समजत नव्हतें. मला त्या वेळीं प्रेम म्हणजे काय असतें याची स्पष्ट कल्पना नव्हती. (आतांहि नाहीं असें वाटूं लागलें आहे ! मध्यंतरीं मात्र कांहीं दिवस मला 'प्रेम' म्हणजे काय हें समजलें. पण आतां मला 'प्रेम' म्हणजे बहुधा व बहुतअंशीं खूळ आहे असें वाटूं लागलें आहे. आधुनिक कवींचे आणि कादंबरीकारांचे 'प्रेम' वगैरे शब्द ऐकले, म्हणजे मी बहुधा गालांतल्या गालांत हंसत्यें ! पण त्या वेळीं 'प्रेम' हा शब्द पुस्तकांतच वाचीत होत्यें; अर्थाच्या नांवानें शून्य !)

आतां ही गोष्ट खरी, कीं लग्न झाल्याबरोबर ते मला 'आपले' असें वाटूं लागले. मंगलाक्षतांमध्यें काय गुण असेल तो खरा; पण असें वाटूं लागलें यांत तिळप्राय शंका नाहीं. असें कां बरें वाटूं लागावें ? अचलेश्वरीच्या देवळाला जातांना आमची जी कानगोष्ट झाली होती तिचा हा नकळत झालेला परिणाम म्हणा, किंवा लहानपणाच्या आईच्या प्रासंगिक बोलण्याचा व शिकवणीचा हा परिणाम म्हणा, किंवा तिच्या वर्तनाचा हा परिणाम म्हणा, किंवा एकंदर सामाजिक परिस्थितीचाच परिणाम म्हणा, मला ते माझे व मी सर्वस्वी त्यांची असें वाटूं लागलें.

सीता, सावित्री यांच्यासारख्या पतिव्रतांप्रमाणें आपण वागावें, किंवा असें म्हणण्यापेक्षां, आपल्या आईप्रमाणें आपण वागावें, असें आपलें मला वाटत असे. आणि त्यांत कांहीं फारसें कठीण नाहीं, असेंहि प्रथम प्रथम माझ्या अनुभवास आलें. त्यांचा चेहरा, त्यांची दृष्टि, त्यांची ठांसून बोलण्याची पद्धति, त्यांची माहिती, त्यांचें शास्त्रीय ज्ञान, आपलें मत खरें असें भासविण्याची त्यांची शक्ति, इत्यादिकांचा असा माझ्यावर परिणाम झाला होता, की त्यांचेंच ऐकावें, त्यांच्याच तंत्रानें चालावें, असेंच मला वाटत असे ! याचीं किती तरी प्रत्यंतरें लग्नांतच आलीं. आमचे बालवयांतील ज्वलज्जहाल सुनंदराव आणि जहालाग्रणी बळवंतराव यांच्या नादानें मीहि त्या वेळीं बहिष्कारवादी बनल्यें होत्यें. बहिष्कार म्हणजे काय आणि तो कां करावयाचा हें मला समजत नव्हतें; पण त्या वेळचे बरेच मुलगे परदेशी साखर खायचे नाहींत, तशी मीहि खात नव्हतें, झालं. या बाबतींत मीं आईशीं कितीदां तरी भांडलें होतें. नाहीं म्हणजे नाहींच खायची मी परदेशी साखर ! माझ्या श्वशुरांना हें खूळ आवडत नव्हतें. त्याप्रमाणेंच 'त्यांना'हि आवडत नव्हतें. लग्नांत विदेशी तसेच स्वदेशी साखरेचे लाडू केले होते, पण घांस द्यायच्या वेळेला, जात्या खोडकर स्वभाव असल्यामुळें, विदेशी साखरेचाच घांस दिला आणि तो मीं खाल्लाहि. मला त्यांचा राग आला नाहीं ! अशी त्या मंगलाक्षतांची जादू आहे !

दुसरी अशीच लहानशी गोष्ट म्हणजे लग्न झाल्यावर ते ओटीवर बसले होते. तिथें आमची उषा त्यांच्याजवळ लडिवाळपणा करायला गेली आणि अंगाला बिलगूं लागली; पण असला लडिवाळपणा तिकडे अगदीं आवडत नसे. म्हणून पहिल्यानें दटावलें व मागाहून चापट मारली; तेव्हां ती लागली रडायला. त्या दोघांचीं बोलणीं मी माजघरांतून ऐकत होत्यें आणि उषा एवढी माझी लाडकी आणि तिचा लडिवाळपणा तर मला फारच आवडावयाचा; पण आतां अक्षता पडल्यावर वाटूं लागलें, कीं तीच वाईट, आणि तिला मारलें हेंच बरोबर केलें. जावें कशाला दुसऱ्याजवळ खोड्या करायला ? दुसऱ्या एखाद्यानें जर असें केलें असतें, तर उषेचा कड घेऊन मी वाघिणीसारखी त्याच्या अंगावर धांवलें असतें. पण आतां !—

ते दिवस आठवले म्हणजे अजूनदेखील कौतुक वाटतें. आम्ही भांडलों-तंडलों, काडी मोडण्याची इच्छा होण्यापर्यंत पाळी आली, सर्व कांहीं गोष्टी झाल्या; पण तेहि दिवस गेले आणि आतां जुन्या आठवणी काढून त्या सांगा-

व्याशा वाटत आहेत. ते दिवस गेले, पण बकुळीचीं फुलें सुकलीं तरी त्यांचा जसा सुवास अगदीं नष्ट होत नाहीं, त्याप्रमाणेंच सात्विक आनंदाच्या दिवसांचें आहे. पण हा वेदान्त कशाला? त्या वेळच्या गोष्टीच बोलूं या. लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं आमच्याकडची समाराधना झाली. पंगतीवर पंगती उठत होत्या. ब्राह्मण, गुजर, साळी, कुणबी, महार, चांभारसुद्धां ब्राह्मणांप्रमाणेंच जेवून तट्ट फुगले. तिकडच्या चालीप्रमाणें ब्राह्मणांच्या पंक्तींना आठ आठ आणे दक्षिणा वांटली. पंगत उठल्यावर म्हारणी नि त्यांचीं लहानमोठीं पोरेंबाळें उष्टया पत्रावळीसाठीं आई-माई करून ओरडूं लागलीं. संध्याकाळीं सहाच्या सुमाराला कुणबी-माळ्यांची पंगत उठल्यावर मांडवांत जरा इकडे तिकडे हिंडायचें होतें, तेव्हां त्यांच्याजवळच त्या वेड्या म्हारणी भीक मागूं लागल्या! ते तर त्यांच्या कटकटीला कंटाळलेले आणि भिकारणींना भीक घालूं नये, त्यांना भीक घालणें म्हणजे आळस वाढविणें होय, अशा मताचे होते. त्यांनीं पहिल्याप्रथम "जा-जा, बायांनो, उगाच कटकट लावूं नका, भीक कशाला मागतां? काम करावं." असें तसें पुष्कळ सांगितलें. पण त्या म्हारणी काय अशानें थांबताहेत? त्या अधिकच ओरड करूं लागल्या. तेव्हां स्वारी संतापली आणि असे वस्कन् त्यांच्या अंगावर ओरडले, कीं त्या बाया आणि तीं पोरें चार पावलें मागेंच सरलीं! आणि क्षणभर त्यांनीं ओरडहि थांबविली. ओरड थांबल्यावर आपण श्वशुरांच्या घरीं असें रागावलों हें बरें झालें नाहीं असें वाटूनच कीं काय, त्यांनीं अर्धवट मनांत व अर्धवट तिथें असलेल्या कारकुनाला उद्देशून 'या भिकाऱ्यांना उत्तेजन देण्यांत कांहीं अर्थ नाहीं; यांनीं देशाचें मोठें नुकसान केलें आहे' अशा अर्थाचें आत्मसमर्थनपर अर्धवट लहानसें व्याख्यानच झोडलें! तें ऐकून त्या कारकुनास काय वाटलें असेल कोणाला ठाऊक; एवढी मात्र गोष्ट खरी, कीं आमच्या आईला फारच धन्यता झाली, आणि मलाहि कांहीं कमी धन्यता झाली नाहीं. एरव्हीं दुसरा कोणी अशा प्रसंगीं गरीब बिचाऱ्या म्हारणींच्या अंगावर ओरडला असता, तर मला वाईट वाटलें असतें; पण त्यांचा तो रुबाब, आणि तें ठांसून बोलणें आणि त्यांचे ते तार्किक विचार, यांनीं मला तर असें होऊन गेलें, कीं ह्यांच्यापुढें आपण अगदींच बावळट, आपणांला कांहीं देशाचें हित वगैरे समजत नाहीं, आपली बायकांची बुद्धि खरीच आकुंचित, आपला कोमलपणा हा खराच घातुक! आमच्या सोनगांवच्या पांचदहा मुलींमध्यें मींच हुशार होत्यें; पण यांच्यापुढें मी अगदींच कमी योग्यतेची, असें मला आतां

वाटूं लागलें आणि मी आपलें एक एक मत–' मत ' कसलें आलें आहे त्या वयांत म्हणा, पण जें कांहीं वाटत होतें तें–एक एक सोडून द्यायला लागलें.

धार्मिक बाबतींतदेखील हाच प्रकार झाला. बळवंतराव आणि सुनंदराव यांचे पहिले पहिले नास्तिकवादाचे संवाद ऐकून माझ्या मनांत चलबिचल होत असे; पण आमच्या आईचें तुळशीला पाणी घालणें, वटपौर्णिमा, मंगळागौर वगैरेच्या निमित्तानें केलेले उपास, तसेंच तऱ्हतऱ्हेचीं तिचीं व्रतवैकल्यें, त्याचप्रमाणें तिचें तें वेळोवेळीं झालेलें बोलणें व तिचें एकंदर वर्तन यांमुळें माझ्या धार्मिकपणांत कायमचा बिघाड झाला नाहीं; आणि बळवंतराव व सुनंदराव हे राष्ट्रीय पक्षाच्या पुरातनाभिमानामुळें पुन्हां जेव्हां संध्या वगैरे करूं लागले आणि देवाधर्मांची चेष्टा करण्याचें सोडून देऊं लागले, तेव्हां तर कौसल्येला रामाची पुन्हां भेट झाल्यावर जसा आनंद झाला असेल तसाच आनंद मला झाला. यांत थोडीशी अतिशयोक्ति असेल, पण रामाच्या मूर्तींमध्यें वगैरे मला जो राम दिसेनासा झाला होता तो पुन्हां माझ्या बालमित्रांच्या धार्मिक परिवर्तनामुळें मला दिसूं लागला एवढेंच मला सांगावयाचें होतें. पण लग्न झाल्यावर लवकरच देवांच्या मूर्तींतला देव, दूषित ताप आल्यावर शरिरांतील तजेला जसा निघून जाऊं लागतो तसा, निघून जाऊं लागला. हा दाखला चुकलाच. पूर्वी प्रिय असलेला पण आतां अप्रिय झालेला व परकी वाटूं लागलेला पाहुणा घरांतून जसा निघून जातो तसा देव निघून जाऊं लागला. त्यांच्याशीं पहिल्या पहिल्याप्रथम मला साक्षात् बोलण्याचा प्रसंगच येत नसे–ते जवळ आले म्हणजे मी लांबच पळत असें; पण पुढें पुढें जेव्हां पुष्कळ वेळ बोलण्याचा प्रसंग येऊं लागला आणि माझ्या मंगळागौरीची, वडाच्या पूजेची व तुळशीला पाणी घालण्याची मामंजींकडून व त्यांच्याकडून चेष्टा होऊं लागली तेव्हां मला असें व्हायचें, कीं खरेंच, आपण मूर्ख तर नाहीं ! झाडांत कसला आहे देव ? आणि देवाला प्रार्थना करून का तो वळणार आहे ? "देवपूजा ही देवाची मनधरणी आहे किंवा त्याला दिलेला लांच आहे" असें त्यांचें म्हणणें असे, आणि तेंच मला खरें वाटूं लागलें !

लग्नांत एके प्रसंगीं मात्र माझ्या मनाला थोडासा धक्का बसला· कारण मी गौरीहराची पूजा करीत होतें आणि पूजा आटोपून घेण्याची तर घाई होऊं लागली. माझें मन त्या वेळीं गौरीमय होऊन गेलें होतें. इतकें, कीं सांगतां येत नाहीं. देवाच्या खऱ्या भक्तीचा अनुभव मला त्या वेळीं आला. पतीबद्दल

मला अत्यंत पूज्यबुद्धि केव्हां वाटली असेल तर त्या वेळीं वाटली, असें मी म्हणेन ही स्थिति घटका अर्धी घटकाच असेल; पण अशी स्थिती होती खरी. शृंगारिक प्रेम व दुसऱ्या असल्या गोष्टी मला त्या वेळीं शब्दार्थापेक्षां अधिक कांहीं समजत नव्हत्या. खऱ्या शुद्ध प्रेमाचा अनुभव मीं त्या वेळीं घेतला. पण हें आतां कशाला सांगूं? 'प्रेमा'चा माझा अर्थ बदलला! आणि हा अर्थ बदलण्याला त्याच दिवशीं आरंभ झाला. कारण गौरीहराची पूजा करून मी जी गौरीचा जणुं कांहीं संचार झाला आहे अशी बाहेर पडत्यें आहें, तोंच किंचित् उशीर झाल्यामुळें रागावलेले मामंजी पुटपुटले, "काय करावें या बायकांना? Wasting time in idolatrous worship!" आणि 'ते'हि असेंच कांहीं हलक्या आवाजांत जें पुटपुटले तें मला ऐकूं आलें नाहीं, पण वडिलांच्या सारखीच त्यांची वृत्ति असावी असें मला वाटलें, आणि मनाला थोडा धक्काच बसला. मामंजी काय पुटपुटले हें आईला व आसपासच्या बायकांना कळलें नाहीं, त्यांना ते रागावले आहेत एवढेंच कळलें; पण मला आतां कांहीं कांहीं इंग्रजी शब्दांचे अर्थ कळूं लागले होते आणि बळवंतराव–सुनंदरावांच्या संगतींत वादविवाद ऐकतांना idolatry शब्द हजारदां कानावरून गेलेला, तेव्हां अंदाजानें मामंजीचा अर्थ मीं ओळखला आणि काय वाटलें तें सांगतां येत नाहीं. बरें, रागावूं कोणावर आणि कां? मामंजींचीं मतें खोटीं आहेत असें मी कसें म्हणूं? आणि मामंजींपेक्षां 'त्यांची' ती वृत्ति पाहून मला वाटलें, कीं यांनाच अधिक कळतें; आपण लहान, वेड्या, कांहीं तरी करतों, करीत बसतों, झालें! पण पुन्हां असें वाटे, कीं आपला हा सनातन धर्म खोटा कीं काय? आणि आईसुद्धां वेडी कीं काय? आणि सुनंदा एवढा हुशार, पण तोहि धार्मिक व्हायला लागला, तोहि खोटा कीं काय? पुन्हां वाटे, कीं 'ते'च बरोबर, सुनंदा आणि बाळू देशाभिमानानें उगाच धर्माचें सोंग करताहेत! खरे ते नास्तिकच आणि नास्तिक नसले तरी त्या दोघांपेक्षां 'ते'च अधिक जाणणारे!

आणि मौज अशी, कीं मला जसें त्यांचें खरें वाटूं लागलें, तसें त्यांना माझें खरें वाटूं लागलें! बोलून मात्र कधीं ते दाखवीत नसत. (पुरुष कधीं आपली चूक तोंडानें कबूल करतील? कृतीनें ते कबूल करतील; पण तोंडानें ते म्हणतच राहातील, कीं बायका वेड्या, त्यांना काय समजतंय् इ० काय असेल तें असो. त्यांच्या बोलण्याचालण्यांत व एकंदर वर्तनांत लग्न झाल्यापासून कोमलपणा थोडा थोडा येऊं लागला आणि माझें भाषण आणि वर्तन कठोर, कर्कश होऊं लागलें. माझ्यामुळें

त्यांचें वर्तन बदललें म्हणावें, तर वास्तविक मीच त्यांच्या दास्यांत सांपडलें होतें. बरें, माझ्यामुळें नाहीं म्हणावें, तर दुसरें कारण काय? आणि याबद्दल संशय कशाला? शेवटीं शेवटीं हें त्यांनीं कबूल केलेंच; पण त्या गोष्टी आतां नकोत. एकमेकांसारखें होत होतों, असें मला सांगायचें होतें. एक रोमन कॅथॉलिक गृहस्थ व एक प्रॉटेस्टंट गृहस्थ वाद करूं लागले व शेवटीं रोमन कॅथॉलिक प्रॉटेस्टंट झाला आणि प्रॉटेस्टंट होता तो रोमन कॅथॉलिक झाला, अशासारखी एक गोष्ट वाचली आहे त्याची मला येथें आठवण होते. आपल्या इकडेहि अशाच प्रकारचें एक मजेदार सुभाषित आहे. ज्याचें चिंतन करावें तेंच स्वरूप आपणांस प्राप्त होतें, या तत्त्वानें राम हा सीतेचा निदिध्यास लागल्यामुळें सीता बनला व सीताहि रामाच्या निदिध्यासानें राम बनली, अशा आशयाचें एक सुभाषित आहे, त्याची मला येथें आठवण होते. राम आणि सीता यांच्या या उदाहरणामध्यें आणि आमच्यामध्यें एक मोठा फरक मात्र असा होता, कीं आमचें स्वरूप कायमचें आणि पुरतेपणीं बदललें नाहीं; थोडासा आणि कांहीं काळपर्यंत फरक झाला, एवढेंच. बाकी ते ते 'ते' आणि मी ती 'मी'च शेवटपर्यंत राहिलों. (ते आतां कोठें आहेत म्हणा? बिचारे गेले. 'सुशीले तूंच बरोबर. माझा तार्किक कठोरपणा मूर्खपणाचा होता, हृदयाचं तुझं कोमलपण हेंच खरं'—असें शेवटीं म्हणाले आणि प्राण सोडला!—या गोष्टी आतां सांगायला नको होत्या; पण ओघाला आल्या म्हणून सांगितल्या.) आणि मी तरी पूर्वींची सुशीला कोठें आहें! माझ्यांत त्यांचा तर्ककर्कशपणा जणु कांहीं संचारला आहे आणि माझा कोमलपणा म्हणजे भ्याडपणा, दुर्बलपणा तर नाहीं ना अशी मला शंका येऊं लागली आहे. कसेंहि असो, त्यांचा अधार्मिकपणा लग्नानंतर मला हळूहळू पटूं लागला व मी या बाबतींत त्यांची पट्टशिष्या बनलें एवढी गोष्ट खरी. पट्टशिष्या कां नाहीं बनणार? वयच तें तसें होतें. त्यांतून मामंजींचेंहि तसेंच बोलणें—चालणें लग्न झाल्यावर त्यांनीं माझी शाळा चालू ठेविली व शाळेंत नास्तिक्याची बीजें पेरलींच आणि घरींहि आगरकरांचे लेख नेहमीं वाचावयाला देऊन उगवलेल्या रोपांना पाणी घातलें. आगरकरांचे लेख मला त्या वेळीं समजावयाचे नाहींत; पण मामंजी ते वाचायला लावायचे. स्पेन्सरचीं पुस्तकें म्हणजे त्यांचे वेद आणि आगरकर म्हणजे या वेदांचे सायणाचार्य किंवा या उपनिषदांचे भाष्यकार! पूर्वींचा धार्मिकपणा किंवा भाविकपणा सासूबाईंच्या ठिकाणीं होता थोडाबहुत; पण त्यांचा बिचाऱ्यांचा धर्म पतिपुत्रांच्या कुचेष्टेमुळें घरांत ओशाळल्यासारखा

वावरत असे. माहेरीं मी मधून मधून जायचीच; पण तेथें काय? वडील धार्मिक बाबतींत उदासीनच. आईचा भाविकपणा भक्कम खरा; पण मला तिच्या भाविकपणाबद्दल आदर जरी वाटावयाचा तरी पुढें पुढें तिची कींव येऊं लागली.

पण ही क्रांति एकदम कांहीं झाली नाहीं. पांचसात वर्षांनंतरची आहे ही. पहिल्या मंगळागौरीचा दिवस आणि ती रात्र अजून मला आठवते आहे. विशेषें-करून दिवसा पूजेच्या वेळीं मला पतीबद्दल, देवाबद्दल आणि धर्माबद्दल खरी-खुरी पूज्यबुद्धि त्या वेळीं वाटत होती. दुसऱ्या वर्षाच्या मंगळागौरीला ही भक्ति कमी होत गेली आणि पुढें तर मामंजीच्या आणि 'त्यां'च्या शास्त्रीय मान्या-पुढें ती कोठच्या कोठें दडून बसली!

पतिसान्निध्यामुळें आणि विशेषेंकरून पतिप्रेमामुळें धार्मिक भक्तीचा लोप होऊं लागला ही मला त्या वेळीं तरी आनंदाची गोष्ट वाटत होती (आणि अजूनहि एका अर्थी वाटते); पण बळवंतराव आणि सुनंदराव (लग्न झाल्यावर कांहीं दिवस मी त्यांना 'सुनंदा' या नांवानेंच हांक मारीत असें, आतां तसें करणें बरें वाटत नाहीं), या दोघांचें आणि माझें पतिप्रेमामुळें हळुहळू बिनसत चाललें हे पाहून मला फार चमत्कारिक व्हायचें. मला 'त्यां'चा स्वभाव पुरतेपणीं त्या वेळीं कळला नव्हता म्हणून मला त्या वेळीं पतिप्रेमामुळें 'ते'च खरे वाटावयाचे आणि हे दोघे इतके दिवस उगीचच यांच्या उलट होते, उगीचच यांना वाईट म्हणावयाचे, उगीचच चेष्टा करावयाचे असें त्या वेळीं वाटूं लागलें आणि त्या दोघांचा राग व तिटकारा येऊं लागला. पण इतक्या दिवसांचें सात्त्विक प्रेम एकदम कसें लुप्त होणार? अर्थात् या दोन भावनांमध्यें नेहमीं आंतल्या आंत धुसफूस चालावयाची आणि कसें वागावें आणि कसें वागूं नये हेंच मला समजायचें नाहीं.

त्यांत पुन्हां आम्हीं आतां मोठीं होऊं लागलेलीं. लग्न झालें, तरी मी कांहीं थोडे दिवस मोकळेपणानें वागें; पण पुढें पुढें हें कमी होत गेलें. त्या दोघांनाहि मला सासरीं भेटणें—किंवा माहेरींहि भेटणें अवघड वाटूं लागलें आणि जवळ राहात असून आणि एके काळीं मनानें अगदीं एक असून आतां आम्हीं परकीं होऊं लागलों! मला याचें फार वाईट वाटे. पण त्याला कांहीं इलाज नव्हता. सुदैवानें हा परकीपणा आतां गेला आहे; पण त्या वेळीं कांहीं वर्षें जो परकीपरकीपणा आमच्यामध्यें आला, त्याच्यामुळें मनाची जी ओढाताण व्हायची आणि वागणें जें

विसंगत रीतीचें–कधीं प्रेमाचें तर कधीं अनास्थेचें, कधीं सलगीचें तर कधीं तुटकपणाचें, व्हायचें–त्याची कल्पनाच वाचकांनीं करावी. वर्णन कसें आणि किती करूं? असो.

एकदां ज्याच्याशीं अगदीं जवळच्या नात्यानें वागलों त्याच्याशीं लांबच्या नात्याप्रमाणें वागावें लागणें हें हृदयाला फारच जाचक होतें; पण असले प्रसंग या संसारांत येतात म्हणूनच तो पुष्कळ वेळां कष्टप्रद होतो.

या शेवटल्या वाक्यावरून अशी कोणीं समजूत करून घेऊं नये, कीं मीं त्या काळीं मोठी दुःखीकष्टी होत्यें. मुळींच नाहीं. उलट मी आनंदांत आणि आपल्याच व आपल्या पतीच्या नादांत होत्यें. सासरचें वळण माहेरच्यापेक्षां अगदीं वेगळें, पण तें मला जाचक झालें नाहीं; कारण तेंच अधिक चांगलें असें मला वाटायचें. मामंजींची शिस्त ग्रंथकारानें मागें वर्णन केलीच आहे. कुटुंब कांहीं मोठें नव्हतें; पण जेवणाची वेळ झाली म्हणून सूचना देण्याकरितां बोर्डिंगांतल्या प्रमाणें घंटा व्हायची. वेळेवर कोणी आलें नाहीं, तर कोणी कोणाला थांबायचें नाहीं असा कायदा. मला शाळेंत जायचें असे; म्हणून मलाहि पहिल्या पंगतीलाच बसावें लागें. पहिल्यापहिल्यांदा मीं मामंजींना किंवा 'त्यां'ना उशीर झाला तर जेवायला बसत नसें; पण ते मग रागवायचे. उगाच वेळ कां दवडायचा, ज्यानें त्यानें आपलें उरकून घ्यावें, म्हणजे मागाहून येणाऱ्यालाहि अवघड वाटत नाहीं अशी त्यांची विचारसरणी. प्रथम मला आधीं जेवायला बसणें कसेंसेंच वाटे; पण पुढें निढावलें आणि आतां–आपलें मत सांगायचें म्हणजे कोणी कोणाला फारसें थांबूं नये हीच रीत चांगली असें मला वाटतें. 'मत' असें आहे; पण मन अजून लहानपणचेंच, माहेरीं असतांना जसें होतें तसेंच आहे बहुतेक. जेवण्याच्या बाबतींत तसेंच इतर बाबतींत. एकाची चूक किंवा एकाचा आळस आणि दुसऱ्याला त्रास असें आमच्याकडे व्हायचें नाहीं. माझें एकदां मीं पुस्तक हरवलें तेव्हां बरीक मामंजींनीं अपवाद करून मला तें आणून दिलें. नाहीं तर आमच्या इथली रीत म्हणजे ज्याची चूक त्यानें त्याचें प्रायश्चित भोगावें. आमच्या सासूबाईंना मात्र कोणताच नियम लागू नव्हता. कारण त्या म्हणजे अशा होत्या कीं, जुनी रीत त्यांनीं फारशी कधीं सोडलीच नाहीं, आणि कोणाची चूक असली तरी शिक्षा आपल्या त्याच भोगायच्या! सुनेकरितां कोणती सासू शिक्षा भोगील? पण बिचाऱ्या, मला रागें भरूं नये म्हणून खोटेंदेखील बोलायच्या आणि दोष आपला आहे म्हणून सांगावयाच्या! त्यांची आठवण

झाली म्हणजे अजून डोळ्यांतून पाणी येतें. पूर्वींचीं तीं माणसेंच निराळीं आणि अलिकडचीं आम्हीं पापी माणसें निराळीं, असें वाटतें. मामंजी आणि 'ते' जेवतांना सासूबाईच्या या प्रवृत्तीची, त्यांच्या सोंवळ्याओंवळ्याची, उपासातापासांची चेष्टा करायचे आणि मीं जरी साक्षात् केली नाहीं, तरी त्यांनीं चेष्टा केल्यावर गालांतल्या गालांत हंसून त्या चेष्टेंतच भागीदार होत असें. पण सासूबाईंची योग्यता फार मोठी, असें त्या वेळींहि मला वाटत असे आणि अजूनहि अगदीं आंतलें मन मला तसेंच सांगतें. पण विचाराच्या दृष्टीनें पाहिलें, म्हणजे त्यांचें तें वागणें चुकीचें वाटतें. कोणाला उशीर झाला तर मला त्या बसवायच्या जेवायला आधीं, पण त्या म्हणून कधीं आधीं बसल्या नाहींत. मला सोंवळेंओंवळें नव्हतें; पण त्यांनीं कधीं तें सोडलें नाहीं. त्यांचा स्वभाव इतका गरीब, कीं पतीलाच नव्हे तर मुलाला देखील त्या भ्यायच्या! 'कर्दनकाळ आहे तो; तिकडचीच प्रतिमा, त्याला हें खपायचें नाहीं' असें वाटून त्या बिचाऱ्या भिऊन असायच्या. मग मला किती भीति वाटत असेल याची कल्पनाच करावी!

सासरीं नवीनच गेल्यें; तेव्हां तर इतकी भीति वाटायची, कीं मी समोरच उभी रहात नसें. पण बोलणीं खाऊन खाऊन मग मीं हें सोडलें, तरी भीति फार वाटायची. ते डोळे आणि तो चेहराच भीति (प्रेमपूर्ण आदरयुक्त भीति) उत्पन्न करायचा. लहान मुलींना पतीची अशी कां भीति वाटते कोणास ठाऊक! कदाचित् अज्ञानामुळें असेल, कदाचित् अलीकडच्या भाषेंत बोलायचें, म्हणजे कामात्मक (Sexual) कांहीं जरूरी किंवा उपयोग किंवा आकर्षण-मार्ग या भीतीच्या मुळाशीं असेल. कांहीं असो; मला भीति वाटायची खरी. मला त्यांची भीति वाटायची खरी; पण ते माझ्याकडे पाहून मोहित होतात असें मला दिसून आलें. असें कां होत होतें कुणाला ठाऊक? आतां पुस्तकें वाचून sexual attraction (कामात्मक आकर्षण) असें मी म्हणेन; पण त्या वेळीं मला वाटायचें, कीं माझ्यांत कांहींच गुण नाहींत, मी जवळ उभी राहायला देखील अपात्र आहें. मी कितीक दिवस जवळ कधीं उभीच राहिल्यें नाहीं, इतकी मी भीत असें. 'भ्यायला काय झालं, लाजतेस कसली' असें ते मला चोरून म्हणायचे; पण माझी लाज म्हणा, भीति म्हणा किती तरी दिवस गेली नाहीं. मी समोर उभी राहातच नसें, मग बोलणें—चालणें कोठलें? आणि म्हणूनच माझ्यावर किती दिवस तरी राग होता. पण या गोष्टी लिहिण्यांत कांहीं अर्थ नाहीं. अशा या मनःस्थितीपासून आरंभ होऊन मी त्यांच्याशीं पुढें पुढें भांडलें,

त्यांना कठोर बोललें, तेव्हां आतां या चमत्काराला काय म्हणावें, जग हें असेंच आहे, म्हणून स्वस्थ बसावें झालें!”

( सुशीलेचें हस्तलिखित आत्मचरित्र )

---

## १४ : देव पुनः सांपडला

बाळू, रावबा, सुनंदा आतां कॉलेजांत गेले होते. सुनंदा घरचा गरीब, पण मॅट्रिकमध्यें एकंदर मार्कांची त्याची बेरीज पहिल्या नंबरची होती. गणितामध्यें २०० पैकीं १८० होते व इंग्लिशमध्येंहि तो पहिला नंबर होता; म्हणून त्याला कॉलेजमध्यें स्कॉलर्शिप मिळण्याची खात्री होती. स्कॉलर्शिपहून अधिक लागणारे पैसे विनायकराव देणार होते. त्या वेळेस डेक्कन कॉलेजमध्यें बेनसाहेब प्रिन्सिपॉल होते. प्रिन्सिपॉलसाहेबांचा व मुलांचा संबंध वर्गाच्या बाहेर फारच थोडा येई; पण वर्गांत बेनसाहेबांचा ‘तास’ म्हणजे केवळ स्वर्गीय आनंद! डेक्कन कॉलेज-मधला दुसरा स्वर्गीय आनंद म्हणजे नदीवर ‘बोटिंग’ करण्याचा. तेथील डिबेटिंग सोसायटी वगैरे गोष्टी इतर कॉलेजांप्रमाणेंच आहेत. फरक असला तर एवढाच, कीं डेक्कन कॉलेजमध्यें भाषणस्वातंत्र्य अधिक. एक दिवस सुनंदानें प्रिन्सिपॉलसाहेबांच्या समक्ष “इंग्लिश लोकांनीं लबाडीनें राज्य मिळविलें आहे, त्यांच्या विरुद्ध बंड करणें शक्य नाहीं म्हणून इष्ट नाहीं; परंतु पुढें मागें शक्य करतां आल्यास इष्ट होईल” अशा प्रकारचीं विधानें केलीं. पण तींहि तेथें पचलीं; इतरत्र पचणें कठीण असें वाटतें . बेननें सुनंदाची हंसत हंसत टीका करून चांगली हजेरी घेतली व इंग्रजांशिवाय दुसऱ्या एकाद्याचें राज्य असतें तर त्याला या भाषणाबद्दल फांशीं दिलें असतें असें सांगितलें व या राजद्रोहात्मक भाषणाबद्दल प्रायश्चित्त म्हणून “यानें हिंदुस्थानचा भूगोल व हिंदुस्तानचा इतिहास या विषयांचा अधिक मार्मिक अभ्यास करावा अशी मी शिक्षा फर्मावितों” असें विनोदी रीतीनें सांगून प्रकरण तेथल्या तेथेंच जिरविलें अशी एक दंतकथा आहे.

हें प्रकरण जिरलें; पण सुनंदा ही व्यक्ति विलक्षणच. ‘इंटर’ मध्यें गेल्यावर दुसरेंच एक प्रकरण त्याच्या पाठीमागें लागलें. बंगाल्यांतील बारिसाल येथील बॉंबप्रकरणाचे कांहीं धागे महाराष्ट्रापर्यंत पोंचले व त्यांतला एक धागा

सोनगांवांतल्या सुनंदाच्या अंगाशीं येऊन भिडला. एक पिस्तुल सोनगांवाला आलें आहे आणि तेथील ज्वलज्जहाल तरुण सुनंदा याजजवळ तें आहे असा पोलिसांना पत्ता लागला. पोलिसांनीं सुनंदाला डेक्कन कॉलेजमध्यें पकडण्याचा प्रयत्न केला; पण बेनसाहेबानें त्यांची डाळ शिजूं दिली नाहीं. "या आवारांत माझ्याशिवाय कोणी धनी नाहीं व पुराव्याशिवाय माझ्या मुलांपैकीं कोणालाहि मी धरूं देणार नाहीं" असें त्यानें सांगितलें असें म्हणतात.

हें खरें असो किंवा खोटें असो, सुनंदा डेक्कन कॉलेजांत राहात होता तेथपर्यंत कांहीं धरला गेला नाहीं. पण मे महिन्याच्या सुट्टींत जेव्हां तो घरीं गेला, तेव्हां मौज अशी झाली, कीं गिरिधररावांकडे ही सगळी मंडळी होती. सुशीला हापूसचे पिके आंबे फोडून देत होती व राजकारणावर गिरिधररावांचा व सुनंदाचा वाद चालला होता. "सरकारनें तुम्हांला पकडलें तर काय करणार तुम्ही ज्वलज्जहाल लोक?" असें गिरिधररावांनीं नुकतेंच म्हटलें होतें व नाशिकच्या खटल्याचा उल्लेख करून आपले लोक कसे नालायक आहेत हें, ते सिद्ध करून दाखवीत होते. सुनंदा म्हणत होता, कीं "नाशिकचा बार आधीं फुटला म्हणून सगळी घाण झाली; नाहीं तर सावरकर म्हणजे अलौकिक व्यक्ति आहे! बंडें पुष्कळदां फसायचींच; पण शेवटीं एखादें यशस्वी होतेंच; त्याला मग बंड म्हणत नाहींत, तर राज्यक्रान्ति म्हणतात, एवढंच..." इत्यादि इत्यादि वाद मोठा रंगांत आला असतां काळ्या डगल्याच्या पोलिसांची एक तुकडी गिरिधररावांकडे आली व त्यांतल्या हवालदारानें गिरिधररावांना सलाम करून सुनंदावरचें वॉरंट दाखविलें. पोलिसांच्या अटकेंत जाण्यापूर्वी सुनंदा जणुं काय सहज सुशीलेच्या कानाशीं लागला व मग ती तेथून हळूच पाय काढून निघून गेली आणि सुनंदानें दागिन्यांचें म्हणून तिच्याजवळ ठेवून दिलेलें एक लहानसें गांठोडें तिनें आपल्या गादीखालीं झटकन् लपवून ठेविलें. इतक्यांत शिपाई तिच्या पाठोपाठ आलाच व 'तुम्ही इकडे कां आलांत, असं यायचं नसतं' असें रागानें बोलून, झडतीचें वॉरंट नव्हतें तरी, तिच्या खोलीची ते झडती घेऊं लागले. ट्रंका, फडताळें झाडून सारीं तपासलीं. तिचीहि एका बाईकडून झडती घेण्यांत आली; पण पोलिसांना कोठेंहि कांहीं आढळलें नाहीं व ते शिकार साधली नाहीं म्हणून नाखूष झाले. (सुशीलेसारखी खुपसुरत नवयुवती पाहाण्यास सांपडली हीच त्यांतल्या त्यांत सुखाची गोष्ट त्यांना वाटली! अस्तु.)

सुशीलेला मात्र ती रात्र प्रथम तरी अत्यंत दुःखाची झाली. पोलिस फसले,

पण मनाला कसें फसविणार? सुनंदानें दिलेल्या गांठोड्यांत काय होतें हें तिला प्रथम ठाऊक नव्हतें. पण गादीखालीं लपवून ठेव म्हणून जेव्हां त्यानें तिच्या कानांत सांगितलें, तेव्हां त्यांत काय आहे हेंहि तिला त्यानें सांगितलें. "मला वांचवायाचें असेल आणि देशाचें हित साधावयाचें असेल तर या वेळीं मला मदत कर आणि कसेंहि करून तो डबा लपव" असे सुनंदाचे त्या वेळचे शब्द होते. तिला थोडाबहुत देशाभिमान होता, कांहीं दिवस स्वदेशीच साखर खावयाची, स्वदेशीच कापड वापरावयाचें, अशा प्रकारचा नियम तिनें पाळलाहि होता; पण असल्या फंदांत आपण पडावें किंवा नाहीं याबद्दल तिला क्षणभर संशय पडला. परंतु लगेच देशाभिमानानें थोडीशी उचल खाल्ली व खरें सांगावयाचें, म्हणजे सुनंदाबद्दलच्या लहानपणापासूनच्या प्रेमानें अधिक उचल खाल्ली आणि तिचा एकदम निश्चय होऊन तिनें तें पिस्तुल त्या वेळीं सुचलेल्या स्थळीं, म्हणजे गादीखालीं लपवून ठेविलें. झडती होईपर्यंत काय होतें, काय नाहीं, या विचारांपुढें दुसऱ्या विचारांना जोर करण्याला फारसा अवकाशच नव्हता; पण झडती गेल्यावर मात्र तिचें मन तिला खाऊं लागलें; आपण जी गोष्ट केली ती चांगली का, असें तिचें मन तिला एकसारखें विचारूं लागलें आणि तिला कांहीं चैन पडूं देईना. पतीला हें गुपित सांगावें का नाहीं याबद्दलहि तिचा निश्चय होईना व त्या रात्रीं कांहीं तास तिला नरक–यातनांप्रमाणेंच यातना झाल्या.

आणि तिच्या पतीनें जेव्हां बराच वेळ अंथरुणावर तळमळून एकदम निश्चय झाल्यासारखें करून तिला म्हटलें, कीं "सुशीले, सुनंदाच्या कानाशीं तूं कुजबुज करतेस हें मला कांहीं आवडत नाहीं; तुझें प्रेम त्याच्यावर आहे हें मला ठाऊक आहे, पण माझ्यादेखत तरी असल्या गोष्टी करूं नकोस" असें जेव्हां म्हटलें, तेव्हां तर तिला साक्षात् नरकयातनांचाच अनुभव येऊं लागला. काय बोलावें आणि काय करावें हें न सुचल्यामुळें तीं रडूं लागली. हें पाहून पतीचें मन द्रवूं लागलें व "मी तुला उगीच बोललों. पुरुषाचं मन संशयी असतं, तूं रागावूं नकोस" असें–तसें तो बोलूं लागला; पण त्याच वेळीं दुर्दैवानें म्हणा किंवा सुदैवानें म्हणा, गादी एके ठिकाणीं एकसारखी खुपते आहे कां, असा विचार येऊन त्यानें अखेर काय असेल तें काढून टाकण्याकरितां कंदील हातांत घेतला व गादी तपासून पाहूं लागला; आणि अखेर डब्यांत लपवून ठेविलेल्या एका पिस्तुलाचें सगळें गुह्य बाहेर पडलेंच!

"माझ्या अपरोक्ष तूं असल्या फंदांत पडतेस हें चांगलं नाहीं." तिचे

पतिराज म्हणाले व कांहीं एक न बोलतां स्वस्थ पडून राहिले. कालान्तरानें ते म्हणाले, " सुशीले, सुनंदाला मी लहानपणापासून ओळखतों आहें व तो असल्या कांहींतरी फंदांत असावा असा मला संशयहि येऊं लागला होता. पण तूं यांत सांपडशील अशी मात्र कल्पनाहि नव्हती. त्याचं मी वैर करतों–त्याचा मला मत्सर वाटतो–असा पुष्कळांचा माझ्यावर आरोप आहे. पण वैर असतं तर आतांच्या आतां त्याचं नांव पोलिसांना सांगून त्याचा कांटा मीं काढून टाकला असता. पण मी इतका नीच नाहीं."

" मीं कधीं आपल्याला असं म्हटलें आहे का ? लोक कांहीं का म्हणत ना मीं कधीं मनांत तरी आणलं आहे का असं ?" सुशीला म्हणाली.

" मनांतलं कोण कसं जाणणार ?"

" सगळं जाणतां येतं !" सुशीलेनें उत्तर दिलें. " माझ्या मनांत सुनंदरावां-बद्दल प्रेम आहे असं मघांशीं जें बोलणें झालं, तें कसं मग ?"

" मला पकडलंस खरं तूं–आणि खरं सांगूं तुला ? मी तुझं मन ओळखतों–तूं खरोखर साध्वी आहेस; पण तुला व्यवहार समजत नाहीं. सुनंदाहि सज्जन आहे, तो हुशार आहे हें युनिव्हर्सिटीनेंच जगजाहीर केलें आहे; पण तुझ्यासारखाच तो व्यवहारांत लहान मुलासारखा आहे. बाळू आणि तो यांच्यावर लहानपणापासूनच तुझं प्रेम आहे हें मला न समजण्याला मी काय दुधखुळा आहें ? पण तूं पतिव्रता आहेस, हेंहि मी जाणतों आहें. तुझी योग्यता मला यायची नाहीं. जगांत देव नाहीं असं मी वारंवार म्हणतों आणि कॉलेजच्या डिबेटिंग सोसायटीमध्यें मीं हें उघडपणें बोलूनहि दाखवलं. पण जगांत देव नसला तरी एक 'देवी' आहे असं मी केव्हांहि म्हणण्याला तयार आहें. पण या देवीनं लौकिक व्यवहारांत मात्र माझ्या तंत्रानं चालावं अशी माझी इच्छा आहे. कारण लौकिक व्यवहार मला तिच्यापेक्षां अधिक समजतो असं मला वाटतं–निदान असा भ्रम आहे. तेव्हां आतां तूं असं कर, कीं उठल्याबरोबर सुनंदाकडे निरोप पाठवून हें सगळं त्याला घेऊन जायला सांग आणि पुन्हां असल्या फंदांत पडूं नकोस. सुनंदाला म्हणावं, आम्ही मॉडरेट लोक बॉंबच्या विरुद्ध असलों तरी आम्ही माणुसकी कांहीं सोडलेली नाहीं आणि आयत्या वेळेस आम्हीच उपयोगी पडूं. समजलं ?"

" देवानंच वांचवलं म्हणायचं ! मला वाटलं होतं, कीं आतां काय होणार आणि काय नाहीं !"

" आमच्या कुटुंबांत इतकीं वर्ष राहून अजून देव तूं मानतेसच म्हणायची ! तुझी तर नेहमीं तक्रार चालायची, कीं ' या कुटुंबात आल्यापासून माझा देव हरवला.' "

" इतके दिवस देव खरंच हरवला होता; पण आज–आतांच–मला तो सांपडला ! इतके दिवस तो जवळ असून मीं पुरतेपणीं ओळखला नाहीं म्हणून देवानं कोप मात्र करूं नये ! "

" केला असता कोप देवानं; पण देवीच्या पुढं काय करतो ? "

---

## १५ : क्रममार्ग का क्रान्तिमार्ग ?

बाळू व रावबा यांचा बी. ए.चा निकाल नुकताच लागला होता व रावबा तिसऱ्या वर्गांत आणि बाळू फर्स्ट क्लासांत, असे ते पास झाले होते. बाळूला डेक्कन कॉलेजामध्यें फेलोशिप् मिळणार हें ठरलेंच होतें व रावबा एल्एल्. बी.चा अभ्यास करणार होता. सुनंदा नुकताच जेलमधून सुटून आला होता. कारण पिस्तुलाचा अखेर पोलिसांना शोध लागला होता व खटला होऊन जा प्रकार व्हावयाचा तो झालाच होता. जेलमधून सुटून आल्यावर सुनंदाशीं कोणी बोलण्यासदेखील तयार नव्हता; पण गिरिधररावांनीं आपण होऊन त्याला आज चहा पिण्यास बोलाविलें होतें. त्यांना ज्वलज्जहालपणा अगदीं आवडत नसला तरी सुनंदावर त्यांचें आपला शिष्य म्हणून फार प्रेम होतें. बाळूलाहि या प्रसंगीं त्यांनीं बोलावलें होतें व सुनंदाच्या आगमनाची मंडळी वाट पहात होती.

" तूं, बाळू, फर्स्टक्लास आलास; पण सुनंदा जर तुरुंगांत गेला नसता तर तो फर्स्टक्लास फर्स्ट आला असता ! पण आतां 'इंटर'देखील पास नाहीं आणि नोकरी मागायला गेला तर दाराशीं देखील कोणी उभं करणार नाहीं."

" ते नोकरी कशाला पहाताहेत ! त्यांचा नोकरी करण्याचा केव्हांच विचार नव्हता." सुशीला तेथेंच 'ज्ञानप्रकाश' चाळीत बसली होती ती म्हणाली.

" Nonsense ! नोकरीशिवाय चालेल कसं त्याचं ? काय श्रीमंती आहे, का काय आहे ? तुरुंगांत जायच्या आधीं लग्न करून बसलेला पुन्हां ! असल्या फंदांत पडायचं, तर लग्न करावं कशाला ? "

" लग्न करायच्या वेळेस पुढचं सगळं भविष्य दिसत असतं का ?" रावबा म्हणाला व आपल्या पत्नीकडे साभिप्राय मुद्रेनें पाहूं लागला. " मला कुठं भविष्य कळलं होतं कीं, आमच्या घरांत आमच्या नास्तिक्यावरती ताण होईल !"

" ती नास्तिक नाहीं आहे." सुशीलेचे श्वशुर म्हणाले. " ती स्पेन्सरप्रमाणं आणि माझ्याप्रमाणं अज्ञेयवादी आहे. तूं मात्र नास्तिक आहेस खरा."

" माझ्यापेक्षां ताण आहे; पण मी कशाला कोणाबद्दल मन कलुषित करूं ? तुमच्याशीं तीं बोलत नाहीं म्हणून तुम्हांला आपली..."

" अरे, बोलायला कशाला पाहिजे ! नास्तिक मनुष्य निराळंच असतं !" गिरिधररावांनीं उत्तर दिलें व विषय बदलण्याकरितां 'अजून कां येत नाहीं हा सुनंदा !' असें म्हणून खिडकींतून रस्त्याकडे पाहूं लागले. पाहूं लागल्यावर क्षणार्धांतच सुनंदा त्यांच्या नजरेस पडला व 'होता तसा आहे अजून' असे उद्गार त्या सामान्यतः कठोर असलेल्या, पण सुनंदाविषयीं कोमल भाव धारण करणाऱ्या गुरूच्या तोंडून एकदम बाहेर पडले.

सुनंदा माडी चढून वर आला व पुष्कळ दिवसांनीं व महत्त्वाच्या प्रसंगानंतरची पहिलीच भेट म्हणून त्यानें आपल्या गुरूच्या चरणांवर डोकें ठेवलें व उपरण्यानें घाम व डोळे पुसून एका जागेवर जाऊन बसला. "अरे, पाय कसले धरतां या नवीन युगांत ? आम्ही काय पूर्वींच्या काळांतल्या गुरूंसारखे गुरु आहोंत, तर तुम्हीं आमचे पाय धरावेत ? या चाली आतां सोडून दिल्या पाहिजेत. बाकी हें सगळें आपोआपच होतं आहे म्हणा ! जगांत, स्पेन्सर म्हणतो त्याप्रमाणं, परिस्थितीला adjustment होतेच आहे !"

" परिस्थितीला adjustment करून घेण्यापेक्षां परिस्थितीच बदलण्याचा कोणी जोराचा प्रयत्न करीत नाहीं. जो तो तिचें दास्य पत्करतो—तिला कांहीं कोणी वांकवीत नाहीं"—सुनंदा म्हणाला. "बाकी आम्ही आहों failures ( अपेशी ). आम्हांला बोलण्याचा कांहीं अधिकारच नाहीं."

" Success आणि failure चा ( यशापयशाचा ) प्रश्न नाहीं." बाळू म्हणाला. "परिस्थितीला वांकविण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी समाज शक्याशक्यतेचा विचार करतो व हें अगदीं साहजिकच आहे आणि त्यांत वाईट तरी काय आहे ?"

" आपल्या समाजांत साधी नीतिमत्ता नाहीं. मोठ्यामोठ्या लोकांतदेखील साधी नीतिमत्ता नाहीं. अशा स्थितींत परिस्थितीला वांकविण्याच्या गोष्टी बोलण्यांत काय अर्थ आहे ?" गिरिधरराव म्हणाले. " आपल्या येथल्या

म्युनिसिपालिटीचें उदाहरण घ्या. येथील जहाल मंडळी सरकारवर इतके दिवस नाहीं नाहीं ती टीका करायची, पण तीच मंडळी आतां सरकारी सभासदांशीं आणि मुसलमानांशीं संगनमत करीत आहेत आणि साधणार काय, तर मॉडरेट अध्यक्ष काढून टाकून आपल्या पक्षाचा अध्यक्ष आतां आणणार ! याला काय नीतिमत्ता म्हणायची का काय म्हणायचं ?'

" मॉडरेट पक्षानं जें केलं तेंच आम्हीं आतां करतों." सुनंदानें उत्तर दिलें.

" मॉडरेट लोक सरकारला अशा रीतीनें कधींच मिळाले नाहींत." रावबानें उत्तर दिलें.

" जाऊं दे रे वादविवाद." गिरिधरराव म्हणाले. " तो आतां तर कोठें आला आहे. प्रकृति कशी आहे, काय आहे, मला विचारूं तर द्याल कीं नाहीं." असें म्हणून त्यांनीं, रावबानें व सुशीलेनें ( बाळूनें आधींच सर्व गोष्टी विचारलेल्या होत्या ) खटल्यासंबंधीं, तुरुंगासंबंधीं वगैरे हरतऱ्हेची चौकशी केली व त्यानेंहि सर्व गोष्टी होत्या तशा सांगितल्या,–आपल्या चुकाहि प्रांजलपणें कबूल केल्या !

" देशांत विशेष जोर नाहीं. विशेष कळकळ असणारे लोक थोडे, स्वार्थत्याग बेताचाच; अशा स्थितींत आम्हीं जो मार्ग स्वीकारला तो साफ चुकीचा होता." तो म्हणाला. " पण प्रयत्न केला याबद्दल मला मुळींच वाईट वाटत नाहीं. यापासून योग्य तो धडा घेतला नाहीं तर मात्र मला वाईट वाटेल."

" योग्य तो धडा कोणता ? " सुशीलेनें चहाची केटली आणली होती, ती हातांत घेऊन कपांत चहा ओतण्यापूर्वीं त्याच्याकडे पाहून विचारलें.

" तो धडा असा, कीं या मार्गांत कांहीं अर्थ नाहीं असं ओळखून दुसरा मार्ग शोधण्याच्या उद्योगास लागणं."

" अरे, पण मी तुम्हाला हें पूर्वींपासूनच सांगत नव्हतों कां ? " गिरिधरराव आत्मप्रौढीची ज्यांत थोडीशी झांक आहे अशा स्वरानें म्हणाले. " केव्हांहि काय, स्पेन्सर म्हणतो त्याप्रमाणें Evolution च्या मार्गानें गेलें पाहिजे, Revolution चा मार्ग फुकट आहे."

" नेहमींच हें तत्त्व बरोबर आहे असं मी अजून नाहीं कबूल करणार." सुनंदा म्हणाला. " पण सध्यांच्या आमच्या स्थितींत तें बरोबर आहे हे मी कबूल करतों."

"सुंभ जळलं तरी पीळ जात नाहीं." सुशीला मध्येंच म्हणाली व गालां-तल्या गालांत हंसूं लागली.

"पीळ नसला तर मनुष्यांत मनुष्यत्व काय राहिलं ?" सुनंदानें उत्तरादाखल म्हटलें व चहाचा घोंट घेतला,

"क्रान्तिमार्ग क्रममार्गापेक्षां नेहमींच वाईट असतो असं नाहीं; पण बहुधा तो वाईट असतो." बाळूनें मध्येंच म्हटलें. "पण क्रममार्गानें जावं म्हणावं, तर त्यांत दोष असा आहे, कीं मार्गाचं अन्तिम गांठण्याला परमावधीचा वेळ लागतो आणि तें कधींकाळीं गांठलं जाईल का नाहीं याबद्दलहि संशय वाटूं लागतो आणि त्या मार्गानें जातांना उत्साह, धाडस, पराक्रम, कल्पकता, स्वार्थ–त्याग या गुणांना फारसा अवकाश मिळत नाहीं."

"ग्रॅज्युएट होऊन अजून तूं देखील या भ्रमांत आहेसच म्हणायचा !" गिरिधरराव म्हणाले, "अरे, सामाजिक कार्यें करतांना उत्साह, धाडस, पराक्रम, कल्पकता, या गुणांना अवकाश मुळींच नाहीं असं म्हणतोस तरी कसा ? बरं, तें राहूं द्या. तुमच्या या पिस्तुलवाल्या लोकांनीं काय काय पराक्रम केले ते तर सांग एकदां ! तुमच्या त्या रामदासी विनायकबोवांना पोलिसांनीं एकच थोबाडींत लगावल्याबरोबर त्यांनीं सुनंदाचं नांव सांगितलं हा काय त्यांनीं मोठा पराक्रम केला ?"

"थोबाडींत 'लगावल्या'बरोबर नाहीं-'लगावूं का' असं म्हटल्याबरोबर गृहस्थानं माझं नांव सांगितलं आणि मला १॥ वर्षांची सजा भोगावी लागली" सुनंदा म्हणाला. "आमच्या खटल्यांत सांपडलेल्या व न सांपडलेल्या लोकांच्या एकेक मजा सांगूं लागलों, तर एक दिवस पुरायचा नाहीं. पोलिसांच्या आणि त्यांच्या ऑफिसरांच्याहि अशाच मौजा आहेत; पण त्या आतां नकोत."

'बरं, आतां तूं काय करणार ?" गिरधररावांनीं विचारलें. "बायकोचं, आईचं आणि तुझं पोट तर भरलं पाहिजे ? आईचं कसं आहे तुझ्या ? ताप येत आहे असं ऐकतों !"

"ताप नाहीं आतां, पण अशक्तता फार आलेली आहे. माझ्या कैदेमुळें तिची कंबरच खचून गेली आहे."

"म्हणून मी विचारतों, कीं पुढचा बेत काय आहे ? तुला आतां सरकारी नोकरी तर मिळायची नाहींच; पण मुंबईस एखाद्या व्यापाऱ्याकडे मिळाली तर मिळूं शके..."

"तसाच कांहीं तरी बेत आहे. सध्यां पण कांहींच निश्चित करीत नाहीं. आईनें एकदोन जुने दागिने मोडले आहेत. त्यावर..."

"Don't talk of that. I cannot bear it." गिरिधरराव गहिंवरून म्हणाले. "तूं असं कर, तुला जर कांहीं पैसे लागले तर उसने म्हण, कर्जाऊ म्हण, फुकट म्हण, मी ते तुला देईन. तुझीं माझीं मतं भिन्न आहेत; पण तुझ्या **मतां**पेक्षां मी तुझ्या **मना**कडे अधिक पहातों. तुझीं मतं तुला तुरुंगांत नेतील; पण तुझं मन तुला स्वर्गांत नेईल. पण हें बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तुला केव्हांहि मदत लागली म्हणजे मला भेट; शक्य असेल तें मी करीन."

वरील प्रकारचें गंभीर स्वरूपाचें भाषण करून गिरिधरराव खालीं कांहीं कामानिमित्त गेले आणि माडीवर रावबा, बाळू, सुनंदा व सुशीला हीं राहिलीं. बाळू व रावबा यांच्यामध्यें केव्हांहि विशेष सख्य नसल्यामुळें व रावबाचें मन संशयी असल्यामुळें सुशीला बाळूशीं बोलण्याचें बहुधा टाळीत असे. पण आज सुनंदाच्या आगमनाचा विशेष प्रसंग असल्यामुळें ती तेथें थांबली व सुनंदा आणि बाळू यांच्याजवळ त्यांच्या पत्नीसंबंधीं (त्यांचीं लग्नें पूर्वींच्या पद्धतीप्रमाणें व बालवयांतच झालीं होतीं हें आतां सांगायला नकोच.) हरतऱ्हेच्या चौकशा व चेष्टा करीत बराच वेळ तेथें राहिली. त्या अवधींत लहानपणच्या सर्व खेळांच्या, रुसव्यांच्या, भांडणांच्या वगैरे आठवणी निघाल्या आणि सर्वजणांनीं तो वेळ आनंदांत व हंसण्यांत घालविला. बोलणें संपत आलें तेव्हां सुनंदा स्मित करून म्हणाला, "तुरुंगांत जाण्यापासून हा एक फायदा झाला कीं, आपण चौघेजण बऱ्याच वर्षांत पूर्वींसारखे हंसलों–खेळलों नव्हतों, ते आज आतां हंसलों-खेळलों."

"हें कांहीं तरी समाधान मानून घ्यायचं आहे, झालं. बी. ए. झाल्यावर या फंदांत वाटलं तर पडायचं होतं, म्हणजे विद्या तरी पुरी झाली असती." सुशीला म्हणाली.

"विद्या करून शेवटीं काय, सत्कर्म करायचं हेंच ध्येय ना ? तें केव्हांहि शक्य आहे. आतां बी. ए. झाल्यावर सन्मानाचं सत्कार्य करतां येतं, तें मला करतां येणार नाहीं, हें मला कबूल आहे; पण सन्मानाशिवाय माझं विशेष कांहीं अडेल असं वाटत नाहीं."

"अडण्याचा प्रश्न नाहीं." सुशीला म्हणाली. "तुम्ही तिघेजण बरोबर होतांत, पण आतां एकजण मागें राहिला हें पाहून वाईट वाटतं."

" मी मागें कुठं आहें ? माझं नांव तर आज वर्तमानपत्रांत गाजत आहे. " सुनंदा संतोषाचा खोटा आविर्भाव आणून म्हणाला. " बरं, माझं आतां राहूं द्या, तूं नास्तिक होत चालली आहेस असं बाळू सांगत होता, तें खरं कीं काय ? "

" मला नास्तिक कोण म्हणणार ? " सुशीलेनें उत्तर दिलें. " मी देव मानतें; इतकेंच नव्हे, तर माझा देव मूर्त देहधारी आहे आणि तो माझ्याजवळ आहे. आतांहि आहे ! असें म्हणून तिनें आपल्या पतीकडे प्रेमपूर्ण नजरेनें पाहिलें. यावर सुनंदा कांहीं कोटी करणार होता; पण इतक्यांत उषा तेथें आली व " ताई, आईनें तुला आज घरीं बोलावलं आहे. तात्यांना म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष नेमलं आहे ना, म्हणून पार्टी आहे. तुला आज तिनं बोलावलं आहे " असें म्हणाली व या बोलण्यानें आणि बोलावण्यानें विषय बदलून मंडळींची पांगापांग झाली.

---

## १६ : स्वार्थभक्ति कां सद्गुणभक्ति ?

सुनंदराव व बळवंतराव एक वर्षानंतर आग्रा, हरिद्वार वगैरेकडे सहल करण्यास गेले असतां त्यांना सुशीलेकडून खालीं दिलेलें पत्र आलें. त्यांत एका अर्थी दुःखाची व एका अर्थी आनंदाची अशी एक बातमी होती. त्या पत्रावरून त्यांच्या मनांत देशाच्या सामाजिक व औद्योगिक उन्नतीसंबंधानें अनेक विचार उत्पन्न होऊन त्यांचीं मनें अस्वस्थ झालीं. पत्र वाचून झाल्यावर वास्तविक त्यांचें संभाषण व्हावयाचें पण त्या वेळीं तरी तसें कांहीं न होतां त्यांनीं तें पत्र दोन तीनदां वाचलें आणि कांहीं थोडीबहुत उद्गारात्मक वाक्यें उच्चारून ते आपापल्या ठिकाणीं त्या पत्राचा विचार करीत स्वस्थ बसले. तें पत्र असें—

श्री

सोनगांव

" प्रिय मित्र बळवंतराव व सुनंदराव यांना सुशीलेचा नमस्कार विनंति विशेष. आपण ताजमहाल पाहून अत्यंत संतुष्ट झालांत आणि साध्या दगडापासून जशी सुंदर इमारत मनुष्याला निर्माण करतां येते तशी सामान्य माणसांच्या समाजापासून त्याला सुंदर समाजमन्दिराची रचना करतां येईल आणि सबंध

विश्वाला आनंद देतां येईल, अशा प्रकारची कल्पना सुनंदरावांना तेथें सुचली आणि मग "मनुष्य मनांत आणील तर समाजाची रचना कशी परस्परोपयोगी व अन्योन्य–सौंदर्यवर्धक होऊं शकेल" याबद्दल आपले वादविवाद झाले इत्यादि हकीगत आपण लिहिली ती कळली. हरिद्वाराचें व तेथील गुरुकुलाचेंहि वर्णन फार मौजेचें वाटलें. आम्ही उभयतां आपलेबरोबर असतों, तर बरें झालें असतें असें माझ्या मनांत आलें; पण त्यांना तें पटलें नाहीं. त्यांचं म्हणणं असं कीं हरतऱ्हेच्या गोष्टींचा निष्फळ शाब्दिक काथ्याकूट करीत बसण्यापेक्षां किंवा निरनिराळीं स्थानं पहात बसण्यापेक्षां मनुष्यानें उद्योगाला लागावं. देशाची उन्नति करावयाची असल्यास हरिद्वारादि तीर्थें पाहाण्यापेक्षां कसला तरी कारखाना काढावा व तो चालवून दाखवावा किंवा निदान त्यांत काम करून देशाच्या संपत्तींत भर घालावी. मला तुम्ही करतां हेंहि चांगलं वाटतं आणि ते म्हणतात तेंहि एका अर्थी खरं वाटतं !

'पण मला हें सांगायचें नाहीं; सांगायची आनंदाची गोष्ट अशी, कीं आम्हीं उभयतां एका महासंकटांतून वाचलों. आमच्या साबणाच्या कारखान्यांतल्या आणि भाताच्या गिरणींतल्या लोकांनीं मजुरी वाढविण्यांत यावी म्हणून संप पुकारला होता व आमच्याइथें पड घेण्याची मुळींच संवय नसल्यामुळें आणि लोकांना न आवडणारीं कठोर सत्यें सडेतोडपणें आणि काळवेळ न पाहतां सांगण्याची संवय असल्यामुळें लोक अखेर बिथरले, संतापले आणि रागाच्या भरांत त्यांनीं कारखान्याला आणि गिरणीला आग लावून दिली ! माझ्या मध्यस्थीनें कारखान्यांतल्या आणि गिरणींतल्या बायकांना मजुरी थोडी वाढली होती. कोंडा, धुण्याचा साबण, वगैरे किरकोळ गोष्टी त्यांना थोड्याबहुत फुकट देण्यांत येत असत. आणि दुसऱ्याहि कांहीं सोयी करण्यांत आल्या होत्या; म्हणून मजूर बाया कांहीं त्या संपांत सामील झाल्या नव्हत्या. त्यांच्याशीं बोलण्याकरितां म्हणून मी दुपारचा चहा वगैरे आटपून कारखान्यांत गेल्यें होत्यें. मागाहून 'ते' आले. ते आल्यावर भाताच्या गिरणींत बसलेल्या मजूरबायांबरोबर बोलण्याचें सोडून मी मनुष्यशून्य झालेल्या साबणाच्या कारखान्यांत आल्यें व एका खोलींत आम्हीं बोलत बसलों. ते आंत एकटेच आहेत य. समजुतीनें कांहीं दुष्ट मजुरांनीं कारखान्याला चारपांच ठिकाणीं आगी लावल्या व बाहेरचें दरवाजे बंद करून मौज पाहात बसले ! तीनचार मिनिटांतच आम्हांला आग लागल्याचें कळलें; पण इलाज काय ? चहूंकडून भडका झालेला.

बाहेर जाण्यास मार्ग नाहीं, काय करावें हें सुचेना. मी कावरीबावरी झाल्यें, रडूं लागल्यें, ओरडूं लागल्यें; पण ते अगदीं शांत होते ! त्यांनीं निरनिराळ्या मार्गांनीं मला बाहेर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! अखेर ते मधल्या विस्तीर्ण चौकांत उघड्यावर अगदीं मध्यावर उभे राहिले व "रडून का आग विझणार आहे ! मरण आतां बहुधा चुकत नाहीं. मूर्ख लोकांशीं गांठ पडली म्हणजे असेच प्रकार व्हायचे. शान्तपणें मध्येंच उभे राहिलों, तर कदाचित् आग विझून आपण थोडेबहुत होरपळून जिवंत राहिलों तर राहूं. असें सांगूं लागले. त्यांचें तें धैर्य पाहून मला ते खरोखरच देव वाटूं लागले ! पण माझें रडणें—ओरडणें कोठलें थांबायला ? आणि तेंहि एका अर्थी बरें झालें. कारण त्यामुळें मी तेथें आहें हें कांहीं मजुरांना कळलें आणि ते मग ताबडतोब एक दार फोडून आगीच्या भडाक्यांत मला वांचविण्याकरितां आले आणि मी त्यांना घट्ट धरून राहिल्यामुळं त्यांना व मला त्यांनीं उचलून नेऊन बाहेर काढलें. मला सोडविण्यास आलेल्यापैकीं एकाचा प्राण गेला आणि दोघे तिघे चांगलेच होर-पळून निघाले ! अशी ही चमत्कारिक ईश्वरयोजना आहे !

" 'आपण नुसत्या पैशांकडे पाहातां म्हणून लोक विरुद्ध आहेत. थोडीशी मजुरी वाढविली तर काय बरं होईल ?' असें मी त्यांना म्हणत्यें, पण ते ऐकत नाहींत. मजुरी वाढविली तर फायदा होणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर तोटा होईल असं ते म्हणतात आणि 'या बाबतींत तुला कांहीं कळत नाहीं, तूं बोलूं नकोस' असें म्हणतात. 'तुला पाहिजे तर हिशोबाच्या वह्या दाखवितों, तोटा होईल का नाहीं तें तूंच सांग' असं मला म्हणतात. पण मी कांहीं वह्याबिह्या पाहात नाहीं; मला त्याचं खरं वाटतं. पण मजुरांचीहि स्थिति पाहावत नाहीं ! 'मजुरांना आपलें खरें हित समजत नाहीं, त्यांचें हित मला समजतं, आणि मी हे उद्योग त्यांच्याकरितां काढिले आहेत' असें ते म्हणतात. 'देशाची औद्योगिक उन्नति झाली पाहिजे, उगीच सरकारच्या नांवानें खडे फोडण्यांत आणि व्याख्यानें झोडण्यांत अर्थ नाहीं' अशा प्रकारचीं त्यांचीं मतें आहेत हें तुम्हांला ठाऊकच आहे. " मजुरांना समजावून सांगाव्यात या गोष्टी म्हणजे ते चिडणार नाहींत' असें मीं म्हटलें म्हणजे म्हणतात, कीं मजुरांना कांहींएक समजत नाहीं; त्यांना क्षुद्र आणि तात्कालिक फायदा तेवढा दिसतो.'

" असं कसं म्हणतां ? मला वांचविण्याकरितां त्यांनीं आपला जीव धोक्यांत नाहीं का घातला ?' मीं म्हटलें, तर त्याचें उत्तर असें, कीं 'तूं बायकांची

मजुरी वाढवून दिलीस म्हणून तुझ्यावर त्यांची भक्ति; दुसरं कांहीं नाहीं.' मी म्हणत्यें कीं, " तसं नाहीं. त्यांना देखील गोड बोललं, घरची विचारपूस केली, सुखासमाधानाच्या गोष्टी सांगितल्या, म्हणजे त्यांना देखील बरं वाटतं. तीं तरी माणसंच आहेत. त्यांना उपकार केलेला समजतो, त्यांना उपकार समजत नसता तर त्यांनीं कांहीं माझ्याकरितां जीव धोक्यांत घातला नसता.'

" ' त्यांना उपकार समजतो हें मी कबूल करतों ' ते म्हणतात, 'पण ते मूर्ख अज्ञानी आहेत, त्यांना स्वहित कळत नाहीं आणि ज्यांना कळत आहे त्याच्यावर त्यांचा विश्वास नाहीं. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें मी जर मजुरी देऊं लागलों, तर एक दोन वर्षांतच मला कारखाना आणि गिरणी बंद करून दिवाळं काढावं लागेल आणि त्यांना मग आतां मिळते आहे ती तरी मजुरी कशी मिळणार ? मला त्यांचं हित समजत आहे आणि माझ्या मताप्रमाणंच मी वागणार या मूर्खांना क्षुद्र आणि तात्पुरता फायदा दिसतो, पुढचं मागचं कांहीं दिसत नाहीं आणि त्यांचा कैवारी घेणारी जी तूं, त्या तुलाहि कांहीं कळत नाहीं !'

" त्यांचें हें म्हणणें मला खरें वाटतें, कारण त्यांना माझ्यापेक्षां खरोखरीच व्यवहारज्ञान अधिक आहे; मला ' अर्थशास्त्र ' वगैरे जे ते शब्द बोलतात त्यांचा अर्थहि कळत नाहीं. त्यांचा आणि माझा वेळ कसा जातो वगैरे गोष्टी कळाव्यात म्हणून हें लांबलचक पत्र लिहिलें आहे. आपलींहि येतात तशींच यावींत. त्यांना फार आवडतात. आपणांला ते Sentimentalists ( भावनाप्रधान ) म्हणतात, पण आदर फार आहे, असो. गांठी पडल्यावर आगीची वगैरे हकीगत सविस्तर सांगेन. आपणहि आपल्या प्रवासाची हकीगत सांगालच, कळावें.

" आपली बालमैत्रीण

" **सुशीला** "

---

## १७ : पति देखील मातीच !

**सुशीलेच्या** देवाविषयींच्या कल्पना व भावना कांहीं अंशीं वयानुसार आणि मनोविकासानुसार, कांहीं अंशीं विशिष्ट अनुभवांमुळें व कांहीं अंशीं ज्या लोकांची तिला संगति लाभली होती त्यांच्या सहवासामुळें, कशा कशा बदलत

गेल्या हें आपण इतका वेळ निरनिराळ्या प्रसंगांच्या व देखाव्यांच्या आधारें पाहिलें. माणसांसारखेच पण त्यांच्याहून उच्चतर कोटींतले आणि आकाशांत राहणारे असे लहानपणचे देव जाऊन त्यांच्या जागीं पति हाच देव तिला आतां वाटूं लागला होता, हें आपण मागील दोन प्रकरणांवरून पाहिलें; पण हा देव देखील तिला फार दिवस लाभावयाचा नव्हता. पुढें तिचा पति मृत्युवश झाला या अर्थानें हें म्हटलें नाहीं–ती मोठीच आपत्ति होती; पण त्याहून अधिक गंभीर अशा अर्थानें तिच्यावर अशी आपत्ति कोसळली, कीं पतीला आपण देव म्हणून समजत होतों तो मोठा भ्रम होता–पति हा देव तर नव्हेच चांगला मनुष्य तरी आहे, का नाहीं याविषयींदेखील शंका आहे. अशा–प्रकारचे विचार तिच्या मनांत येऊं लागले. मातीचा गणपति कांहीं दिवसपर्यंत देव मानून नंतर मग तो केवळ मातीचाच आहे, त्याच्यांत देवत्व कांहीं नाहीं. हें प्रत्ययाला आल्यास जिवाला धक्का बसतो; पण मातीच्या गणपतींत देवत्व नसलें तरी इतरत्र आहे. या भावनेला जर तेथें त्या सुमारास अंकुर फुटला तर त्या धक्क्याचा विशेष वाईट परिणाम होत नाहीं. उलट झाडांचीं मुळें जशीं वादळी पावसानें अधिक दृढ होतात व त्या झाडाला अधिक तजेला आणतात, तशांपैकीं थोडीशी स्थिति होते. गगनांतले सगळे देव गगनकुसुमाप्रमाणें खोटे आहेत, ते मानणें हा एक कविसंकेत किंवा सुजन–संकेत आहे, असें कळून आल्यानंतर “ कांहीं सुजन देवांसारखे आहेत, निदान त्याचें सौजन्य हें दैवी आहे, ” ही कल्पना मनुष्याच्या जीवाला अध्यात्मिक जीवन देऊं शकते आणि या कल्पनेच्या जोडीला जर सुशील पत्नीला अनुरूप पतीसंबंधानें जो शारीरिक आणि बौद्धिक मोह असतो तो तेथें असेल तर मातीचे देव जाऊन ( थोड्याशा अतिशयोक्तीनें बोलावयाचें म्हणजे ) साक्षात् देवाचा अवतार आपल्या भाग्याला आला असें वाटून अध्यात्मिक जीवनाचा प्रवाह शुद्ध व आनंददायक स्वरूपांत वाहूं शकतो. पण आपण ज्याला अगदीं अवतारच नाहीं, तरी तत्सम अशा कांहीं तरी उच्च कोटींतलें मानलें, तो आपल्यासारखा आहे; इतकेंच नव्हे, तर ( शक्तीनें व बुद्धीनें कितीहि जरी श्रेष्ठ असला तरी ) तो आपल्यापेक्षां नैतिकदृष्ट्या कमी योग्यतेचा आहे असें जर एखाद्याच्या प्रत्ययाला आलें तर त्या जीवाला आपली मोठीच फसगत झाली असें वाटेल आणि स्वतःविषयीं व सर्व जगाविषयीं त्याला अति तिटकारा वाटूं लागेल.

आणि त्यांत पुन्हा अशी जर स्थिति आली, कीं ज्या सात्त्विक गुणांचा आपण एखाद्यावर मायेनें आरोप केला तो त्या गुणांनीं युक्त नाहीं एवढेंच कळून आलें;

इतकेंच नाहीं, तर ज्या गुणांना आपण ‘उच्च’ व ‘सात्त्विक’ म्हटलें, ते तसे आहेत का नाहींत याबद्दलच शंका आली–म्हणजे ‘सौजन्याला’ ‘सौजन्य’ तरी कां म्हणावें अशीच शंका मनांत येऊं लागली आणि “मनुष्याचे सद्गुण म्हणजे स्वार्थाचीं केवळ रूपांतरें होत, जगाच्या रंगभूमीवर स्वार्थानें घेतलेलीं सोंगें होत,” असे अंधुक अंधुक कां होईना मनांत संशय येऊं लागले म्हणजे मनुष्याच्या जीवाचा आधारच तुटल्यासारखा होऊं लागतो. आपल्या सुशीलेच्या नाशिबीं या दुःखद स्थितीचा थोडासा अनुभव घ्यावयाचा होता व तो ज्या वयांत खरोखर येऊं नये त्या वयांत घ्यावयाचा होता; पण याचा आतां अधिक विचार न करतां कोणत्या प्रसंगांमुळें व अनुभवांमुळें या मनोवस्थेला ती येऊन पोंचली हें आपण पाहूं या.

सुशीलेच्या बहुतेक जीवनांत जे हरतऱ्हेचे फरक झाले ते बहुतेक हरतऱ्हेच्या सूक्ष्म प्रसंगानुसार घडून आले आहेत. स्थूल दृष्टीनें पाहाणाऱ्याला तिच्या मनाचीं स्थित्यंतरें कां व कशीं घडून आलीं हें कळणें दुरापास्त होतें. फार काय, स्थित्यंतरें घडून आलीं आहेत हें देखील त्याला कळून येणें कठिण होतें. प्रस्तुत लेखकाची देखील हीच स्थिति झाली. कारण मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या मनःस्थितीमध्यें पुढें सुमारें एक वर्ष कांहींच फरक घडून आलेला नाहीं व पतीच्या सहवासांत ती त्या अवधींत स्वर्गतुल्य आनंदोपभोग घेत आहे, अशी बाह्य निरीक्षणावरून या लेखकाची–इतकी ओळख असतांना देखील–कल्पना झाली होती ! त्याला जे दोनचार देखावे प्रत्यक्ष पाहाण्यास मिळाले, त्यांवरून कोणाचीहि अशीच कल्पना झाली असती. परंतु त्या देखाव्यांचें प्रस्तुत लेखकानें लिहिलेलें वर्णन जेव्हां सुशीलेनें या लेखकाच्या घरींच वाचलें, तेव्हां, “Thou too Brutus !” असें ती उद्गारली व मग तिनें ‘बाह्यतः मी जरी किती आनंदी दिसत होत्यें, तरी अंतरात्म्यांत सूक्ष्मपणें कांहीं ठिणग्या पडल्यामुळें तेथें धूर होण्यास आरंभ झाला होता व धुमसतां धुमसतां कालांतरानें तेथें मोठा भडका उडाला’ असें सांगितलें आणि ‘मी आपल्या आत्मचरित्रांत ही सगळी हकीगत दिली आहे’ असें सांगून तें दुसऱ्या दिवशीं पाठवूनहि दिलें. ती हकीगत वाचल्यावर प्रस्तुत लेखकानें लिहिलेलीं चार प्रकरणें अयथार्थ म्हणून रद्द करावीं लागलीं व त्यांच्या-ऐवजीं तिच्या आत्मचरित्रांतलीं कांहीं प्रकरणें तिच्या संमतीनें घेण्याचें ठरविलें. ती लिहिते—

"आमच्या इथें बी. ए. होऊन एल्‌एल्‌. बी. चा अभ्यास सुरू झाल्यावर सुनंदराव एक दिवस त्यांच्याकडे आले आणि गांवांत एक मोफत वाचनालय काढण्याचा आपला विचार आहे असें सांगून वर्गणीचा मोठा आंकडा घालण्यास त्यांनीं सांगितलें. आणि 'बाळूनें एक महिन्याची फेलोशिप् म्हणजे ५० रुपये दिले आहेत, तुम्हीं १०० रुपये दिले पाहिजेत' असें म्हटलें. 'तुम्हीं हिच्याजवळ तिच्या पाटल्या मागा पाहिजे तर. ती देईल. कारण तिचें मन कोमल आहे. मी बोलून चालून कठोर मनाचा. मला तुमची ही नसती उठाठेव पसंतच नाहीं.'

"कां पसंत नाहीं ?" सुनंदरावांनीं विचारलें.

'कां काय ! स्पेन्सरचा मी वडिलांसारखाच शिष्य आहें. प्रत्येकानं आपआपलं काम करावं याच्यांतच सगळ्यांचं हित आहे, असं माझं मत आहे. प्रत्येकानं आपआपलं धोतर धुतलं, म्हणजे सगळ्यांचीं धोतरं धुतलीं जातातच. मग हा सरळ मार्ग सोडून प्रत्येकानं दुसऱ्याचं धोतर धुवायचं हा द्राविडी प्राणायाम कशाला करावयाचा ? किती ही हास्यास्पद गोष्ट ! म्हणे, प्रत्येकानं स्वार्थ सोडून परार्थ साधावा, म्हणजे आपलं धोतर किंवा आपल्या कुटुंबांतल्या माणसांचीं धोतरं धुवायचीं नाहींत, तर प्रत्येकानें परार्थ साधण्याकरितां दुसऱ्याच्या घरचीं धोतरं धुवायचीं !"

"भलतंच कांहीं तरी उदाहरण नेऊन कसं चालेल ?" मी सुनंदरावांच्या बाजूनें म्हटलें.

"तुझ्यासारख्यांजवळ चालायचं नाहीं हें मी कबूलच करतों. तुझ्यापुढं माझं काय चालताय् तर हें उदाहरण चालेल ?"

"सगळ्याच गोष्टी अशा थट्टेवर न्यायच्या" असें मीं म्हटलें. त्यांचा युक्तिवाद मला पटला नाहीं, पण थट्टा अगदीं अप्रिय झाली असें मात्र नाहीं. किंबहुना खरें सांगायचें, म्हणजे मला ती आवडलीच !

"थट्टेचा भाग सोडून दे पाहिजे तर" ते पुढें म्हणाले, "पण ही गोष्ट खरी कीं मला स्पेन्सरचीं विकासवादाचीं तत्त्वं पटतात. जगांत जीवनकलह चाललेला आहे; जे जगण्यास लायक असतील ते जगतील आणि त्यांनींच जगावं. इतर मरतील, आणि ते मेले म्हणून वाईट वाटण्याचं कारण काय ?"

"म्हणजे, आपलं राष्ट्रदेखील जीवनकलहांत मेलं तरी चालेल ?" राष्ट्रीय पक्षाचे अभिमानी सुनंदराव म्हणाले.

" हा चालण्याचा प्रश्न नाहीं. जीवनकलहांत जें होईल तें होईल. आणि तें व्हायचंच आणि व्हावंहि. नालायक माणसं काय आणि राष्ट्रं काय, जीवनकलहांत नष्ट झालीं तर वाईट काय झालं ?

" म्हणजे तुम्ही गरीबगुरिबांना, दीनदुबळ्यांना हातभार लावण्याच्या विरुद्ध आहांत म्हणावयाचें ! "

" आहें खरा बुवा. आणि खरी गोष्ट सांगूं का तुम्हांला–तुम्हांला राग येईल आणि हिला वाईट वाटेल, पण मी सांगतों–जगांत खरा परोपकार नाहींच. प्रत्येक जण स्वार्थी आहे. आतां टिळक–गोखले वगैरेंनीं स्वार्थत्याग केला नाहीं का म्हणून मला तुम्ही विचाराल; पण खरें उत्तर द्यायचें, म्हणजे त्यांनींदेखील स्वार्थत्याग कांहीं केला नाहीं. स्वार्थत्यागांतच त्यांना सुख वाटत होतं. आपण देशाभिमानी आहोंत, आपण मोठे उच्च कोटींतले, आपण स्वार्थत्याग करतों, या भावनेचं त्यांना सुख होत होतं. कालच एका पुस्तकांत मीं एक वाक्य वाचलं Self-sacrifice is a luxury, a sort of self-indulgence.' हें पाहा, आहेच तें पुस्तक इथं "–असें म्हणून त्यांनी एक तांबड्या कव्हराचें पुस्तक काढलें व वरील वाक्य काढून (तिथें खूणच घातली होती !) सुनंदरावांना दाखविलें.

वाक्य वाचून झाल्यावर सुनंदराव नुसते हंसले व म्हणाले, " हे वाद जुनेच आहेत. ' Gratitude is anticipation of favours to come ' हें बटलरचं वाक्य, किंवा '**न वाऽरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति**' इत्यादि उपनिषदांतलीं वचनं सगळीं जुनींच आहेत ."

" जुनीं आहेत. आणि खरींहि आहेत " ते म्हणाले. " जगांत परार्थ मनापासून पाहाणारे थोडे–फार थोडे–आहेत. आणि जे थोडे आहेत त्यांचा तो भ्रम आहे. ते अध्यात्मिक सुरा प्यालेले असतात आणि या सुरेच्या नशेंत ते टिळक–गोखल्यांप्रमाणें वागतात ! "

सुनंदराव यावर कांहीं बोलले नाहींत. त्यांनीं केवळ एक उसासा टाकला आणि अशा मनुष्याशीं सुशीलेची जन्माची गांठ पडली आहे याबद्दल त्यांना फार वाईट वाटत आहे असें ज्यांत सूक्ष्म दृष्टीनें पाहाणाऱ्यांस दिसलें असतें अशा नजरेने माझ्याकडे किंचित् पाहून ते म्हणाले, " असो. आपलीं मतं कांहीं वाद

करून बदलायच्चीं नाहींत; मग उगाच कशाला नसता वाद घाला? बाकी आज मी मोठाच मूर्खपणा करणार होतों; पण नशिबानंच वांचलों म्हणायचा. 'वकिलींत खोटं बोलावं लागतं, म्हणून वकिलीचा अभ्यास करायचा सोडून द्या' असं तुम्हांला मी सांगणार होतों; पण सुदैवानं तो विषय काढला नाहीं म्हणून बरं झालं."

हें ऐकून नुसते हंसून ते उठले आणि फडताळ उघडून कायसंसं हातांत घेऊन ते सुनंदरावांजवळ गेले आणि जुने दोस्त या नात्यानें पाठीवर थाप मारून म्हणाले, "माझा खरा विश्वास म्हणून नव्हे, तर पूर्वीच्या दोस्तीकरितां आणि (माझ्याकडे वळून) हिच्याकरितां मी दहा रुपये देतों; पण अट एक आहे कीं चहाला राह्यलं पाहिजे." असें म्हणून त्यांनीं अभिप्राययुक्त अशा दृष्टीनें माझ्याकडे पाहिलें. मी अर्थात् अभिप्राय ओळखलाच आणि चहा आणण्याकरितां–(करायला आधींच सांगितला होता मीं!)–खालीं जाऊं लागल्यें; इतक्यांत चहा आलाच! (आमच्या इथं गड्याच्या हातचा चहा चालत होताच व सुनंदरावांनाहि हरकत नसे.) चहापान झाल्यावर आम्ही आपापल्या कामाला गेलों. पण त्या दिवशीं–किंवा रात्रीं म्हणा पाहिजे तर–'Self sacrifice is a luxury, a sort of self-indulgence' (त्याग हा एक भोगाचाच प्रकार आहे–स्वतःचें कौतुक करून घेण्याचा तो एक पर्याय आहे") या वाक्यानें डोळ्याला डोळा लागूं दिला नाहीं! जागें झाल्यावर पुष्कळदां कारण विचारणें झालें, पण मनांतल्या यातना त्यांच्याजवळ सांगून काय उपयोग? उगाच चेष्टा मात्र व्हायची! म्हणून मीं कांहीं तरी उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं आणि वेळ निभावून नेली."

---

## १८ : सुखवादाचे परिणाम

"**मा**गील प्रकरणांत वर्णन केलेलें संभाषण लोकांना कोणाला ठाऊक नव्हतें– माझें चरित्र लिहूं पाहाणाऱ्या लेखकालाहि त्या वेळीं ठाऊक नव्हतें. पुढें त्याला किंवा त्यांना म्हणूं या–मी एका विशिष्ट प्रसंगीं सांगितलें; पण त्यांच्याहि स्मरणांतून ती गोष्ट गेलेली दिसते. पण मला तें विसरणें शक्य नव्हतें; कारण माझा स्वभाव बाह्य गोष्टींपेक्षां अशा अंतर गोष्टींवरच अधिक

अवलंबून होता. चांगली म्हणा, वाईट म्हणा (वाईटच म्हटली पाहिजे) पण लहानपणापासून माझी वृत्ति अंतर्मुख होती हें कांहीं खोटें नाहीं. मला आपलें एकसारखें असें वाटायचें, कीं 'परोपकार' वगैरे सर्व जर 'ते' म्हणतात त्याप्रमाणें स्वार्थाचाच एक पर्याय असेल तर आतां चांगलें असें जगांत राह्यलें काय? सासरीं आल्यापासून माझा देव गेला, धर्म गेला आणि आतां 'सद्वर्तन' हा शब्ददेखील निरर्थक होऊं पाहातो आहे; तेव्हां माझा अधःपात आतां कोठपर्यंत जाणार आहे? माझी ही वृत्ति आईला कळली, तर ती काय म्हणेल? तिला काय वाटेल? आणि तात्या एवढे उदारमतवादी पण ते तरी काय म्हणतील?"

प्रश्नाला तीव्रता येण्याचें आणखीं एक कारण असें, कीं–सांगूं नये पण सांगितलें पाहिजे–दिवसेंदिवस तिकडची वृत्ति चमत्कारिक झाली, आणि भलते भलते नाद लागले. माझ्यावरचें प्रेम कमी झालें असें नाहीं, उलट तें अधिकच होत गेलें; पण पुरुषांचें मनच तसें असतें म्हणा, नाहीं तर दुसरें कांहीं म्हणा, बाहेरचा नाद लागला. कांहीं दिवस मला ही गोष्ट समजली नाहीं; पण समजल्या शिवाय ती किती दिवस राहणार? मीं पुष्कळ सांगून पाहिलें, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. आणि कळस केव्हां झाला, तर जेव्हां मी एक दिवस खूप रागावल्यें तेव्हां असें म्हणणें झालें, कीं 'तुझं काय जातं मीं कांहीं केलं तरी? तुझं सुख कांहीं कमी झालं काय? तुझ्यावरचं माझं प्रेम कमी झालंय् का? मग माझ्या स्वतःच्या सुखाच्या आड तूं कां येतेस?'

"सुखाच्या पलीकडे मनुष्याला दुसरं कांहीं नाहीं?' मीं रागारागानें म्हटलें, पण माझा राग तर आला नाहींच; उलट किंचित् हंसून आणि कौतुकपूर्ण नजरेनें माझ्याकडे पाहून म्हणणें झालें, कीं 'तुझा हा राग फारच मनोहर आहे; पण वाईट एवढंच वाटतं कीं तो भ्रममूलक आहे. खरंच सांग, सुखा-शिवाय दुसरं कांहीं आहे का जगांत?' मी कांहींच बोलल्यें नाहीं, तेव्हां म्हणा-यचें, कीं, 'सुशीले, तुझी श्रद्धा मला प्राप्त होईल का? लहानपणापासून अश्रद्धे वर, जीवनकलहाच्या तत्त्वावर आणि भौतिकशास्त्रांवर मी वाढलों आहें. माझ्या हृदयांतला कोमलतेचा आणि सात्त्विकतेचा झरा आटला आहे. 'सात्त्विकते' चा मला अर्थच कळत नाहीं; आणि 'कोमलता' म्हणजे तर मला मूर्खपणाचाच प्रकार वाटतो. सुखाशिवाय मला साध्य नाहीं. भौतिकशास्त्रांच्या नियमांशिवाय मला नियमन नाहीं. वस्तूंच्या गुणधर्मांव्यतिरिक्त मी धर्म जाणत नाहीं.

जीवनकलहांत टिकेल तो खरा, टिकणार नाहीं तो फुकट, हा माझा आद्य नीति-सिद्धान्त. परिस्थितीला अनुरूप वागणं हें माझं व्यावहारिक धोरण; आणि 'अनुरूप' याचा अर्थ अधिकांत अधिक सुख देणारं, अनुरूप याचा दुसरा तिसरा अर्थ मी जाणत नाहीं; पण तुझ्या रूपाकडे पाहून आणि तुझ्या शीलाकडे पाहून मी कुठें तरी चुकतों आहे असं वाटतं. चूक कुठं आहे हें अजून समजत नाहीं. तर ती चूक सांग म्हणजे मी तुझे उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. मला धर्म, नीति, सद्‌गुण नको आहेत का? पण माझा त्यांच्यावर आतां विश्वासच बसत नाहीं, त्याला मी काय करूं? तुझा विश्वास आहे. फार चांगलं आहे. मला तुझा हेवा वाटतो आणि असं मनांत येतं, कीं तुझे पाय धरावेत आणि तुला गुरु करावं. तुझ्या पायाचं तीर्थ घ्यावं इतकी तूं पवित्र आहेस; पण तुझं हें पावित्र्य भ्रममूलक आहे असं वाटतं त्याला मी काय करणार? माझं मन तूं फिरव, मी तुझे खरोखर पाय धरीन आणि तीर्थ घेईन, पण आहे या मनःस्थितींत मी वागतों तसं वागूं नको तर काय करूं?'

हें लहानसें व्याख्यान मीं ऐकून घेतलें, पण उत्तर कांहीं दिलें नाहीं. काय उत्तर देऊं? वयानें, ज्ञानानें, अनुभवानें, अधिकारानें ते श्रेष्ठ, त्यांना मी काय सांगणार? त्यांचे युक्तिवाद त्या वयांत मला समजत होते हेंच माझें भाग्य; ते खोडून काढणें कोठलें साधायला? अर्थात् 'मौनं सर्वार्थसाधनम्' या तत्त्वाचाच मीं स्वाभाविकपणें अवलंब केला आणि दोन उसासे टाकून कपाळावर हात दिला आणि स्वस्थ बसलें. अश्रुबिंदू माझ्या मदतीला धावले आणि त्यांचा त्यांच्या मनावर परिणाम तात्काल झाला. इतका, कीं खरोखरच ते माझे पाय धरूं लागले—पण तात्काल झालेला हा परिणाम तात्कालिकच होता, हें पुढच्या वर्तनावरून मला थोडक्या अवधींतच दिसून आलें!

चमत्कार असा कीं मला त्या रात्रीं किंवा पुढें खरें जें वाईट वाटलें तें मात्र याच, कीं त्यांचा युक्तिवाद माझ्या बुद्धीला खरा आणि बिनतोड वाटला! त्यांचें जडवादाचें बोलणें ऐकतांना ते युक्तिवाद कसेसेच वाटतात; पण ते खरे नाहींत का? स्पेन्सरला, मामंजींना आणि त्यांना काय समजत नाहीं म्हणावयाचें? आणि त्यांचेंच म्हणणें खरें धरलें, तर आपल्या जुन्यापुराण्या कल्पना आपण सोडून द्यायला नकोत का? बाहेरचा नाद वाईट दिसतो खरा; पण 'तुझ्या सुखाच्या आड न येतां मीं जर सुखोपभोग घेतला तर त्यांत तुझं काय जातं?" या त्यांच्या प्रश्नाला मी तरी काय उत्तर देऊं? त्या वेळीं तरी मला देतां येत

नव्हतें. इतकेंच नाहीं, तर त्यांचेंच म्हणणें मला खरें वाटूं लागलें होतें! आणि माझा राग जो त्यांना दिसला, तो त्यांच्यावर होता असें म्हणण्यापेक्षां तो माझ्यावरच होता असें आतां मला तरी वाटतें. कारण माझें अगदीं अंतर्यामीचें मन त्यांच्या युक्तिवादाच्या अगदीं विरुद्ध असलें, तरी तें मुखदुर्बल होतें आणि म्हणून तर माझा मलाच तिट्कारा वाटत होता; पण हा तिट्कारा त्यांना मात्र दिसला रागाच्या आणि शोकाच्या रूपांत! माझ्या हृदयाच्या गाभ्यांतल्या अगदीं मधल्या गाभ्यांत मला त्यांचें म्हणणें किती जरी खोटें वाटलें तरी बुद्धीला त्यांचेंच म्हणणें पटल्यासारखें वाटायचें. अशा स्थितींत खरा राग होता तो माझा माझ्यावरच; पण त्यानें खोटें सोंग घेऊन आपलें स्वरूप त्यांच्यापासूनच नव्हे, तर बरेंचसें माझ्या पासूनहि लपवून टाकलें.

त्यांतल्या त्यांत पुन्हां मौज अशी–हो, मौजच, कारण आतां ते दिवस गेले, मौजेकरितांच हें पृथक्करण चाललें आहे–मौज अशी, कीं त्यांच्याबद्दल माझ्या मनांत प्रेम, आदर, पूज्यभाव देखील होता. ते पूर्ववयांत चमत्कारिक वागावयाचे. माझ्या आईनें आणि सासूबाईंनी योग्य संधि साधून मला तरुण पुरुषांच्या मनाची सूचना देऊन ठेवलीच होती आणि प्रसंगानुसार कसें वागावें हेंहि सांगून ठेवलें होतें, त्यामुळें त्या त्या वेळीं त्यांचें सांगणें पटून त्यांच्या सूचनांचा मीं उपयोग करून घेतला होता. पुरुष हे असेच, या वयांत तरी असेच, असेंच मीं मनांत ठरवून ठेवलें होतें! पण भलता नाद जेव्हां लागला तेव्हां मात्र माझ्या हृदयाला धक्का बसला खरा, आणि याचें उघड उघड समर्थन ज्या दिवशीं झालें त्या दिवशीं तर मी मानसिकदृष्टया जड, मूक व बधिर झाल्यें! माझ्या मनांत परस्परविरुद्ध अशा विचारलहरी एकापाठीमागून एक जलद उत्पन्न होऊं लागल्या. "कोण खरें? ते का मी? आणि मी असल्यें तरी त्यांची जर अशा प्रकारची वृत्ति, मग बोलायचें काय, आणि बोलून उपयोग तरी काय? आणि खरेंच बोलायचें म्हणजे त्यांचें म्हणणें कुठें बरें चूक आहे?—हो, चूक नाहीं तर काय? असें भलतें वागलें तर कधीं कोणी चांगलें म्हणेल का? पण लोकं चांगलें नाहीं' म्हणाली म्हणून तें तसं होतं का काय? लोकं जुन्यापुराण्यालाच चिकटून राह्यचीं; पण कांहीं म्हटलं तरी हा असला नाद कांहीं चांगला नाहीं. शरीराची हानि, मनाची हानि, नीतीची हानि, सगळीच हानि; पण हें आपल्याला वाटतं; त्यांना कुठें वाटतें? त्यांना समजत नाहीं का चांगलं–वाईट? त्यांच्यापेक्षां आपल्याला अधिक का समजताय्? हो, अधिक समजताय् तर काय

झालं. मनोविकारांनीं पुरुषांचं मन बिघडतं, त्यांना सारासार विचार राहात नाहीं. जणुं कांहीं बायकांना स्वार्थच नाहीं ? मी स्वार्थामुळं तर असं म्हणत नाहीं ना ?– नाहीं, स्वार्थामुळं मुळींच नाहीं. त्यांच्याकरितां मी पाहिजे तो स्वार्थत्याग करीन ! पण 'स्वार्थत्याग' म्हणजे काय ? आणि तो खरा जगांत आहे का ?"–विचारांच्या या अशा उलटसुलट हेलकाव्यांमुळें माझें मन कांहीं दिवस इतकें भांबावून गेलें होतें, इतकें तें सुस्त झालें होतें, कीं त्याला चेतना आणणें कोणत्याहि मानवी किंवा दैवी शक्तीला शक्य नव्हतें !

'शक्य नव्हतें' हें म्हणणें अर्थात् कांहीं कालावधीपुरतेंच खरें ठरलें. कारण माझ्या दुर्दैवानें (किंवा आतां मी सुदैवानेंच म्हणतें) माझ्यावर वरच्यापेक्षांहि अधिक वाईट प्रसंग आले आणि त्यांनीं माझ्या मनाची अजगरी सुस्ती झाडून टाकून मला खडबडून जागें केलें. इतकेंच नव्हे, तर (भगवद्गीतेच्या भाषेंत बोलायचें म्हणजे) त्यामुळें माझें अखेर क्षुद्र हृदयदौर्बल्य जाऊन अध्यात्मिक दृष्ट्या मी पुन्हा जिवंत झाल्यें; इतकेंच नव्हे, तर बलवान् 'श्रेष्ठ' धारिष्टवान् झाल्यें."

---

## १९ : आईबापांना 'स्वाभाविक शिक्षा'

"त्यांचा बाहेरचा नाद आणि तो ज्याचा परिणाम होता असा त्यांचा तो जडवाद–किंवा निसर्गवाद–यांनीं माझ्या मनाला जें जाड्य आणलें तें लोकांच्या ध्यानांत येणें फारसें शक्य नव्हतें. मी पूर्वीप्रमाणें घरचें काम थोडेंबहुत संभाळून हायस्कुलांत जातच होत्यें आणि सगळ्या गोष्टी जशा करायच्या तशाच करीत होत्यें. आईला, सासूबाईंना आणि वडिलांना मात्र मी कांहीं पूर्वींची राहिलें नाहीं. माझ्या मनांत कांहीं तरी गांठ आहे, कांहींतरी सलतें आहे, असा त्यांना संशय आला. निरनिराळ्या प्रसंगीं त्यांनीं मला तसें बोलूनहि दाखविलें आणि कारण विचारलें; पण 'कांहीं नाहीं, कांहीं नाहीं' असें म्हणून मी खरें उत्तर देण्याचें टाळलें. काय उत्तर देणार ? आपल्याच माणसाच्या असल्या गोष्टी आईजवळ देखील बोलणें कठिण आणि त्यांत पुन्हां मला वाटायचें कीं, ते कसेहि वागले तरी आपण आपलें सगळ्यावर पांघरूण घातलें पाहिजे. पण दिवसें-दिवस हें पांघरूण घालणें अशक्य होऊं लागलें आणि माझें मनहि त्यांच्याबद्दल विटूं लागलें.

कारणें सांगायला गेलें तर अगदीं क्षुल्लक; पण मनावर मोठा परिणाम करणारीं. माझे श्वशुर अलीकडे फार आजारी पडले होते आणि त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामाहि दिला होता. पैशांचा वगैरे विशेष प्रश्न नव्हता म्हणून तें सगळें बरोबरच होतें; पण म्हातारपणीं आजारांत त्यांनां दुबळेपणा आणि दुसरें बाल्य आलें, तेव्हां त्यांच्या चिरंजिवांनीं त्यांना लहान मुलाप्रमाणेंच वागविण्यास जेव्हां आरंभ केला आणि स्पेन्सरच्या 'स्वाभाविक शिक्षा' वडिलांना देण्याचा उपक्रम केला, तेव्हां मात्र मला काय वाटलें हें सांगणेंच कठिण आणि जेव्हां एक दिवस प्रत्यक्ष आपल्या आईवरहि 'स्वाभाविक शिक्षे'चा प्रयोग झाला तेव्हां माझें मन इतकें विटलें, कीं त्या प्रकाराचीं मनाला खरोखरच ओकारी यायला लागली. ( आणि कर्मधर्मसंयोग असा, कीं त्या सुमाराला खरोखरीच ओकाऱ्या यायला लागल्या. ओकाऱ्या पाहून लोकांना वाटलें, कांहीं दिवस गेलेत म्हणून. सासूबाईंना आणि आईला त्यामुळें आनंद झाला पण लवकरच त्यांच्या भ्रमाचा भोंपळा फुटला ! )

माझ्या मनाची स्थिति वर्णन केली मीं, पण काय प्रकार झाले ते सांगितलेच नाहींत ! म्हटलें तर सांगण्यासारखे पुष्कळ आहेत, पण एका अर्थी सांगण्यासारखें त्यांत कांहींच नाहीं. माझ्या श्वशुरांचा वटवट लावण्याचा स्वभाव आणि स्पेन्सर-संबंधींचा नादिष्टपणा कांहीं नवीन नव्हता; पण त्यांत म्हातारपणाच्या भ्रमिष्ट-पणाची भर पडल्यामुळें वेळींअवेळीं जो येईल त्याच्याशीं स्पेन्सरविषयीं वटवट करीत बसायचे, तेव्हां पुष्कळ वेळां चिरंजीव त्यांना दटावावयाचे आणि गप्प बसवायचे. हें कांहींच नाहीं. कोणाला तरी सांगून टॉनिक आणि इतर औषधें आणण्याकरितां वडिलांजवळ दिलेली दहा रुपयांची नोट त्यांनीं एकदां हरवली, तेव्हां रागारागानें त्या दिवशींचें त्यांचें औषध न आणण्याची त्यांना 'स्वाभाविक शिक्षा' देण्यांत आली ! हेंहि कांहीं नाहीं; पण प्रत्यक्ष जन्मदात्या आणि लालनपोषण करणाऱ्या आईला उपासाच्या सामानाकरितां दिलेली पावलीहि तिनें हरवली, म्हणून ' उपासाचें सामान आज तुला मिळायचं नाहीं, तुला हीच शिक्षा पाहिजे ' असें जेव्हां सांगण्यांत आलें आणि तें मीं जेव्हां ऐकलें—न ऐकून करावयाचें काय, कान तर फोडून घ्यायचे नाहींत !—तेव्हां माझ्या डोळ्यांत अश्रू आले आणि तोंडांत मारल्याप्रमाणें मी अगदीं ओशाळून गेल्यें. सासूबाई फारसें कांहींच बोलल्या नाहींत, फक्त एवढेंच म्हणाल्या, " खरें आहे बाबा,

मीच चुकल्यें, तुझं सगळं बरोबर आहे!" त्या असें म्हणाल्या आणि जपमाळ घेऊन देवघरांत जाऊन रडत बसल्या. मी हळूच कांहींतरी निमित्त काढून सासूबाईकडे गेल्यें आणि पाय घट्ट धरून 'स्वभाव फार चमत्कारिक झाला आहे, क्षमा करा, मी काय करूं असं करतात त्यांलां!' असें म्हटलें. माझ्या उष्ण अश्रूंनीं त्यांचे पाय भिजले आणि त्यांच्या डोळ्यांतले दोन–तीन थेंब माझ्या मानेवर पडले. 'ऊठ, बाई, क्षमा कसली करायची! त्याला मी का शाप देणार आहें? माझा त्याला केव्हांहि आशीर्वादच आहे. माझ्या नशिबीं जें आहे तें मला भोगलंच पाहिजे; त्याला तो काय करणार आणि तूं तरी काय कराणार! माझं भोक्तृत्वच असें म्हणून त्याला अशी बुद्धि होते. तूं नको वाईट वाटून घेऊं. माझं काय, थोडे दिवस राहिले आहेत, ते कसेहि जातील. तुझं मात्र कठिण आहे. त्याचं अलिकडे कांहीं लक्षण ठीक दिसत नाहीं. रात्रीं–अपरात्रीं येतो जातो काय, सगळं तुला ठाऊक आहे. तूं समजुतदार म्हणून बोलत नाहींस; पण मला कांहीं दिसत नाहीं का? सगळं दिसतंय्, पण करायचं काय? आणि आतां तर त्या सटवीला घरांतच आणणार आहे म्हणे! 'पुढचे दिवस कठिण आलेत एवढी गोष्ट खरी.' मी यावर कांहींच बोललें नाहीं; कांहीं वेळानें देवघरांतून बाहेर पडल्यें आणि आपण जाऊन कांहीं सांगावें म्हणून माडीवर गेल्यें. पाहिलें तों डोकीवर टोपी घालून बाहेर जायला निघायचें होतें. 'आईला फराळाचं आणून देतों, बिचारीला वाईट वाटलं असेल. I have a soft corner for her do yon see!' हें ऐकल्यावर मला इतकें बरें वाटलें, कीं 'त्या सटवीला घरांतच आणणार आहे म्हणे' या बातमीनें जी मनांत अस्वस्थता उत्पन्न झाली होती ती क्षणभर थांबली आणि मला क्षणभर वाटलें, कीं 'वाटतं तेवढे कांहीं वाईट नाहींत, बरं का! हृदय कोमलच आहे, पण पुरुष म्हणून मनांत येईल तें लगेच बोलून टाकतात, झालं!' हा विचार क्षणभरच आला आणि मी त्यांच्याकडे आदरयुक्त प्रेमानें आणि कौतुकानें स्मितपूर्वक पाहूं लागल्यें. "जा–जा, इथून जा. अशा मोहक रीतीनें माझ्याकडे पाहूं नकोस, नाहीं तर मी भलतंच कांहीं तरी करीन. तूं आणि माझी आई दोघीजणी मोठ्या वाईट आहांत. You disturb my philosophy of life and action. समजाताहें का, मी काय म्हणतों आहे तें? तुला काय समजणार आहे माझ्या मनांतला कलह? बाकी समजत नाहीं हेंच चांगलं आहे. Ignorance is bliss." असें म्हणून आणि माझ्या गालाला लीलेनें बोट लावून ते बाजारांत

निघून गेले. मी तेथेंच फोटोंकडे वगैरे शून्य दृष्टीनें पाहात किती वेळ तरी उभी राहिल्यें. खालीं येत्यें तों स्वारी दाणे, खजूर, केळीं वगैरे खूप पदार्थ घेऊन आली होती.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र....... ता. ..............
वि. ........ क्र. ..... ..........



“ पुराणान्तरीं एक गोष्ट आहे, कीं एका साध्वीनें आपल्या पतीला वेश्येच्या घरीं पोंचविलें—इतकी ती पतिनिष्ठ आणि स्वार्थ–निरपेक्ष होती ! असेल गोष्ट खरी कदाचित्; पण हल्लींच्या युगांत तरी असली गोष्ट शक्य नाहीं–निदान मला शक्य नव्हती. निदान त्या वयांत, त्या मनोरचनेंत त्या पतिविषयीं आणि त्या बाईविषयीं शक्य नव्हती. आमच्या घरांत त्यांची ती लाडकाबाई राहाण्याला जेव्हां आली, तेव्हांपासूनच माझें डोकें फिरूं लागलें. पण करायचें काय? तशीच राहिल्यें. त्यांत पुन्हा कांहीं दिवस गेलेले. माहेरीं जावेंसें वाटलें; पण माहेरीं जाऊन आईबापांना क्षणोक्षणीं दुःखाची आठवण करून देण्यापेक्षां भोक्तृत्व असेल तें सासरींच भोगावें असें मी ठरविलें आणि तशीच लोंचटासारखी तेथें चिकटून राहिल्यें. ते आपल्याकडून मला म्हणत, कीं ‘ तुझ्यावरती माझें प्रेम होतें तसेंच आहे ’ आणि खरें म्हटलें म्हणजे होतेंहि तसें,–अर्थात् थोडेंसें कमी; पण प्रेम होतें यांत शंका नाहीं. माझ्याविषयीं म्हणाल, तर मी सीता–सावित्री नव्हतें आणि नाहींहि. सीता–सावित्री आतां मला ध्येयभूत राहिल्याहि नाहींत. पण पातिव्रत्य अत्यंत पूज्य होतें आणि ते किती जरी चुकत चालले तरी आपण आपला धर्म सोडूं नये असें मला वाटत असे. सीता–सावित्रीपेक्षां आई आणि सासूबाई यांचेंच उदाहरण मला डोळ्यांपुढें दिसायचें आणि या जशा वागल्या असत्या तसें आपण वागावें असें मला वाटत असे. पण आई–सासूबाई निराळया युगांतल्या, मी निराळया युगांतली; आणि माझ्यावरचा प्रसंगहि अगदींच निराळया प्रकारचा. ती बया ( नांव रूपाबाई, जातीनें सोनारीण, रूपानेंहि वेताचीच; पण म्हणतात ना, प्रेम आंधळें असतें ! )–या रूपाबाई आल्यापासून घरीं त्यांचें राज्य सुरू झालें. मामंजी अर्धांगवायु होऊन अंथरुणावर खिळलेले; सासूबाईंनीं हाय घेतलेली आणि डोळे आधीं मिटले तर बरें म्हणून मृत्युजवळ आग्रहाची विनवणी चालविलेली; मी ओकाऱ्यांनीं बेजार झालेली, काळज्यांनीं काळवंडलेली आणि

अतिविचारांनीं दिङ्मूढ झालेली ! तिकडे तर काय आपण आपल्या मतानुसार धैर्यानें वागत आहोंत, लोकमताला जुमानीत नाहीं, याची फुशारकी वाटत होती ! एल्‌एल्‌ बी. ची परीक्षा नुकतीच पास झाली होती आणि नशिबानें हात दिल्यामुळें पहिल्यापासूनच प्रॅक्टिस चांगली होती. यौवनाचा भर, पैशाची टंचाई नाहीं,–अशा स्थितींत रूपाबाईचें प्रस्थ न माजलें तरच नवल !

एवढी गोष्ट खरी, कीं मी किती जरी पतिव्रता असल्यें, आणि किती जरी दिङ्मूढ झालेली असल्यें, तरी स्वाभिमान अद्यापि गेलेला नव्हता. तिचें प्रस्थ सुरू झालें तें मीं विशेष तक्रार न करतां सुरू होऊं दिलें; तिच्याकडे सारें लक्ष गेलें, तिचें कौतुक होऊं लागलें, हें सगळें मीं सहन केलें; पण हात धुऊन पाठीस लागलेलें दैव या गोष्टी काय इथेंच सोडणार आहे ? हळूहळू माझें स्वामित्व गेलें; इतकेंच नव्हे, तर माझ्याकडे दासीत्व येऊं लागलें. आणि हें मात्र मला सहन झालें नाहीं आणि एक दिवस घरांत चांगलीच खडाजंगी झाली. त्या वादामुळें आणि गडगडाटामुळें ते मोहनिद्रेंतून थोडेसे जागे झाले आणि मग आमच्या डोळ्यांतून पर्जन्याचा वर्षाव होऊन दोघांचीं हृदयाकाशें कांहीं दिवस बरींच 'स्वच्छ झालीं.' हें अतिशयोक्तीचें असेल. पण मला खरेंच वाटूं लागलें, कीं यांचा कांहीं दोष नाहीं, ते बिचारे मोहांत सांपडले आहेत. त्या बाईची मीं दासी व्हावें अशी यांची कांहीं इच्छा नाहीं. आणि खरोखरीच त्यांची अशी इच्छा नव्हती. कारण रूपाबाईला रागारागानें समोर बोलावून आणून, असले प्रकार होतां कामा नयेत, ती घरची मालकीण आहे, तिची योग्यता तुम्हांला यायची नाहीं, तिचे गुण निराळे, तुमचे गुण निराळे, असें–तसें पुष्कळ सांगितलें, आणि त्याप्रमाणें कांहीं दिवस एकंदर परिस्थिति बदलली देखील.

पण जो प्रखर उन्हाळा यावयाचा होता तो आलाच. त्याचें वर्णन काय करूं ! शत्रूवर देखील असा प्रसंग येऊं नये. सीतेला भोगावा लागलेला वनवास तिला दुःखदायक झाला असेल, पण तसला वनवास मीं स्वर्गवास मानला असता, कारण तिच्या पतीचें प्रेम अखंड आणि एकनिष्ठ होतें आणि तिचा वनवास वनांत होता–माझा वनवास माझ्या घरांत होता, आणि पतिप्रेम अढळ नव्हतेंच नव्हतें. माझ्या घरांत मीं पाहुण्यासारखें नव्हे, तर चोरासारखें रहायचें; मृत्युशय्येवर सासू–सासऱ्याचे हाल डोळ्यांनीं पाहायचे; पतीच्या पैशाचीच नव्हे तर अब्रूची हानि हरतऱ्हेनें कशी होत आहे हें राजरोस ऐकायचें; पतीच्या मनाला कीड लागलेली पाहायची आणि आपण जवळ असून त्याच्याजवळ जाण्याची चोरी

असायची,—देवा, असला प्रसंग दुसऱ्या कोणत्या स्त्रीवर आणूं नकोस एवढीच प्रार्थना आहे. आणि असला प्रसंग आणलासच, तर त्या स्त्रीला फार दिवस बुचकळ्यांत न ठेवतां आपली सुटका कशी करून घ्यावी याबद्दल निश्चित उपाय सुचव; निदान एवढें तरी कर, कीं कर्तव्य काय आणि अकर्तव्य काय याबद्दल तिचें मन संशयांत ठेवूं नको. पतीच्या चरणांशीं राहायचें, मग त्यानें लाथा मारल्या तरी हरकत नाहीं, अशी श्रद्धा तुला प्रिय असल्यास तशी श्रद्धा तिच्या मनांत उत्पन्न कर; किंवा असल्या पतीला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न यापुढें करण्यांत अर्थ नाहीं, आपला आत्मा निराळा, त्याचा आत्मा निराळा, त्यानें आपल्या जिवाची माती करून घेतली म्हणून आपणहि आपल्या जिवाची माती करून घ्यायची हा शहाणपणा नाहीं, त्यानें आपल्या नीतिमत्तेची होळी पेटविली म्हणून आपणहि आपल्या नीतिमत्तेची आहुति त्या भडाग्नींत द्यावयाची नाहीं—अशा प्रकारची निश्चयी वृत्ति तुला प्रिय असल्यास ती तिला लाभूं दे. पण अधली मधली स्थिति कोणाच्याहि नशिबीं लिहूं नको. कारण ती स्थिति म्हणजे शुद्ध नरक होय!

आणि या नरकांतल्या सर्व यातना, सर्व सुखसोहाळे, मीं भोगले. नरकयातना भोगायला सुद्धां भाग्य लागतें! सगळ्यांच्याच नशिबीं हे भोग नसतात! माझ्या-सारख्या ज्या थोड्या भाग्यवान् त्यांनाच हें सुख लाभतें!”

---

## २१ : अखेर सुरेख तें सगळेंच सुरेख

“प्रिय मित्र सुनंदा यास, त्याच्या बाळूचा साष्टांग नमस्कार विनंती विशेष. पत्र लिहिण्याचें निमित्तकारण असें, कीं १९२१ सालीं सरकार जी शिरगणति करील त्यांत पूर्वी नसलेल्या निदान एका मुलीची व एका मुलाची तरी सरकारला गणति करावी लागेल अशी व्यवस्था अनुक्रमें माझ्या व तुझ्या पत्नीनें केली आहे. बाळेंबाळंतिणी खुशाल आहेत. माझ्या पत्नीला दूषित ताप (Septic fever) येत आहे म्हणून ती जरा घाबरली आहे; पण काळजी करण्याचें कारण नाहीं. असें डॉक्टर वरून तरी म्हणत आहेत. माझ्या पत्नीला मुलगी झाली म्हणून किंचित् वाईट वाटत आहे: पण ती गोरी आहे आणि तुझा मुलगा काळा आहे. ही गोष्ट तिला अगदींच असमाधानकारक नाहीं! तुझ्या

बायकोकडे तुझें लक्ष नाहीं; पण आंधळयाच्या गाई देव राखतो या न्यायानें दैवी सद्गुण असलेल्या माझ्या पत्नीनें तिला आपल्या घरीं आणलें आहे व त्या घराला बाळंतिणीच्या दवाखान्याचें स्वरूप आणलें आहे! कालान्तरानें त्याचें रूपांतर वेड्याच्या इस्पितळांत न होवो म्हणजे मिळविली!

"मला स्वतःला मी मोठा शहाणा समजतों; पण आतां वेड लागण्याची भीति वाटण्याचें कारण असें कीं हल्लींचा काळ विलक्षण क्रान्तीचा दिसतो आहे! महायुद्धाच्या धामधुमींत राष्ट्राराष्ट्रांत ज्या क्रान्त्या होत आहेत त्या सोडून दिल्या, तरी आपल्या शेजारीं–आपल्या ओळखीच्या व प्रेमाच्या माणसांत परिस्थितीच्या व स्वभावाच्या विलक्षण क्रान्त्या होत आहेत आणि या क्रांत्यांचें वर्णन करण्याकरितांच खरोखर हें पत्र मी लिहीत आहें. रावबाला आणि सुशीलेला जर तूं आतां पाहिलेंस तर त्यांना तूं ओळखशील का नाहींस अशी मला भीति वाटते; इतकीं तीं त्यांच्या आईबापांच्या मृत्यूनंतर बदललीं आहेत! पूर्वीचा तो उंच, सुदृढ, उमदा व देखणा रावबा आतां आजारी होऊन अस्थिपंजर झालेला आहे! व सुशीलाहि आतां अशक्त आणि फिकी व पोक्त झालेली आहे, या अर्थानें मी त्यांच्यामध्यें क्रान्ति झाली आहे असें म्हणत नाहीं–या गोष्टी तुला माहितच आहेत. त्यांच्या स्वभावामध्यें व परिस्थितीमध्यें मोठा फरक झालेला आहे (–व तो इष्ट आहे आणि म्हणूनच थोड्याशा आनंदी व रंगेल वृत्तीनें मी हें पत्र लिहीत आहें–) हें मला सांगावयाचें आहे.

"रावबानें आठ दिवसापूर्वी मला निरोप पाठवून घरीं बोलावून नेलें आणि रूपाबाईला व तिच्या माणसांना बाहेर जाण्यास सांगून मला म्हटलें, 'बाळू, तुझी नि सुनंदाची मरण्यापूर्वी मला क्षमा मागावयाची आहे. सुशीलेची पण क्षमा मागायची आहे. तर त्यांना लवकर आणण्याची व्यवस्था कर.'

"सुनंदा कलकत्यास गेला आहे; तो कांहीं येऊं शकायचा नाहीं. पण सुशीलेला पाहिजे तर लोणावळयाच्या शाळेच्या पत्यावर तार पाठवून इकडे येण्यास सांगतों.'

"तार पाठवून नाहीं यायची ती. तिचे मी इतके अपमान केले आहेत आणि इतकं तिला छळलं आहे, कीं ती आतां तारेनें आणि पत्रानें यायची नाहीं. घरांतून घालवून दिल्यावर कोण येईल? तर स्वतः जा. लोणावळयास क्राइस्ट्स क्रॉस हायस्कूलच्या हॉस्टेलमध्यें ती राहाते, तिला समक्ष भेटून आग्रह करून घेऊन ये. तिला मी सांगतों तें सांग म्हणजे ती येईल. तिला मी असा मृत्युशय्ये-

वर पडलों आहें असं सांग आणि म्हणावं–इकडे ये कानांत सांगतों...' कानांत जें त्यानें सांगितलें तें ऐकून मी चकितच झालों आणि विशेष न बोलतां 'काळजी करूं नको, घेऊन येतों' असें म्हणून त्याचा निरोप घेतला आणि चवथ्याच दिवशीं तिला घेऊन आलों. आल्याबरोबर ती प्रथम पतीकडे गेली व पाय वगैरे चेपूं लागून पतीची सेवा, जणुं कांहीं पूर्वी कांहींच झालें नाहीं अशा रीतीनें करूं लागली व हें घटकाभर पाहिल्यानंतर मी आपल्या घरीं गेलों.

"दुसऱ्या दिवशीं त्यानें मला निरोप पाठवून संध्याकाळीं ५ च्या सुमारास 'एक मौज पाहाण्यास' बोलावलें. सकाळीं दुखणें बरेंच अधिक झालें होतें असें मीं ऐकलें होतें आणि दुपारीं हा असा निरोप! तेव्हां याचा मला कांहीं अर्थच कळेना. कचेरींतलें काम आटोपून मी परस्पर तिकडे जाऊन पाहातों, तों रावबा कण्हत आहे व सुशीला, रूपाबाई, एक डॉक्टर, रूपाबाईनें आणलेला एक वकील व इतर कांहीं मंडळीं चिंताक्रांत बसलेली आहे. वकिलाच्या डाव्या हातांत एक कागद, उजव्या हातांत टांक होता. मला आलेला पाहून त्यानें रूपाबाईकडे पाहिलें व आतां पुढें काय करावयाचें असें सूचक मुद्रेच्या द्वारें विचारलें. तिनें कागद सहीकरितां रावबापुढें करण्यास वकिलाला सुचविलें व त्यानें तो पुढें केला. रावबानें टांक घेऊन सही केली,–नव्हे, सही केल्यासारखें केलें आणि एकदम अंगांत संचार झाल्यासारखें करून त्यानें तो कागद माझ्या हातांत चट्कन् दिला आणि म्हटलें, 'पाहा, मीं परवां तुझ्या कानांत सांगितलं त्याचं प्रत्यन्तर! ही चोर मंडळी या वुइलवर माझी सही घेऊन माझा आणि हिचा (अर्थात् सुशीलेचा) घात करणार होती!' मीं तें मृत्युपत्र घाईत वरून वरून वाचलें. त्यांत अर्थात् जें असावयाचें तेंच होतें. रावबानें मात्र सही करण्याच्या ठिकाणीं सही न करतां 'तुमची लुच्चेगिरी ओळखणारा' असें म्हटलें होतें!

"तुला सांगायला नकोच, कीं, सकाळीं अत्यवस्थ असल्याचें त्यानें केवळ सोंग केलें होतें व हा योगायोग त्यानेंच शिताफीनें जुळवून आणला होता. रूपाबाई व तिचे साथीदार हे आपणांकडून अर्धवट गुंगींत असतांना एका आपमतलबी मृत्युपत्रावर सही घेणार आहेत व मागाहून लवकरच मृत्यु न आल्यास विषप्रयोगहि करणार आहेत असें त्याला कांहीं दिवसांपूर्वी कळून आलें होतें. त्याला झोंप लागली आहे असें वाटून ते आपआपसांत जें कुजबुजत होते तें त्यानें ऐकलें होतें व त्यामुळें त्याची बौद्धिक गुंगी उतरून तो सावध झाला होता.

अर्थात् त्यानें मला लगेच बोलावणें पाठवून व या कटाची ही गुणगुण सांगून सुशीलेला आणण्याची विनंति केली होती. त्याप्रमाणें मीं तिला आणलें आणि तदनंतरची ही अशी सुखपर्यवसायी हकीगत घडली.

" रूपाबाई व तिचे साथीदार हल्लीं पोलिस-अटकेंत आहेत. पण ते सुटले तरी मी सध्यां तरी विशेष फिकीर करीत नाहीं. मला याहून पुष्कळ उच्चतर कामें आहेत. शिवाय खटला चालू ठेवल्यास रावबाला शारीरिक व मानसिक त्रास होण्याचा संभव आहे. त्याच्या सध्यांच्या स्थितींत त्याला हा असा त्रास देणें इष्ट नाहीं. हल्लीं त्याची प्रकृति थोडीबहुत सुधारली आहे. सुशीला त्याला पूर्वीपेक्षांहि अधिक प्रिय झाली आहे. सुशीलाहि पूर्वीचें सगळें विसरली आहे. आर्य स्त्रियांची लोक चेष्टा करोत; पण आर्य-स्त्री ती आर्य-स्त्री !

" नव्हे, मी चुकलों. सुशीला आतां पूर्वीची आर्य-स्त्री राहिली नाहीं. तिचीं मतें आतां पार बदललीं आहेत. तिची वृत्तिहि बदलली आहे. तिचीं मतें तूं ऐकलींस तर तुझ्या हृदयाला धक्काच बसेल. मलासुद्धां चमत्कारिक वाटलें; पण सुशीलेचें सगळेंच चांगलें वाटतें, त्याप्रमाणें हें स्थित्यंतरहि चांगलेंच वाटलें. अशीच तुझीहि अवस्था होईल असें वाटतें. आतां हें पत्र फार लांबलें आहे म्हणून अधिक लिहीत नाहीं. 'All's well that ends well !' या चांगल्या म्हणीनें मीहि आपल्या पत्राचा अंत करतों. हृदयाची अस्वस्थता म्हणीनें दूर होत नाहीं हें मी ओळखून आहें. पण कोठेंतरी संपविलेंच पाहिजे ना ?

तुझा

" बाळू "

---

## २२ : " मी मरत नाहीं तर जिवंत होतों आहें,— मला माझी बायको जन्म देत आहे "

" प्रिय मित्र सुनंद यास, बाळूचा नमस्कार—येथें कोणाचेंच कुशल नाहीं. मुलें चिरचिर करताहेत, सौभाग्यवतीद्वय अंथरूण धरून आहे. क्षयानें बेजार झालेली पत्नी लवकरच अंथरूण सोडण्याच्या बेतांत आहे ! मला काय वाटत आहे हें काय लिहूं ? रावबानें तर अंथरूण सोडलें—कायमचें सोडलें ! सुशीलेला आतां मी कसा भेटूं ! तूं कसा भेटशील ?

"हा प्रकार अगदीं अकल्पित झाला. मागील पत्रांत वर्णिलेली हकीकत झाल्यानंतर त्याची प्रकृति सुधारत चालली; इतकी, कीं तो पुन्हां हिंडूं फिरूं लागला व पूर्वीप्रमाणें वादविवादहि करूं लागला. सुशीलेविषयीं तर त्याची वृत्ति इतकी बदलली, कीं तो तिला प्रत्यक्ष देवाप्रमाणें–किंवा व्याकरणाकरितां 'देवी' प्रमाणें म्हण पाहिजे तर–मानूं लागला. तुझ्यामाझ्याविषयींचेंहि त्याच्या मनांतलें किल्मिष पार निघून गेलें होतें. मला तो वारंवार बोलवीत असे आणि हरतऱ्हेच्या गोष्टी काढून तासतास दोनदोन तास बोलत बसत असे. 'देवी' तर तेथें असा-वयाचीच ! एक दिवस तिच्या देखत तो मला म्हणाला, 'बाळू, मी इतके दिवस शूद्र होतों, आतां मी ब्राह्मण झालों आहें' मला याचा कांहीं अर्थ समजेना,, सुशीलेलाहि कांहीं समजेना, म्हणून आम्ही त्याच्याकडे चकित दृष्टीनें पाहूं लागलों. तो मग स्मित करून म्हणाला, 'तुम्हांला मनुष्य द्विज केव्हां होतो हें ठाऊक नाहीं का ? **जन्मना जायते शूद्रः संस्काराद् द्विज उच्यते !** आपल्या शास्त्राप्रमाणें आपण सर्वजण जन्मतः शूद्रवृत्तीचे असतों, सुसंस्कारांनीं आपणांला जणुं दुसरा जन्म मिळून आपण 'द्विज' होतों. मला 'हिनें' द्विज केलें आहे."

"त्याचें हें बोलणें ऐकून मला शाणि अर्थात् सुशीलेलाहि किती बरें वाटलें असेल हें तुला सांगायला नकोच. पण तिनें मनांतला आनंद लपविण्याचा थोडासा प्रयत्न करून म्हटलें, 'तसं पाहिलं तर मीहि या घरांत आल्यापासून द्विज झालें आहें, माझाहि इथं संबंध घडल्यापासून पुनर्जन्म झाला आहे. मी आतां पूर्वीची राहिल्यें नाहीं."

"तुम्हीं दोघंजण 'द्विज' झालांत, मी मात्र अजून शूद्रच आहें' मीं मध्येंच म्हटलें. 'या शूद्राला तुम्हां द्विजांच्या घरांत येण्याची बंदी होते कीं काय, अशी मला भीति वाटूं लागली आहे."

"ती भीति नको.' रावबा म्हणाला. 'मी आधुनिक द्विज आहें. मी अस्पृश्यता मानीत नाहीं. ही थट्टा सोडून खरें सांगूं का बाळू तुला, हिच्या लहान लहान गोड वाक्यांनीं जडवाद्यांचीं बडींबडीं पुस्तकें खोटीं पाडलीं आहेत. बायका लेकाच्या वस्ताद खऱ्या !"

"'असल्या शब्दांनीं न फसण्याइतकी मी आतां वस्ताद झालेली आहें एवढं मी कबूल करत्यें.'

"'' तूं कबूल कर, नाहीं तर कबूल करूं नको. खरी गोष्ट आहे ती सांगितली. जडवादानें माझ्या आत्म्याला जाड्य आलें होतें, जीवनकलहाच्या तत्त्वानें माझ्या हृदयांत गुप्त असा कलह उत्पन्न केला होता, अज्ञेयवादानें मी कुठें तरी वाहवत जात होतों; पण तुझ्या प्रेमाच्या आणि कर्तव्यतत्परतेच्या संजीवनीनें माझें जाड्य दडवून मला पुनर्जन्मच जणुं दिला आहे. इतकें तुला मीं वाईट वागवलें असतांना तूं पुन्हां आलीस आणि मागचें सगळें विसरून माझी सेवा केलीस त्यानें मी चीतच झालों.'

"' ' संजीवनीनें मीं जिवंत केलंना, मग चीत केलं कसं म्हणतां येईल ?' सुशीला खोडसाळपणानें हंसून म्हणाली.

"' ' आधीं चीत करून मग संजीवनीनं पुनर्जन्म दिलास असं मला म्हणायचं आहे.' रावबानें उत्तर दिलें व आपली बाजू सांवरून घेतली.

"' ' अस्सं, अस्सं !' एवढेंच मान हालवून व डोळे मोठे करून सुशीला म्हणाली व गप्प बसली. तेव्हां मला या लाडक्या वादांत वेड्यासारखें होऊन मीं म्हटलें ' मी मात्र तुमच्या या वादांत मरतों आहें, मला कोणता कच किंवा देवयानी संजीवनी देणार आहे कोणाला ठाऊक !'

"अशा रीतीचे आमचे पुष्कळ संवाद आणि पुष्कळ वेळां झाले आणि उत्तर ध्रुवावरच्या सहासहा महिन्यांच्या दीर्घकालीन रात्रीनंतर सूर्योदयाचीं पूर्वचिन्हें दिसूं लागल्यावर तत्कालीन ऋषींना जसा आनंद होत असे व ते मग आनंदानें उषेचीं स्तोत्रें गाऊं लागत तशीं आपणहि गावींत असें मला वाटूं लागलें होतें. ( मी खरोखरीच कविता करूं लागलों होतों, व तुला पाठवून देणार होतों त्या ! ) पण माझें उषास्तोत्र पुरें व्हायच्या अगोदरच पुन्हा माझें सर्व जग अंधतमामध्यें गुडुप झालें !

" मृत्यूचा तो देखावा माझ्या डोळ्यांसमोर आहे. मी त्याचं वर्णन मात्र करीत नाहीं. तूं परत आल्यावर सगळं सांगेनच. सुशीलेनें त्याची फारच उत्तम शुश्रूषा केली,–तिला कोणी ती शिकविली, कोणाला ठाऊक ! त्याला तिनें आपल्या सेवेनें आणि शीलानें पुन्हा इतकें आपलेंसें केलें होतें आणि इतकें सुधारलें होतें, कीं त्या उभयतांचा संसार पाहून मला आपल्या उभयतांचा संसार नीरस वाटूं लागला होता ! रावबाशीं आपण लहानपणापासून भांडत आलेले आहोंत व तो हाडाचा वाईट नाहीं हेंहि आपण एकमेकांशीं कितीदां तरी म्हटलेलें आहे; पण त्याचें हृदय इतकें चांगलें असेल अशी मला कांही कल्पना

नव्हती. सुशीलेला तो अलीकडे कसें वागवीत होता हें तुला मी वर्णन करून काय सांगूं ? पत्र लांबलं आहे (तुला लिहिलेलें कोणतं पत्र लांबत नाही ? ) तेव्हां त्याचें प्राणोत्क्रमणाच्यापूर्वी अर्धवट वायूच्या स्थितींतच बडबडलेलें वाक्य सांगतो आणि पुरें करतों. त्याच्या बडबडीमध्यें किती अर्थ भरलेला आहे, पाहा :

" 'मी मरत नाहीं...मी जिवंत होतों आहें...मला माझी बायको...जन्म देत आहे.'

तुझा

" बाळू "

---

## २३ : क्राइस्ट्स क्रॉस स्कूल

" **मि**त्रवर्य रा. रा. बळवंतराव व सुनंदराव यांस सुशीलेचे नमस्कार, विनंति विशेष. मी येथें आल्यापासून एका वर्षांत आपणांला सविस्तर पत्र लिहिलें नाहीं, याचें कारण तसें पत्र लिहिण्याची मला परवानगीच नव्हती. खुशालीचीं पत्रें पाठविलीं तीं देखील मिनतवारीनेंच पाठवितां आलीं. माझ्या येथील राहाणीविषयीं सामान्य माहिती घरच्या पत्रांवरून कळली असेलच. विशेष माहिती विशेष परवानगीनें लिहीत आहें.

" सासूसासऱ्यांच्या मरणानंतर लवकरच हात धुऊन पाठोपाठ माझ्यावर जो दुर्धर प्रसंग आला त्यानंतर दोन तीन महिने मला फारच कठिण गेले. आतां मला वाटतें, मी बरीच मूळ प्रकृतीवर आलें आहें–म्हणजे मी आतां विशेष कुढत नाहीं किंवा जुन्या आठवणी काढून त्यांचाच आपल्याशीं विचार करीत बसत नाहीं. इतर मुलींप्रमाणेंच–माझ्यासारखे गोडहि अनुभव नाहींत आणि कडुहि अनुभव नाहींत अशा कुमारींप्रमाणेंच–मी वागतें. खेळणें, थट्टामस्करी करणें, 'हक्का'करितां भांडणें, इत्यादि गोष्टींत त्यांच्यासारखीच मी आहें. पूर्णपणें त्यांच्यासारखीच असणें शक्य नाहीं. ज्या बाईला एकदां **उच्च पतिसुखाचा** अनुभव मिळाला, जिला एकदां पुत्रमुखदर्शनाचें सुख लाधलें आणि जिचीं हीं सुखें काळानें हिरावून नेलीं, ती पुन्हां पूर्ववत् होणेंच शक्य नाहीं !"

" येथें रोमन कॅथॉलिक मिशनची मदत असलेली, पण त्या मिशनच्या

ताब्यांत नसलेली १०० शंभर एक मुलांची शाळा आहे. ६५ मुली व ३५ एक मुलगे आहेत. वयें ३ ते २५ पर्यंत आहेत. बहुतेक मुलें साहेब, अँग्लो-इंडियन व पारशी यांचीं आहेत. फक्त ७ हिंदू व २ मुसलमान आहेत. बहुतेक सगळीं हॉस्टेलांत राहाणारी मुलें आहेत. फक्त २ पारशी मुलगे व १ युरोपियन मुलगी हीं गांवांतून येतात. अगदीं पूर्व-प्राथमिक वर्गापासून ते सीनियर केंब्रिजपर्यंतचे वर्ग आहेत. शिक्षकवर्गांत बहुतेक युरोपियन आहेत. एक पारशी, तो सायन्स शिकवितो व एक हिंदु आहे, तो गणित शिकवितो. बहुतेक मडमांचेंच राज्य आहे; एकच युरोपियन पुरुष आहे-तो प्रिन्सिपलबाईचा यजमान. शाळा प्रिन्सिपलबाईच्या ताब्यांत. मुलग्यांकरितां निराळा बंगला आहे; पण दिवसाचें बरेंचसें शिकवणेंसवरणें व बसणेंउठणें शाळेच्या मोठ्या आवारांतच होतें. वर्गांत व बाहेरहि स्त्रीपुरुष हा भेद फारसा तीव्रतेनें पाळण्यांत येत नाहीं. साहाजिकपणें भेद होतो तो केव्हांहि रहाणारच. यापासून वाईट परिणाम होईल असें प्रथम वाटतें.-मलाहि वाटलें; पण अनुभवान्तीं मन बदललेलें आहे. येथील चाळीस वर्षांच्या इतिहासांत अनिष्ट प्रकार तीनचार झाले. येथील मुलगे व मुली यांच्यामध्यें विवाह फार होत असतील अशी बाहेरच्यांची कल्पना असते; पण आंकडेशास्त्र सांगतें, कीं गेल्या चाळीस वर्षांत २३ लग्नें झालीं आणि तीं आईबापांना व गुरुजनांना इष्ट व संमत अशा राजमार्गांनींच झालीं. येथील वातावरण अतिशय शुद्ध व सात्त्विक आहे व त्याचें बरेंचसें श्रेय आमच्या बाई मिसेस् स्वीट यांजकडे आणि थोडेंसें त्यांच्या यजमानांकडे व सहाय्यक शिक्षक शिक्षिकिणींकडे आहे. मिसेस् स्वीट या चाळीस वर्षांपूर्वी शाळेवर प्रथम आल्या. (तेव्हां त्या मिसेस् स्वीट नव्हत्या तर मिस् कॅथॅरिन फुलव्ह होत्या) पांचसात वर्षांनीं त्या विलायतेस रजेवर गेल्या असतां त्यांचें मिस्टर रॉबर्ट स्वीट यांच्याशीं लग्न झालें व तीं दोघेंहि इकडे येऊन उभयतां शाळा चालवूं लागलीं. त्यांच्या शिष्यशिष्यिणींचे मुलगे व मुली, (कांहीं मुलींच्या नाती!) आतां त्यांच्या शाळेंत शिकत आहेत. मिसेस स्वीट यांचा स्वभाव गोड व कोमल असून शिस्तीकडे लक्ष देणारा, जात्या खेळकर व थोडासा खोडकर आणि थट्टेखोर असून तत्त्वाच्या व महत्त्वाच्या बाबतींत गंभीर, न्यायनिष्ठुर व निस्पृह आहे. त्यांचें मुलांवर इतकें प्रेम आहे कीं, त्यांना तीं स्वतःचींच मुलें, किंबहुना नातवंडें-पंतवंडें वाटतात. मिस्टर स्वीट हे आपले सरळ व सालस गृहस्थ आहेत. ते शाळेंत शिकवून झाल्यावर टेनिस, गॉल्फ

किंवा वाचन यांत व्यापृत असतात. त्यांनीं हिंदुस्थानांतील क्राईस्टचे बंधु ' या नांवाचें इंग्रजींत एक पुस्तक लिहिलें आहे व कांहीं गोष्टीहि लिहिल्या आहेत. त्यांत बहुतेक धार्मिक तत्त्व असतें-कला या दृष्टीनें त्या बेताच्याच.

"धार्मिक तत्त्वाचा आतां उल्लेख आलाच आहे तेव्हां मी एकदम सांगून टाकतें, कीं मी आतां पूर्वींचे देव मानीत नाहीं. आकाशांतला बाप मी मानावा आणि क्रिश्चनांच्या कळपांत यावें अशी मिस्टर व मिसेस स्वीट यांची सात्त्विक इच्छा आहे; पण मी वळेन असें वाटत नाहीं. ईश्वर मानलाच तर सहा दिवस काम केल्यानंतर थकणारा व रविवारीं विश्रांति घेणारा, Doomsday च्या दिवसापर्यंत सर्व लोकांना आपल्याला स्वर्ग मिळतो का नरक नशिबीं येतो हें न कळूं देणारा, सगळयांना थडग्यांतच कुचंबत ठेवणारा, अडॅम आणि ईव्हच्या चुकीबद्दल मनुष्यजातीवर रागावणारा आणि सर्वांना उगीच शिक्षा करणारा, क्राइस्टनें स्वतःवर शिक्षा ओढवून घेतल्यावर मग या पुत्रबलिदानानें समाधान पावणारा, क्राइस्टवर विश्वास नसणाऱ्या साधूंनाहि स्वर्गवासाची आशा न दाखविणारा व विश्वास ठेवणाऱ्या दुष्टांनाहि स्वर्गाची लालूच दाखविणारा-असा हा देव मानण्यापेक्षां आपल्या विष्णु, शंकर, ब्रह्मदेव, विठ्ठल, दत्तात्रेय यांपैकीं एखादा मानला तर काय वाईट ? काव्यदृष्टया तरी आमचे देव खात्रीनें श्रेष्ठ आहेत. तत्त्वदृष्टया जर पाहिलें, तर आमचा सर्वव्यापी, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, पूर्वकर्मानुसार बरींवाईट फलें देणारा ईश्वर बुद्धीला अधिक समाधान देतो. आणि त्याच्याहि पलीकडे जाऊन परमार्थाकडे पाहिलें, तर आमचें ' ब्रह्म ' फारच उत्तम. असो. मी शाळेंतल्या धार्मिक प्रार्थनेला जातें; गेलेंच पाहिजे असें नाहीं; पण जावें अशी अपेक्षा असते; आणि मिसेस् स्वीटचें मन मोडणें कठीण वाटतें -पण मिसेस् स्वीट यांना माझीं मतें पूर्णपणें ठाऊक आहेत. क्राइस्टबद्दल मला आदर आहे, क्रिस्ती साधुसंतांबद्दल आहे, क्रिस्ती मिशन्सबद्दल आहे. आणि हा आदर मनापासून आहे, हें त्या ओळखून आहेत. त्या उभयतांचीं धार्मिक मतें रोमन कॅथॉलिक पंथाचीं आहेत; पण तीं उभयतां इतरांचे बाबतींत औदार्य स्वीकारून बोलतात व चालतात.

"अशा या संस्थेंत मुलगे व मुली एकत्र शिकल्या व राहिल्या तर वाईट परिणाम होईल असें वाटत नाहीं. आतांपर्यंतच्या अनुभवावरून जें वाटलें तें लिहिलें आहे. इतर गोष्टींबद्दल पुढें केव्हां तरी अशीच परवानगी काढून मग लिहीन. माझी आई मला लवकरच भेटण्यास येणार आहे, त्या वेळेस आलेत तर भेट-

ण्याची परवानगी मिळेल; नाहींतर अपवादात्मक प्रसंगाशिवाय परवानगी मिळणें कठिण असतें. तेव्हां ती विचारूंच नये. येथील कोर्स संपण्यास अद्यापि दोन वर्षें तरी लागतील. पुढें काय याची आजच काळजी कशाला? Sufficient unto the day is the evil thereof.

आपली उभयतांची बालमैत्रीण

"सुशीला"

ता० क०—पत्रें केवळ खुशालीचींच कां असेनात, पाठवावींत. मला बरें वाटतें.

"विनोदाला व कुमुदिनीला आशीर्वाद. माझा रवींद्र जिवंत असता तर त्यांच्या एवढाच असता. कोठें असेल तेथें त्याला माझा आशीर्वाद द्यावा. Rationalist असून वेड्यासारखें लिहीत आहें-पण मला पहिल्यापासूनच वेडी ठरविलेली आहे ना?

"सुशीला"

---

## २४ : ही आपली समाजव्यवस्था

लोणावळें,

ता......

प्रिय तात्या यांस सा. न. वि. वि.—

"आपण व आई मला भेटून गेल्यापासून शारीरिकदृष्ट्या माझी खुशाली आहे; पण मनांत फार गोंधळ माजून राहिला आहे. मी मनानें बाटत आहें-म्हणजे ख्रिस्ती धर्माकडे माझा ओढा अधिक होत आहे असें नव्हे, तर हल्लींच्या सर्व धर्मांचा व प्रचलित समाजव्यवस्थेचा (म्हणजे, 'अव्यवस्थे'चा) मला तिटकारा येत चालला आहे. धर्मांतील तत्त्वें चांगलीं असतात, पण त्या तत्त्वांचा व्यवहारांत कांहींच उपयोग होत नाहीं, उलट हे धर्म कांहीं वाईट चालीरीतींना व नामधारी समाज'व्यवस्थे'ला पाठिंबा देऊन गरिबांच्या नाशाला कारणीभूत होत आहेत असें माझें मत होत चाललें आहे. एकच गोष्ट पाहून माझें मत बदलत चाललें आहे असें नाहीं. जगांतील अनेक व्यवहार पाहून मला असें वाटूं लागलें आहे, कीं एक अजिबात विचार करण्याचें तरी टाळावें किंवा

धार्मिकदृष्ट्या क्रांतिकारक तरी बनावें. ही वृत्ति नुकतीच फार बळावली आहे आणि त्याला कारण पुढील अनुभव.

" आमच्या वसतीगृहाच्या शेजारीं रेल्वेवर माती खडी वगैरे गाढवांवर वाहून नेणाऱ्या वडारी लोकांचीं पालें आहेत. इतके दिवस आम्ही येथें आहोंत; पण त्या पालांत कधीं आम्ही गेलों नव्हतों. त्या लोकांशीं कधीं बोललोंहि नाहीं. जणुं कांहीं त्यांचीं गाढवं आणि ते यांमध्यें फरक नाहीं असें आम्हीं त्यांना लेखीत होतों; आणि खरोखर म्हणावयाचें म्हणजे तेहि गाढवासारखेच वागत होते ! दहाबारा दिवसांपूर्वी एकाला कांहीं रोग झाला, तेव्हां त्यांच्या बायकामुलांनीं रडण्यास आरंभ केला आणि पुरुष मंडळी कांहींतरी अघोरी उपाय करूं लागली. एकजण अगदीं जवळ असलेल्या डॉक्टरकडे गेला; पण त्या साहेबाच्या क्रिस्ती धर्मानें त्याला कांहीं अशी बुद्धि दिली नाहीं, कीं फी मिळण्याची आशा नाहीं तरी आपण गरिबांना औषध द्यावें ! मागाहून हिंदु वैद्य, मुसलमानी हकीम, पारशी डॉक्टर, सगळयांकडे तो गेला; पण कोणी कांहीं आलें नाहीं. शेवटीं तो आमच्या मिसेस स्वीटबाईकडे भीत भीत आला आणि हातांपायां पडून कांहीं तरी औषधपाणी द्या म्हणून म्हणूं लागला. मी, मास्टर काफ नांवाचा माझा एक शाळेंतला मित्र, आणि दोन चार मुली व मुलगे त्या दिवशीं बॅडमिंटनच्या मॅचिस् खेळून झाल्यावर मिसेस स्वीटबाईनें प्रेमपूर्वक बोलावलें होतें म्हणून चहा पिण्यास त्यांच्याकडे गेलों होतों. आम्हीं ती सगळी हकीगत ऐकली आणि या गरीबाला मदत करण्याला जाऊं या असें म्हटलें. स्वीटबाईहि तयार होत्याच. त्यांनीं सामान्य वरगुती औषधाच्या दोनतीन बाटल्या घेतल्या व आम्ही सगळींजणं वडाराच्या पालांकडे निघालों; तों तेथें काय जिकडे तिकडे आक्रान्त चालला होता. रोगी ज्या पालांत होता त्यांत स्वीटबाई आणि मी वांकून कसा तरी शिरलों. उभं राहाण्यास जागा नव्हती. आंत देखील एवढीशी जागा, पण त्यांत तो रोगी आणि त्याच्या भोंवतीं दोन पुरुष आणि दोन म्हाताऱ्या बाया, आणि आसपास घाणेरड्या गोधड्यांवर बसलेलीं दोन मुलें आणि निजलेलें अंगावरचें मूल ! रोग्याच्या उशाशींच एक चूल ! त्यांत गोंवऱ्या घातल्या होत्या आणि त्यामुळें त्या पालांत धूर भरून राहिला होता. मिसेस स्वीटबाईनें ओरडणाऱ्या त्या सगळयांना आधीं गप्प बसविलें आणि मग त्या चौकशी करूं लागल्या. त्या वडाऱ्याची दहाबारा वर्षांची मुलगी होती तिनें आपल्या धाकट्या भावांना जवळ घेतलें होतें. तिची आई नुकतीच वारली होती आणि एवढ्या वयांत त्या पोरांचा

सांभाळ करण्याचा भार तिच्यावर पडला होता ! तिनें प्रथम माझे आणि मग स्वीटबाईंचे पाय धरले आणि ओक्साबोक्सीं ती रडूं लागली. रोग्याजवळ बसलेल्या बायांनीं तिची हकीगत सगळी सांगितली. आम्ही तिला उगी केलें आणि विचारपूस करून कांहीं औषध देण्याच्या उद्योगाला लागलों. पिण्याच्या पाण्यांत परमॅंगॅनेट (Permanganate) घालून द्यावें म्हणून स्वीटबाईंनीं मोठें भांडें भरून पाणी मागितलें. पण घरांत भांडेंच रिकामें नव्हतें ! अखेर एक कटोरें मिळालें; पण पाणीच मिळेना ! एका मातीच्या गाडग्यांत बुडाशीं थोडें राहिलेलें गढूळ पाणी शेवटीं मिळालें. त्यांत तें परमॅंगॅनेट किंचित् घालून लाल करून रोग्याला पिण्याकरितां दिलें व मग औषधाची एक बाटली देऊन आम्ही बाहेर पडलों. मिसेस् स्वीट अगदीं घाबरलेल्या दिसल्या. त्या म्हणाल्या, " ही कॉलऱ्याची केस आहे. तुम्ही माझ्याबरोबर उगाच आलांत. आतां घरीं गेल्याबरोबर डिस्इन्फेक्टंट घालून अंघोळ करा आणि कपडे वाफारून परटाकडे द्या. " मास्टर ' काफ 'नें शेजारच्या पालांत राहाणाऱ्या वडाऱ्यांकडून पुष्कळ माहिती काढिली होती त्यावरून त्यालाहि ही कॉलऱ्याची केस आहे असें कळून चुकलें होतें; पण तो स्वतःविषयीं न घाबरतां ज्या समाजव्यवस्थेनें या लोकांना अशा अज्ञानांत आणि दारिद्र्यांत ठेविलें त्या समाजव्यवस्थेला रागारागानें शिव्याशाप देऊं लागला. ' ही पहा आमची भांडवलशाही; हा पहा तुमचा हिंदुधर्म, यांना तुम्ही अस्पृश्य समजतां ना ? ' तो मला म्हणाला.

" ' यांना नाहीं आम्ही अस्पृश्य समजत,–महार, मांग वगैरेंना अस्पृश्य समजतों, ' मीं उत्तर दिलें.

" 'पण अस्पृश्यांप्रमाणें वागवतां तर खरें ना ? मी तुम्हां हिंदूंनाच दोष नाहीं देत,–भांडवलशाहींतले सगळे धर्म आणि सगळे लोक सारखेच. युरोपियन, पारशी, मुसलमान–कोणी तरी डॉक्टर येथें आला का ? माणसाची किंमत नाहीं पैशाची किंमत आहे या जगांत. This must be done away with. I am going to be a social revolutionary. अशा रीतीनें तो चेवाचेवानें बोलूं लागला, तेव्हां मिसेस स्वीटनें त्याला दाबलें व तोहि मग बराच गप्प राहिला. ( पूर्णपणें गप्प राहाणें काफच्या स्वभावांतच नाहीं !) या काफबद्दल, मी घरीं आलें होतें तेव्हां पुष्कळ गोष्टी मीं तुम्हांला सांगितल्या आहेत त्याचा उतावळेपणा, घायकुतेपणा, प्रेमळपणा व रागीटपणा हे सर्व गुण अतिरेकामुळें हास्यास्पद होतात, पण मला तरी तो आवडतो. आणि म्हणूनच त्याच्याशीं मी

स्नेह करत्यें. त्याला सुटीमध्यें आपल्या घरीं बोलवूं काय ? त्याची इच्छा आहे, पण मिसेस् स्वीट पाठवितील किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. पण या पुढच्या गोष्टी आहेत. वडाऱ्याबद्दल लिहीत होत्यें ती हकीगत राहिलीच ! औषधपाणी देऊन व पाणी तापवून पिण्यास सांगून आम्ही तेथून निघालों.

"घरीं आल्यावर आम्ही अंघोळी करून कपडे बदलले. पण त्या वडाऱ्यांना आणि त्यांच्या मुलांबाळांना कोण अंघोळ घालतो आणि त्यांचे कपडे कोण बदलतो ? अखेर जें व्हावयाचें तेंच झालें. ७०–८० वडारी एका आठवड्यांत पटकीला बळी पडले ! 'पटकीला बळी पडले' म्हटलें, पण हे पटकीला बळी पडले का आपल्या 'समाजव्यवस्थेला,' हा मला व काफला प्रश्न पडला आहे. याचें उत्तर तात्या, तुम्ही द्याल काय ? ही समाजस्थिति बदलतां येणार नाहीं काय ? काफ आणि मी दोघांनीं तरी बदलण्याची प्रतिज्ञा केली आहे. पोरपणची प्रतिज्ञा म्हणून हंसाल तुम्ही, पण हंसण्यावारी दवडण्याचा हा प्रश्न नाहीं सध्यां अधिक लिहित नाहीं.

"बळवंतरावांना व सुनंदरावांना नमस्कार कळविणें. बळवंतरावांच्या पत्नीला थोडा ताप येत असतो असें मागील पत्रांत लिहिलें होतेंत. ताप कसा आहे तो कळवावा.

"**सुशीला**"

ता० क०—"वडाऱ्याची मुलगी व तिचे धाकटे तीन भाऊ यांना भाड्याचे पैसे देऊन मी पुण्यास एका मिशनमध्यें पाठविलें आहे. हीं मुलें बाटतील व हिंदुधर्माला मुकतील हें खरें; पण हिंदुधर्मानें त्यांच्याकरितां काय केलें आहे ? मुलीच्या शिक्षणाचा खर्च मी सोसणार आहें; लहान मुलांचा मिशनमार्फत होईल असें मिसेस् स्वीटबाई म्हणाल्या. असल्या मुलांची सोय कशी लावावयाची याबद्दल समाज विचारच करीत नाहीं. कादंबऱ्या–नाटकांना प्रेमाशिवाय विषयच नाहींत; राजकारणी पुरुषांना 'स्वराज्या'शिवाय दुसरें कांहीं सुचत नाहीं; समाज–सुधारकांना विधवाविवाह, स्त्री-शिक्षण, ब्राह्मणब्राह्मणेतर असलेच विषय सुचतात ! गरीब महार–मांग, वडारी–डोंबारी यांची स्थिति कशी असेल, ही स्थिति अशी कां, ती कशी सुधारावयाची, याचा कोणीच विचार करीत नाहीं ! मला तर काफप्रमाणेंच वाटूं लागलें आहे, कीं सर्व समाज किडलेला–सडलेला–'rotten' झालेला आहे. तो सुधारण्याला उपाय म्हणजे पूर्वींची मूर्खपणाची

धर्म-'व्यव्यस्था' मोडून टाकली पाहिजे. माझीं हीं मतें चुकीचीं असतील, 'आहेतच' अशी मी आपली सध्यां समजूत करून घेत्यें. पण तुमच्याशीं याविषयीं बोलूं नये तर कोणाशीं बोलूं? सुटीमध्यें तुम्ही, बळवंतराव, सुनंदराव काफ वगैरे मंडळी एकत्र जमून आपण जर चर्चा केली तर किती चांगलें होईल! पण या पुढच्या गोष्टी! असो. ताजा कलम फारच वाढला, पण इलाज नव्हता."

"सुशीला"

---

## २५ गणपति पाण्यांत बुडविले!

सुशीला उन्हाळ्याच्या सुट्टींत घरीं आली होती. घरीं म्हणजे आतां माहेरींच; कारण सासूसासरा वगैरे वारल्याचें मागें आलेंच आहे. तिचें घर व इस्टेट यांची व्यवस्था तिचे वडील पाहात असत व पैशासंबंधानें तिच्या पतीनें अगदीं शेवटीं तरी सावधगिरी टेवल्यामुळें तिला तशी ददात नव्हती. तिची बहीण उषा ही आतां हायस्कूलमध्यें जाऊं लागली होती व तिच्या लग्नाच्या गोष्टी मधून-मधून अर्धवट थट्टेंत व अर्धवट गंभीरपणें चालल्या होत्या. आज सुशीलेच्या निमित्तानें घरांत पुष्कळ मंडळी जमली होती. सुनंदराव अर्थात् होतेच. बळवंत-राव व त्यांचे वडील आणि त्यांची आई शेजारींच राहात होतीं; तेव्हां ही घरोब्याचीःमंडळीहि अर्थात् आलीच होतीं. सुनंदराव व बळवंतराव यांच्या पत्नीहि आल्या होत्या, अर्थात् त्या सबालक आल्या होत्या. त्यांचीं मुलें-विनोद व कुमुदिनी-सुशीलेजवळ खेळत होतींच हें सांगणें नकोच. सुशीला मनानें आतां पूर्वींची राहिली नव्हती, हें तिच्या पोषाखावरून कळणें शक्य नव्हतें. पोषाख बहुतेक पूर्वीसारखाच होता. मिशनच्या क्राइस्ट्स् क्रॉस हायस्कूलमध्यें तिचा पोषाख थोडासा निराळा असे; पण घरीं आल्यावर-किंबहुना घरीं येतांनाच-तिनें आपला पूर्वीचाच दाक्षिणी स्त्रियांचा पोषाख केलेला होता. वर्तन मात्र थोडेंसें बदललें होतें; म्हणजे ती आतां सर्वांशीं-पुरुषांशींदेखील-अधिक मोकळे-पणानें वागूं लागली होती. स्वभाव पूर्वीसारखाच कोमल, गोड, दुसऱ्याचें मन न दुखविणारा, असा होता. बोलण्यांत मात्र फारच क्रांति झाली होती. इतकी कीं तिची आई लक्ष्मीबाई आश्चर्य चकितच नव्हे, तर मनांत दुःखीकष्टी होई! तिच्या वडिलांना तीं बोलणीं ऐकून विशेष कांहींच वाटत नव्हतें, उलट

आनंदच होई. कारण त्यांचींहि मतें बहुतेक तिच्यासारखींच होतीं–ते बोलून दाखवित नव्हते एवढेंच. बळवंतराव यांचीहि गोष्ट अशीच होती. ते तरी आतां पूर्वींचे कोठें राहिले होते? त्यांचा तो राष्ट्राभिमान, धर्माभिमान वगैरे कालमानाला अनुसरून थंडावले होते! त्यांच्या पत्नींना मात्र हे विचार थोडेसे कानांना चमत्कारिक लागायचे; पण त्याहि नवीन युगांतल्या असल्यामुळें ते विचार त्यांच्या जिवाला धक्का देत नसत; उलट एका अर्थीं गुदगुल्या करून एक प्रकारची जागृति ते उत्पन्न करीत व कौतुकयुक्त आनंदाला कारणीभूत होत.

उषेच्या लग्नासंबंधीं थट्टा करतां करतांच सुशीला म्हणाली, "आई, एवढ्या लहानपणीं कशाला हिच्या लग्नाचा विचार करतेस? आमच्या शाळेंत हिच्या दीडपट वयाच्या क्रिस्ती, पारशी आणि आपल्या हिन्दूहि मुली आहेत. त्या बहुतेक कुमारीच आहेत. त्यांचीं लग्नें लवकर झालीं नाहींत म्हणून त्यांचं काय नुकसान झालं आहे?"

"क्रिस्ती मुलींचं मला कशाला सांगतेस! त्यांचं सगळंच निराळं. त्यांना काय, आज लग्न झालं आणि उद्यां काडी मोडली तरी हरकत नाहीं! आणि दहादां लग्नं केलीं तरी हरकत नाहीं!"

"हें तूं कांहींतरी बोलतेस झालं." सुशीलेचे वडील म्हणाले. "तुला त्यांची कांहीं माहिती नाहीं. आपण असं भलतंच बोलूं नये."

"तसं आहे असं मी घटकाभर कबूल करत्यें." सुशीला म्हणाली. "पण त्यांत वाईट काय झालं? नवरा दारूबाज असला आणि तो जर पोराबाळांच्या आयुष्याचा नाश करीत असला तर असल्या नवरोबाला सोडून आपल्या मुला-बाळांचं रक्षण केलं तर त्यांत पाप नाहीं, तर उलट पुण्य आहे. लग्न केलं म्हणजे त्या नवऱ्याला आपली आणि आपल्या मुलाबाळांची मान कापायला द्यायची कीं काय? मान कापलेली एक वेळ चालेल; पण त्याला नीतिमत्ता पण विकायची? मी तरी विवाहाचा हा अर्थ मानायला तयार नाहीं."

"पाहिलंत काकू! क्रिस्ती मिशनच्या शाळेंत पाठविण्याचा हा परिणाम!" बळवंतरावांचे वडील, विश्वासराव, विनोदबुद्धीनेंच स्मितपूर्वक म्हणाले. त्यांना सुशीलेचे विचार पटलेसे दिसले; पण उगीच वादाकरितां ते म्हणाले, "बरं, दोन दोन चार चार लग्नं उघडपणं केलीं म्हणजे नीतिमत्तेचं रक्षण होतं का? स्त्री–पुरुषांचा संबंध निलाजरेपणानं उघडपणं झाला आणि त्याला 'पुनर्विवाह'

असं नांव दिलं म्हणजे तो एका पाठीमागून एक किती वेळां झाला तरी तो व्यभिचार म्हणावयाचा नाहीं असं का तुला म्हणायचं आहे ?"

"पुरुषांनीं अनेक 'पुनर्विवाह' केले तर त्यांना तुम्हीं व्यभिचार म्हणत नाहीं ना ? मग बायकांनाच निराळा न्याय कां ?" सुशीलेनें उत्तर दिलें. "हें बाकी माझं खरं उत्तर नाहीं हो. हें आपलं क्षणभर तुमचं तोंड बंद करण्याकरितां आहे. माझं खरं उत्तर असं आहे, कीं विवाह हा कितवा आहे हें न पाहातां तो ज्या स्त्री-पुरुषांमध्यें होतो त्यांचं एकमेकांवर प्रेम आहे का नाहीं, एकमेकांविषयीं आदर आहे का नाहीं, तीं एकमेकांना अनुरूप आहेत का नाहींत, हें पाहावं. प्रथम-विवाहाला देखील मी व्यभिचारसंबंध म्हणेन,–जर तीं वधूवरं एकमेकांना अनुरूप नसतील, एकमेकां-विषयीं त्यांना प्रेम किंवा आदर वाटत नसेल, तर ! सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्याचा पंधरा वर्षांच्या मुलीशीं झालेला विवाह माझ्या मतें विवाहच नव्हे ! त्या मुलीचा तो प्रथमविवाह असला तरी तो फसवेगिरीचा कायदेशीर बलात्कार आहे. ज्या स्त्री–पुरुषांना एकमेकांबद्दल अत्यन्त तिटकारा आहे, एकमेकांची एकमेकांना अगदीं ओकारी येत आहे, त्यांनीं एकत्र राहून असल्या परिस्थितींत अपत्योत्पत्ति करणें म्हणजे तें पाप आहे, कारण तीं आपल्या वर्तनानें मुलांच्या जीविताची आणि नीतिमत्तेची राखरांगोळी करीत असतात."

"हीं मतं तूं मिशनमधल्या इंग्रजांपासून घेतलेलीं नाहींस, हीं रशियांतलीं दिसताहेत." सुनंदराव म्हणाले.

"बरोबर ओळखलंत." सुशीला म्हणाली. "तुम्हांला बोल्शेविकांचीं राजकीय क्रान्तीचीं मतं चालतात; पण हीं कां चालत नाहींत, कोणाला ठाऊक !"

"मला कुठं त्यांचीं सर्वच राजकीय मतं आवडताहेत ?" सुनंदरावांनीं उत्तर दिलें. "मला त्यांचीं अत्याचाराचीं मतं मुळींच आवडत नाहींत. मध्यम वर्गाचा आणि वरिष्ठ वर्गाचा द्वेष ते करतात, हें तर मला मुळींच पसंत नाहीं. झारशाही, भांडवलशाही, शिष्टशाही किंवा उपाध्यायशाही जशी वाईट तशीच मजूरशाहीहि वाईटच. जबरदस्ती कोणाचीहि असो, ती मला पसंत नाहीं. मजुरांची किंवा मजूर-पुढाऱ्यांची तर मुळींच नको. रशियांतलं चांगलं असेल तेंच मी घेतों."

"मग त्यांचीं विवाहाविषयक मतं चांगलीं असलीं तर घ्यायला काय हरकत आहे ?" बळवंतराव सुशीलेच्या बाजूनें म्हणाले. "मतं चांगलीं आहेत का

नाहींत हा मात्र प्रश्न आहे." ते लगेच वकिली डाव टाकून मिस्कीलपणें डोळे मिचकावीत म्हणाले.

"बरोबर, तोच प्रश्न आहे." सुशीलेचे वडील म्हणाले. "आणि माझं खरं मत विचारलं तर सुशीलेसारखंच आहे. पण आतां आम्ही म्हातारे झालों. किती जरी तें खरं वाटलं तरी तें चमत्कारिक वाटतं; खरं का नाहीं विश्वासराव ?"

"अगदीं खरं सांगायचं म्हणजे हेंच खरं आहे. पण आपण कांहीं आतां असलीं मतं उघडपणं बोलूं शकणार नाहीं. आपल्या वेळीं आपण आपल्या कालाच्या थोडंसं पुढं गेलों. आपल्यापुढं हा बाळू आणि सुनंदा गेले; आणि त्यांच्याहि पुढं ही सुशीला चालली आहे. कालाचा महिमा अगाध आहे !"

"आम्ही सुशीलेला पुढं जाऊं द्यायचे नाहीं हां;" सुनंदराव म्हणाले. "आम्ही विचारानें तिच्या पुढें आहों. पण आज या गोष्टी बोलूं नयेत, राजकारणाकडं आपण लक्ष द्यावं, असं आमचं मत आहे. म्हणून आम्ही या सामाजिक गोष्टींकडे लक्ष देत नाहीं एवढंच; नाहीं तर आम्ही काय बायकांना पुढं जाऊं देतों !"

"तो आरोप मी कधींच करणार नाहीं पुरुषांवर." सुशीला स्मितपूर्वक उपरोधिक स्वरानें म्हणाली. "पुरुष आम्हांला केव्हांहि मागं ठेवायला पाहाणार. इतके दिवस त्यांनीं तेंच केलं आणि पुढंहि ते तेंच करणार. आतां या रमा-वहिनींना (सुनंदरावांच्या पत्नीकडे पाहून) पुढं बसून तरी कसं दिलंत हाच प्रश्न मला पडला होता. खरं म्हटलं, म्हणजे त्यांनीं घरांत चुलीजवळ असायचं."

"आम्ही कृतीनं बायकांना पुढं आणतों, बोलून नाहीं ! तुम्ही मात्र बोलतां पुष्कळ; पण बसलां आहांत त्यांच्या पुढं; आणि कृतीनं त्यांना मागं टाकतां आहांत !"

"शाब्दिक कोटि करून तुम्हीं जिंकलंत–पुढंहि जिंकाल; पण सत्य हें शाब्दिक कोट्यांनीं असत्य ठरत नाहीं."

"चिडल्यासारखं करूं नको;" बळवंतराव म्हणाले. "तुझं म्हणणं आम्हांला पटतं; पण आज या गोष्टी बोलण्यांत कांहीं अर्थ आहे का ? दुसऱ्या सगळ्या सामाजिक–धार्मिक सुधारणा झाल्या म्हणजे या क्रान्तिकारक सुधारणा घेऊं हातीं."

"पण आज बोलायला काय हरकत आहे ?" सुशीलेनें म्हटलें. "आणि खरं म्हटलं, तर ज्यांना शक्य असेल त्यांनीं कृतींत तरी कां आणूं नये ? पहिल्या

प्रथम असे लोक थोडेच असावयाचे; पण कोणीतरी केव्हांतरी बोलायला आणि आचरण्याला आरंभ केलाच पाहिजे ना? आपल्या चालीरीति, आपले विचार, आपला धर्म—सर्व कांहीं rotten झालं आहे, सगळं कुजलेलं आहे. पार सगळी ही घाण काढली पाहिजे."

'तूं काढ ही घाण, मी आपली घरांतला केर काढायला जातें." सुशीलेची आई कंटाळून आणि किंचित् कष्टी होऊन प्रेममूलक रागानें म्हणाली.

लक्ष्मीबाईंची ही अबुद्धिपुरःसर कोटि ऐकून मंडळी हंसली. त्यांच्या पतीलाहि आपल्या पत्नीचें कौतुक वाटलें व ते म्हणाले, "अहो, किती केलं तरी सुशीलेची आई आहे ती. अशिक्षित आहे; पण बोलण्यांत कांहीं कमी नाहीं. बाकी ती आतां इतकी संतापली आहे, कीं तिच्या डोकीवर चहाचं पातेलं ठेवलं तर पांच मिनिटांत आधण येईल. विस्तव पेटवायची मुळींच जरूर नाहीं!"

"चहा पाहिजे आहे हें कांहीं सुचवायला नको; मीं ओळखलं होतं आणि म्हणूनच मी उठल्यें." लक्ष्मीबाई म्हणाल्या व सैंपाकघरांत गेल्या. इतक्यांत सुनंदरावांचा मुलगा रडूं लागला व बळवंतरावांची मुलगीहि रडूं लागली. तेव्हां त्यांच्या आयांनाहि जें निमित्त पाहिजे होतें तें आपोआप मिळून त्याहि घरांत लक्ष्मीबाईंना मदत करण्याकरितां मुलांना घेऊन गेल्या. अन्नपूर्णाकाकूंनाहि मग कांहींतरी निमित्त करून तेथून पाय काढला. सुशीलाहि उठूं लागली; पण तिच्या वडिलांनीं तिला थट्टेनें म्हटलें, "सुशीले, तूं हें 'आर्यस्त्रीत्व' दाखवूं नकोस. किती दिवसांनीं तुझ्याशीं मंडळींना मनमोकळं बोलतां येत आहे. तूं आपली बस. आणि तूं आतां पूर्वीची 'आर्यस्त्री' राहिलीस कोठें? तुला लोणावळ्याच्या मडमांनीं पार बाटवलं आहे."

"ती कसली बाटते?" सुनंदराव म्हणाले. "तीच त्या मडमांना बाटवील. त्या शाळेंत गेली तेव्हां मला भीति वाटत होती, कीं ही कदाचित् बाटायची! पण आतां मीं निश्चिन्त झालों. आकाशांतल्या बापाला ही मुलगी कांहीं लाभत नाहीं, ही माझी आतां खात्री झाली."

"आकाशांतल्या बापाला नाहींच मी लाभायची; पण कैलासावरच्या शंकराला आणि क्षीरसमुद्रांत निजणाऱ्या विष्णूलाहि माझ्याकडे पाहून समाधान व्हायचं नाहीं. पण मी चुकलेंच बोलायला. ते देव आतां माझ्या दृष्टीनं नाहींसेच झाले आहेत. कागदाचा ताबूत किंवा मातीचा गणपति आपणच निर्माण करतों आणि

संग्रहालय, ठाणे

मग पाण्यांत बुडवितों, त्याचप्रमाणें आपण हरएक देव निर्माण केले आणि त्यांना आतां जलसमाधि देण्याची वेळ आली आहे असं माझं मन होत चाललं आहे-झालंच आहे.”

“देवांबरोबर दैवी गुणांना जलसमाधि देत नाहींस तोंपर्यंत कांहीं हरकत नाहीं.” तिचे वडील म्हणाले.

“पण दैवी गुण म्हणजे काय ?” सुशीला म्हणाली. “माझ्या मनांत जो गोंधळ चालला आहे तो याबद्दलच. पूर्वींचे दैवी गुण मी आतां दैवी मानीत नाहीं–आणि म्हणून तर माझं मन अस्वस्थ झालं आहे.”

“पूर्वींचे दैवी सद्गुण दैवी मानीत नसशील; पण कांहीं तरी सद्गुण दैवी आहेत हें तूं मानतेस ना ? निदान सद्गुण आणि दुर्गुण यांमध्यें तूं फरक मानतेस ना ? मग झालं तर !” बळवंतराव म्हणाले.

“हो. हा भेद मानतें मी ! आणि म्हणून तर मला एक प्रकारचं समाधान आहे. पण जाऊं द्या या गोष्टी. आपण दुसऱ्या गोष्टी बोलूं या.” असें म्हणून ती मग मिस्टर व मिसेस् स्वीट, चॅरिटी, मिसेस् ग्रीन, मिसेस् लवसॉंग इत्यादि मिशनरी बायांचे वगैरे स्वभावविशेष सांगूं लागली. तिच्या बोर्डिंगमधील नियमांची, शिस्तीची, वागण्याच्या पद्धतीची हकीगत पत्रद्वारें मंडळींना थोडी-बहुत समजली होती; पण तोंडी हकीगत आणि लेखी हकीगत यांमध्यें जीव आणि जड यांसारखा किंवा व्यक्ति आणि त्याचा फोटो यांसारखा फरक आहे. तिच्या तोंडून ती हकीगत ऐकतांना एक तास कसा गेला हें कोणाला कळलें देखील नाहीं; आणि प्रश्न विचारण्यांत व हकीगत ऐकण्यांत जो वेळ गेला त्यामुळें विस्तव पेटण्यास उशीर होऊन इतक्या मंडळींच्या चहाला जो उशीर झाला होता तो पचून लक्ष्मीबाईची व इतर बायांचीहि अब्रू चव्हाट्यावर आली नाहीं. आणि दुसरी मौजेची गोष्ट अशी झाली, कीं चहा त्या दिवशीं धुरकटला होता व अगोड झाला होता, पण तोहि त्या वेळच्या संभाषणाच्या आनंदांत मंडळींना गोड लागला. खरं म्हणायचं म्हणजे गोड लागला नाहीं, तर चहा पिण्याकडे आणि चहाच्या चवीकडे कोणाचं फारसें लक्षच नव्हतं ! विनायक-रावांनीं ‘धुरकटला आहे आणि साखर थोडी कमी आहे’ असें कायसेंसें म्हटलें, पण तिकडे कोणाचंच लक्ष गेलें नाहीं !

---

सुशीला लोणावळ्याच्या क्राइस्ट्स क्रॉस स्कूलमध्यें प्रथम गुरुजनांना व मित्रमैत्रिणींना अत्यंत प्रिय व आदरणीय झाली होती; पण अलीकडे अलीकडे ती वरिष्ठ वर्गांत आल्यापासून कांहींजणांना तिचें संभाषण व तिचें वर्तनहि चमत्कारिक वाटूं लागलें होतें. इतकें, कीं कांहीं शिष्टंमन्य मुलींनीं मिसेस् स्वीटबाईंच्या कानाशीं लागून ती नास्तिक आहे, ती क्रिश्चॅनिटीवर भलतेसलते आरोप घेते, इतकेंच नव्हे, तर तिचें नैतिक वर्तनहि दूषणीय आहे, असें त्यांच्या जवळ सूचित केलें होतें व अशा रीतीनें आपण फार सभ्य असें भासविण्याचा अप्रत्यक्ष प्रयत्न केला होता. "आम्हांला तसें कांहीं ठाऊक नाहीं म्हणा; ती तशी कांहीं वाईट नसेल; पण आपलं कानावर घालून ठेवलं आहे, एवढंच" असें वर पुन्हां बोलून ठेवून त्यांनीं स्वतःला पळवाट ठेवून दिलीच होती! मिसेस् स्वीटबाईंनीं तें सगळें नुसतें ऐकून घेतलें व 'उगाच कुणाला नांवें ठेवूं नयेत, ही संवय वाईट,' असें सांगून त्यांना वाटेला लावलें होतें. परंतु पुढें कांहीं दिवसांनीं 'अमक्या अमक्या युरोपियन मुलानें सुशीलेजवळ प्रेमाच्या गोष्टी काढल्या व तो तिच्या नादीं फार दिवसांपासून आहे, तोहि नास्तिक आहे, तिच्या आणि त्याच्या वारंवार कानगोष्टी होतात' अशाप्रकारचे प्रवाद कांहीं शिष्टंमन्य शिक्षकिणींकडूनहि मिसेस् स्वीट यांच्या कानांवर जाऊं लागले. 'माझं लक्ष आहे, मी चौकशी करत्येंच आहें,' असें सांगून मिसेस् स्वीट यांनीं ती गोष्ट तेवढ्यावरच ठेविली. त्यांचें लक्ष तिच्यावर होतेंच व संभाषणद्वारा त्या तिला योग्य त्या सूचना देतच होत्या; पण अखेर एक दिवस एका नर्सनें सुशीला व मास्टर जॉन काफ यांचीं नांवें घेऊन बराच बोभाटा केल्यामुळें मिसेस् स्वीट यांनीं आवडत्या 'पपी'समवेत (कुत्र्यासमवेत) व पतिसमवेत संध्या काळीं डोंगरावर फिरावयास जातांना सुशीलेलाहि जणुं काय सहजच म्हणून बोलावलें. सुशीलेनें कशाकरितां तें ओळखलेंच व आनंदानें, किंबहुना उत्सुकतेनें, त्यांच्याबरोबर फिरावयास जाण्याचें कबूल केलें. तिला तरी हेंच पाहिजे होतें; कारण आपल्याबद्दलचा गैरसमज दूर करावा अशी तिचीहि इच्छा होतीच.

फिरावयास जातांना सुशीलेशीं संभाषण कांहींच झालें नाहीं. मला कांहीं महत्त्वाच्या बाबतींत तुझ्याशीं बोलावयाचें आहे, एवढें मिसेस् स्वीट यांनीं शाळेंतून बाहेर पडल्याबरोबर तिला सांगून टाकलें होतें; पण कांहीं वेळ त्या

आपल्या पतीबरोबर आसपासच्या झाडांबद्दल, पक्ष्यांबद्दल, त्यांच्या घरट्यांबद्दल, हवेबद्दल वगैरे बोलत होत्या.

"किती सुंदर आहे देखावा! सकाळीं पाऊस पडला तेव्हां एवढी उघाडी संध्याकाळीं होईल असं वाटलं देखील नाहीं." ती म्हणाली.

"हवा चांगली पडली आहे; पण एखादवेळेस एकदम परवांसारखा पाऊस यायचा-आजकालची हवा म्हणजे बायकांच्या स्वभावासारखी चंचल आणि मनांत काय आहे याचा थांग लागूं न देणारी अशी आहे." मिस्टर रॉबर्ट स्वीट विनोदस्मितपूर्वक म्हणाले.

ते हें सहजच बोलले; पण सुशीलेला तें जरासें लागलें, तेव्हां मिसेस् स्वीट म्हणाल्या, "पुरे झाली तुमची स्त्री-निंदा."

"मी स्त्री-निंदा करीत नाहीं. एकदम वादळ येईल, तर आपण आज लांब फिरायला जाऊं नये हें सुचवतों."

"तुमचीं इतर भविष्यं जशीं पुष्कळशीं खोटीं ठरलीं तसं हेंहि ठरेल; माझी खात्री आहे."

"बरं आहे. तुमचं म्हणणं मला खरं वाटत नाहीं; पण म्हातारपणीं देखील माझं स्त्री-दाक्षिण्य नष्ट झालं नाहीं हें दाखविण्याकरितां मी तुमचं ऐकतों. चला डोंगरावर, तुमची इच्छा आहे तर."

वाटेंतील भातशेतांतून जातांना तेथील वडाऱ्यांचीं घाणेरडीं खोपटीं व मुलें आणि 'पपी'चा दुरून वास येऊन भुंकूं लागलेलीं कुतरडीं पाहून मिसेस् स्वीट म्हणाल्या, "मगाचच्या प्रोकीन् लोकांच्या विलायती फुलांच्या सुंदर बागा आणि त्यांतले ते सुसंस्कृत लोक, त्यानंतर दिसणारीं हीं बिननांगरलेलीं आणि भाताच्या खुंटांनीं भरलेलीं शेतें आणि त्यांतल्या झोंपड्यांत राहाणारीं हीं क्रिस्तपूर्वकालीं जशीं होतीं तशींच राहिलेलीं रानटी माणसें, तसेंच एकीकडे हा रेल्वेचा धुमधडाका आणि टाटाचा हा प्रचंड तलाव व दुसरीकडे हा सर्वांकडे तुच्छतेनें पाहाणारा भव्योदात्त पर्वत-हा एकंदर देखावा पाहून माझं तरी मन थक्क होतं. मौज आहे नाहीं का रॉबर्ट!"

"तसंच पाहिलं तर सगळं जगच मौजेचं आहे" मिस्टर स्वीट म्हणाले. "आपल्या देहांत काय मौज आणि विरोध कमी आहे? हाडांतलीं-रक्तांतलीं

द्रव्यें जड; वाढ वनस्पतीसारखी, अशन–पान–मैथुनादि पुष्कळशा प्रेरणा पशूंसारख्या; कांहीं वासना, कांहीं चालीरीती रानटी लोकांसारख्या; पोषाखांत, भाषाप्रकारांत वगैरे मध्ययुगीन मिश्रण; बाह्य आचार–विचार कांहीं एकोणीसाव्या शतकांतले आणि कांहीं विसाव्या शतकांतले; मनांतले अस्पष्ट, अमूर्त, पण आंतल्या आंत माशासारखे वळवळणारे व मधूनमधून वर उड्या मारून चकाकणारे विचार अगदीं आतांचे–या सालचे; आणि आकांक्षेची नजर New Jerusalem कडे–नवीन येणाऱ्या युगाकडे ! हें नव्या–जुन्याचें बऱ्या–वाईटाचें मिश्रण मगाचच्याहून का कमी आश्चर्यकारक आहे ?"

"कमी मुळींच नाहीं. बाकी तुम्ही म्हणतां, रॉबर्ट, तेंच खरं आहे. जगांतली प्रत्येक वस्तु–प्रत्येक गोष्ट–आश्चर्यपरिपूर्ण आहे. हें पॅशन्–फ्लॉवर ( कृष्णकमल ) पाहा–How lovely ! आणि नास्तिक लोक पुन्हां म्हणतातच आहेत, कीं जगाला कांहीं हेतु नाहीं, जग हें अहेतुक आहे."

"हेतु असेल; पण तो काय आहे याबद्दल संशय आहे. नास्तिक लोकांबद्दल गैरसमज करून घेऊं नकोस." रॉबर्ट स्वीट म्हणाले.

"मला तुमचे हे सूक्ष्म भेद नको आहेत, मी आपली..."

"बायकांना तत्त्वज्ञान आवडायचं नाहीं असं ॲरिस्टॉटल् म्हणतो, तें मी विसरलोंच." मिस्टर स्वीट स्मितपूर्वक म्हणाले व "आपल्या या सुशीलेलाहि विसरलों !" असें म्हणून संभाषणाचा ओघ बदलला आणि 'पपी'ला शीळ घालून बोलावून जवळ आणून "मी आतां 'पपी'बरोबर डोंगरावर जरासा जाऊन येतों, तुम्हांला काय बोलायचं आहे तें बोलून घ्या" असें ते म्हणाले व निरोगी व उत्साहपूर्ण वृद्धपणांत जितक्या जलदीनें चालतां येईल तितक्या जलदीनें ते चालूं लागले. "जरा सावकाश चला" मिसेस् स्वीट म्हणाल्या व मग त्यांनीं विनोदबुद्धीनें स्मितपूर्वक भाष्य केलें, "–तुमच्याकरितां नाहीं म्हणत मी, आपला 'पपी' आतां म्हातारा झाला आहे, त्याच्याकडे पाहा जरा. त्यानें आपली फार सेवा केली आहे. त्याला आपण संभाळलं पाहिजे."

"कुत्र्याला आपण बाळगतों आणि संभाळतों असं आपण मानतों, पण कुत्रा मानतो, कीं मी यांना बाळगलं आहे आणि मी यांना संभाळीत आहे— एका जर्मन तत्त्ववेत्त्यानं असा शोध लावला आहे–तुला सांगितलं नाहीं का परवां ?" असें कांहीं तरी म्हणून मिस्टर स्वीट वाट चालूं लागले व 'पपी'हि त्यांच्या पाठोपाठ गेलाच.

लगेच मिसेस् स्वीटबाईंनीं गंभीर स्वरानें सुशीलेला म्हटलें, "सुशीला, काय आहे प्रकरण तुझ्याबद्दलचं, खरं सांग; मी तुझ्या आईप्रमाणं–आजीप्रमाणं आहें, तूंहि तसंच मानतेस; तर खरं सांग. जॉन काफचे आणि तुझे संबंध कोणत्या प्रकारचे आहेत?"

"ते मोहित झाले आहेत व माझ्या नादीं आहेत–मजजवळ त्यांनीं लग्नाची गोष्टहि काढली होती. तुम्हांला ठाऊक आहे, कीं ते अगदीं पोरवयाचे आहेत आणि मी फार मोठी नसलें तरी हिंदु विधवा आहें. मला सगळ्या या गोष्टी समजतात. मी बेजबाबदार रीतीनें वागलें नाहीं आणि वागणारहि नाहीं."

"माझा तुझ्यावर विश्वास आहे -अगदीं पूर्ण विश्वास आहे. तूं वाईट रीतीनं वागणार नाहींस हें खरं, पण तुझं त्याच्यावर प्रेम आहे का?"

"लग्न करावं अशा प्रकारचं नाहीं."

"मग त्याला तूं उत्तेजन देऊं नकोस–आणि एक चुकलं नाहीं का, कीं तूं माझ्याशीं या बाबतींत कांहीं बोलली नाहींस? नियमांच्या दृष्टीनें नाहीं मी म्हणत, तुझे नि माझे प्रेमाचे संबंध म्हणून मी बोलत आहें."

"सांगितलं असतं मीं; पण तुम्हीं त्या बिचाऱ्याचं नुकसान केलं असतंत,– 'तुम्हीं' म्हणजे लोकांनीं–म्हणून मी लपवून ठेवूं पाहात होतें. तो बिचारा सज्जन आहे, त्याचं नांव उगाच बद्‌ झालं असतं."

"तुझं त्याच्यावर प्रेम नाहीं हें मीं ओळखलं होतं; पण कोणी सांगावं काय असेल तें, म्हणून आपलं मीं विचारलं. आणि तुला खरं सांगूं का–तुझ्या आई-बरोबर गेल्या महिन्यांत जो तरुण पुरुष आला होता–'बळवंतराव' का कोण तो–आणि ज्याची बायको आणि मुलगी नुकतीच मेली म्हणून तुमच्या गोष्टी निघाल्या होत्या–त्याचं तुझ्यावर खरें प्रेम आहे आणि तुझंहि त्याच्यावर खरं प्रेम आहे. मी म्हातारी आहें आणि माझी दृष्टि मंद झाली आहे; कानहि थोडेसे बहिरे झाले आहेत; पण कोणाचं प्रेम कोणावर आहे हें माझ्या डोळ्यांना अद्यापि ओळखतां येतं आणि कानांनाहि शब्दांच्या स्वरांवरून समजतं. मी बोलतें तें खरं का नाहीं?"

"सामान्यतः खरं आहे; पण अगदीं पूर्णपणें यथार्थ नाहीं. सत्याचा त्यांत अंश आहे एवढंच."

" तें कसं का असेना, तूं एका वर्षाच्या आंत येथून जाणार. पुढं तुझी तूं मुखत्यार आहेस. इथें आहेस तोंपर्यंत जपून वाग. जॉन काफ् हा सज्जन आहे हें तुझं म्हणणं बरोबर आहे. त्याचं प्रेम खरं आहे, पण तें टिकाऊ नाहीं."

" मीं त्याला तेंच सांगितलं. त्याच्या नांवावर कोटि करून मीं त्याला म्हटलं, कीं ' Your love is calf-love.' त्याबरोबर तो हंसला आणि म्हणाला, ' Punning is not proving.' मी त्याला कांहीं उत्तर देऊन सगळं हंसण्यावारी नेऊं लागलें; पण बिचाऱ्याला तें फार वाईट वाटत होतं. But after all he is a sport. He bore it well."

" जॉन काफ्च्या बाबतींत मी आतां निभ्रान्त झालें आहें. मी खोट्या लोकापवादांना भीक घालीत नाहीं. तूं निर्धास्त राहा. पण तूं क्रिस्ती धर्माविरुद्ध भलतं भलतं बोलतेस, या आरोपाबद्दल तुझं काय म्हणणं आहे ? "

" तुम्ही माझीं पत्रं वाचतां, त्यांतहि मीं क्रिस्ती धर्माची व त्याबरोबर माझ्याहि धर्माची अर्धवट विनोदानं चेष्टा केली आहे. त्याप्रमाणेंच मी मधून मधून बोलतें. माझीं मतं तुम्हांला ठाऊकच आहेत. अलौकिक चमत्कारांवर वगैरे मीं आतां कसा विश्वास ठेवूं ? आणि तुमचा तरी आहे का ? आणि इतके दिवस मीं हा प्रश्न विचारला नव्हता; पण आपली परवानगी असली तर विचारतें..."

" चालूं दे. विचार."

" मला असं विचारायचं आहे, कीं आपली रोमन कॅथॉलिक पंथावरची श्रद्धा अंध नाहीं का ? पोप हा तरी मनुष्यच, मग तो स्खलनशील नाहीं असं तुम्हीं कसं मानतां ? मेरी ही क्राइस्टला जन्म देते, मग ती ' अदूषित ' कुमारी कशी ? असे कितीक प्रश्न आहेत."

" तूं ज्या भक्तिभावानं विचारते आहेस त्याला अनुरूप अशा सद्भावानं आणि सत्यभक्तीनं मी तुला उत्तर देतें. मी तुझ्यासारख्याच अवस्थेंत एके काळीं होतें. लग्नाच्या आधीं मी हिंदुस्थानांत ५-६ वर्षं होतें. तेव्हां मला कॅथॉलिक पंथ सोडून द्यावासा वाटूं लागला होता. पण मी विलायतेस गेल्यावर: माझी आणि रॉबर्टची गांठ पडली. तो प्रथम विवेकवादी ( रॅशनॅलिस्ट ) होता. पण पुढं कॅथॉलिक झाला होता. त्याच्याशीं माझं पुष्कळ बोलणं होत असे. आणि त्यानं मला अध्यात्मिक प्रकाशाचा लाभ करून दिला आणि माझं जीवित

प्रसन्न आणि मधुर केलं. त्यानं माझ्या सगळ्या शंका दूर केल्या. तो बाहेरून जितका खेळकर व खोडकर दिसतो तितका तो आंतून गंभीर आणि कोमल आहे. त्यानं मला पटवून दिलं, कीं जगांत सगळ्या गोष्टी श्रद्धेवर चालल्या आहेत. प्रत्येक युगाच्या व माणसाच्या श्रद्धा निरनिराळया असतात एवढंच! जो तो आपल्या श्रद्धेला 'विवेकपूर्ण विकास' म्हणतो व इतरांच्या श्रद्धेला भोळसटपणा, अंधभक्ति, गाढ अज्ञान अशीं नांवं ठेवतो. उदाहरणार्थ, अलीकडे डॉक्टर, केमिस्ट, जीवशास्त्रज्ञ या तज्ज्ञांचं युग असल्यामुळं त्यांचीं मतं लोक न समजतां, न विचार करतां, मान्य करतात. बरं, मौज अशी, कीं हे 'तज्ज्ञ' स्वतः वारंवार बजावून सांगत असतात, कीं आम्ही अद्यापि शास्त्राच्या कांठावर आहोंत म्हणून! खोल सागरांत जाऊन तेथील थांग लावण्याचं अद्यापि फारच दूर आहे. आमचीं सत्यं हीं तात्पुरतीं सत्यं (Hypotheses) असं तेच म्हणत असतात; पण लोक त्यांच्या 'तात्पुरत्या सत्यांना' सिद्धान्त समजून कांहीं तरी भकत असतात! बरं, त्या त्या शास्त्रांत ते 'तज्ज्ञ' प्रमाणभूत मानणाऱ्या या युगांत नैतिक आणि अध्यात्मिक गूढ विषयांच्या बाबतींत 'पोप'सारख्या विद्वान्, सूज्ञ, सत्कर्मरत, सच्छील, अनुभवी माणसाचं म्हणणं खरं मानलं तर त्यांत चुकलं कुठं? दांत आणि संधिवात (Rheumatism) यांचा आपल्याला कांहीं संबंध दिसतो का? पण डॉक्टरनं म्हटलं, कीं दांत बिघडले आहेत म्हणून हा संधिवात झाला आहे, म्हणजे तें आपण खरं मानतों. तसंच पूर्वीच्या युगांतल्या भुताखेतांप्रमाणें अलीकडे हरतऱ्हेच्या सूक्ष्म जंतूंचं बंड माजलं आहे; पण जीवशास्त्रज्ञाला 'जीव' म्हणजे काय हें विचारलं तर तें मात्र सांगतां येत नाहीं. आणि तो म्हणे 'जविशास्त्रज्ञ!' रॉबर्ट असं म्हणतो, कीं श्रद्धेशिवाय या जगांत चालायचं नाहीं–त्या त्या युगांत त्या त्या शास्त्रांत जे 'तज्ज्ञ' असतील (म्हणजे मानले जात असतील) त्यांचं सामान्य माणसांनीं ऐकणं हें श्रेयस्कर आहे. अर्थात् नैतिक आणि अध्यात्मिक बाबतींत 'पोप'सारख्या नीतिश्रेष्ठ माणसाचं ऐकण्यांत कमीपणा काय आहे? त्याचं ज्ञान, त्याचा अनुभव, त्याचं शील–सगळंच आपणांपेक्षां अधिक आहे. तर मग आरोग्याच्या बाबतींत जसं डॉक्टरचं आपण बिनदिक्कत ऐकतों, तसं अध्यात्मिक बाबतींत 'पोप'चं कां ऐकूं नये? मला हा विचार पटला आणि मनाला समाधान झालं. पुढें आमचं लग्नहि झालं आणि मिशनच्या कामाला अविवाहित पाद्री पाठविण्याचा जरी मिशनचा शिरस्ता असला, तरी इथल्या

शाळेंतल्या माझ्या पूर्वीच्या कामाकडे लक्ष देऊन आणि रॉबर्टची शिफारस खुद्द आर्चबिशपकडून होऊन आम्हांला या शाळेवर नेमलं. तर, माझ्या श्रद्धेचं हें असं आहे........"

"माझं कांहीं समाधान होत नाहीं," सुशीला म्हणाली. "पण ही चर्चा आतां नको. हे पहा ढग येताहेत. लवकर निघालों नाहीं तर पाऊस आपल्याला वाटेंत गांठील. परवांच्यासारखं वादळ आलं तर फारच पंचाईत होईल."

"रॉबर्टचंच भविष्य खरं होणार असं दिसतंय्." मिसेस् स्वीट म्हणाल्या. "How he will enjoy his victory over me! He will welcome a storm now. पण वादळ यायच्या आंतच आपण निघूं या. रॉबर्ट कुठें आले आहेत? त्यांना पाऊस सोसायचा नाहीं. पाऊस मला आवडतो म्हणतात; पण या एप्रिल अखेरअखेरपासूनच ते जास्त आजारी पडतात असा आज माझा १५–२० वर्षांचा अनुभव आहे. ते मात्र कबूल करायचे नाहींत." असें म्हणताहेत तों मिस्टर स्वीट व त्यांचा 'पपी' तेथें आले. मिस्टर स्वीट यांना पाऊस पडून आपली पत्नी भिजेल अशी खरी खरी काळजी पडलेली दिसली; पण बोलून न दाखवतां ते चालूं लागले व जातां जातां "काय, दोघींचं काय ठरलं? प्रकरणाचा निकाल लागला कीं नाहीं? बाकी हा प्रश्नच चुकीचा आहे. निकाल ठरलेलाच आहे. माझी पत्नी नेहमींच बरोबर आणि तिचा प्रतिपक्षी नेहमीं चूक, हाच निकाल माझ्या उभ्या जन्मांत माझ्या अनुभवाला आलेला आहे! आणि (ढगांकडे पाहून किंचित् स्मित करून) आजहि येईल कदाचित्!!"

मिसेस् स्वीट पुढें काय बोलल्या हें कोणाला ऐकूं गेलं नाहीं; कारण एकदम आभाळांत गडगडाट झाला. विजाहि मग चमकूं लागल्या. वारा इतका सोसाट्याचा सुटला, कीं जिकडे तिकडे धूळ उडून सूर्यास्तापूर्वीच अंधार झाला. मिस्टर स्वीटनीं मिसेस् स्वीटचा एक हात धरला व सुशीलेनें दुसरा धरला; आणि तीं तिघेजणें व 'पपी' डोंगरावरून कशींबशीं खालीं आलीं. इतक्यांत वाऱ्याचा सों सों आवाज आणि ढगांचा गडगडाट यांच्या साथींत पावसाचे टपोरे थेंब पडूं लागले. ते तापलेल्या शेतांवर पडल्यामुळें त्या वेळीं जो एक प्रकारचा वास येऊं लागला, त्याच्याकडे कोणाचें लक्ष जाणार? हा सर्व प्रकार १०–१५ मिनिटांच्या अवकाशांत झाला. 'पपी'सह सगळींजणें घाबरलीं व

एकमेकांबद्दल चिंता करूं लागलीं. मिस्टर स्वीट यांना वाटलें, कीं मी आपला डोंगरावर भटकत राहिलों म्हणून उशीर झाला आणि आपल्या पत्नीला व सुशीलेला आपल्या नादिष्टपणामुळें त्रास होत आहे. मिसेस् स्वीटला वाटलें, कीं आपण दोन बायका गुह्य गोष्टी बोलत आहोंत असें पाहून आपला पति भोंवतीं भोंवतीं रेंगाळत राहिला असला पाहिजे. सुशीलेला वाटलें, कीं आपण भलताच प्रश्न काढून मिसेस् स्वीट यांचा वेळ घेतला. 'पपी'ला काय वाटलें असेल कुणाला ठाऊक; पण तोंदेखील या तिघांचें कसें होणार या चिंतेनेंच कीं काय, मधून मधून त्यांच्याभोंवतीं जीभ काढून धांपा टाकीत घिरट्या घालीत होता व काळोखांत वाट दाखविण्याचें काम करीत होता. त्यांची शाळा तेथून ३०–४० मिनिटांच्या रस्त्यावर होती; पण आतां पाऊस धो धो पडूं लागल्यामुळें छत्र्या निरुपयोगी ठरून सगळे कपडे भिजले, बुटांना चिखलाचे दाट लेप लागून ते जड झाले व या सुसंस्कृत लोकांना, असंस्कृतीच्या काळांत काळोखांत पाऊस पडत असतां रानटी लोकांना काय वाटत असेल याचा थोडासा अनुभव आला. मिस्टर स्वीट हे एवढे धीट, पण ते देखील घाबरले. अर्थात् स्वतःपेक्षां या दोन स्त्रियांचें आतां कसें होईल याबद्दल अधिक भीति होती. बायकांना वाटलें, कीं आतां वाटेंत कोणा मवाल्यानें धरलें तर काय करायचें ? आणि मिसेस् स्वीटला दुसरी अशी काळजी वाटली, कीं मिस्टर स्वीट ओलेचिंब भिजले आहेत, ते आजारी पडले तर काय करायचें ? नेहमींच्या मानानें अर्ध्यापाऊण तासाचाच रस्ता; पण आज अधापाऊण तास झाला तरी निम्मी वाट संपली नाहीं. जेमतेम ही मंडळी मोठ्या रस्त्याला लागली; पण तेथें तर उलट जास्तच भीति वाटूं लागली—कारण गाड्या आणि मोटारी ! शिवाय मोटारींच्या उजेडांत त्यांना कांहीं न दिसतां मोटारींतल्या लोकांना मात्र तमाशा पाहाण्याला सांपडावयाचा ही भीति ! मिस्टर स्वीट हे गाडी किंवा मोटार भाड्यानें मिळते कीं काय हें हात वर करून पाहाण्याचा प्रयत्न करीत, पण दोनतीन मोटारी आल्या, त्या न थांबतांच डोळे दिपवून व चिखल उडवून मात्र गेल्या ! नंतरची एक थांबली; पण आंत पॅसेंजर होते त्यामुळें इलाज नव्हता. इतक्यांत एका वळणाशीं त्यांच्या तोंडावर हातांतल्या विजेच्या बत्तीचा उजेड पडला व कसला काय म्हणून विचार करताहेत, तोंच त्यांच्या अंगावर दोघेजण धांवून आले. मिसेस् स्वीटला एकानें खालीं पाडलें व तिच्या गळ्यांतील सांखळी व हातांतलें रिस्टवॉच तो काढूं लागला.

दुसऱ्यानें मिस्टर स्वीट यांना आदळलें व त्यांचे खिसे तो चांचपूं लागला. सुशीलेनें प्रसंगावधान राखून मिसेस् स्वीटच्या छातीवर बसणाऱ्याच्या हातांतली विजेची बत्ती हिसकावून घेतली व त्याला मागून ओढून खालीं पाडलें व बुटाच्या लाथा मारून रक्तबंबाळ केलें. मिस्टर स्वीट यांना लोळवणारा इतक्यांत त्यांच्याशीं धडपड करण्याचें सोडून देऊन आपल्या सोबत्याला सोडविण्याकरितां येऊं लागला; पण 'पपी'नें त्याच्या पायाचा असा चावा घेतला, कीं तो खालतीं लोळूं लागला व शिवीगाळी पुटपुटूं लागला. मिस्टर स्वीट या संधींत उठले, पण त्यांना घेरी येऊन ते पडलेच. 'पपी' निश्चेष्ट पडलेल्या मिसेस् स्वीटसभोंवतीं, हुंगत, भुंकत व घिरट्या घालीत होता, तो आतां आळीपाळीनें मिस्टर स्वीटभोंवतींहि तसें करूं लागला. सुशीलेनें रक्तबंबाळ केलेला मवाली उठला व तिच्याशीं दंगामस्ती करूं लागला; पण सुशीलेनें धैर्यानें या संकटाला तोंड दिलें. 'पपी' या संधींत जणुं कांहीं शहाण्या माणसाप्रमाणें धनीधनिणींना क्षणभर सोडून त्यांच्या प्रिय शिष्यिणीला वांचविण्याकरितां धांवला व तिला त्यानें सोडविलेंहि. मिस्टर स्वीट यांना पाडणारा पहिला मवाली लवकरच तेथून निसटला; पण दुसरा पळूं शकत नव्हता. थोड्याच अवकाशांत एक मोटर आली व पुढची व्यवस्था यथायोग्य रीतीनें लागली. कपडे वगैरे सांवरल्यावर, मवाल्यांच्या भोंवतीं जमलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्यें येऊन सुशीलेनें व मिस्टर आणि मिसेस् स्वीट यांनीं आपआपल्या परीनें एकमेकांची अर्धवट थट्टा करीत हकीगत सांगितली व मग त्या मवाल्याकडे वळून हे असले धंदे कशाकरितां करतोस म्हणून ती मंडळी विचारूं लागली.

" देशाकरितां ! " तो म्हणाला. " देशाकरितां आणि धर्माकरितां ! त्यांना या युरोपिअन लोकांच्या, या खिश्चन लोकांच्या जाचांतून सोडविण्याकरितां मीं हें केलं. बस्स ! याच्यापुढं मी बोलणार नाहीं. माझं नांव, गांव, पत्ता, कांहीं एक तुम्हांला कळणार नाहीं. तुम्हीं मला सामान्य चोर समजाल. खुशाल समजा ! "

" Religion and patriotism, how many sins are committed in your names." ( धर्मा आणि देशाभिमाना ! तुमच्या नांवानें किती तरी पापं घडत आहेत ! " सुशीला एकदम उद्गारली !

**सोनगांव**

"**सुशीलाबाईस** सुनंदाचा नमस्कार. मागें बाळूच्या मुलाचें शोकजनक वृत्त कळविलेंच. आतां त्याची पत्नीहि मुलापाठोपाठ गेल्याचें वृत्त कळवावयाचें आहे. पुष्कळ दिवस ही गोष्ट लिहून कळवावी म्हणत होतों, पण कांहीं तरी निमित्त होऊन लिहिण्याचें लांबणीवर पडत गेलें. क्षयादि रोग उत्पन्न करण्यांत त्या 'न्यायी' 'दयाघन' देवाचा हेतु काय असेल तो त्यालाच ठाऊक!

त्याला मुली सांगून येऊं लागल्या आहेत; चांगल्या मोठ्याहि आल्या आहेत. आमच्या कॉलेजांतल्या एका मित्राची बहिण आहे, तिला तो घेऊन माझ्याकडे आला आणि पूर्वीच्या मैत्रीचा फायदा घेऊन मला तो बाळूचें मन वळविण्याबद्दल आग्रह करूं लागला. मनुष्य फार चांगला आहे; पण इरतऱ्हेच्या आपत्तींमुळें त्याचें माथें थोडेंसें फिरलें आहे. सगळा समाज बिघडला आहे, सगळे लोक चोर, लबाड आहेत, यांना चोप देऊन वठणीवर आणलें पाहिजे, असें तो म्हणत असतो. शिवाजीनें सुरत लुटलें, त्याप्रमाणें कांहीं देशाभिमानी लोकांनींहि मुंबई, महाबळेश्वर, माथेरान, लोणावळा वगैरे ठिकाणीं बंगले बांधून राहणाऱ्या खुशालचेंडूंना लुटून स्वराज्य संपादावें अशा गोष्टी तो बोलत असतो. मीं मागें एकदां असल्याच फंदांपासून त्याचें मन परावृत्त केलें होतें; पण हल्लीं तो चिडून गेला आहे. त्याचा मार्ग मूर्खपणाचा आहे; पण समाजाची सुधारणा झाली नाहीं तर असले लोक निर्माण व्हावयाचेच!

त्याच्या वतीनें मीं बाळूजवळ गोष्ट काढली. लग्न पुन्हां कर, विधुरावस्थेंत राहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं, मुलगी चांगली आहे, मोठी आहे, वगैरे मीं सांगितलें. खरें सांगावयाचें, म्हणजे लग्न करण्याबद्दल मीं आग्रहहि केला. त्याचें मन वळूंहि लागलें होतें. देशाभिमानी मनुष्यानें लग्न करूं नये, कांदाभाकरी खाण्याची संवय करून ठेवून तुरुंगांत जाण्याचें शिक्षण घ्यावें, अशा प्रकारची माझीं लहानपणीं मतें होतीं आणि दोन दिवस मीं तसा प्रयत्नहि केला होता (आतां त्याचें हसूं येतें!), पण माझीं मतें आतां बदललीं आहेत. विवाह देशाभिमानाच्या आड येत नाहीं, आपलें मनच कच्चें असतें, असें आतां माझें मत झालें आहे. बाळू तर पहिल्यापासूनच समतोल बुद्धीचा. विवाह

करावयाचा नाहीं वगैरे फंदांतला तो नाहीं. विवाह पुन्हां करण्यास तो तयार आहे; परंतु ' सध्यां नको ' एवढेंच म्हणतो.

माझें ठीक चाललें आहे. जगांतील आपत्ति-विपत्ति पाहून मन भांबावून जातें. माणसें एकत्र येतात काय, जातात काय, सर्वच पोरखेळ वाटतो. पण हा खेळ तरी कसला ? देवाचा खेळ होतो, पण आमचा जीव जातो !

उत्तराची अपेक्षा नाहीं. भेटीअंतीं बोलूं. बाकी बोलावयाचें आहे काय ? आणि तूं तरी असल्या प्रसंगीं काय बोलणार ? "

तुझा बालमित्र,
" सुनंद "

---

## २८ : एका धोंड्यानें दोन पक्षी मारण्याचा ( का जिवंत करण्याचा ? ) प्रयत्न

क्राइस्टस् क्रॉस् स्कूल, लोणावळें,
रविवार

" प्रिय बळवंतराव यांस, सा. न. वि. वि.

दोन महिन्यांपूर्वी घडलेल्या अत्याचाराची हकीगत घरच्या पत्रांत लिहिली होती, ती आपणांस दाखविण्यास सांगितलें होतें व आपण वी वाचली असेलच. पुष्कळ दिवसपर्यंत अत्याचारी गृहस्थानें-( तो गृहस्थ आहे, सुशिक्षित आहे, चांगलाही आहे; पण भलत्या मार्गाला लागलेला आहे, हें पुढील हकीगती-वरून दिसून येईलच )-त्या गृहस्थानें तोंड उघडलें नाहीं; परंतु पोलिसांच्या ' समजुती 'मुळें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं हेतूमुळें म्हणा, त्यानें पंधरा एक दिवसांपूर्वी तोंड उघडलें आणि आणि ज्या कांहीं गोष्टी सांगितल्या त्या चमत्कारिकच ! त्यांच्याशीं आपला संबंध असल्यामुळें मिसेस स्वीटबाईच्या परवानगीनें हें पत्र लिहीत आहें.

"या अत्याचारी गृहस्थाचें नांव गणपतराव आगटे. आपल्याच तालुक्यांतल्या 'नाणवली ' गांवचा. तेथें त्याची इस्टेट चांगली होती; पण त्याचे वडील वारल्यावर हरतऱ्हेच्या लुच्चे लोकांनीं बुडवली व लुबाडली-म्हणजे ज्यांनीं कर्ज घेतलें होतें,

त्यांनीं तें हरतऱ्हेच्या कायदेबाजी करून बुडविलें व ज्यांचें कर्ज होतें त्या मारवाड्यांनीं तसेंच करून लुबाडलें. वडील वारण्याचें कारण अतिश्रम–अतिश्रम कां, तर मुलग्याच्या शिक्षणाकरितां व मुलींच्या लग्नाकरितां. श्रमामुळें जो रोग झाला त्याची योग्य चिकित्सा झाली नाहीं. जो डॉक्टर बोलावला होता त्याला रोगाचें निदान होईना; पण दुसऱ्या डॉक्टरला बोलावलें तर आपल्या हातची केस जाईल व आपल्याकडे कमीपणा येईल, म्हणून त्यानें दडपून आपल्या अंदाजानें जें सुचलें तें केलें व—अबुद्धिपुरःसर त्या माणसाचा बळी घेतला, त्याचीं पोरेंबाळें उघडीं पाडलीं आणि लुच्चे लोकांना आपआपली लुच्चेगिरी करण्याला वाट मोकळी करून दिली ! पैशाच्या मोहामुळें काय ही अनर्थपरंपरा ! खाजगी मालमत्तेची पद्धति जगांतून हळूहळू नाहींशी करण्याच्या उद्योगाला लागण्याची वेळ येत चालली आहे, असें जें माझें मत होऊं लागलें आहे त्या मतानें आज दोनचार दिवस फारच उचल खाल्ली आहे. पैसा नसल्यामुळें या गणपतराव आगट्याला शिक्षण मिळालें नाहीं; पण जात्या तो सत्प्रवृत्तीचा असल्यामुळें मोठा देशाभिमानी आहे, निदान त्याच्या बोलण्यावरून असें वाटतें. परंतु शिक्षणाच्या अभावीं भलत्याच मार्गाला लागला. सर्व शिक्षण मोफत असतें तर हा भलत्या मार्गाला लागला असता काय ?

" त्याचें मन बहकण्याला दुसरें कारण असें झालें. त्याचें मन एका अनुरूप मुलीवर–विधवेवर जडलें; पण ती विधवा लग्नाला तयार नाहीं. (इच्छा आहे, पण धैर्य नाहीं.) अर्थात् तो 'प्रेमवेडा' होऊन गेला आहे. अशा स्थितींत या वयांत मनाचा समतोलपणा कोठला टिकायला ?

" त्यांत पुन्हां त्याची बहीण मोठी आहे. तिच्या लग्नाची त्याला काळजी होती. ती वयानें १७-१८ वर्षांची आहे; पण शिक्षण बेताचेंच. तिला उजवून टाकण्याकरितां त्यानें आपल्याशीं बोलणें केलें; पण आपण नाहीं म्हटलें. याविषयीं तो संभाषणांत म्हणाला, 'आणि तें बरोबर आहे, त्याचं मन इंग्रजी शिकलेल्या एका विधवेवर जडलेलें आहे म्हणे ! सुशीला का कायसं तिचं नांव आहे. पुनर्विवाह केलान् तर मला आनंदच आहे–आणि लवकरच तो करणार आहे म्हणे–पण माझ्या बहिणीशीं लग्न केलं असतं म्हणजे मी एका काळजींतून सुटलों असतों.' गणपतराव हें सर्व सहजगत्या म्हणत होता. त्याची आणि आपली व सुनंदरावांची ओळख आहे कॉलेजमधली ! पण तो मला ओळखीत नाहीं असें दिसतें; मात्र हें ऐकत असतांना मला काय वाटलें असेल, कल्पना करा !

“ सुनंदरावांचा तो वारंवार उल्लेख करतो. ‘ राजकारणांतल्या बॉंबच्या बंगाली कटांत मी आहें असा संशय सुनंदरावांना आला व मला एकीकडे नेऊन यापासून परावृत्त करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला; गांधींचा खादीचा मार्गच सध्यांच्या स्थितींत चांगला असें सांगितलें. पण सुनंदरावांबद्दल मला कितीहि आदर असला–बोले तैसा चाले अशा कोटींतला तो आहे, शिक्षण पुरें झालें नाहीं म्हणून मागें पडला, नाहीं तर तो मोठ्या योग्यतेला चढावयाचा !–सुनंदराव व्यक्तिशः कितीहि चांगले असले, तरी त्यांचीं मतें मला पसंत पडेनात, म्हणून मी बंगाली कटांत सामील झालों आणि देशकार्याकरितां पैसा पाहिजे म्हणून वाटमारीचा धंदा करूं लागलों–असें तोच कबूल करतो ! हा गृहस्थ दोषी तर खराच ! पण त्याच्यापेक्षां विकृत समाजस्थिति अधिक दोषी नाहीं का ? मला तर वाटतें, कीं He is more sinned against than sinning.

“ पण हें मला लिहावयाचें नाहीं. मला खरें लिहावयाचें आहे तें आपल्या –म्हणजे तुमच्या–लग्नाविषयीं. कारण आपलें लग्न होणें शक्य नाहीं व इष्ट नाहीं असें सध्यां तरी माझें मत आहे. (आडपडदा न ठेवतां एकदम सरळपणें व स्पष्टपणें या बाबतींत बोलावें असें माझें मत होत चाललें आहे व तें मी आचरणांतहि आणतें आहें; हें यावरून दिसून येईलच.) कारणें अशीं:– विवाहव्यवस्था व एकंदर सर्व समाजव्यवस्था या बाबतींत माझीं मतें चमत्कारिक (म्हणजे सरळ व चांगलीं; पण **लोकांना** चमत्कारिक वाटणारीं)–अशीं होत आहेत. आपणाला तीं ठाऊक आहेत, कांहीं अंशीं पसंत आहेत; पण आपण वस्तुस्थिति, भविष्य आणि वर्तमान, यांचा मेळ घालूं पाहाणारे आहांत. मलाहि तेंच पाहिजे आहे; पण मेळ घालणें साधणार नाहीं असें वाटतें. वस्तुस्थितिरूपी शिलेंतून ध्येयमूर्ति हळूहळू उत्पन्न करणें हें आपलें ध्येय आहे. आपलें वर्तनहि तसेंच आहे; पण मला आंतून असें वाटतें, कीं अन्तिम ध्येय एकदां शब्दरूपानें कां होईना शुद्ध स्वरूपांत जगापुढें यावें.

“ ध्येयाचें सगुण, जिवंत, हलतें–बोलतें, हंसरें–खेळतें रूप पाहण्याचें आपल्या नशिबीं नसलें तरी स्पष्ट शब्दचित्र तरी कां काढूं नये, अशी माझी वृत्ति होऊं लागली आहे. आपण म्हणणार, कीं ‘ शब्द पुष्कळ वेळां घाण करतात. जें करावयाचें तें करावें; बोलण्यानें बिघाड होतो.’ मलाहि हें पटतें; पण आपला हा ‘ योग ’—हें ‘ कर्मसु कौशल ’–मला साधत नाहीं.

" शिवाय, (आणि पुनर्विवाह न करण्याचें हेंच खरें कारण आहे) मला जें बोलून टाकावेंसें वाटत आहे, माझें अवतारकृत्य म्हणून जें मला वाटत आहे—तें सुपरिणामकारी होण्याकरितां माझें वर्तन माझ्या दृष्टीनेंच नव्हे तर लोकांच्या दृष्टीनेंहि अत्यंत शुद्ध असलें पाहिजे. मीं आपल्याशीं पुनर्विवाह केला तर माझ्या मतांची कांहींएक किंमत राहाणार नाहीं. (वास्तविक मतांप्रमाणें मी वागणारी आहें असें त्यावरून सिद्ध होईल; पण लोकांची मनःस्थिति हें मानण्याइतकी उदार नाहीं.)

" सुनंदरावांची या बाबतींत मला पत्रें आलीं होतीं; पण इतके दिवस त्यांना उत्तर लिहिण्याचें मी टाळीत होतें. सुनंदरावांच्या मनांतून मित्राचें व मैत्रिणीचें कार्य साधून एका धोंड्यानें दोन पक्षी मारावयाचे होते. पण सुनंदरावांचें कोणतें कार्य उत्तम साधलें आहे, तर हें साधणार ? सद्धेतु विफल होण्याचा त्यांचा हा पहिलाच अनुभव नाहीं. स्पष्टोक्तीमुळें अथवा अन्य रीतीनें गैरसमज होऊन त्यांचा सद्धेतु कुफल मात्र होऊं नये अशी इच्छा आहे.

" आपली बालमैत्रीण

**सुशीला** "

---

## २९ : तोंडीं सांगणें चांगलें, का पत्रद्वारें सांगणें चांगलें ?

**कथानकाचा** प्रवाह कालक्रमानुसार कोणत्या दिशेनें वहातो आहे, मध्यंतरीं किती काळ लोटतो आहे, या कालावधींत कोणत्या कोणत्या गोष्टी घडून येत आहेत, कोणतीं स्थित्यंतरें होत आहेत, हें सर्व पुढील दोनतीन पत्रांतील मजकुरावरून समजून येण्यासारखें आहे. म्हणून अधिक शब्द न लिहितां पत्रद्वारेंच कथौघ दिग्दर्शित करतों.

**पत्र नं. १**

मुबइ, गुरुवार.

" सुशीलाबाईस सुनंदाचा नमस्कार मी मुंबईस खादीचे कार्याकरितां आलों आहें. पत्र लिहिण्याचीं दोन कारणें. आपली सीनियर केंब्रिजची परीक्षा पास

होऊन Paul's Prize मिळविल्याबद्दल आपलें अभिनंदन करणें हें पहिलें कारण. ( Paul's Prize हें कशाबद्दल आहे ? )

" दुसरें अधिक महत्त्वाचें कारण असें:—माझा बालमित्र बाळू दिवसेंदिवस अधिक अशक्त होत चालला आहे. मलेरिआ, अपचन, रक्तक्षय वगैरे डॉक्टरी निदानें एका अर्थी खरीं आहेत; पण एका अर्थी खोटीं आहेत. म्हणजे त्यांच्या मुळाशीं दुसरें एक कारण आहे. त्याच्याकडे डॉक्टर लोक लक्ष देत नाहींत, त्यांच्या लक्षांतहि तें येत नाहीं. वास्तविक तें रोगबीज चांगलें मोठें आहे—हा रोगजंतु पाहण्याकरितां सूक्ष्मदर्शक यंत्राची मुळींच जरूर नाहीं. उघड्या डोळ्यांनीं तो दिसतो. माणसाएवढा मोठा आहे सुंदर आहे. चालतो–बोलतो, हंसतो–खेळतो, चांगले–वाईट जाणतो, परीक्षा पास होतो आणि Paul's Prize हि मिळवितो.

"तुम्ही आपल्या गांवांत आतां मुलींची शाळा काढणार हें मागील संभाषणांवरून व पत्रांवरून जाणतों. आपल्या गांवांत शाळा चालवावयाची म्हणजे आपणांला पुनर्विवाह करतां येणार नाहीं–आपलें वर्तन जुन्या पद्धतीचें असलें पाहिजे–हें मात्र मला पसंत नाहीं. शिक्षणाचें ध्येय साधण्याकरितां व आपलीं अत्यंत पुढें गेलेलीं सुधारकी मतें लोकांनीं विचारांत घ्यावींत,–वाह्यात् बाईचीं म्हणून त्यांचा उपहास व अवहेलना करूं नये–याकरितां आपण परंपरागत, रूढ, संकेतस्वरूप नीतिमत्तेचीं बंधनें पाळलीं पाहिजेत, या म्हणण्यांत अगदीं सत्य नाहीं असें नाहीं. पण धैर्यानें आपल्या मताप्रमाणें चालल्यास व विचाराला पटतील अशीं नीतिबंधनें पाळल्यास लोक आपली योग्यता कालांतरानें ओळखणार नाहींत असें वाटत नाहीं.

" शिवाय, चांगल्या स्त्रियांनीं जर अनुरूप वराशीं पुनर्विवाह करण्याचें टाळलें तर 'पुनर्विवाह' करणाऱ्या त्या वाईट असा अर्थ होणार नाहीं काय ? 'जिला राहवत नसेल तिनें पुनर्विवाह करावा' असें बोलणाऱ्या स्त्रियांचा तुम्हांला अत्यंत राग येतो हें मी अनेकदां पाहिलेलें आहे. आपणहि 'राहवत नसेल तर' ही भाषा सोडतां; पण कांहीं तरी सबब काढून आपलें सीता–सावित्रीत्व स्थापूं पाहातां आणि आचार जुना ठेवून व विचार नवे बोलून जुन्या–नव्यांना खूष ठेवण्याचा प्रयत्न करतां, असा आरोप मीं केला तर अगदींच खोटा होईल कीं काय ? 'गांवांतल्या लोकांना माझा पुनर्विवाह पसंत पडणार नाहीं आणि माझें

सुविचारप्रसाराचें आणि शिक्षणप्रसाराचें कार्य मागें पडेल ' ही तुमची भीति वरकरणी आहे असें मी म्हणत नाहीं, तर ती स्वतःची फसवणूक आहे. ही आत्मवंचना सोडून द्या, श्रेष्ठ धारिष्ट धरा व बाळूचा जीव वांचवा.

" आपल्या उभयतांचा बालमित्र

**सुनन्दराव."**

**पत्र नं. २**

**सोनगांव, बुधवार**

" प्रियमित्र सुनंदराव यांस, सा. न. वि. वि.—

" आपलें पत्र पावलें. आपल्या पत्राचें उत्तर लिहिण्यास उशीर झाला याचें कारण येथें मी प्राथमिक चार व इंग्रजी तीन इयत्तांपर्यंत शिक्षण देणारी शाळा काढण्यांत व तदर्थ समारंभ करण्यांत गुंतलें होतें. कृष्णजन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशीं शाळा उघडली व म्हणूनच तिला ' नन्दबाल '–शाळा असें नांव देण्यांत आलें असें लोक मानतात; पण ज्यांचें नांव चिरायु व्हावें असें मला वाटतें, असे हे ' नन्द ' कोण व ' बाल ' कोण हें मीं सांगितलेंच पाहिजे असें नाहीं.

" पुनर्विवाहविषयक युक्तिवादाबद्दल चर्चा समक्षच करूं. सध्यां वास्तविक ही सगळीच चर्चा बंद ठेविली पाहिजे,–कारण आई विरुद्ध आहे. तिच्या कानावर कुण कुण गेली तेव्हां ' मी जीव देईन ' म्हणून ती म्हणाली ! आतां तरी तुमची ' मध्यस्थाची कुशलता ' बंद राहील ना ?

" आपण खादीकार्य करतां—स्तुत्य आहे; पण बायकोचें व मुलाचें आणि मुलीचें कार्य कोण करणार ? बळवंतरावांना आतां तुमच्या पत्नीला मदत करणें अवघड वाटतें. मीं पर्वांच १०० रु. दिले. आपलेहि हाल होताहेत म्हणून ऐकतें. ५०० रुपये पाठवीत आहें त्यांचा विनियोग **आपल्या सुखसोयीं**-करितां करावा,–खादीप्रचाराकरितां करूं नये. ( या अटीवरच हे दिलेले आहेत. )

" वहिनींचे हाल पाहून अर्धवट थट्टेनें आणि अर्धवट मनापासून मीं तुमच्या नादिष्टपणाची निंदा केली; पण तुमची तरफदारी करून वहिनी म्हणाल्या, ' समजत का नाहीं तुम्हीं म्हणतां तें ? आणि मुलाबाळांवर माया कमी का आहे ? माझ्यापेक्षां माया अधिक आहे ! पण हल्लीं लोकांचीं कामं करण्याची रीत निघाली आहे ना ! त्याप्रमाणं वागायचं झालं. पहिल्यापासून स्वभाव नादिष्ट

आणि त्यांतून आतां तर गांधी आणि खादी यांचा नाद हा सगळीकडेच झाला आहे. लोकांचीं कामं करताहेत, करूं द्या. आपल्याला नाहीं करतां येत; त्यांना तरी करूं द्या. तुमच्यासारख्या आम्ही शिकलों असतों म्हणजे आम्हीं नसती शाळा काढली ? इ० इ० ' वहिनींचा हा सोशिकपणा, ही भक्ति, ही शान्ति, मला कधीं तरी लाभेल काय ?

" बळवंतरावांची प्रकृति सुधारत आहे. त्यांनीं हल्लीं माझ्याकडे येण्याजाण्याचें टाळलें आहे. मीहि खरें सांगावयाचें म्हणजे टाळतें; पण गांठी मधूनमधून पडतातच. बाह्यतः हंसतों.

" आपली बालमैत्रिण
**सुशीला** "

**पत्र नं. २**

" चिरंजीव सुशीला हीस आशीर्वाद.—घरच्या घरीं बापानें मुलीला पत्र लिहिण्याचा प्रसंग आला आहे; पण समक्ष मला बोलतां येणार नाहीं अशी भीति वाटते म्हणून हा मार्ग मीं स्वीकारला आहे.

" बळवंतरावांची प्रकृति खालावत चालली आहे याचें खरें कारण सुनंदरावांकडून मला कळलें नसतें तरीहि मीं ओळखलें असतें. एकेकाळीं मी तरुण होतों व प्रेम ही चीज जीवाला उत्साह देते तशी ती जीवाचा नाशहि करते हें मी ओळखतों. तुम्ही अलीकडे एकमेकांकडे फारशीं जात येत नाहीं यांतीलहि बीज मी ओळखतों. पुनर्विवाह ' नंद–बाल ' संस्थेला बाधक होईल म्हणून तूं करीत नसशील तर ही तुझी चूक आहे. लोकांचा पहिल्याप्रथम गैरसमज होईल; शाळेवरहि थोडासा वाईट परिणाम होईल; पण आपल्या या सोनगांवांतील स्थिति २० किंबहुना १० वर्षांपूर्वींसारखी राहिलेली नाहीं. नवीन पिढी सगळी सुधारक आहे. पुराणाभिमानी जुनीं खोडं कांहीं मेलीं, कांहीं मरूं घातलीं आहेत, कांहीं मतानें बदलत आहेत, कांहीं पुरीं बदललेलीं आहेत ! शिवाय संस्थेकरितां व्यक्तीनें किती आत्मयज्ञ करावयाचा ? केव्हां करावयाचा ? तुझ्या पुनर्विवाहानें संस्था बुडून जाऊन पुन्हां दुसरी संस्था निघणें शक्यच नाहीं असें असतें तर एक वेळ मीं तुझा आत्मयज्ञ बरोबर म्हटला असता; पण आज एक वर्षभर सस्था चाललेली आहे. मुलें फी देऊन शिकत आहेत. शिक्षणाची चटक उत्पन्न

झालेली आहे. तूं संस्था सोडलीस तर कोणीहि ती चालवील. ( गुंतवलेलें भांडवल मात्र तूं देणगी म्हणून दिलें पाहिजेस व तूं देशीलहि )

" आतां तुझी आई तुझ्या पुनर्विवाहाच्या विरुद्ध आहे, ' जीव देईन ' म्हणत्ये, ही गोष्ट खरी. पण तुला एक कानगोष्ट सांगतों, कीं ती कांहीं जीव देत नाहीं. पण, सुशीले, खरोखरच जीव दिलान् तर-? जीव देणार नाहीं असें वाटतें; पण जीव दिलान् तर पत्नीहत्येचा माझ्याकडे दोष येणार ! तेव्हां कानगोष्ट विसर. (पत्र लिहितांना देखील अशी विसंगति उत्पन्न होत आहे, तर समक्ष बोलतांना काय होईल ? ) तुला योग्य वाटेल तें कर. पुनर्विवाह नाहीं केलास तर बळवंतराव जाणार; केलास तर तुझी आई जाणार ! मी तुला काय सल्लामसलत देऊं ? तूंच मला सल्लामसलत दे. बळवंतरावासारखा समतोल बुद्धीचा, धीरगंभीर वृत्तीचा मनुष्य इतका कोमल असेल असें कोणाला खरें वाटणार नाहीं ! पण मी त्याला लहानपणापासून ओळखतों आहें. तुमचा दोघांचा विवाह झाल्यास तुम्ही उभयतां सुखी व्हाल; पण...तिनें भलतंसलतं केलं तर काय करणार ? या बाबतींत मी कांहीं एक सल्ला देऊं शकत नाहीं. मग पत्र कां लिहितों आहें, असें विचारशील, तर त्याचें उत्तर असें, कीं तूं कांहींहि केलेंस तरी मला मान्य होईल. मी तुझ्या पुनर्विवाहाला विरुद्ध नाहीं हें तुला स्पष्टपणें कळवावें असें माझ्या मनांत पुष्कळ दिवस येत आहे. दुरून दुरून तुला मीं सांगितलें; पण स्पष्टपणें सांगणें जरूर वाटलें म्हणून पत्र लिहीत आहें.

" या बाबतींत सुनंदरावाचा सल्ला घे. तो उभयतांचा मित्र आहे, हितेच्छु आहे, सर्व गोष्टी मार्मिकपणें जाणणारा आहे. त्याच्या नादिष्टपणाबद्दल आपण हंसतों; पण त्यांच्या कल्पकतेबद्दल आणि सात्त्विकतेबद्दल आपण कौतुकहि केलेलें आहे. तर त्याला पाहिजे तर विचार. मी पत्रांत जें कांहीं सुसंगत लिहिलें आहे त्यापेक्षां अधिक कांहीं समक्ष भेटींतदेखील मला सांगतां येणार नाहीं.

" तुझे वडील

**तात्या** "

"सोनगांव, बुधवार,

सा. न. वि. वि.—

"आपले गुरु व गुरुपत्नी-मिस्टर व मिसेस् स्वीट हीं आतां वृद्ध झाल्यामुळें हा देश सोडून कायमचीं जाणार म्हणून त्यांना भेटण्याकरितां आपण गेलांत व २००० रुपये त्यांच्या सन्मानार्थ शाळेला देणगी दिलींत, हें सर्व ठीक झालें; पण आजारी पडल्यामुळें तेथें आपणांस राहावें लागावें ही आपल्या शाळेच्या दृष्टीनें खेदाची गोष्ट आहे. तथापि मी आहें व सुनंदाहि आहे. शाळेची काळजी करूं नये. बालमित्रांवर एवढा विश्वास असावा. इकडे येण्याची घाई करूं नये.

"आपणांला आश्चर्य वाटेल; पण खरी गोष्ट आहे, कीं मी सोनगांवचा कांहीं दिवस राजा झालों होतों; पण दुर्दैवानें आतां पदच्युत झालों आहें. तो प्रकार असा: आपल्या शाळेंत मीं एक अस्पृश्य जातीचा मुलगा व एक मुलगी दाखल केली आणि बसण्याच्या जागेंत वगैरे भेद ठेवला नाहीं. त्यामुळें कांहीं जुनी खोडें जरी रागावलीं तरी सर्व गांधीभक्त व सर्व नवीन पिढी फार संतुष्ट झाली व माझ्या धैर्याबद्दल प्रशंसा करूं लागली. बोहरी गल्लींतील मशिदीसमोर वाद्यें वाजवावयाचीं किंवा नाहीं याबद्दल हिंदु-मुसलमानांचा गेल्या वर्षीं जो तंटा झाला त्यांत अखेर मला पंच नेमण्यांत आलें होतें हें तुम्हांला ठाऊकच आहे. या तंट्याचा निकाल मीं पूर्ण चौकशी करून व गेल्या पन्नास वर्षांची परंपरा पाहून मुसलमानांच्या बाजूनें दिला, त्यामुळें कांहीं हिंदूंना जरी वाईट वाटलें तरी एकंदरींत माझ्या न्यायप्रियतेबद्दल जिकडे तिकडे वाहवाच झाली व मी छोटासा गांधीच बनलों 'बाळू' या नांवावर श्लेष करून मला कांहीं गांधीभक्त थट्टेनें 'बालगांधी' असें म्हणूं लागले आणि '**बाळ**' शब्द असल्यामुळें **बाळ** गंगाधर टिळकांचे भक्तहि मला टिळक व गांधी यांच्या तत्त्वांचा सुंदर मिलाफ असें समजून माझ्या 'बाळ-गांधी' या पदवीला मान्यता देऊं लागले. माझें हें लोकमान्य-महात्मेपण वृद्धिंगत होण्याचें कारण असें झालें, कीं बोहरी गल्लींतल्या मशिदीसंबंधींच्या माझ्या निकालानें चढून गेलेले मुसलमान यंदा 'गुजरगल्लींतूनहि गणपति न्यावयाचा नाहीं, कारण ती गल्ली मशिदीलगतची

नसली तरी तेथें वाजलेल्या वाद्यांचा आवाज मशिदींत प्रार्थना करणाऱ्यांना ऐकूं येऊं शकतो व त्यांच्या एकाग्रतेचा भंग करतो ' असें म्हणूं लागले. आमचे गांधीभक्त धर्मावतार सुनंदराव भांडणाच्या विरुद्ध आहेत; परंतु मुसलमानांचा हा चढेलपणा पाहून त्यांनीं सत्याग्रह करण्याचा निश्चय केला व सगळ्यांच्या पुढें होऊन त्यांनीं आपलें पुढारीपण सिद्ध केलें. मला असला सत्याग्रह फारसा आवडत नाहीं म्हणून मीं त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला; परंतु सुनंदराव तुला ठाऊकच आहे! मारामारीची गुप्त तयारी मुसलमानांनीं केली आहे व ते सुनंदरावाला ठार मारणार आहेत असें मला कांहीं स्वयंसेवकांनीं येऊन सांगतांच, सत्याग्रहांत सामील होण्याकरितां म्हणून नव्हे—तर प्रियमित्राचा जीव वांचवावा म्हणून—मी धांवत धांवत गुजरगल्लींत जों जातों, तों मारामारीला सुरवात होऊन सुनंदरावाचें आणि माझें डोकें आणि मान आणि गुंडांचे सोटे यांची भेट झाली! आमच्या हातांनीं योग्य ती कामगिरी केलीच; (कारण, सुनंदराव खादीभक्त असला तरी असल्या बाबतींत गांधीभक्त नाहीं, आणि मी तर स्वसंरक्षणार्थ हातांचा उपयोग करण्याच्या विरुद्ध नाहींच नाहीं, हें तुम्हांला ठाऊकच आहे.) अधिक विस्तार करीत नाहीं; पण एवढेंच सांगतों, कीं सुनंदरावाच्या पोटांत सुरी खुपसली गेली असल्यामुळें तो अत्यवस्थ आजारी आहे, परंतु जिवाला धोका नाहीं असें डॉक्टरांचें म्हणणें आहे. मलाहि बरेंच लागलें आहे, परंतु भितीचें कारण नाहीं. मारामारींत हिंदूंचा जय होऊन त्यांनीं माझी मिरवणूक काढली व मी सोनगांवचा अनभिषिक्त राजा बनलों! परंतु परवां एका सभेंत मी खादीचें स्तोम माजविण्याच्या विरुद्ध बोललों; त्यामुळें गांधीभक्तवृंद आणि अस्पृश्यांना देवळांत येऊं द्यावें असें बोललों म्हणून येथील ब्रह्मवृंद मजवर कोपला आहे. मुसलमान तर मारामारीमुळें रागावलेलेच आहेत. अर्थात् माझें औट घटकेचें राज्य आतां लयाला गेलेलें आहे!

"केसरी व ज्ञानप्रकाश यांतून सोनगांवच्या मारामारीची हकीगत थोडी आली आहे व आम्हांला 'जबर जखमा' झाल्या आहेत असे त्यांत उल्लेख आहेत; ते वाचून काळजी वाटेल म्हणून हें लांबलचक खुलाशाचें पत्र लिहिलें आहे. माझ्याबद्दल आणि सुनंदरावांबद्दल काळजी करूं नये. डॉक्टरनें दिलेल्या औषधाच्या गुंगींत सुनंदराव आपल्या दोघांच्या लग्नाबद्दल कांहीं तरी बडबडत असतो, त्यामुळें आपल्याबद्दल लोकांत फार गैरसमज झाला आहे. (माझें राज्य जाण्यास तें एक कारण आहे!) पण या बाबतींत कांहीं दिवस न बोलण्याचा

व लिहिण्याचा निश्चय उभयतांनीं केलेला आहे तो पाळणें इष्ट आहे; म्हणून येथेंच संपवितों."

"आपला बालमित्र
बाळू"

---

## ३१ : आत्महत्या ?

"सोनगांव

"चिरंजीव सुशीला हीस तिच्या वडिलांचे आशीर्वाद विशेष. यंदा गणेशचतुर्थीला तूं येथें नव्हतीस, दसऱ्यालाहि नाहींस आणि दिवाळीला येतेस किंवा नाहीं याबद्दल शंका दिसते. दिवाळीच्या दिवसांत 'तिला' व मला काय वाटेल हें सांगावयास नकोच. तथापि डॉक्टरांची परवानगी मिळाल्याशिवाय येऊं नको. लोणावळयास पाऊस फार असतो म्हणून तिला वाटतें, कीं दुखणें उलटेल; पण डॉक्टरांना या सगळया गोष्टी कळतात, तरी त्यांच्या सल्ल्याप्रमाणेंच वागावें. प्रवासाच्या श्रमानें दुखणें एखादे वेळेस उलटतें; तरी असा अविचार करूं नये.

"तूं आजारी असतांना असल्या गोष्टी लिहूं नयेत; पण कदाचित् तुझ्या मनाला आराम वाटेल आणि आजारहि कदाचित् कमी होईल म्हणून पुढील हकीकत लिहीत आहें. सुनंदाची जखम आतां चांगली बरी झाली आहे; पण हिंडतांफिरतां येत नाहीं म्हणून त्याला गाडींत घालून अचलेश्वरीच्या पायथ्याशीं असलेल्या महादेवाच्या देवळाकडे हवा खाण्याकरितां नेलें. वाटेंत त्यानें तुझ्या पुनर्विवाहाची गोष्ट तिच्याजवळ काढली. "सुशीलेनें पुन्हां लग्न केलें तर मी जीव देईन" असें ती म्हणाली; तेव्हां सुनंदानें एक दीर्घ सुस्कारा टाकला व तो गप्प बसला. कांहीं वेळानें तो मला इंग्रजींत म्हणाला, कीं "मी आतां बोलणार आहें तें सर्व खोटें आहे, ती एक युक्ति आहे, तुम्ही कांहीं वेळ स्वस्थ बसा." असें म्हणून त्यानें एक लांब सुस्कारा टाकण्याचें नाट्य केलें. 'इंग्रजींत काय सांगितलंस रे ? सुशीलेचं पत्रबित्र आलं आहे का काय कांहीं ?" ती उत्सुकतेनें त्याला व मला विचारूं लागली; पण आम्ही दोघेजण कांहींच बोललों नाहीं. तेव्हां ती अधिकच घाबरली आणि 'काय आहे तें खरं सांगा,

लपवून ठेवूं नका ' असा आग्रह करूं लागली. अखेर जणुं (काय नाइलाज म्हणून सुनंदा म्हणाला, " पत्र आलं आहे. खुशालीचं आहे. प्रकृति सुधारते आहे. पण–पण–सगळं सांगून काय करायचं आहे ? या गोष्टी आपल्या हातांतल्या नाहींत, जशा व्हावयाच्या तशा त्या होणारच." " म्हणजे काय ? " तिनें विचारलें. " पुनर्विवाह करण्याचं ठरवलं आहे कीं काय ? " " नाहीं, नाहीं. तसं मुळींच नाहीं. पुनर्विवाह करण्याचा पुढंमागं कदाचित् मोह होईल आणि मग आपली आई जीव देईल या भीतीनं तिनंच आधीं आपल्या जीवाचा अंत करून टाकण्याचा बेत केला आहे." " म्हणजे काय ? जीव का देणार आहे ती ? " " काय करणार आहे नि काय करणार नाहीं हें मी काय सांगूं ? " सुनंदा म्हणाला. तो आणखी म्हणाला–" या सुशिक्षित मुली ! या काय कुणाचं ऐकणार आहेत ? त्याच आम्हांला आतां उपदेश करणार ? मातृहत्येचें पातक करण्यापेक्षां आत्महत्याच केलेली काय वाईट असें ती म्हणत आहे. आणि तिला काय, अफू आणि दुसरीं सगळीं औषध ठाऊक ! मनांत आणलं तर केव्हांहि आत्महत्या करूं शकेल ! मुली सुशिक्षित केल्या म्हणजे शिक्षणाचा हा असा उपयोग करतात ! खरंच का ती आत्महत्या करणार आहे ? " असें तिनें पुन्हां विचारलें, तेव्हां सुनंदा लुच्चा म्हणाला, (तो इतका नाट्यकुशल असेल असं मला वाटलं नव्हत !) " अहो, करणार म्हणून काय विचारतां ? दिवस–वार देखील ठरविला आहे तिनं ! बाकी मी तुम्हांला सांगतों आहे या गोष्टी, हेंच चुकतों आहें. ज्या गोष्टी व्हावयाच्या असतील त्या होतील ! जीव देण्याचा तुमचा आग्रह तुमच्या दृष्टीनें बरोबर आहे आणि तिच्या दृष्टीनें तिचाहि आग्रह बरोबर आहे; आम्ही तर बोलून–चालून नादिष्ट आणि डोक्यांत कांहीं ना कांहीं तरी खूळ घेऊन बसणारे ! आम्ही काय लोकांना सांगणार ? आमचे बळवंतराव सांगायचे कांहीं चार शब्द; पण या बाबतींत त्यांनीं बोलणें इष्ट नाहीं ! ' भाऊबीजेच्या दिवशीं तूं शक्य असल्यास ये आणि आपल्या बहिणीच्या देहाला अन्त्यविधि देण्याची ओंवाळणी घाल.' असं सुशीला लिहिते आहे ! यंदाची भाऊबीज चांगलीच होणार आणि ओंवाळणीहि फारच उत्तम घालावयाची आहे ! " ही शेवटलीं वाक्यें रडव्या आवाजांत जेव्हां सुनंदा थांबत थांबत म्हणाला, तेव्हां मी तोंड फिरविलें आणि हंसूं लपविण्याकरितां तोंडावर उपरणें घेतलें. तिला वाटलें, कीं माझ्या डोळ्यांत आंसवें आलीं आहेत ती मी लपवितों आहें, आणि त्यामुळें तिचा दुःखाग्नि इतका भडकला, कीं वर्णन करतां

यत नाहीं ! दुःखावेगांत ती आतां बडबड करूं लागली, कीं "तिचा पुनर्विवाह करून टाका. मी कशाला आड येऊं ? आम्हांला काय जुन्या माणसांना समजतं आहे ? तिला ज्यांत सुख त्यांत मला सुख" इ० इ०

"तात्पर्यार्थ तुला कळलाच असेल. सुनंदाची युक्ति सफल झाली व ती आतां तुझ्या लग्नाला अनुकूल झाली आहे; इतकेंच नव्हे, तर आग्रह करूं लागली आहे.

"उषेचा अभ्यास बरा आहे. ती तुला आतां इंग्रजींत पत्र लिहिणार आहे; पण 'Dear Tai' च्या पुढें तिला वाक्यच सुचत नाहीं; म्हणून कार्ड दोन दिवस तसेंच पडून आहे. आमच्याबरोबर गार्डीत ती होती आणि आई रडूं लागली तेव्हां तीहि भांबावून जाऊन रडूं लागली होती !

तुझ्या शाळेचें ठीक चाललें आहे. अस्पृश्य मुलांना घेतल्यामुळें कांहीं दिवस गडबड झाली होती; पण आतां फार उत्तम मत झालें आहे. सर्व श्रेय बाळूला व सुनंदाला आहे. कळावें, हे आशीर्वाद.

"तुझे वडील
**तात्या**"

ता० क०—लग्नाच्या बाबतींत तुझा निश्चय तूं कर. माझीं मतें व माझी वृत्ति हीं तुला ठाऊकच आहेत.

---

## ३२ : वर्तमानपत्रांतील कांहीं उतारे

**सुशीलेच्या** चरित्रांतील बऱ्याच भागाशीं प्रस्तुत लेखकाचा कांहीं प्रसंगीं संबंध आलेला आहे तो वाचकांना सध्यां सांगण्याचें कारण नाहीं व तसें करणें इष्टहि नाहीं. कलाविषयक व इतर कारणांस्तवहि सुशीलेची हकीगत स्वमुखानें न सांगतां पत्रांच्या द्वारें व इतर मार्गांनीं सांगून लेखकाचीं स्वतःचीं मतें, स्वतःच्या मनःप्रवृत्ति, स्वतःचा संबंध, सध्यां अप्रसिद्ध ठेवण्याचा विचार केलेला आहे. तदनुसार या प्रकरणांतील हकीगत सोनगांव येथें प्रसिद्ध होणाऱ्या तीन वर्तमानपत्रांतील कांहीं उताऱ्यांच्या द्वारें देण्यांत येत आहे. सोनगांव कांहीं मोठें गांव नव्हे, परंतु तेथेंहि दोन वर्तमानपत्रें पुष्कळ दिवसांपासून आहेत. रोगहारक औषधांच्या व फलदायक ताइतांच्या वगैरे जाहिरातींवर, नवराबायकोच्या आणि म्युनिसिपालिटीच्या, तसेंच धनकोऋणकोच्या व सोडचिठ्ठी देऊं पाहाणाऱ्यांच्या नोटिसांवर उपजीविका करणाऱ्या या साप्ताहिकांचीं नांवें '**सुवर्ण-वार्ता**' व

'**पारिजातक**' अशीं होतीं. अलीकडे 'मराठमोळा' म्हणून एक नवीन पाक्षिक निघालेलें आहे. त्या त्या संपादकांची योग्यता व त्या त्या पत्रांचें धोरण हीं पुढील उताऱ्यांवरून सहज कळून येण्यासारखीं आहेत. मागील प्रकरणांत वर्णिलेल्या गोष्टीनंतर सुमारें तीन महिन्यांनीं '**सुवर्ण-वार्ते**'त पुढील पॅरिग्राफ आले. त्यांवरून सुशीलेवर कसले किळसवाणे लोकापवाद पसरले होते हेंहि ध्यानांत येईल.

## विचार–विहार

"येथें नवीन उघडलेल्या मराठी–इंग्रजी शाळेचा वार्षिक रिपोर्ट गेल्या बुधवारीं वाचण्यांत आला. त्यावरून प्राथमिक शाळेंत १७० मुलगे व ७० मुली असून इंग्रजी तीन इयत्तांत ६० मुलगे व २३ मुली असल्याचें दिसून येतें. शाळेंत अस्पृश्य मुलांमुलींना घेण्यांत येतें; इतकेंच नव्हे, तर सर्व प्रकारें समानतेनें वागविण्यांत येतें. त्याप्रमाणें इंग्रजी शाळेंत मुलग्यांना व मुलींना एकत्र शिक्षण देण्यांत येतें. याबद्दलचीं आमचीं मतें आम्हीं सध्यां देऊं इच्छित नाहीं. एवढेंच सांगून ठेवतों, कीं या गोष्टी सध्यां प्रयोगावस्थेंत आहेत व यद्यपि जनसमूहानें त्या सध्यां चालूं दिल्या आहेत, तथापि त्यापासून बरे–वाईट परिणाम दिसूं लागतांच जनताजनार्दन नारसिंह अवतार धारण केल्याविना राहाणार नाहीं."

" या शाळेची मूळ कल्पना ज्यांच्या डोक्यांत आली व ज्यांनीं द्रव्यादिक साहाय्य देऊन ही संस्था चालविली आहे त्या सुशीलाबाई आमच्या नागरिक आहेत; ही गोष्ट एके काळीं आमच्या सुवर्णग्रामला भूषणास्पद वाटत होती. त्यांचें सौंदय, त्यांचें नामानुरूप सुशीलत्व व त्यांचें सुविद्यत्व यांबद्दल एके काळीं आम्हां सुवर्णग्रामीयांना सकौतुक अभिमान वाटत होता. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही, कीं त्या अलीकडे कांहीं महिने आजारी पडून (या वयांत आजार कसला ?) लोणावळ्यास बालसंगोपन शाळेंत राहिल्या आहेत. त्या शाळेला त्यांनीं २००० रुपये दिले आहेत असें ऐकतों. मिशनचे बालसंगोपनात्मक कार्यास द्रव्याच्या द्वारेंच नव्हे, तर तेथील बालबालिकांची संख्या वृद्धिंगत करण्याच्या बाबतींतहि लोकांना उपदेश करून व इतर प्रकारें त्या सक्रिय सहानुभूति दाखवीत आहेत अशी जनवार्ता आहे, ती आम्हां आर्यसंस्कृतीच्या अभिमानी लोकांना तरी अमंगल वाटण्यासारखी आहे. आम्ही एवढेंच इच्छितों कीं, तेथील मिशनरी डॉक्टर,

नर्सेस वगैरेच्या साहाय्यानें सुशीलाबाईंची व तेथील लहानमोठ्या नव्याजुन्या बालबालिकांची शारीरिक व आध्यात्मिक प्रकृति चांगली राहो !"

~ ~ ~

"सुशीलाबाई यांची शारीरिक व आध्यात्मिक प्रकृति इतकी खालावेल अशी आमची समजूत नव्हती. त्यांच्या सौंदर्याभोंवतीं त्यांच्या शीलानें, विद्येनें, वक्तृत्वानें व गोड स्वभावानें एक प्रकारचें आध्यात्मिक वलय आमच्या भोळ्या-भाबड्या दृष्टीला दिसत होतें. त्यांच्या भाषणांतील अलीकडील सडेतोडपणा आम्हांला कौतुकास्पद वाटावयाचा. स्वार्थत्यागाकडे व इतर उच्च गुणांकडे पाहून त्यांच्या उच्छृंखल भाषणाकडे आम्ही दुर्लक्ष करीत होतों व मागेंपुढें हा उच्छृंखलपणा जाईल अशी आम्हांला आशा होती; पण ही आशा मायिक ठरली. सर्व जग मायिक आहे असें पूर्वऋषींनीं जें वेदान्ततत्त्व ठरविलें त्याची सत्यता अशा प्रसंगीं पटते ! जग सर्व मिथ्या, जिकडे तिकडे मायेचा कारभार, सर्वत्र मायेचे मोहक लपंडाव !"

~ ~ ~

"बळवंतराव व सुनंदराव या आमच्या सन्मान्य (?) नागरिकांसंबंधींहि आम्हांला पुष्कळ लिहावयाचें आहे. ते सन्मित्र आहेत, दोघे बुद्धिमान् आहेत, स्वार्थत्यागी आहेत, हें आम्ही त्यांचे ग्रामवासी पुष्कळ वर्षें ओळखून आहोंत. पण बळवंतरावांनीं स्वतःस अजातशत्रु धर्माचे अवतार समजुन बोहरी आळींतल्या मशिदीवरून जाणाऱ्या मिरवणुकीच्या वाद्यांबाबत मुसलमानांच्या बाजूनें अन्यायाचा जो निर्णय दिला, तसेंच अस्पृश्यांना शाळेंतच नव्हे तर देवळांतहि घेण्याचा त्यांचा उघडउघड जो बेत दिसतो आहे, त्याप्रमाणेंच कधीं या पक्षास व कधीं त्या पक्षास मिळून, कधीं वकिली सोडून तर कधीं वकिली करून, कधीं खादी वापरून तर कधीं खादीची निंदा करून, कधीं मुसलमानांच्या गळ्यांत गळा घालून व कधीं त्यांचे सोटे डोक्यावर घेऊन, कधीं विवाह न करण्याचें ठरवून तर कधीं ( जनवार्ता खरी असेल तर ) पुनर्विवाह करण्याचें ठरवून, कधीं सुशीलाबाईशीं अबोला धरून तर कधीं—अधिक लांबण लावून उपयोग काय ? असल्या या धरसोडीच्या, तत्त्वहीन, निष्ठाहीन, आर्यसंस्कृतिविरुद्ध आचारामुळें ( किंवा अनाचारामुळें म्हणा ) एके काळीं प्रति-टिळक किंवा प्रति-गांधी वाटणारे –किंबहुना उभयतांचे गुण स्वतःमध्यें आहेत असें क्षणभर भासविणारे असले हे

द्विजिव्ह दुतोंडे लोकनायक आमच्या आर्यसंस्कृत्यभिमानी सुवर्णग्रामाला नकोसे झाले आहेत व त्यांनीं आतां लोणावळयासारख्या ठिकाणीं जाऊन सुशीलेवर आलेल्या (?) आपत्तींतून सुटण्यास तिला मदत करावी एवढीच लोकांची इच्छा आहे" *

~ ~ ~

पुढील उतारा '**पारिजातक**'मधील आहे. तो संपादकीय स्फुटांतला आहे.

"येथील नवीन उघडलेल्या मुलांमुलींच्या शाळेची दिवसेंदिवस कशी प्रगति होत आहे हें दुसरीकडे दिलेल्या सविस्तर रिपोर्टावरून वाचकांच्या ध्यानांत येईल. या प्रगतीचें मुख्य श्रेय आपल्या चिरपरिचित सुशीलाबाईंस असून, त्या श्रेयाचा कांहीं अंश बळवंतराव, सुनंदराव वगैरे मित्रमंडळींकडे आहे. कांहीं विघ्नसंतोषी लोकांनीं सुशीलाबाईंवर शिंतोडा उडविण्याची ही 'सुवर्ण'संधि न दवडतां काल्पनिक 'विचारां'चा खुळचट 'विहार' करून भलत्याच वार्ता पसरविण्याचें पुण्य पदरीं घेतलें आहे, तें त्यांचें त्यांनाच लखलाभ होवो. बळवंतरावांसारख्या सरळ व सर्वसंग्राहक वृत्तीच्या नागरिकावर देखील आडून तोंडसुख घेणाऱ्याचें तोंड धरण्याचें सामर्थ्य आमच्यामध्यें नाहीं, हें आम्ही प्रांजलपणें कबूल करतों."

"सुशीलाबाई, बळवंतराव, सुनंदराव यांच्यासारखीं माणसें सोनगांवसारख्या लहान गांवीं, हिंदुस्थानसारख्या अभागी देशांत आणि सध्यांच्यासारख्या विकृत परिस्थितींत आणि विपरीत कालीं जन्माला आलीं नसतीं तर त्यांनीं फार मोठें नांव मिळविलें असतें व मोठा पराक्रम केला असता. सोनगांवासारख्या कुग्रामांत राहून तीं शक्य तेवढी लोकसेवा करीत आहेत याबद्दल धन्यता न मानतां त्यांची अवहेलना करण्यांत आनंद मानणाऱ्या मानवी काक-बकांबद्दल अधिक न लिहिलेलेंच बरें. तथापि त्यांना आम्ही आतां एवढेंच सांगून ठेवतों, कीं सुशीलाबाई आणि बळवंतराव यांना लाजेनें मान खालीं घालावी लागेल असें कांहीं एक कृत्य त्यांनीं केलेलें नाहीं. सुशीलाबाईंनीं आपली निम्मी इस्टेट एका संस्थेच्या स्वाधीन केली आहे व निम्मी मृत्युपश्चात् त्यांनीं एका नवीन संस्थेला मिळेल अशी कायदेशीर व्यवस्था करून ठेविली आहे. वर उल्लेखिलेली संस्था

* **टीप**—वरील स्फुट विचार–विहार 'सुवर्णवार्ता'कारांना मान्य आहेतच असें कोणीं समजूं नये. संपादक '**सुवर्ण–वार्ता**'

म्हणजे 'नवयुगिन विश्वकुटुंबी संस्था' (The New Socialistic Association). या संस्थेचे उद्देश व घटना लवकरच प्रसिद्ध करण्यांत येतील. बळवंतरावांनींहि आपल्या प्राप्तीचा एकपंचमांश भाग या संस्थेला देण्याचें योजिलें आहे; इतकेंच नव्हे, तर देऊंहि लागले आहेत. या गोष्टीची वार्ता झोंपेचें मुद्दाम सोंग करणाऱ्या लोकांना ऐकूं गेली तरी ते या गोष्टीकडे कानझांक करोत, परंतु इतर लोकांना तसें करतां येणार नाहीं. आतां लोणावळ्यास 'बाल'-संगोपनाला अप्रत्यक्ष मदत करण्याचा जो ग्राम्य ध्वन्यर्थ आहे, त्यासंबंधानें आम्हांला जी माहिती आहे तिचे धागेदोरे सुशीलाबाईकडे न जातां कोणीकडे हे धागे जातात हें आम्ही सुचविणार होतों. परंतु हा प्रकार अशिष्ट म्हणून ध्वनि-रूपानें देखील आम्ही कांहीं एक न सांगतां अप्रिय उल्लेख येथेंच संपवितों."

~ ~ ~

'**मराठमोळा**' या वर्तमानपत्रांतील उताऱ्याची भाषा कानाला चमत्कारिक लागेल; पण ती शिष्टतेकरितां बरीच सुधारून घेऊन खालीं दिलेली आहे. हेतु हा, कीं सर्व परिस्थिति वाचकांच्या नजरेस यावी.

"सोनगांवच्या आमच्या एका बामणी भावानें (भाऊ कसला तो?) एका 'सद्गृहस्थानें' म्हटलें पाहिजे; पण 'सद्गृहस्थ' तरी कसला, 'माणसानें' म्हणावं झालं. बाकी माणूस तरी कसला तो? 'पशूनें' म्हटलं पाहिजे; येथील नवीन निघालेल्या शाळेंत अस्पृश्यांस घेतलें जातें म्हणून ओरड चालविली आहे. त्याचप्रमाणें येथील सन्मान्य नागरिक भाऊ बळवंतरावजी यांनीं एका जुन्या देवळाचा उद्धार करून त्यांत नवीन मूर्ति बसवावयाची आणि तेथें पूजेअर्चेचें बंड न ठेवतां फक्त गुरवानें तेथें जाऊन साफसूफ करावयाची आणि मंत्रतंत्र कांहींएक न करतां देवाच्या मूर्तीवर पाणी घालून चार फुलें वहावयाचीं आणि या देवळांत अस्पृश्यांना देखील येऊं द्यावयाचें अशी जी एक योजना केली आहे, तिच्याविरुद्धहि कांहीं बामणांनीं व बामणाळलेल्या व भटाळलेल्या कांहीं मराठ्यांनींहि बोंबाबोंब चालविलेली आहे. येथील सर्व सुशिक्षित मराठे मंडळींना त्यांची ही योजना पूर्णपणें पसंत आहे. या सोनगांवांत ज्या बामणांचे मनांत बामण जातीबद्दल फाजील अभिमान नाहीं व जे मराठ्यांना व अस्पृश्यांना कुत्र्याप्रमाणें वागवूं इच्छित नाहींत त्यांपैकीं बळवंतराव, सुनंदराव वगैरे मंडळी आहेत. मुसलमानांना देखील ही मंडळी बंधु म्हणायला तयार आहेत; पण आम्ही मात्र नाहीं. कारण मुसलमान हा साधारण बामणापेक्षां जरी बरा असला, तरी एकंदरींत तो 'भाऊ'

म्हणून घरांत वावरूं देण्याला लायक नाहीं असं आमचं मनांतलं खरं मत आहे व तें आम्ही उघड बोलून दाखवितों. कदाचित् आमचं मत चुकीचं असेल; चुकीचं आहे असं दाखविल्यास आम्ही थोबाडींत मारून घेऊं. कसं जरी असलं तरी ही गोष्ट खरी कीं, बळवंतरावासारखी मंडळी फार उच्च दर्जाला गेलेली आहे. त्यांचें मनाचें औदार्य असामान्य आहे. सुशीलाबाई यांच्या हाताचें औदार्यहि तसेंच आहे, हें त्यांच्याकडून शाळेला जी मदत होत आहे त्यावरून दिसतें. या मंडळींचीं मतें मुसलमानांचे बाबतींत चुकीचीं असलीं व त्यांचे औदार्यबुद्धीला कांहीं मंडळी खरोखर अपात्र असली तरी त्यांना सर्वांनीं योग्य तो मान दिलाच पाहिजे. 'ते बामण' ही भाषाच त्यांच्यासारख्याच्या ठिकाणीं संभवत नाहीं; कारण ते सत्य, न्याय, नीति यांचे भक्त आहेत—खोट्या ब्राह्मण्याचे नव्हत."

---

## ३३ : सगळीकडून मार !

सुशीला चांगली बरी होऊन लोणावळ्याहून परत आल्यावर कांहीं दिवस कांहीं मूर्ख किंवा दुष्ट किंवा अर्धवट लोक तिच्याविषयीं अनेक प्रवादांची देवघेव करीत होते; परंतु या पिकाला फारसा बाजारभाव नसल्यामुळें हे प्रवाद जागच्या जागीं जिरत होते. बळवंतराव व सुशीला या व्यक्ति कांहीं अशा नव्हत्या, कीं त्यांचेबद्दल अनंत कालपर्यंत लोकांमध्यें असला घाणेरडा गैरसमज कायम राहावा. राजकीय व सामाजिक मतांसंबंधानें गैरसमज होते; पण ते मतांसंबंधानें—नैतिक चारित्र्यासंबंधानें नव्हेत. मतांविषयींच्या या गैरसमजांमुळेंहि त्यांना फार त्रास भोगावा लागला ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. आणि हा त्रास सामान्य प्रकारचा नव्हता, तर प्राण घेणारा होता हें सुशीलेनें सुनंदरावाला लिहिलेल्या पुढील पत्रावरून दिसून येईल.

"सोनगांव, शनिवार,

"प्रिय मित्र सुनंदराव यांस—सा. न. वि. वि.—शाळेचें ठीक चाललें आहे. आपलें खादीप्रचाराचें कार्य वऱ्हाडांत चांगलें चाललें आहे—निदान आपलीं व्याख्यानें पुष्कळ ठिकाणीं होत आहेत व तुमची वाहवा होत आहे—हें तिकडील वर्तमानपत्रांवरून दिसतें.

"माझ्या पुनर्विवाहाला आईला आपण युक्तीनें अनुकूल करून घेतलीत;

परंतु अजून देखील आपण लग्नाचे बाबतींत वधूवरांच्या आईबापांची अनुकूलता पाहातां, वधूवरांच्या मनाची अनुकूलता आहे किंवा नाहीं हें पाहात नाहीं! 'आम्हीं पाहातों' असें तुम्ही म्हणाल; अनुकूलता दिसली म्हणूनच पुढील गोष्टींना आरंभ केला असेंहि तुम्ही सांगाल; पण स्त्रियांचें मन पूर्णपणें समजणें तुम्हांला अशक्य आहे. मी अनुकूल आहें आणि नाहींहि. हें कसें तें तुम्हांला थोडेंबहुत ठाऊक आहेच. अधिक सांगणें हें समक्ष व तोंडींच शक्य आहे. आणि आतां सांगण्याची जरूरहि नाहीं, म्हणून पत्रद्वारें सांगत नाहीं.

"जरूर नसण्याचें कारण असें, कीं बळवंतरावांवर आपलेप्रमाणेंच प्राण घेणारा प्रसंग आला व ते आतां अंथरुणावर निजून आहेत. गेला रविवार हा त्यांचा घातवार होता असें दिसतें! सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं झोंप येई-पर्यंत अपमानपरंपरा लागली होती. पहिला अपशकून माझेकडून झाला. दोघेंजण सकाळीं फिरावयास गेलों असतां सगळ्यांच्या दृष्टीनें पाहाण्याची व सर्वांशीं गोड बोलून, गोडपणें वागून, सर्वांचा होतां होईतों संग्रह करण्याची त्यांची वृत्ति वास्तविक उदारपणाची आहे व श्रेष्ठ धारिष्टाची आहे हें जरी मी ओळखून होतें व आहें, तरी मीं ती आमच्या संभाषणांत हास्यास्पद ठरवून टाकली. हा अपशकुनाचा केवळ आरंभच. संभाषणाच्या ओघांत पुनर्विवाह आणखी एक वर्ष तरी अशक्य हें मीं जेव्हां सांगितलें, तो खरा वज्रघात. हें माझ्याकडून सुचविलें गेल्यानंतर अचलेश्वरीच्या देवळापर्यंत आम्ही बहुतेक अबोलाच धरून चाललों होतों—बोलण्याकरितां हजार विषय काढले, पण खरें संभाषणच होईना. अचलेश्वरीला नमस्कार करण्याकरितां बळवंतराव आंत शिरल्यावर तेथें पूजा करीत असलेल्या अण्णंभटानें 'तुम्ही नास्तिक–बाटगे लोक देवळांत येऊन आम्हांला कां बाटवूं पाहातां?' असें म्हटलें. उत्तर वगैरे न देतां आम्ही लगेच तेथून परतलों. घरीं गेल्यावर चहा वगैरे पिऊन अंघोळ करून मामलेदारांच्या अध्यक्षतेखालीं हिंदु-मुसलमान पुढाऱ्यांची दिलसफाई व दिलजमाई व्हावी म्हणून जी खाजगी सभा भरली होती त्या सभेला ते गेले. तेथें मुसलमान पुढाऱ्यांनीं त्यांच्या ढोंगी न्यायप्रियतेची आणि 'बामणी काव्या'ची चांगलीच हजेरी घेतली व सभेंत कांहीं एक निष्पन्न न होतां ते परत आले. संध्याकाळीं ते एका बाजारांतल्या खुल्या जागेंत भरविलेल्या ब्राह्मणेतरांच्या सभेला बोलावलें होतें म्हणून गेले. हेतु हा कीं ब्राह्मण–ब्राह्मणेतरांमध्यें सलोखा वाढावा. सभेंत गेल्यानंतर ब्राह्मण–निंदाप्रचुर भाषणें झालीं—तीं त्यांनीं शांतपणें ऐकून घेतलीं.

उत्तर देण्याची इच्छा मुळींच नव्हती; परंतु मंडळीनें फारच आग्रह केल्यावरून बोलावयास उठले, तोंच ' बामण इथं कशाला ? ' ' बसवा ' बामणि बच्चाला ! असे उद्गार व त्यांच्या पाठोपाठ बटाटे व कांदे यांचा त्यांच्यावर वर्षाव होऊं लागला आणि बखेडा माजून मारामारी झाली आणि चार–पांच ' बामणां 'चीं डोसकीं शेकलीं गेलीं ! मारामारीची चौकशी करण्याचा बहाणा करून कांहीं पोलिस अंमलदारांनीं त्यांना जखम झाली असतांच चावडीवर नेलें व तेथें पाचकळपणा करून त्यांचें मन दुःखित केलें. पुढें कलेक्टर साहेबांकडून ते पोलीस बडतर्फ केले गेले ही गोष्ट वेगळी.

" एकंदर प्रकार हा असा होऊन ते सध्यां अंथरुणावर पडून आहेत. आपला मुद्दा न सोडतां सर्वांना खूष करण्याची, त्यांची बोलण्याची व वागण्याची पद्धति अलीकडे कांहीं वर्षें तेवढी यशस्वी होत नाहीं. कारण काय बरें असावें ? मी तर अप्रत्यक्ष कारण नाहीं ? मद्विषयक विचारांनीं व विकारांनीं मन अस्वस्थ होऊन त्यांची ती सात्त्विक प्रसन्न मुद्रा, त्यांचा तो आत्मविश्वास, यश एकसारखें मिळत गेल्यामुळें सदोदित वहात राहाणारा आनंदाचा जिवंत झरा, त्यांचें तें सर्वांस पसंत पडणारें भाषण, त्यांचें तें सर्वांना कौतुकास्पद वाटणारें ' कर्मसु कौशल '–हीं सर्व आतां मंदतेज होऊं लागलीं आहेत कीं काय अशी मला शंका येऊं लागली आहे. अप्रत्यक्षपणें मी या सगळ्याला कारणीभूत आहें, हा विचार माझ्या मनाला किती जाचक होत असेल याची तुम्हांला कल्पना करतां येईल. पण उपाय काय ? तुम्हांला सुचल्यास कळवावा. खादीप्रसाराचें सार्व-जनिक कार्य सोडून इकडे येण्यास तुम्हांला सांगणें स्वार्थाचें असेल; पण मित्र-कार्याला व मैत्रिणीच्या समाधानाला कांहीं तरी महत्त्व आहेच. कळावें, लोभ असावा हे विनंति.

" आपली बालमैत्रीण

**सुशीला** "

---

## ३४ : लोभमूलानि पापानि

**मा**गील प्रकरणांत वर्णन केलेल्या परिस्थितींत तदनंतरच्या सहा महिन्यांमध्यें फारच फरक घडून आला होता. सोनगांवांत सहसा प्लेग येत नव्हता; परंतु या सालीं तेथें रोज दहादहा बाराबारा केसीस होऊं लागल्या होत्या. पांढरपेशी

ब्राह्मण, गुजर, सोनार, कासार वगैरे मंडळी गांवाबाहेर आवशांत किंवा शेतांतल्या पडळींत वगैरे राहाण्यास गेली; पण बाकीच्या लोकांना कांहीं ना कांहीं तरी कारणानें गांवांतच राहाणें किंवा येणेंजाणें भाग पडल्यामुळें पुष्कळच लोक त्या वर्षी प्लेगला बळी पडले. त्यांत पुन्हा त्या सालीं दुष्काळ आला. पाऊस चांगला पडला होता, भाताचीं पिकें सोळा आण्यांच्या ऐवजीं अठरा आणे आलीं होतीं, पण नको त्या वेळेस पाऊस पडून आलेल्या पिकांची नासाडी होऊन गेली होती. प्लेगमुळें गांव अर्धवट ओसाड झालेले. त्यांत पुन्हा दुष्काळ. अशा स्थितींत चोऱ्या, दरोडे इत्यादिकांचा सुळसुळाट न झाला तरच नवल! आणि खरें पाहिलें, तर जेथें सगळेच झांकलेले चोर व दरोडेखोर आहेत तेथें या चोरांना आणि दरोडेखोरांना तरी नांवें कोणत्या तोंडानें ठेवावयाचीं? असो.

सोनगांवांत एक एल्. एम्. ॲण्ड एस्. झालेला म्हातारा डॉक्टर व एक एम्. बी. बी. एस्. झालेला नवा डॉक्टर, शिवाय एक हॉस्पिटल ॲसिस्टंट आणि चार–पांच गांवठी वैद्य आणि दोन हकीम एवढीच रोगचिकित्सक मंडळी. **त्यांची अर्थात पोळी पिकली. त्यांनाहि दोष देण्याचें कारण नाहीं, –दोष देणें अन्यायाचें होईल.** समाजाची परिस्थिति व रचनाच अशी आहे, कीं डॉक्टर वगैरे लोकांना अशा वेळीं साधतील तेवढे पैसे मिळविण्याची बुद्धि व्हावी. अशील पेंचांत सांपडल्यावर वकील जर त्याच्यापासून हवे तसे पैसे उकळतो,–गुजर, मारवाडी, सावकार, कुळकर्णी, तलाठी, पाटील, पोलीस, शिपाई, फॉरेस्टचे राउण्डगार्ड, मामलेदार,–झाडून सर्व मंडळी जर अडचणीत सांपडलेल्या माणसापासून जेवढे पैसे काढतां येतील तेवढे काढतात, तर डॉक्टर लोकांनीं संधि आल्यावर चार पैसे मिळविले तर त्यांना दोष देण्याचा वरील मंडळीला काय अधिकार? तेव्हां दोष कोणाला न देतां वस्तुस्थिति सांगावयाची म्हणजे ती अशी, कीं पैशाच्या अभावामुळें पुष्कळ लोकांचे प्राण गेले. कित्येक बालिकांना वैधव्य आलें. याबद्दल तेथले वैद्य व डॉक्टर जबाबदार नसतील (कारण, प्लेगच्या पुढें ते तरी काय करणार?) पण त्यांनीं जर पैशाकडे जरा कानाडोळा केला असता तर एक दोन बालिकांचें तरी वैधव्य चुकलें असतें असें मानण्याला पुरावा आहे. गरीब मराठ्यांना, महारमांगाना आपलीं लहानगीं मुलें जिवापेक्षां प्यारीं असतात. पण बिचाऱ्यांच्याजवळ पैसा नसल्यामुळें मुलांना औषधपाणीदेखील मिळण्याची पंचाईत पडून मुलांचे हालहाल होऊन प्राण जाण्याच्या वेदना पाहाण्याचें

त्यांच्या नशिबीं येतें व त्यांना पुरून टाकण्याचे सोहाळे पाहावे लागतात ! वैद्य-डॉक्टरांनीं सगळयांना वांचविलें असतें असें नाहीं; पण कांहीं तरी मुलें वांचलीं असतीं ना ? औषधपाणी आपण देतों एवढें तरी समाधान त्यांना मिळालें असतें ना ? रोग्याच्या वेदना तरी कमी करतां आल्या असत्या ना ? सर्व समाजच आपआपल्या परीनें व ज्याला जेव्हां संधि येईल तेव्हां इतरांकडून पैसे काढण्याचा प्रयत्न करीत आहे व हा प्रयत्न करीत असतां इतरांची काय अवस्था होत असेल याचा विशेष विचार करीत नाहीं, तेव्हां वैद्य-डॉक्टरांनाच नांवें ठेवणें गैर होईल, ( आणि त्यांच्यामध्यें जे कांहीं लोभरहित आणि परोपकारी थोर लोक आहेत. त्यांच्यासंबंधानें तर हें अत्यंत अन्यायाचें आणि कृतघ्नपणाचें होईल ) पण प्लेगच्या दिवसांत वरील प्रकारचे विचार मनांत आल्याशिवाय राहात नाहींत.

आपणांला परिचित असलेल्या सोनगांवकर मंडळीवर या प्लेगाचा व दुष्काळाचा परिणाम फारच झाला, सुनंदरावाची दोन मुलें गेलीं. हीं अथात् पैशाच्या अभावामुळें नाहीं. कारण सुनंदराव हा जरी गरीब होता तरी पोरांकरितां त्यानें बायकोचे दागिने विकण्याचें ठरविलें व त्या माउलीनें बिचारीनें ते आनंदानें काढून दिले. त्याच्याविषयीं गांवात आदर होता आणि त्याचे एक डॉक्टर चांगले स्नेही होते व ते त्याजजवळून विशेष फीहि घेत नसत; परंतु गांवाबाहेर रहाण्यास जायचें म्हणजे पैशाचेंच काम असतें. शिवाय डॉक्टरनें पैसे घेतले नाहींत तरी प्लेगासारख्या आजारांत रोगशुश्रूषेच्या उपकरणांना व औषध-पाण्याला पैसा लागतोच. पैशांची त्यानें कशीतरी व्यवस्था केली. पण एक दिवस अकालीं पाऊस येऊन आवशांत जेव्हां गळूं लागलें आणि आजारी मुलांना ठेवण्या-निजविण्याकरितां झोंपडींत सुकी जागा म्हणून राहिली नाहीं तेव्हां मात्र त्याच्या डोळयांतून अश्रू आले ! त्याच्या शेजारींच एका श्रीमंत ब्राह्मण सावकाराचा लहानसा बंगला, गुरांकरितां एक चांगला गोठा व गड्यांकरितां एक गोठ्यासारखीच झोंपडी होती. बंगला व हे गोठे रिकामेच होते; कारण हे सावकार आपल्या दुसऱ्या एका लांबच्या शेतावर तेथील हवापाणी चांगलें म्हणून राहाण्यास गेले होते. या गृहस्थाजवळ कित्येकांनीं बंगला राहाण्यास मागितला होता; पण त्यानें तो रिकामा ठेवला, परंतु प्लेगानें ग्रासलेल्या लोकांना दिला नाहीं ! कित्येकांनीं गोठे तरी द्या असें म्हटलें–आणि अशा याचकांमध्यें सुनंदराव होता–पण ही देखील याचना त्या सद्‌गृहस्थानें मान्य केली नाहीं ! सुनंद-

रावाच्या आवशांत गळूं लागून मुलें ठिवकणाऱ्या पाण्यानें भिजूं लागलेलीं पाहून सुनंदरावाच्या डोळ्यांतून अश्रु आले असें वर म्हटलें; पण त्या अश्रूंच्या पाठीमागें दुःख जसें होतें तसा गवाणींतल्या कुत्र्याप्रमाणें वागणाऱ्या त्या ब्राह्मण सावकाराबद्दल रागहि होता. पण दुःख आणि राग दोन्हींहि गुंडाळून तो प्राप्तकर्तव्य करूं लागला. कर्तव्य करूनहि दोन मुलांच्या हालांचे, मृत्यूंचे व चितांचे देखावे पाहाण्याचें त्याच्या नशिबीं आलें. पण त्यानें आपलें सगळें दुःख व सगळा राग गिळून पुढील कर्तव्याला आरंभ केला व जणुं कांहीं आपणांला कांहीं झालेंच नाहीं असें बाह्यतः दाखवून शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्यांच्या आपत्तींतून सोडविण्याकरितां शक्य ती मदत करूं लागला.

बाहेरून कांहीं जरी त्यानें दाखविलें तरी एकंदर समाजव्यवस्था कोठें तरी बिघडलेली आहे व ती दुरुस्त करून घेतली पाहिजे असें त्याच्यासारख्या विचारशील कर्मयोगी मनुष्याच्या मनांत आल्याशिवाय कसें राहील? ब्राह्मण सावकाराला त्यानें इतरांप्रमाणें शिव्या दिल्या नाहींत, कारण एकंदर समाजाची रचना जर स्वार्थावर व लोभावर उभारलेली आहे—स्वार्थ व विशेषेंकरून द्रव्य-लोभ हाच जर समाजाचा पाया, हेच जर समाजवास्तूचे आधारस्तंभ, ह्याच जर समाजमंदिरांतील पूजनीय देवता, ह्यांच्याभोंवतींच जर बहुतेक सर्व लोक प्रदक्षिणा घालीत आहेत, ह्याच देवतांचे जे अनन्यभक्त त्यांनाच जर बहुतेक लोक वंदनीय व सन्मान्य समजतात, तर त्या सावकाराला दोष देण्याची प्रथम जरी इच्छा झाली व त्याचा प्रथम जरी राग आला तरी विचारान्तीं सुनंदरावाला असें वाटलें, कीं त्याला एकट्यालाच दोषी समजणें व त्याला जनांत नाहीं तरी मनांत दहावीस शिव्या हासडणें म्हणजे आपलें स्वतःचें विचारदौर्बल्य प्रगट करणें आहे. विचार केला असतां समाव्यवस्थाच सदोष आहे, म्हणजे ही व्यवस्था (किंवा अव्यवस्था) चालू देणारे आपणहि (अप्रत्यक्षपणें नव्हे, तर) प्रत्यक्षपणें सदोष आहों हें सुनंदरावाला पूर्वीं वाटतच होतें; पण आतां या गोष्टीचा मना-पासून व उत्कट विचार होऊन त्याला वरील तत्त्व चांगलें पटलें व तो मनाशीं उद्गारला, "सुशीला म्हणते तेंच खरं. आपला समाज विष्णु–शंकर इत्यादि देवांची पूजा नांवाला आणि बाह्यतः करतो; पण खरी मनापासूनची पूजा द्रव्याची आणि स्वार्थाची करतो. लोकांमध्यें खरा धर्म राहिला नाहीं, खरी भक्ति नाहीं, खरेपणा कोठेंच नाहीं. सगळा ढोंगाचा बाजार. या ढोंगाचा स्फोट कोणीं तरी एकदां स्पष्टपणें केला पाहिजे. गांधी हें कार्य करीत आहेत, पण अजून

त्यांची देवाची, धर्माची भाषा सुटत नाहीं. त्यांचा देवाधर्मावर खरा विश्वास असेल, पण लोकांचा नाहीं. कांहीं लोकांचा असेल, पण हे असे लोक थोडे. देवावर आणि धर्मावर विश्वास नसतां तद्वाचक शब्द आणि तत्संबंधीं दिखाऊ आचार कशाला पाहिजेत? पार सर्व नाहींसे केले पाहिजेत. सुशीला सडेतोडपणें बोलते तें ऐकलं म्हणजे कसंसंच वाटतं; पण एकंदरींत तीच खरी आहे. आणि तिचं बोलणंहि शेवटीं हितकारक होईल. आमच्यासारखे गुळमुळीत लोक फुकट आहेत. आमचा गुळमुळीतपणा लोकांच्या ढोंगाला उत्तेजन देतो."

सुनंदराव अशा रीतीनें विचार करीत बसला असतां बळवंतराव व सुशीला हीं त्याच्याकडे फिरत फिरत आलीं. या दोघांची कुटुंबविषयक परिस्थिति त्याच्यापेक्षां अधिक चांगली होती अशांतला भाग मुळींच नाहीं. बळवंतराव आपल्या शेतावर आवसा बांधून राहिले होते. प्लेगची कोणाला बाधा झाली नाहीं, पण कोणीं दुष्टांनीं अपरात्रीं आवशावर हल्ला करून त्याच्या प्रिय मातेला व पित्याला यमसदनाला धाडलें! हल्ला करणाऱ्या अत्याचारी लोकांचा हेतु दरोडा घालण्याचा होता का हिन्दुधर्माचा अभिमानी पुढारी म्हणून गणला गेलेला जो बळवंतराव त्याचा खून करण्याचा प्रयत्न कांहीं माथेफिरू मुसलमानी लोकांनीं केला होता, याचा अद्यापि पत्ता लागला नव्हता बळवंतरावालाहि जखम झाली होती, पण नशिबानेंच तो वांचला. तो ज्या खोलींत निजत असे त्या खोलींत कर्मधर्मसंयोगानें त्याचीं वृद्ध मातापितरें त्या रात्रीं निजलीं होतीं आणि त्या दरोडेखोरांच्या किंवा अत्याचारी धर्मवेड्यांच्या हत्यारांना तीं बळीं पडलीं. पोलिसांचा तपास चालू होता, पण अद्यापि निश्चित असें कांहीं निष्पन्न झालें नव्हतें. कांहीं निष्पन्न झालें असल्यास पोलिसांचा त्रास मात्र निश्चित निष्पन्न झाला होता.

सुशीलेवर असले प्रसंग आले नव्हते; पण जगाची एकंदर स्थिति पाहून—हिंदुस्थानाबाहेरील देशांची, हिंदुस्थानची, सोनगांवची व विशेषेंकरून सुनंदरावांची व बळवंतरावांची स्थिति पाहून—तिचीं आधींच जहाल असलेलीं धार्मिक, सामाजिक व राजकीय मतें आतां अगदीं पूर्णपणें ज्वलज्जहाल बनलीं होतीं. तिचा शाळा—मित्र मास्टर काफ (Calf) याचीं तिला अलीकडे जीं वारंवार पत्रें येत, त्यांनीं या ज्वलज्जहालपणाच्या आगींत भरच घातली. तो प्रेमवेडा झाला होता हें सुशीलेला थोडेंसें दुःखदायक व बरेंचसें सुखकारक वाटत होतें—कारण ती झाली तरी तरुण स्त्रीच होती! (कोणत्या तरुणीला आपण अनेकांचें मन आकर्षण करून घेतों ही

जाणीव सुखवीत व खुलवीत नसेल ?) पण काफबद्दल तिला जें खरें वाईट वाटावयाचें तें हें, कीं हा उच्च तरुण मनुष्य कृत्रिम समाज-रचनेमुळें फुकट चालला आहे. त्याचीं मतें नास्तिक्याकडे झुकत होतीं व तो जहाल विश्वकुटुंबवादी बनत चालला होता हें सुशीलेला ठाऊक होतें. (त्याच्या या प्रवृत्तीमुळें सुशीलेचीहि तशी प्रवृत्ति झाली, का सुशीलेमुळें त्याची तशी प्रवृत्ति झाली हें कोडें, अंडें आधीं का कोंबडी आधीं, या कोड्याप्रमाणेंच न सुटण्यासारखें आहे!) मास्टर काफ याचीं मतें त्याच्या पालकांना पसंत नव्हतीं. ते स्वतः टिळेमाळा करणारे धर्मध्वजी रोमन कॅथलिक होते! मास्तर काफला त्यांनीं सांगितलें, तूं आपल्या नास्तिक्याचा व विश्वकुटुंबवादाचा उघड पुरस्कार करण्याचें सोडलें नाहींस, तर तुला यापुढें पैसे मिळणार नाहींत. मास्टर काफनें अर्थात् या अटी कबूल केल्या नाहींत आणि तो हिंदुस्थानांत अर्धवट बेकार स्थितींत भटकत होता. टिकेट-कलेक्टरची जागा त्याला एकदम मिळाली होती; पण त्याच्या उत्साहामुळें व उद्योगामुळें 'रेल्वे कामगार-संघाची' सभासद मंडळी वाढली, संघाचें काम जोरानें व नेटानें होऊं लागलें आणि अखेर एक संप पुकारला जाऊन तो यशस्वी रीतीनें पारहि पडला. पण याच त्याच्या गुन्ह्यामुळें वरिष्ठांनीं दुसरी कांहीं तरी सबब काढून त्याला बडतर्फ केलें होतें; आणि तो आतां बेकार होता. त्याला पैसे द्यावे किंवा नाहींत असा सुशीलेला विचार पडला. आपणांवर प्रेम करणाऱ्याला पैसे पुरविल्यास लोक भलताच अर्थ करतील अशी तिला भीति वाटली. ही भीति दूर सारून तिनें एकदां त्याला पैसे पाठवूं का म्हणून पत्रद्वारें विचारलेंहि; पण त्यानेंच तें पत्रोत्तरीं नाकारलें. 'पैसे कशासाठीं घ्यावयाचे? जगण्यासाठीं ना? पण कृत्रिम, ढोंगी, अन्यायी, खोट्या जगांत जगून करावयाचें आहे काय? मला तर जीव द्यावासा वाटत आहे. मरणाच्या आधीं तुला एकदां भेटावें अशी इच्छा आहे व भेटेनहि. तेथपर्यंत पुरण्याइतके पैसे मजजवळ आहेत"-अशा आशयाचें पत्र तिला त्याच्याकडून नुकतेंच आलें होतें. समाजांतील क्षुद्र स्वार्थीपणाचा, संभावित ढोंगीपणाचा, स्वयंसंतुष्ट भांडवलशाहीचा, सदाचारहीन धार्मिकतेचा तिला अगदीं वीट व तिटकारा आला होता. ती एरव्हीं शान्त, गोड व जुळतें घेणाऱ्या स्वभावाची होती. पण सुनंदराव, बळवंतराव व मास्टर काफ यांच्यावर आलेल्या प्रसंगांसारखे प्रसंग पाहून तिच्या अंगाची लाही होत असे आणि तिच्या तोंडून बेफामपणाचे, किंबहुना अविचाराचे उद्गार निघत. आधींच तिचीं मतें समाजांत सर्व प्रकारची क्रांति घडवून आणली पाहिजे या दिशेकडे झुकणारीं, त्यांत पुन्हां

असल्या प्रसंगांचा त्यांवर अपघात झाला; मग काय विचारतां ? ते क्रान्तिप्रवण विचार आतां दृढ, स्पष्ट, बलवान्, अभिनिवेशयुक्त आणि आग्रही बनले. पूर्वींच्या आणि आतांच्या विचारांतील भेद एका अर्थी 'प्रमाणभेद' असेल; पण हा प्रमाणभेद इतका मोठा होता, कीं तो 'प्रकारभेद' गणण्यास हरकत नव्हती. पूर्वींचीं मतें खडतर अनुभवांमुळेंच बनलेलीं होतीं, पण त्यांत थोडा तरी पुस्तकी अंश होता. आतां बालमित्रांवरचे दोन प्रसंग व आंग्ल-शालेय मित्र मिस्टर काफ याच्यावरचा हा प्रसंग, हे पाहिल्यावर आणि त्यांची कारणमीमांसा मनाशीं केल्यावर तिला वाटूं लागलें, कीं समाजाच्या मुळाशींच कीड लागलेली आहे व ती काढण्याचा प्रयत्न करणें हेंच आपल्या जीविताचें इतिकर्तव्य. 'नवयुगीन विश्वकुटुंबी संस्था' तिनें आधींच काढली होती; पण तिचें कार्य अद्यापि जोरांत चाललेलें नव्हतें; किंबहुना ती संस्था केवळ कागदावरच असून प्रत्यक्ष असें कार्य ती कांहीं फारसें करीत नव्हती. पण आतां या संस्थेला वाहून घेऊन तत्प्रीत्यर्थ हरतऱ्हेचें कार्य करीत राहावें, जरूर पडल्यास शाळादेखील दुसऱ्याच्या स्वाधीन करून त्या जबाबदारींतून मोकळें व्हावें, असें तिला वाटूं लागलें. जवळच्या एकदोन उदाहरणांवरून समाजासंबंधीं सार्वत्रिक सिद्धांत काढणें तर्कशास्त्रदृष्ट्या चुकीचें असेल व व्यावहारिक दृष्ट्या घातुकहि असेल; पण तिच्या मनानें अगोदरच सिद्धान्तरूपानें ग्रहण केलेल्या तत्त्वांना स्वकीय जनांवरच्या खडतर प्रसंगांनीं दुजोरा दिला आणि त्या तत्त्वांच्या चैतन्यांत भर घातली, ही गोष्ट खोटी नव्हे. तिचीं तत्त्वें चुकीचीं असतील, तिची विचारपरंपरा सदोष असेल, तिचीं गृहीतकृत्यें निराधार असतील; पण तिची मनःस्थिति त्या वेळीं अशा प्रकारची झाली होती व अशा प्रकारच्या कारणांनीं झाली होती यांत शंका नाहीं. आपलीं प्रामाणिक मतें पुष्कळ वेळां वाचनानें श्रवणानें, विचारानें व वादविवादानें बनलेलीं किंवा बदललेलीं असतात; पण त्यांच्यामध्यें निश्चितता, चैतन्य, उत्साह व कार्यप्रेरकता हे गुण हृदयाला जाऊन भिडणाऱ्या अनुभवांवरूनच प्राप्त होतात हें ध्यानांत धरलें पाहिजे. असो.

बळवंतराव व सुशीला हीं आवशांत शिरलीं, त्याच्या मिनिटभर आधीं सुनंदरावांच्या पत्नीनें प्लेगच्या तडाक्यांतून उरलेल्या आपल्या मुलीला पतीजवळ दिलें होतें व ती आतां घागर व कळशी घेऊन दूरच्या विहिरीचें पाणी आणण्यास चालली होती. पाहुणे मंडळी आली म्हणून ती जरा थबकली; पण सुशीलाच म्हणाली, कीं 'पाण्याला का जातां ? चला, मी पण येत्यें. द्या मला एक घागर.'

सुनंदरावांच्या पत्नीनें "तुम्ही कशाला येतां? तुमचीं का हीं कामें आहेत? आमच्या नशिबीं हींच कामें आहेत; आम्ही आपल्या करतो तीं–" असें–तसें सद्भावानेंच पण नैराश्यपूर्ण अंतःकरणानें सांगितलें. पण सुशीलेनें आपणच तेथेंच बाजूला असलेली एक घागर उचलली आणि मग त्या दोघी कांहीं वेळ प्रेमाचा शाब्दिक कलह करून विहिरीवर पाणी आणण्याकरितां गेल्या. सुनंदराव बळवंतरावापाशीं विशेष कांहीं बोलला नाहीं; कारण लहान मुलीला उगी करण्यांत त्याची सगळी चतुराई खर्च होत होती. बळवंतरावानें तेथें पडलेला 'केसरी' प्रथम चाळला आणि नंतर 'टाइम्स' उघडून तो वाचूं लागला व मधून मधून कांहीं मथळे मोठ्यानें वाचून त्यांवर कांहीं विनोद अगर उपरोधिक किंवा आश्चर्यसूचक उद्गारात्मक टीका तो करीत होता. कांहीं वेळानें विहिरीवर गेलेल्या दोघी बायका आल्या. एकीनें चूल पेटविली व दुसरी स्त्रीसाम्राज्य व पुरुषराज्य यांच्या दरम्यानच्या क्षेत्रांत बसली.

"मला मुलं फार होताहेत, त्यांचं पुढं कसं होणार अशी तुम्हांला काळजी होती ना सुशीलाताई? आतां झाली ना निवारण!" सुनंदराव म्हणाले. सुशीलेनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. अशा वेळीं अशा प्रकारचा विनोद करणाऱ्यांपैकीं ती नव्हती. बळवंतरावालाहि तो विनोद रुचला नाहीं. त्याचा सुनंदरावाच्या बायकोवर काय परिणाम होईल हें अगोदर मनश्चक्षूंना व लगेच चर्मचक्षूंनाहि दिसून येऊन तो आपल्या मित्राच्या अकाल–विनोदी स्वभावाची कींव करूं लागला. आपली बायको रडूं लागलेली पाहून सुनंदराव ओशाळला व म्हणाला, "औदासीन्याचें पटल कोणीकडून तरी घालवावें म्हणून मीं असला अघोरी विनोद करण्याचा प्रयत्न केला. पण 'करायला जावं एक आणि व्हावं भलतंच' अशी माझी नेहमींचीच स्थिति आहे! त्यांत आश्चर्य कांहींच नाहीं."

या बोलण्यानें औदासीन्याची छाया सर्वत्र अधिकच पसरली. इतकी, कीं त्या दिवशीं बळवंतराव व सुशीला यांनीं जें बोलण्याचें योजून ठेविलें होतें तें न बोलतांच तीं उभयतां आपआपल्या आवशांवर परत गेलीं. दुसऱ्या दिवशीं परत सुनंदरावाकडे आल्यावर त्याच्या पत्नीच्या शोकात्मक स्थितींत तेथें खरें संभाषण व्हावयाचें नाहीं असें ओळखून त्यांनीं त्याला 'अचलेश्वरीला चला जाऊं' असें म्हणून बाहेर काढलें व तेथें जाऊन स्वतःची स्थिति पार विसरून जगाच्या उलाढालीच्या गोष्टी ते बोलूं लागले व हरतऱ्हेच्या सामाजिक, नैतिक व धार्मिक सुधारणा सहकारितेनें करण्याची प्रतिज्ञा त्यांनीं

त्या संध्याकाळीं केली ! नारायणरावाच्या मृत्यूनंतर बारभाईंनीं स्मशानांत जशा शपथा घेतल्या व प्रतिज्ञा केल्या तशापैकींच या शोकग्रस्त ध्येयवादी त्रिमूर्तींचा हा प्रकार होता. बारभाईंच्या प्रयत्नांची अखेर इतिहासावरून समजते; या त्रिमूर्तींच्या प्रयत्नांची अखेर कशी होणार आहे हें सांगणारा भविष्यवादी कोण आहे ? भविष्य जरी सांगतां आलें नाहीं तरी कांहीं गोष्टींचें दिग्दर्शन करतां येईल. तें पुढील प्रकरणांत करून भविष्यकालाच्या पोटीं काय आहे याचा निर्णय भविष्यकालावरच सोंपविलेला बरा.

---

## ३५ : अयं निजः परोवेति गणना लघुचेतसाम् ।<br>उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् ।।

"**तुमची** ही विश्वकुटुंबी संस्था ठीक आहे; पण अजून कांहीं खात्री पटत नाहीं." विनायकराव एकदां वाचकांच्या परिचयाच्या सोनगांवकर मित्रत्रयाला म्हणाले. "आपल्या इकडे '**वसुधैव कुटुंबकम्**'–सगळ्या जगाला आपलें कुटुंब मानावें हें तत्त्व जुनें आहे व तें सर्वमान्य आहे; पण तुमचा अलीकडचा विश्वकुटुंबवाद दिसण्यांत सारखा पण अगदीं भिन्न आहे. तुम्ही खाजगी मालमत्ता मुळीं मानीतच नाहीं. आमची सर्व समाजरचना खाजगी मालमत्तेवर उभारलेली आहे. आम्ही एवढेंच म्हणतों, कीं आपल्या मालकीचें जें असेल त्याचा आपण सद्व्ययच करावा म्हणजे अडचणींत असलेल्या आपल्या बंधुभगिनींना मदत करण्याच्या कामीं त्याचा उपयोग करावा. आपल्या समाजाचा पाया कुटुंब, तुम्ही कुटुंबव्यवस्थेवरच घाला घालतां."

"कबूल !" त्यांची मुलगी सुशीला म्हणाली. "तुम्ही म्हणतां तें सगळं कबूल; पण आमच्या मनांत वाईट काय आहे ? तुम्हीं भेद दाखविलांत तो खरा आहे; पण जुन्या विश्वकुटुंबवादापेक्षां नवा विश्वकुटुंबवाद अधिक चांगला आहे असं आमचं म्हणणं आहे; त्यांत चुकीचं काय आहे तें सांगा."

"सांगतों आतां काय काय चुका आहेत त्या." विनायकराव बोलूं लागले. "तुमची इथली संस्था अत्याचारी नसेल, अत्याचाराचा पुरस्कारहि करीत नसेल; पण तुमचे युरोपमधले थोरले भाऊ आणि तिथल्या थोरल्या भागिनी अत्याचारानें

देखील समाजव्यवस्थेंत क्रांति घडवून आणावी असें म्हणतात. ही झाली पहिली चूक. ही क्रांति एकदम घडवून आणावी असं ते म्हणतात ही दुसरी चूक. ही क्रांति **आपल्या** मताप्रमाणें असावी, सर्व लोकांना विचारण्याची जरूर नाहीं आणि त्यांना पसंत पडेपर्यंत वाट पाहण्याची मुळींच जरूर नाहीं असं ते मानतात ही त्यांची तिसरी चूक; आणि तुमचे सिद्धान्त इतिहासाच्या शिकवणुकीला सोडून आहेत असं नाहीं तर एकंदर मनुष्यस्वभावाला–मानसशास्त्राला सोडून आहेत, ही सर्वांत मोठी चूक."

"फिर्यादीतर्फेच्या वकिलाप्रमाणें चार मुद्दे काढलेत, त्यांना मी आरोपीतर्फेचा वकील म्हणून उत्तर देतों, कीं सोनगांवची आमची संस्था म्हणजे युरोपमधील संस्था नव्हे. अर्थात् युरोपमधल्या एखाद्या संस्थेला लागू असलेले आरोप आम्हांला लागू नाहींत."

"कबूल करतों हें मी." विनायकराव म्हणाले, "पण तिकडच्या संस्थेमध्यें आणि तुमच्या संस्थेमध्यें फरक काय आहे तो तुम्हीं सांगितला पाहिजे."

"फरक सांगतों;" बळवंतराव म्हणाले, "फरक असा, कीं आमचा अत्याचारावर विश्वास नाहीं. आम्ही गांधींचे भक्त नसलों तरी त्यांचा अनत्याचाराचा पुरस्कार आम्हांला बराच पसंत आहे."

"तात्या, 'बराच' शब्द ध्यानांत धरा बरं का." सुशीला म्हणाली. "'बराच' शब्दामध्यें बराच अर्थ आहे."

"आला, ध्यानांत आला अर्थ." तिच्या वडिलांनीं मंद स्मित करून उत्तर दिलें.

"तुम्ही हंसा," बळवंतराव म्हणाले. "पण आमचं खरं मत असंच आहे, कीं होतां होईतों जबरदस्ती करूंच नये. प्रबल मनुष्य अल्पबलाला एखादी गोष्ट जबरदस्तीनें करावयाला लावतो; पण तो अल्पबल मनुष्य आपण प्रबल केव्हां होऊं याची वाट पाहात असतो, व प्रबल झाल्याबरोबर पूर्वीच्या जबरदस्तीचा सूड उगवतो! एका मनुष्याची जी गोष्ट तीच मनुष्य-संघाची किंवा राष्ट्राची. जबरदस्तीनें दुसऱ्याकडून एखादी गोष्ट करून घेतां येते; परंतु हें यश टिकाऊ नसतें. खरें टिकाऊ यश मनुष्याला एखादी गोष्ट मनापासून तो जेव्हां ती करतो तेव्हां येतें."

" आणि म्हणूनच आम्ही सुधारणा घाईनें करूं इच्छीत नाहीं." सुनंदराव मध्येंच म्हणाला. " आम्हांला ' झटपट रंगारी ' सुधारणा नको आहेत. आम्ही आपल्या संस्थेच्या द्वारें लोकमत तयार करणार आणि मग शंभर–दोनशें–पांचशें वर्षांनीं जेव्हां सुधारणा व्हायच्या असतील तेव्हां त्या आपोआप घडून येतील."

" बरं, तिसऱ्या आक्षेपाबद्दल काय ? " विनायकरावांनीं विचारलें.

" तिसऱ्या आक्षेपाचं उत्तर असं, " सुशीलेनें उत्तर दिलें; "—कीं आमची सोनगांवची विश्वकुटुंबी चळवळ केवळ कामगारांचेंच वर्चस्व स्थापण्याकरितां नाहीं, त्याचप्रमाणें केवळ शेतकऱ्यांचें, केवळ मध्यमवर्गाचें, केवळ सरदारांचें किंवा केवळ सरकारी नोकरांचें वर्चस्व स्थापण्याकरितां नाहीं; आम्हांला सर्व जनता–जनार्दनाचें वर्चस्व पाहिजे आहे. पांचामुखीं परमेश्वर असें आमचें मत आहे."

" काय, बोलतेस काय तूं हें—" विनायकराव म्हणाले. " परमेश्वराचं नांव तुझ्या तोंडून आतां निघालं हें मोठंच पाप केलंस तूं ! "

" पाप झालं खरं;" सुशीलेनें स्मितपूर्वक गुन्हा कबूल केला. " माझ्या ध्येयात्मक समाजव्यवस्थेंत परमेश्वराला आणि इतर देवांना आणि देवींना पुराणकालीन वस्तुसंग्रहांतील 'मृत देवतां'च्या कपाटांत स्थान मिळेल, इतरत्र मिळणार नाहीं."

" ध्येयनिष्ठ लोकांच्या हृदयांत देवाला स्थान मिळेल असं तूं परवां म्हणालीस, विसरलीस वाटतं ?" बळवंतराव म्हणाले.

" विसरल्यें खरी," सुशीलेनें उत्तर दिलें. " पण एका अर्थी विसरलें नाहीं असेंहि म्हणायला हरकत नाहीं; कारण सात्त्विक लोकांच्या वगैरे हृदयांत जो देव वास करतो त्याचें नांव ' ध्येय ' असेल,–' देव ' हें नांव तो पुढें सोडून देणार आहे ! "

" कां ' देव ' या शब्दाचा विटाळ कां वाटतो ? " विनायकरावांनीं विचारलें. " एखाद्याची खरोखरच जर उच्चतमगुणविशिष्ट विभूतीवर श्रद्धा असली तर त्यानें ही श्रद्धा त्याज्य कां मानावी ?"

" खरोखरीच श्रद्धा असली तर उच्चतमगुणविशिष्ट विभूतीवर श्रद्धा ठेवण्यास हरकत नाहीं. " सुशीलेनें उत्तर दिलें.

" पण आपण मूळ मुद्दा सोडून देत आहोंत. आमची विश्वकुटुंबी संस्था ईश्वरवादी नाहीं आणि निरीश्वरवादी नाहीं; आम्हीं सत्यवादी आहोंत सर्व लोकांना आमच्या राज्यव्यवस्थेंत विचारस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य असेल. विशिष्ट

वर्गाचा इतर वर्गावर जुलूम असावा हें मतच मुळीं आम्हांला पसंत नाहीं, म्हणून आमच्या राज्यांतील लोकांनीं ईश्वर मानावाच किंवा मानूं नयेच असा आम्ही निर्बंध घालूं इच्छीत नाहीं."

"तुम्हांला राज्य जणुं कांहीं मिळालंच आहे अशी तुझी भाषा दिसते. तुमच्या राज्यांतली पाहिली राणी तूं आहेस असं दिसतं!"

"आमच्या राज्यांत राजा नाहीं आणि राणी नाहीं—सगळेच आम्ही कामकरी!" सुशीलेनें उत्तर दिलें.

"असं कसं होईल?" विनायकराव थट्टेच्या स्वरांत म्हणाले. "मुंग्या सगळ्या कामकरी असतात; पण त्यांच्यामध्यें देखील एक 'राणी मुंगी' असतेच; ती तूं होणार अशीं मला लक्षणं दिसूं लागलीं आहेत! पण ही थट्टा सोडून देऊन माझ्या चवथ्या आक्षेपाकडे वळूं या. तुमच्या समाजव्यवस्थेचा हा सगळा डोलारा मनुष्यस्वभावाच्या आणि सहजप्रवृत्तीच्या विरुद्ध आहे आणि इतिहासाचीहि साक्ष अशीच आहे, यावर तुमचं उत्तर काय आहे? तुमच्या विश्वकुटुंबी संस्थेवर खरा आक्षेप म्हटला म्हणजे हाच आहे. यावर तुमचं काय म्हणणं आहे?"

"यावर आमचं म्हणणं असं आहे," बळवंतराव म्हणाले, "कीं मनुष्य स्वभाव कसा आहे हें निश्चित ठरविण्याला आज पुरेसें साधन नाहीं. आजपर्यंतच्या इतिहासावरून भविष्यकाळाबद्दलचीं अनुमानें करणें चुकीचें आहे. पूर्वीचा काळ आजच्या काळांहून फार भिन्न होता; आणि भविष्यकाळ, आजच्याहून फार भिन्न होणार आहे."

"या तुमच्या कल्पनेच्या उड्या आहेत." विनायकराव मध्येंच म्हणाले.

"असतील, कल्पनेच्या उड्या असतील; पण त्याला इतिहासाचा आधार तुमच्या सिद्धान्तापेक्षां अधिक आहे. मनुष्यसमाज दहा हजार वर्षांपूर्वीं होता तसा चारपांच हजार वर्षांपूर्वीं म्हणजे वेदकालीं नव्हता. वेदकालीं जसा होता तसा पुराणकालीं नव्हता. पुराणकालीं जसा होता तसा आज नाहीं. मनुष्याच्या वासना व महत्त्वाकांक्षा पूर्वीसारख्या राहिल्या नाहींत. पूर्वीं मनुष्य मनुष्याला खात होता, जें दिसेल तें आपलें म्हणत होता, जी स्त्री दिसेल ती आपली असं मानीत होता व तिला हें मानण्याला लावण्याचा गोडीगुलाबीचा किंवा जबरदस्तीचा प्रयत्न करीत होता. पूर्वीं 'कुटुंब' असलेंच तर अशा रीतीनें खुषीनें—

जबरदस्तीनें आलेल्या स्त्री–पुरुषांचें व त्यांच्या अपत्यांचें होतें. राज्य किंवा राष्ट्र असें कांहीं नव्हतेंच; घरेंदारें नव्हतीं; कायदे नव्हते; अर्थात् कोणाचे कोणते हक्क हें ठरविणारीं कोटेंहि नव्हतीं. या स्थितीशीं आजच्या स्थितीची तुलना करा आणि ' काल ' ही अजब चीज किती फरक घडवून आणीत असते, याचें मनाशीं आश्चर्य करीत राहा."

" तूं तर वक्तृत्वच करूं लागलास,बाळू ! " विनायकराव उद्गारले आणि डोळे मिस्किलपणें मिचकावून म्हणाले, " असला बाह्य फरक पुष्कळ झाला आहे हें कबूल. ' पुष्कळ ' म्हणजे फारच पुष्कळ--तुला वाटेल तेवढा ! पण मनुष्याच्या मूलभूत प्रवृत्तीमध्यें फरक झाला आहे का ? मनुष्याची स्वार्थबुद्धि नष्ट झाली आहे का ? कामवासना गेली आहे का ? क्रोध थंडावला आहे का ? असुया मरून गेली आहे का ? खरी गोष्ट अशी आहे, कीं मनोविकार सगळे तत्त्वतः पूर्वीसारखेच आहेत–ते व्यक्त करण्याची पद्धति मात्र बदलली आहे. मनोविकार तेच, फक्त पोषाख बदलला आहे. पोषाखांतला फरक सोडला तर पांच हजार वर्षांपूर्वीचा मनुष्य आणि आजचा मनुष्य यांत काय फरक आहे ? अवयव तेच. प्रवृत्ति त्याच. ज्ञान–म्हणजे माहिती–अधिक आहे, पण ' स्वभाव ' बदलला आहे असं म्हणतां येणार नाहीं."

" स्वभाव हा सहजप्रवृत्ति, शिक्षण, संवयी, संगत, सभोंवतालची परिस्थिति यांवर अवलंबून असतो असं म्हणतात. आणि हें जर खरं असेल—" बळवंतराव म्हणाले, " तर पांच हजार वर्षांपूर्वीच्या मनुष्याच्या आणि आतांच्या मनुष्याच्या स्वभावांत फार फरक आहे असंच अनुमान निघेल. कारण अवयव आणि त्यांच्या सहज–प्रवृत्ति यांशिवाय इतर बाबतींत या उभायतांमध्यें साम्य कांहींच नाहीं. अवयवांमध्येंहि थोडा फरक झालेला आहे. कारण हजरों वर्षांपूर्वीच्या माणसांचे व हल्लींच्या माणसांचे सांपळे जर तुलनेच्या दृष्टीनें पाहिले तर उंची, पायांची ठेवण, हातांची लांबी वगैरेमध्यें फरक दिसतो. पूर्वीचे लोक कमी उंच होते. ते पायांनीं चालत, पण किंचित् अस्वलासारखी त्यांची चाल होती. हात सापेक्षतः हल्लींपेक्षां लांब होते. ते लोक आजानुबाहु असावेत असं दिसतं. त्यांचं घ्राणेंद्रिय अधिक तीक्ष्ण होतं असं अनुमान आहे. पण शरीराच्या अवयवांमध्यें किंवा त्यांच्या शक्तीमध्यें कांहीं एक फरक झाला नाहीं असं गृहीत धरलं, तरी शिक्षण, संवयी, संगत, सभोंवतालची स्थिति या बाबतींत इतकी भिन्नता आहे, कीं पूर्वीच्या रानटी माणसाचा आणि विसाव्या

शतकांतील माणसाचा स्वभाव एक आहे म्हणणं हें अत्यंत अतिशयोक्तीचं आहे, आणि ही अतिशयोक्ति घातुक आहे."

"स्वभावांत भेद असेल; पण मूलतः भेद आहे का ? असा माझा प्रश्न आहे."

"त्यावर माझं उत्तर असं आहे," बळवंतराव म्हणाले, "—कीं फूल आणि फळ किंवा लहान मुलगी आणि तरुणी हीं 'मूलतः' जरी एक असलीं तरी त्यांमध्यें जसा जमीनअस्मानाचा फरक असतो तसाच प्रकार इथं आहे."

"आणि शिवाय" सुनंदराव म्हणाला, "—दुसरं असं, कीं मनुष्यस्वभाव पूर्वींसारखाच आहे असं गृहीत धरलं, तरी हा स्वभाव व्यक्त होण्याच्या बाबतींत तुम्ही फरक मानतांच. तेव्हां जरी पूर्वींसारखेच मनोविकार असले तरी त्यांची अभिव्यक्ति भिन्न असूं शकेल; आणि एवढं कबूल केलंत म्हणजे आमचं काम झालं."

"मनुष्यस्वभाव ही एक स्थिर, नित्य वस्तु आहे असं मानण्यांत जशी एक चूक होते आहे," सुशीला म्हणाली, "—तशी दुसरी चूक अशी होते आहे, कीं मनुष्यस्वभाव केवळ स्वार्थी, आपमतलबी, कामैकप्रेरित, अधिकारलोलुप असं सामान्यतः मानण्यांत येतं. मोठमोठे लोक देखील पुष्कळदां असंच म्हणतात. पण मनुष्यांत उच्च प्रवृत्ति आणि मनोवृत्तिहि आहेत. त्याला स्वार्थ प्रिय असेल; पण 'स्व'मध्यें तो कुटुंबाचा–देशाचा–मनुष्यजातीचाहि समावेश करतांना आढळतो. स्वार्थाबरोबर त्याला परार्थहि प्रिय आहे. स्वार्थ बहुधा प्रबळतर होतो; पण परार्थहि कित्येक वेळां प्रबळतर होऊं शकतो. शिवाय, ज्ञानानें व अनुभवानें खरा स्वार्थ आणि परार्थ यांचा अविरोध जसजसा दिसून येऊं लागतो, तसतसा स्वार्थप्रवृत्ति व परार्थप्रवृत्ति यांमध्येंहि साहजिकच अविरोध उत्पन्न होऊं लागतो. उदाहरणार्थ, शेजारच्या घरीं प्लेग झाला म्हणजे आपल्या घरींहि प्लेग होण्याचा संभव आहे ही जाणीव एकदां तीव्रतेनें उत्पन्न झाली म्हणजे शेजारींदेखील प्लेग होऊं नये अशाबद्दल लोक दक्ष होऊं लागतात, असा आजकाल आपण अनुभव पाहतोंच आहोंत."

"कबूल आहे, कबूल आहे तुमचं सगळं म्हणणं," विनायकराव म्हणाले, "पण अद्यापि तें चांगलंसं गळीं उतरत नाहीं. कारण सांगतां येत नाहीं; पण पटत नाहीं एवढी गोष्ट खरी. माझ्या बोलण्याचा हा प्रकार बायकी आहे हें मला कबूल आहे; पण वस्तुस्थिति ही अशी आहे."

“ बोलण्याचा बायकी प्रकार म्हणतां, पण या भाषेवर सुशील आक्षेप घेईल हो ! ” सुनंदराव म्हणाला.

“ आक्षेप घेणारच, ” सुशीला म्हणाली; “ पण सध्यां घेत नाहीं. आमच्या तात्यांचं चुकतं आहे कुठं, तर जगांत विचारांमध्यें व आचारांमध्यें केवढ्या मोठ्या मोठ्या आणि किती झपाट्यानं क्रान्त्या होत आहेत यांकडे ते लक्ष देत नाहींत ! खाजगी मालमत्तेच्या पद्धतीपासून लोकांचं किती नुकसान होत आहे हें लोकांच्या एकदां नजरेस आलं, म्हणजे हळुहळू कालांतरानं हल्लींच्या समाज-व्यवस्थेंत फरक होत जाऊन विश्वकुटुंबी व्यवस्थेकडे समाजाच्या प्रवृत्तींची दिशा झुकणार यांत शंका नाहीं. आतांच पाहा ना, आगगाड्यांचे रस्ते, रेल्वे, पोस्ट ऑफिसं, पोलिस, सैन्य हीं सर्व खाजगी मालकीचीं राहिलीं नाहींत, तर तीं बहुतेक सार्वजनिक स्वरूपाचीं झालीं आहेत आणि त्यांची व्यवस्था बरीच चांगली आहे. विशेषेंकरून पोस्टाची व्यवस्था सार्वजनिक स्वरूपाची आहे, तरी ती किती उत्तम चालली आहे ! जी. आय. पी. सारख्या कांहीं रेल्वे, आतां जशा राष्ट्राच्या झाल्या आहेत, तशाच सगळ्या झाल्या तर त्या काय चालणार नाहींत असं वाटतं ? आणि पोस्टाप्रमाणें आणि रेल्वेप्रमाणें खाणी आणि जमिनी सार्वजनिक मालकीच्या झाल्या तर अव्यवस्था माजेलच असं निश्चयानं म्हणण्याला पुरावा काय ? आज, उद्यां किंवा एकदोन पिढ्यांत ही क्रांति होणार नाहीं व होणं इष्टहि नाहीं; पण पुढं मागं केव्हांहि होणार नाहीं आणि झाली तर वाईट परिणाम घडून येतील असं खात्रीनं म्हणण्याला पुरावा काय आहे ? असले प्रयत्न पूर्वी फसले हा इतिहासाचा पुरावा एवढंच सिद्ध करतो, कीं या बाबतींत यश येण्याला अडचणी पुष्कळ होत्या. पण कालमानाप्रमाणं हरतऱ्हेच्या यांत्रिक व इतर सुधारणा होत आहेत; लोकांमध्यें ज्ञानवृद्धि होत आहे; लोक इतके दिवस निजलेले होते ते आतां जागे झाले आहेत; व्यक्ति–व्यक्तींचे, राष्ट्रा–राष्ट्रांचे हितसंबंध एकमेकांस निगडित झाले आहेत याची जाणीव उत्पन्न होऊन दुसऱ्याचं हित किंवा अनहित तें वस्तुतः आपलंहि हित किंवा अनहित हें अनुभवान्तीं व्यक्तींना व राष्ट्रांनाहि चांगलं कळूं लागलं आहे; संशयी, स्वार्थी कलहात्मक वृत्ति शेवटीं आपल्यालाच घातुक होते हें तत्त्व पटूं लागलं आहे; विश्वासानं विश्वास वाढतो व मनुष्य विश्वासार्ह होतो, तसंच प्रेमानं प्रेम वाढतं आणि मनुष्य प्रेमार्ह होतो; या तत्त्वाचाहि अनुभव अनेकांना अनेक क्षेत्रांत येत आहे,–अशा स्थितींत भविष्यकाळीं विश्वकुटुंबवाद लोकांना पटेल व तो त्यांना चांगलं यशहि देईल असं कां मानूं नये ? ”

"कां मानूं नये याचं उत्तर असं, कीं यश येईलच खास, अशी खात्री करून देणारा निश्चयात्मक प्रबळ पुरावा नाहीं." विनायकरावांनीं उत्तर दिलें.

"नसेल, पुरावा नसेल," सुनंदराव म्हणाले, "पण पूर्वींच्या 'समाज-व्यवस्थे' नं आतांपर्यंत अव्यवस्थाच माजविली ही तर गोष्ट खोटी नाहीं ? आतांच्या समाजव्यवस्थेला काय मोठंसं सुयश मिळालं आहे तर आम्हीं अपयशाला भ्यावं ! आतांपर्यंतचा इतिहास म्हणजे कलह, मारामाऱ्या, खून यांचाच बराचसा इतिहास. लढायांत आणि युद्धांत शत्रूंचा जीव घेणं म्हणजे वास्तविक खून करणं होय; पण हे खून प्रतिष्ठितपणाचे, कायदेशीर आणि मोठ्या प्रमाणावर आणि पुष्कळ वेळां अप्रत्यक्ष असतात म्हणून त्यांना खून म्हणायचं नाहीं इतकंच. दुसरं असं, कीं हल्लींच्या समाजव्यवस्थेंत कोण सुखी आहे, तर आमच्या विश्व-कुटुंबी समाजामुळं दुःख ओढवेल म्हणून आम्हीं चिन्तातुर व्हावं आणि सदाशा आणि सदुद्योग सोडून देऊन आहे त्या स्थितींत समाधान मानावं ? हल्लींच्या समाजांत—हिंदुस्थानांतल्याच नव्हे, तर कोठल्याहि समाजांत—मजूर संतुष्ट नाहींत, मालक नाहींत, कारकून नाहींत, शिक्षक नाहींत, मध्यम वर्ग नाहीं, सरदार नाहींत, व्यापारी नाहींत, कारखानदार नाहींत,—कोणीच नाहीं. हल्लींच्या समाजव्यवस्थेंत तरुण मुलगे असंतुष्ट, मुली असंतुष्ट, स्त्रिया असंतुष्ट, पुरुष असंतुष्ट;—जो तो मनांत झुरतो आहे, समाधान कोणालाच नाहीं. प्रत्येकजण इतरांना दोष देतो आहे आणि आपल्या अपयशाचं किंवा दुःखाचं खापर फोडण्याला शेजाऱ्यापाजाऱ्यांचीं किंवा आप्तसंबंधीं लोकांचीं डोकीं मिळालीं नाहींत तर समाजाच्या डोक्यावर हें खापर तो फोडतोच—नाहीं तर निदान 'दैव' किंवा 'देव' यांचीं डोकीं केव्हांहि आणि कोणालाहि आणि कोठेंहि खापर फोडण्याच्या या कामाला उपलब्ध आहेतच !"

"पण सुशीलेच्या विश्वकुटुंबी समाजव्यवस्थेंत देवांची हकालपट्टी झाल्यामुळें खापर फोडण्याचं तें एक स्थान कमी होईल ! ही एक मोठी आपत्तिच ओढवणार आहे म्हणायची !" विनायकराव थट्टेच्या स्वरानें म्हणाले.

"आमच्या राज्यांत देवाला स्थान नाहीं खरं—" सुशीला थट्टेला थट्टेनेंच उत्तर देण्याच्या स्वरांत म्हणाली. "पण कांहीं लोक हृदयांत त्याला स्थान देणारे असतीलच ! त्यांना तो अगदीं जवळच सांपडेल, आणि इतरांनीं या हृदयस्थ आणि अंतर्यामीं वास करणाऱ्या देवाच्या नांवाचा उच्चार करून खापर फोडावं ! उंच आकाशांत, किंवा कैलासावर, किंवा स्वर्गांत किंवा लांबच्या क्षीरसागरांत

असलेल्या देवाला जर इथली हांक ऐकूं जाते आणि इथल्या दगडी मूर्तींच्या माथ्यावर वाहिलेलीं फुलं जर त्याला पोंचतात, तर इथून दिलेले शिव्याशापहि त्याला खात्रीनं पोंचतील."

"तुझ्या या फटकळपणानें तुझ्या बाजूच्या सत्याची किंमत तूं कमी करतेस;" विनायकराव म्हणाले. "बाकी तुला दोष देऊन काय उपयोग? मींच या चेष्टेला आरंभ केला, तेव्हां तुला कोणत्या तोंडानं दोष देऊं?"

"देवाचं नांव आलं, कीं सुशीलेचं डोकं उठतं आणि ती कांहीं तरी बडबडूं लागते, तेव्हां तो प्रश्नच सोडून मूळ विचार करूं या." सुनंदराव म्हणाला. "सुशीलेचा मुद्दा असा होता, कीं हल्लींची समाजव्यवस्था म्हणजे अव्यवस्था आहे—तिला व्यवस्था हें नांव सौजन्यानं द्यायचं एवढंच. I. C. S. मधला साहेब जसा Indian नसतो, Civil नसतो आणि Servant हि नसतो, तथापि त्याला आपण Indian Civil Servant म्हणतोंच, तसंच समाजांतील हल्लींच्या अव्यवस्थेला 'व्यवस्था' म्हणायचं झालं. खरा प्रकार असा आहे, कीं समाजाचा पाया डळमळीत आहे अशी लोकांना शंका येऊं लागली आहे; समाजाचा डोलारा ताबुताप्रमाणें हलत आहे; हा डोलारा एकदां गडगडून पडला तर नवीन इमारत मजबूत पायावर बांधतां येईल अशी कांहीं लोकांना कल्पना सुचूं लागली आहे–इतकंच नव्हे, तर ते त्या दिशेनं प्रयत्न करीत आहेत. कोठल्याहि देशांतल्या जुन्या परंपरागत रूढींचा आणि ढोंगासोंगाचा आधार असलेली इमारत आज ना उद्यां,–नाहीं तर ५००० वर्षांनीं,–कोसळणार यांत शंका नाहीं. मग या असल्या अपेशी समाज'व्यवस्थे'चं अवडंबर माजविण्यांत काय अर्थ आहे? हल्लींच्या पद्धतींत जर लोकांना सुख असतं, समाधान असतं, तर गोष्ट वेगळी; पण वस्तुस्थिति अशी आहे, कीं सर्वत्र असंतोषाचा बाजार आहे. पुरुष बायकांच्या नांवानं खडे फोडतात, बायका पुरुषांच्या नांवानं बोटें मोडतात! ब्राह्मणेतर ब्राह्मणांना शिव्या देतात, ब्राह्मण ब्राह्मणेतरांना पोकळ शाप देतात! भांडवलवाले लोक 'मजूर-अडाणी, बेवकूफ, निष्काळजी, बेइमानी' असं म्हणतात; तर मजूरवर्ग भांडवलवाल्यांना 'स्वार्थी मगरूर, निर्दय, लबाड, संभावितपणें दरोडा घालणारे, मजूरांना पिळून काढणारे, नफेबाजी करून मोटारी उडवणारे आणि व्यसनांत लोळणारे' अशा प्रकारचीं शेलकीं विशेषणं लावतो! हल्लींच्या समाजव्यवस्थेंत पैशाकरितां मुलगे

बापाचा खून करतांना आढळतात. बायको नवऱ्याचा खून करते असा देखावा दिसतो! लहान मुलांच्या अंगावरचे दागिने मिळावेत म्हणून त्यांचा अमानुषपणं जीव घेणारे काय थोडेथोडके गुन्हेगार आहेत? या द्रव्यलोभाची विलक्षण गोष्ट फ्रान्समधल्या एका गुन्हेगाराची आहे. तो एकेकट्या स्त्रीपुरुषांना कांहीं तरी निमित्त करून आपल्या खोलींत बोलावीत असे आणि त्यांचा तेथें बेमालूम रीतीनें खून करीत असे! हेतु काय, तर त्यांचीं प्रेतं एका संशोधक डॉक्टरला विकून तो डॉक्टर त्याबदली जें काय देईल तें घ्यावयाचं! अशा रीतीनें त्यानं शंभरावर खून केले म्हणतात! असे प्रकार ज्या समाज-'व्यवस्थे'नें होतात, ती काय व्यवस्था म्हणायची कां व्यवस्थेची ही चेष्टा आहे? आजच्या समाजांत गरिबांना अन्न नाहीं आणि श्रीमंत अजीर्णानें आजारी पडत आहेत! वयाच्या साठसत्तर वर्षांपर्यंत घाम येईतों रोज काम करून समाजाची सेवा केली तरी म्हातारपणीं अन्नाशिवाय व औषधपाण्याशिवाय कांहींना मरण्याची पाळी येतें, तर कांहींजण 'गर्भश्रीमंत' असून कांहीं एक काम नाहीं म्हणून जगभर उगीच भटक्या मारीत असतात! असे एक कां दोन, लाखों प्रकार. या समाजरचनेला व्यवस्था कोण म्हणणार असेल तो असो; मला तर हा सांवळागोंधळ वाटतो. देवानें केलेली ही रचना नव्हे, तर हा एक पोरखेळ आहे. मन सुसंस्कृत करण्याचं हें मंदिर नाहीं, तर ढोंगसोंग आणि हलकटपणा शिकविण्याची ही शाळा आहे. हल्लींच्या समाजाच्या कोशांत गरिबी म्हणजे 'पाप', श्रीमंत म्हणजे 'सर्वगुणसंपन्न', बळी तो कान पिळी हा 'न्याय', सरकारच्या चुका सडेतोडपणें दाखविणं हा 'राजद्रोह', निरपराधी लाखों लोकांचा राजरोस खून पाडणं म्हणजे 'युद्ध चालविणं', लोकांना फसविणं म्हणजे 'मुत्सद्देगिरी', ढोंग करून बाह्य शिष्टाचार पाळणं म्हणजे 'सभ्यता', आणि देव, स्वर्ग, श्रुति-स्मृति इत्यादि शब्द उच्चारणं, टिळेमाळा करणं आणि त्याच्यावर श्रद्धा आहे असं सांगणं किंवा भासविणं म्हणजे 'धार्मिकता'! या कोशांतले हे अर्थ आमच्यासारख्यांना अमान्य आहेत. आम्हांला वाटतं, कीं खाजगी मालमत्तेचीं, दिखाऊ धर्मश्रद्धेचीं आणि ढोंगी शिष्टाचारांचीं खुळं एकदां मोडलीं म्हणजे समाजाला सत्याची भाषा समजूं लागेल आणि ती भाषा तो वापरूं लागेल, आणि खऱ्या विचारविनिमयाचा, अन्योन्य साहाय्याचा आणि सात्त्विक आनंदोपभोगाचा मार्ग मोकळा होईल."

सुनंदरावांचें हें एक उत्साहपूर्ण भाषण आणखीं कदाचित् दोनचार मिनिटें चाललें असतें; पण बाहेर कोणी Mr. Calf नांवाचा युरोपियन गृहस्थ सुशीलाताईला भेटण्यास आला आहे आणि त्यानें हें आपल्या नांवाचें कार्ड दिलें आहे असें उषेनें येऊन सांगितल्यामुळें तें भाषण व अर्थात् नंतरचें संभाषणहि तेथेंच थांबलें आणि सुशीला मिस्टर काफला भेटण्याकरितां बाहेर गेली. 'गुड् ईवनिंग' वगैरे झाल्यावर त्याला घरांत आणून त्याची व तेथें जमलेल्यांची सुशीलेनें प्रत्यक्ष ओळख करून दिली. 'काफ'चें नांव आणि त्याचा स्वभाव वगैरे सर्व त्यांना माहीत होतेंच; कारण सुशीलेनें त्याच्या कितीक तरी गोष्टी त्यांना सांगितल्या होत्या. आज त्याची प्रत्यक्ष ओळख होण्याचा योगायोग आला एवढेंच.

चहापान वगैरे झाल्यावर ती काफबरोबर अचलेश्वरीकडे हिंडण्यास गेली. बळवंतराव व सुनंदराव किंचित् कालानें तिकडेच फिरण्याकरितां निघाले आणि अचलेश्वरीच्या डोंगराच्या माथ्यावर जाऊन सुशीला व काफसाहेब कोठें आहेत हें पाहाण्याकरितां दृष्टि टाकतात तों त्यांना एक विलक्षण दृश्य दिसलें!

हें दृश्य म्हणजे काफसाहेबानें सुशीलेचे हात आपल्या हातांत घेतले आहेत व तीं दोघेंजणं अगदीं जवळ बसून अत्यंत सलगीनें आणि प्रेमानें बोलत आहेत! बळवंतरावाला आपले डोळ फसवीत तर नाहींत ना असा प्रश्न पडला! सौजन्याची मूर्ति म्हणून जिला आपण समजत होतों तीच का ही सुशीला, असें त्यानें आपल्या मनाला विचारलें. ही विचारपरंपरा आणखी चालली असती; पण इतक्यांत सुशीला खिशावर हात ठेवून नको नको म्हणत असतां काफनें पिस्तूल काढलें व एकदम तें आपल्या छातीवर रोखून त्यानें स्वतःचा प्राण घेतला!

"काय आहे प्रकरण हें?" सुनंदरावानें पुढें जाऊन सुशीलेला विचारलें. सुशीलेनें उत्तर दिलें, "स्वार्थी, अन्यायी भांडवलशाहीनं आणि समाजव्यवस्थेनं घेतलेला हा बळी! 'या अन्यायी जगाला मी कंटाळलों आहें आणि आत्महत्त्या मी करणार आहें,' असं काफनं मला नुकतंच पत्र लिहिलं होतं. अविचार करूं नकोस म्हणून मीं त्याला लिहिलं होतं; पण जगांतील मूर्खपणाच्या आणि लुच्चेगिरीच्या व्यवहाराकडे आणि धर्माच्या नांवाखालीं होणाऱ्या अधर्माकडे पाहून त्याचं मन जगाला अगदीं विटलं, आणि मनाचा निश्चय करून अखेरची माझी भेट घेण्याकरितां तो मुद्दाम इथं आला आणि घटकाभर मन मोकळं करून

बोलून अखेर, मी नको नको म्हणत असतां, त्यानें हा प्रकार केलाच ! जगाचा ‘ व्यवहार ’ आणि ‘ धर्म ’ आणखी असे किती बळी घेणार, कोणास ठाऊक ! ”

---

## ३६ : काफचें पत्र

काफनें आत्महत्या केल्यामुळें सुशीलेला किती वाईट वाटलें असेल याची कल्पना येणें कठीण. लोणावळ्यास असतांना तो व ती उभयतां एकत्र मोठ्या प्रेमानें आणि सलगीनें कितीदां तरी बोललीं-चाललीं होतीं, कितीदां त्यांनीं कितीतरी विषयांवर वादविवाद केले होते, कितीदां समाजसुधारणेंबद्दल निश्चय केले होते व शपथा घेतल्या होत्या; आणि, खरें सांगावयाचें म्हणजे, कितीदां तरी काफनें तिची विवाहयाचना केली होती, आणि कितीदां तिनें ती नाकारली होती ! काफची आठवण झाली म्हणजे अजून देखील तिच्या डोळ्यांतून आंसवें येतात व ती उसासे टाकून “ व्हायच्या गोष्टी त्या होतात. समाजरचना बिघडलेली, त्याला काय करणार ? ” असाच जणुं काय अर्थ ती आपल्या मुद्रेनें व्यक्त करते.

काफच्या मृत्यूनें वाईट वाटण्याचें एक आगंतुक कारण म्हणजे कांहीं महिने त्यामुळें तिच्या आणि तत्संबंधीं माणसांच्या पाठीमागें लागलेला पोलिसांचा ससेमिरा. इतर देशांतले पोलिस कसे आहेत हें ठाऊक नाहीं; पण आपल्या देशांतले पोलिस रक्षण करण्याऐवजीं भक्षण करण्याकरितां नोकरीवर आहेत कीं काय असा विचार त्यांच्या लीला पाहून पुष्कळ वेळां मनांत येतो. सगळे पोलिस असे नसतील; पण कांहीं वेळां अनुभव असा येतो खरा. बाकी त्यांना तरी काय दोष द्यावा ? समाजानें त्यांना शिक्षण दिलें नाहीं; संगत चांगली लावली नाहीं; पैसेखाऊ लोकांचीं व त्यांच्या व्यावहारिक यशाचीं उदाहरणें त्यांच्या डोळ्यांपुढें हजारों येत असतात; मोठमोठे मी मी म्हणविणारे लोकहि ‘ द्रव्य ’—देवाची पूजा करीत आहेत असें त्यांना दिसत असतें; ‘ आधीं पोटोबा आणि मग विठोबा ’ अशी म्हण समाजांत रूढ व प्रिय आहे; व एकंदर समाजाच्या मुळाशीं ‘ स्वार्थ हाच मनुष्याचा प्रेरक हेतु आहे, प्रत्येकजण स्वार्थाच्या पाठीमागें लागलेला आहे ’, अशा प्रकारची कल्पना आहे; ‘ धर्म ’ देखील खरा दयाभूतपणा, खरी न्यायप्रियता

दाखवीत नाहीं, असा हरघडीं अनुभव येत आहे—अशा समाजांत पोलिस, आहेत त्यापेक्षां अधिक वाईट नाहींत हेंच आपलें सुदैव !

पोलिसांच्या त्रासापेक्षां तिच्या मनाला दुःख देणारें दुसरें एक व फार नाजूक कारण होतें. तें असें, कीं बळवंतरावांना काफनें तिच्याशीं जें सलगीचें वर्तन केलें तें पाहून तिच्याबद्दल संशय येऊं लागला व त्यांचें वर्तन तिच्याशीं दिवसेंदिवस अधिकाधिक दूरदूरपणा आणि तटस्थपणा दाखविणारें होऊं लागलें; पण या गोष्टीचा विचार करण्यापूर्वीं पोलिसांचा त्रास वास्तविक ज्या पत्रामुळें दूर झाला त काफनें लिहिलेलें व त्याच्या खिशांत सांपडलेलें पत्र येथें भाषान्तररूपानें देऊन मग बळवंतराव व सुशीला यांच्या मनःस्थितीकडे वळूं.

## काफच्या पत्राचें भाषांतर

"माझ्या मृत्यूसंबंधीं खरी हकीगत कळावी अशी ज्यांना इच्छा असेल त्यांना—मी खालीं सही करणार काफ असें सांगतों, कीं मी दोनचार दिवसांत आत्महत्या करून घेणार आहें, आत्महत्या करण्यापूर्वीं सोनगांवास जाऊन तेथें सुशीला नांवाच्या एका सच्छील स्त्रीस शेवटची भेट द्यावी अशी प्रबळ इच्छा होत असल्यामुळें मी तेथें जाणार आहें व बहुधा तेथेंच पिस्तुलानें आपल्या जीवाचा अंत करणार आहें. तरी या बाबतींत त्यांना कोणीं नाहक त्रास देऊं नये.

"आत्महत्त्या करण्याचीं कारणें अशीं, कीं मला या जगांतील अन्यायाचा वीट आला आहे—ओकारी आली आहे. या अन्यायाच्या मुळाशीं स्वार्थ आहे. स्वार्थाच्या मुळाशीं 'खाजगी मालमत्ता' हें एक कारण, 'स्व'चा अर्थ आकुंचित करणें हें दुसरें कारण, 'अर्थ' या शब्दाचाहि विपरीत अर्थ करणें हें तिसरें कारण. खाजगी मालमत्तेची इतके दिवस उपयुक्तता असेल,—होतीच; पण आतां या प्रकारची उपयुक्तता दिवसेंदिवस कमी होत जाणार. 'स्व' चा अर्थ व्यापक केला तर सबंध जग स्वकीय वाटूं लागेल व विश्व हें आपलें कुटुंब असें मानल्यावर 'स्वार्थ' फारसा घातुक होणार नाहीं. स्वार्थ घातुक होतो याचें एक कारण 'स्व'चा अर्थ मर्यादित करणें. तें कारण वरीलप्रमाणें दूर झालें आणि 'अर्थ' शब्दाचाहि 'पैसा, मालमत्ता' असा जो मर्यादित व चुकीचा अर्थ करतात तो बदलून ज्याच्या योगानें मनाला खरा सात्त्विक आनंद होतो किंवा होईल, जें मनाला खरी प्रसन्नता देईल, जें अंतरात्म्याला शांति देईल तो माझा 'अर्थ' असा जर अर्थ रूढ होईल, तर 'स्वार्थांत' विशेष कांहीं किल्मिष राहाणार नाहीं.

" परंतु हीं तत्त्वें लोकांना लवकर पटण्याची मला आशा नाहीं. पटणार आहेत असें मला वाटतें; पण माझ्या ह्यातींत पटणार नाहींत. माझा स्वभाव उतावळा, भावनात्मक आहे. हा माझा दोष आहे हें मला ठाऊक आहे; पण स्वभावाला औषध नाहीं म्हणतात तेंच खरें. समाजाची पुढें विश्वकुटुंबी व्यवस्थेच्या दिशेनें व्यवस्था लागावयाची आहे हा विचार मनाला एक प्रकारें समाधान देत असला आणि या दिशेनें प्रयत्न करून सदर सुधारणेला आपल्या परीनें हातभार लावणें हें माझें कर्तव्यकर्म आहे असें जरी मला वाटत असलें, तरी आज स्वतःच्या बाबतींत अनुभवित असलेल्या आणि जगांत सर्वत्र दिसत असलेल्या अन्यायांकडे पाहून माझ्या मनांत परस्परविरुद्ध अशा तीव्र भावनांचा खेळ सुरू होतो. रागानें एकदां तळपायाची आग मस्तकाला जाते तर लगेच हातपाय थंड पडतात; एका क्षणीं समाजाचा तिटकारा येतो तर दुसरे क्षणीं त्याच्या मूर्खपणाचें हंसू येतें; आतां अन्याय-प्रतिकारार्थ अतिशयित व कल्पनातीत उत्साह उत्पन्न होतो तर कालान्तरानें नैराश्याच्या दरींत मी दडून बसतों! विवेक मला तारतम्याचा व आत्मसंयमनाचा उपदेश करतो; पण विवेकाचे शब्द भावनांच्या गोंधळांत आणि गोंगाटांत ऐकूं येत नाहींत. माझें मला हें सर्व समजत आहे तरी एकंदरींत आतां जगण्यांत कांहीं अर्थ नाहीं असा माझा निश्चय झाला आहे.

" सुशीलेवर माझें निरतिशय प्रेम होतें. ती आणि मी जर विवाहबद्ध होऊं शकलों असतों, तर जगांतील विषमतेच्या आणि अन्यायांच्या उन्मूलनार्थ आम्हीं उभयतांनीं जिवापाड श्रम केले असते-जीव वेंचले असते-कशाचीहि पर्वा केली नसती. पण आमचीं भिन्न कांतडीं, आमचे भिन्न धर्म, आमच्या विवाहाच्या आड आलीं! शिवाय तिचें मन माझ्यापेक्षां दुसऱ्यावर अधिक जडलें आहे असें दिसतें. (इतर कोणत्याहि बाबतींत ती माझ्याशीं खुल्या दिलानें बोलत असे; पण या बाबतींत मात्र एक प्रकारचा संकोच तिच्या बोलण्यांत दिसे, म्हणून मला निश्चित कांहीं सांगतां येत नाहीं.) कसेंहि असलें तरी माझ्या नशिबीं तिच्याशीं विवाह करण्याचें सौख्य नाहीं. तिच्याशीं सहकार्य करण्याचें माझ्या भाग्यांत नाहीं, कारण समाजाच्या कृत्रिम भेदांनीं तेंहि अशक्यप्राय केलें आहे. माझा आत्महत्त्येचा निश्चय हा प्रेमभंग व तज्जन्य नैराश्य यामुळें उत्पन्न झाला असेल व प्रथम दिलेली कारणमीमांसा चुकीची असेल. कदाचित् दोन्ही मीमांसा खऱ्या असतील. दोन्ही प्रकारच्या नैराश्यांनीं माझा निश्चय झाला असेल. कसेंहि असलें तरी निश्चय कायम.

" जन्माला येऊन अनेक दुर्भाग्यांचा अनुभव मीं घेतला; पण सुशीलेच्या संगतीचा लाभ कांहीं वर्षें मिळाला ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. तिचा मोकळा–निष्कपटी स्वभाव, तिचें आत्मसंयमन, तिची ध्येयनिष्ठा, इत्यादि गुणांचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. तिनें मला पुष्कळ सुधारलें, माझी पाशवी वृत्ति तिनें संयमित केली व या वृत्तीला चांगलें वळण लावलें, हे तिचे उपकार आहेत. आत्महत्त्येपासून परावृत्त करण्याचा तिनें मला पुष्कळ उपदेश केला आहे, पण या बाबतींत मात्र मी तिला यश देणार नाहीं. कारण ज्या जगांत खरी नीति नाहीं, खरा धर्म नाहीं, खरा न्याय नाहीं, त्या विषम, निर्घृण जगांत जगण्यापेक्षां आत्महत्त्या करून या घातुक प्रकाराकडे जगाचें लक्ष वेधावें, असें वेड माझ्या मनानें घेतलें आहे. हें खरेंच 'वेड' असेल; पण असलें तरी आतां पर्वा नाहीं, नसलें तरी आतां त्याचें विशेष कौतुक नाहीं.

" माझ्याबद्दल सुशीलेला खरें वाईट वाटेल. तिला दुःख दिल्याबद्दल तिची क्षमा मागून व तिचें ज्याच्यावर प्रेम असेल त्याच्याशीं तिचें लग्न होऊन त्याच्या सहकार्यतेनें तिनें काढलेल्या विश्वकुटुंबी संस्थेचें कार्य दिवसेंदिवस प्रगत होवो एवढी ईश्वराजवळ मागणी करून (आतां मी ईश्वर मानीत नाहीं, पण संवयीमुळें जी भाषा वापरून गेलों ती बदलीत नाहीं.) व अधिक विस्तार न करतां सुशीलेची पुन्हां एकदां आठवण करून हें पत्र संपवितों."

" **जोसेफ काफ** "

---

## ३७ : आरोपीनें केलेला गुन्हा करून न्यायाधीश आरोपीला दोषमुक्त करतो

**सुशीलेनें** काफशीं एकान्त केला व तेथें ती त्याच्या अगदीं जवळ बसली व आपले हात त्याला हातांत घेऊं दिले, हा देखावा बळवंतराव व सुनंदराव या उभयतांना चमत्कारिक वाटला हें साहजिक आहे. सुनंदराव क्षणभरच आश्चर्यचकित झाला; पण क्रुद्ध मुळींच झाला नाहीं. कारण त्याला काफचा आणि तिचा काय संबंध आहे हें तिच्याच तोंडून थोडेंबहुत कळलें होतें; आणि, सुशीला कधींहि वाईट वर्तन करावयाची नाहीं अशी त्याची खात्री होती. युरोपिअन मुलांमुलींच्या 'मिश्र शाळेंत' मुलांमुलींमध्यें आपल्या डोळ्यांना अपरिचित

असलेली सलगी असते आणि काफ व सुशीला यांमध्यें तर ती साहजिकपणें असणारच हें तो ओळखून होता; म्हणून त्याच्या मनांत विपरीत कल्पना व भावना उत्पन्न झाल्या नाहींत. पण बळवंतराव कितीहि जरी समतोलबुद्धीचा असला तरी सुशीलेविषयींची त्याची दृष्टि सुनंदरावापेक्षां किंचित् भिन्न होती व तो तिच्या त्या काफबरोबरच्या सलगीकडे अगदीं पूर्णपणें निर्विकार दृष्टीनें कांहीं वेळ–कांहीं दिवस–पाहूं शकत नव्हता. तिला तो साक्षात् कांहीं बोलला नाहीं; पण त्याचें तिच्याशीं वर्तन पूर्वीसारखें मोकळेपणाचें राहिलें नाहीं. मनांतली अढी लपवायची म्हटली तरी लपत नाहीं, प्रेमी माणसाच्या तर ती तेव्हांच ध्यानांत येते; मग ही अढी लपविण्याचा प्रयत्नच जेथें विशेष नव्हता, तेथें ती कशी लपेल ? आणि सुशीलेसारख्या सूक्ष्म दृष्टीच्या चिर–परिचित, प्रेमातुर नाहीं तरी प्रेमलालस, मुलीपासून कशी लपणार ? त्यांत पुन्हां सुनंदरावासारखा इकडच्या गोष्टी तिकडे व तिकडच्या गोष्टी इकडे, सद्बुद्धीनेंच कां होईना बोलणारा व दोघांच्या हृदयांतल्या गोष्टी जाणणारा मध्यस्थ भेटल्यावर एकमेकांचीं मनें एकमेकांविषयीं कशीं आहेत, हें कळल्याशिवाय कसें राहाणार ? उभयतांचीं मनें वस्तुतः एकमेकांविषयीं आदरयुक्त व प्रेमार्द्र असतां गैरसमजामुळें त्यांच्या मध्यें जो एक अनिष्ट संकोच, किंवा दूरदूरपणा, किंवा आडपडदा उत्पन्न झाला होता, तो दूर करण्याकरितां त्यानें प्रत्येकाशीं स्वतंत्रपणें संभाषण करून पुष्कळ प्रयत्न केला व या पूर्वतयारीनंतर त्या दोघांची त्यानें याच विषयासंबंधीं बोलण्याकरितां म्हणून अगोदर स्पष्टपणें सांगून एक दिवस गांठ घालून दिली व आपण मध्यस्थ म्हणून किंवा अध्यक्ष म्हणून दोघांच्या वादविवादाला त्यानें योग्य दिशा लावून दिली, आणि मानसिक घर्षणामुळें उत्पन्न झालेल्या उष्णतेचा पारा फार चढूं दिला नाहीं. तथापि उच्चारावयास नको होते असे कांहीं शब्द उभयपक्षीं उच्चारले गेलेच. पण ग्रंथकर्त्यानें स्वतःचीं मतें दिग्दर्शित करण्यापेक्षां त्या त्या व्यक्तींनाच बोलूं दिलेलें बरें म्हणून त्यांचेंच संभाषण देण्यास आरंभ करावा हें चांगलें.

"त्यांतली खरी गोष्ट अशी आहे," सुशीला संभाषण मुख्य मुद्द्यावर आलें असतां शांतपणें पण निश्चयाच्या आणि किंचित् निराशेच्या स्वरानें म्हणाली, "कीं तुम्हां पुरुषांना बायका म्हणजे खाजगी मालमत्ता वाटते. बायकोला स्वतंत्र अस्तित्व आहे, जीवित आहे, तिच्या आवडीनिवडी आहेत, अशी तुम्हांला

कल्पनाच येत नाहीं. लग्न झाल्यावर तिनें एखाद्या जड वस्तुप्रमाणें—बाहुली प्रमाणें वागलं पाहिजे. नवऱ्याच्या परवानगीशिवाय तिनं इथून तिथं हालायचं नाहीं, लग्न झाल्यावर ती जणुं कांहीं मेलीच. ती जणुं कांहीं आंगठीप्रमाणें, घड्याळाच्या सांखळीप्रमाणें पाहिजे तेव्हां, पाहिजे तशी हातांत घेऊन वापरावयाची व खेळावयाची वस्तूच. ती म्हणजे तरुणांचं एक खेळणं. तिला स्वतःची हौस नाहीं, आवड नाहीं, हक्क नाहीं, कांहीं नाहीं. तिची स्वतःवरदेखील मालकी नाहीं, मग इतरांवर हक्क कोठले ? तिचा देहच पतीच्या मालकीचा असं नव्हे, तर तिचं मनदेखील त्याच्या मालकीचं झालं पाहिजे ! देहावर, मनावर–सगळ्यांवर सर्व सत्ता आणि मत्ता त्याची..."

"—आणि लत्तादेखील त्याचीच." सुनंदराव चढता पारा जरा खालीं उतरविण्याकरितां हंसत म्हणाला.

"तुम्ही विनोद खुशाल करा; पण वस्तुस्थिति मी सांगत्यें त्याप्रमाणें आहे. नीच किंवा सामान्य पुरुषांचीच अशी वृत्ति असती तर वाईट वाटलं नसतं; पण वाईट वाटून थोडंसं नैराश्य जें येतं, रागहि थोडासा येतो–तो या गोष्टीचा, कीं चांगले चांगले लोक, ज्यांना आपण इतर बाबतींत खरोखर थोर व उदार म्हणूं, ज्यांच्याबद्दल कोणालाहि केव्हांहि आदर वाटलाच पाहिजे, त्यांचीदेखील बायकांच्या बाबतींत हीच वृत्ति ! नांव घेऊनच बोलायचं म्हणजे (बळवंतरावांकडे बोट दाखवून) ही मूर्ति पाहा. इतर बाबतींत यांची वृत्ति कशी असते, आणि जी आपली पत्नी व्हावी अशी त्यांची इच्छा आहे ती पत्नी होण्यापूर्वी–होण्याचं कबूल करण्यापूर्वी देखील–तिच्या विषयींची यांची वृत्ति पाहा ! तिनं दुसऱ्याशीं एकान्त करूं नये. (यांच्याबरोबर मात्र करावा !), तिनं दुसऱ्याशीं गुजगोष्टी बोलूं नयेत (यांच्या मात्र कानगोष्टी ऐकाव्यात !). तिनं दुसऱ्याशीं सलगी करूं नये (यांना मात्र करूं दिली तर बरं वाटेल असं वाटतं. बाकीच्या गोष्टींचा अनुभव आहे, या गोष्टीचा मात्र अनुभव नाहीं !) मी असं म्हणत्यें, कीं मला कांहीं अस्तित्व आहे का नाहीं ? यांचं माझ्यावर प्रेम असलं म्हणजे यांची मी दासी झाल्यें कीं काय ?"

"प्रश्न भलत्या रुळावर नेऊं नकोस." सुनंदराव म्हणाले. "बाळूला जें वाईट वाटत आहे आणि जो राग आला तो याबद्दल, कीं तुझ्यासारख्या स्त्रीनं एकान्तांत इतकी सलगी केली. तुझं दुसऱ्या कोणाशीं लग्न ठरलेलं असतं किंवा झालेलं असतं तरी देखील त्याला आतां इतकंच वाईट वाटलं असतं

आणि आतां इतकाच राग आला असता. कोणत्याहि स्त्रीनं परपुरुषाशीं अशी सलगी करूं नये असं त्याला वाटतं, आणि तुझ्यासारख्या मुलीच जर अशा वागायला लागल्या तर सौजन्याची आशाच बाळगायला नको असं त्याचं म्हणणं आहे."

"हा सगळा वेदान्त मला ठाऊक आहे." सुशीलेनें अविचारानें उत्तर दिलें. "या बोलायच्या गोष्टी आहेत. मनांतले भाव निराळे असतात."

"अशीच जर भाषा वापरायची असेल–" सुनंदराव म्हणाला, "—तर बोलणं इथंच संपवलेलं बरं."

"मला वाटतं इथंच बोलणं संपवावं–निदान आज तरी झालं तितकं पुरे." बळवंतराव म्हणाला.

"मी तुमच्यावर भलत्या हेतूंचा आरोप करीत नाहीं. जाणूनबुजून तुम्ही असं करतां असं मी म्हणत नाहीं." सुशीला जरा नरम पडून हलक्या आवाजांत म्हणाली. "पुष्कळसे हेतु गूढ, गुप्त, सुप्त असतात असं तुम्हीच ना नेहमीं म्हणत असतां? माझ्या म्हणण्याचा भावार्थ असाच होता. शब्द कमी अधिक गेले असतील, ती माझी चूक आहे. चूक आहे हें कबूल केल्यावर, माफी मागल्यें हेंहि म्हणणं आलंच!"

"माफी मागण्याचा आणि करण्याचा आजचा प्रश्न नाहीं." सुनंदराव म्हणाला. "आपला मुख्य प्रश्न तुझ्या मागच्या वर्तनाचा आहे, आजच्या बोलण्याचा नाहीं. तुझं वागणं नीतिशास्त्रदृष्ट्या चांगलं आहे का, हा प्रश्न आहे; किंवा, गैरसमज होण्याचा संभव अगदीं शून्यापर्यंत कमी करावा म्हणून मी असं म्हणतों कीं, आजचा प्रश्न तुझ्याबद्दलचा नाहींच; आणि खरोखर तो तसा नाहीं आहे. कोणीं एका 'ई'नं 'अ' या पुरुषाशीं तुझ्यासारखं वर्तन केलं तर तें चांगलं होईल का असा प्रश्न आहे. यावर तुला काय म्हणावयाचं आहे?"

"यावर माझं सरळ उत्तर असं आहे, कीं ती 'ई' माझ्यासारख्या परिस्थितींत माझ्यासारखी जर वागली तर त्यांत कांहींएक गैर होणार नाहीं. मी काफच्या अगदीं जवळ बसल्यें होत्यें, आमचे हात एकमेकांच्या हातांत होते; पण यापलीकडे अत्यंत मनापासूनच्या संभाषणाशिवाय आमच्यामध्यें कांहींएक व्यवहार घडला नाहीं. माझा शाळासोबती जीव द्यायला निघाला असतां त्याला परावृत्त करण्याचा मीं प्रयत्न करूं नये? तो जिवाच्या अगदीं अंतःस्थ गोष्टी

बोलण्यास आला असतां मी बाह्योपचाराच्याच गोष्टी बोलूं? माझ्यावर जो प्रेम करतो त्याच्यावर मला उलट तशा प्रकारचंच प्रेम करतां आलं नाहीं म्हणून प्रेमानं आणि सलगीनं त्याच्याशीं बोलूं नको ?"

"प्रेमानं बोलण्यास हरकत नाहीं, विशेष सलगी कशाला पाहिजे ?" सुनंदराव म्हणाला.

"सलगीला काय हरकत आहे ?" सुशीलेनें उत्तर दिलें. "हाताला हात लागला म्हणजे कांहीं पाप होत नाहीं–निदान मला तरी तसं वाटत नाहीं. आतां तुमचं उत्तर मला ठाऊक आहे. सुनंदराव, तुमचं तें स्मित आणि लुचे डोळे मला स्पष्ट सांगत आहेत, कीं हातांत हात घालण्याला जर हरकत नाहीं, तर हात गालाला लागले किंवा ओंठाला लागले म्हणून काय हरकत आहे, आणि यापुढंहि गेलं तरी काय हरकत आहे, असं तुम्ही मला विचाराल. पण मिळमिळीत उत्तरानं प्रश्न खरा सुटत नाहीं म्हणून मी स्पष्टपणें असं सांगत्यें, कीं विवाहसंस्था ही राजसंस्थेप्रमाणेंच मनुष्यानें आपल्या अभ्युदयाकरितां आणि निःश्रेयसाकरितां काढलेली आहे. राजसंस्था जशी ईश्वरकृत नाहीं तशी विवाहसंस्थाहि नाहीं. राजाचे अधिकार मर्यादित करून किंवा 'राजाला' नामशेष करून तुम्ही जशी आपल्या अभ्युदयाला आणि निःश्रेयसाला ती संस्था अनुरूप करून घेतां, त्याप्रमाणंच विवाहसंस्थेमध्येंहि योग्य फरक करण्यास हरकत नाहीं. ती देवानं केलेली नाहीं व दिव्य नाहीं; केवळ मानवकृत, सर्वस्वीं मानवी आहे. तिचं पावित्र्य हेंच, कीं ती मानवजातीच्या अभ्युदयाला आणि निःश्रेयसाला कारणीभूत झाली, होत आहे व होईल. पण कालमानाप्रमाणं युगधर्माला अनुसरून योग्य ते फेरफार करण्यास हरकत नाहीं; इतकंच नव्हे, तर फेरफार करणं इष्ट व आवश्यक आहे. नाहीं तर मूळ हेतु बाजूस राहून ती संस्था अधर्म्य होईल, अधर्माला कारणीभूत होईल. विवाहाची गांठ स्वर्गांत ईश्वराकडून बांधली जाते ही कल्पना चूक आहे, त्याचप्रमाणं एकदां बांधलेली गांठ साफ सुटूं नये ही कल्पनाहि चूक. राजा हा विष्णूचा अंश, आणि तो करील ती पूर्व दिशा, या कल्पना आपण जशा सोडल्या, तशा विवाहाबद्दलच्या या कल्पनाहि सोडल्या पाहिजेत. स्त्री-पुरुषांची ऐहिक उन्नति आणि पारमार्थिक कल्याण यांकरितां विवाह आहे. विवाहसंस्थेला स्त्री-पुरुषांच्या उन्नतीचा आणि कल्याणाचा बळी देण्याकरितां ती संस्था नाहीं. स्त्री-पुरुषांनीं एकत्र समाधानानं राहावं, परस्परांना मदत करावी

आणि अपत्यें झाल्यास त्यांचं रक्षण, वर्धन व शिक्षण करावं म्हणून विवाह करावयाचा. तसेंच एका स्त्रीकरितां अनेक पुरुषांमध्यें भांडणें उत्पन्न होऊं नयेत म्हणून विवाह-व्यवस्था केलेली आहे. आणि विशेषेंकरून मुलांच्या हिता-करितां विवाह आहे. पुरुषांमध्यें असूया नसती व मुलं होत नसतीं तर कदाचित् विवाहसंस्था जन्माला आली नसती! मुलं होत नसतीं तर तुमचा 'अ' आणि तुमची 'ई' एकान्तांत बोललीं चाललीं असतीं, तरी कोणीं विशेष कांहीं मानलं नसतं किंवा बोललं नसतं. फार काय, बोलण्याचालण्याच्या पलीकडे जाऊन तुम्ही सुचवितां त्याप्रमाणं कांहीं केलं असतं तरी त्यांत कांहींएक वाईट झालं नसतं,–किंवा मानलं गेलं नसतं–अर्थात् जर या प्रकारामुळं 'ई'ला आणि 'अ'ला एक 'ऊ' होण्याचा संभव नसता तर! 'ई' आणि 'अ'चा अत्यंत सलगीचा संबंध एखाद्या 'ऊ'ला जन्म देण्याला कारणीभूत होतो किंवा होण्याचा संभव असतो, आणि या 'ऊ'चें पालन-पोषण कोणीं करावयाचें, हा व असेच दुसरे प्रश्न उत्पन्न होतात म्हणून हा निकट संबंध वाईट, आणि म्हणून तो संबंध न होईल अशा रीतीनं मनुष्यानं वागलं पाहिजे; इतकंच नव्हे, तर अशा प्रकारचा मोह होईल अशी परिस्थितिहि त्यानं टाळली पाहिजे."

"आम्ही तरी तेंच म्हणतों." बळवंतराव म्हणाला. "स्त्रीनं एकान्तांत पुरुषाशीं सलगी करणं हें वाईट कां? तर अशा परिस्थितींत मोह होणं साहजिक असतं म्हणून. सर्वच 'अ' आणि 'ई' अशा परिस्थितींत पापाचरण करतात असं नव्हे, सामान्यतः करतात असंहि नव्हे, तर अपवादात्मक 'अ' आणि 'ई' सोडून दिले असतां सामान्य 'अ–ई'ना मोह होण्याचा संभव असतो, हें हजारों वर्षांच्या अनुभवांवरून समाजानं ओळखूनच स्त्री-पुरुषांच्या व्यवहाराच्या बाबतींत त्यानें कांहीं दूरदृष्टीचे व धूर्तपणाचे निर्बंध घालून ठेवले आहेत. सगळ्यांचा तात्पर्यार्थ हा, कीं मोहकारक प्रसंग किंवा मोहानुकूल परिस्थिति होतांहोईतों उत्पन्नच होऊं नये. आतां कांहीं असामान्य आत्मसंयमन असलेल्या अपवादात्मक व्यक्तींना हे निर्बंध जाचक होतील हें कबूल; पण समाज अपवादापेक्षां नियमाकडे अधिक पाहातो आणि अनुभवानें सामान्य नियम असा ठरला आहे, कीं सामान्य माणसानें सामान्यतः मोहकारक प्रसंग टाळावेतच, व तो टाळीत नसल्यास समाजानें त्यावर टीका करून किंवा अन्य मार्गानें त्याला मार्गावर आणण्याचा प्रयत्न करावा."

" सामान्यतः ही योजना योग्य आहे असं मी कबूल करतों;" सुनंदराव सुशीलेची बाजू घेऊन म्हणाला. " पण प्रत्येक नियमाला अपवाद आहेच ना ? मनुष्याकरितां नियम आहेत, नियमांकरितां मनुष्य नाहीं हें समाजानं देखील ध्यानांत घरलंच पाहिजे."

" समाज कदाचित् हें ध्यानांत घेणार नाहीं आणि त्यानं घेऊंहि नये असं एक वेळ मी म्हणेन." सुशीला म्हणाली. " विचारी म्हणविणाऱ्या—आणि खरं बोलायचं म्हणजे विचारी असणाऱ्या—लोकांनीं तरी हें ध्यानांत घरलं पाहिजे."

" अपवाद मानायला मी तयार आहें." बळवंतराव म्हणाला. " पण एकदां अपवादाची पळवाट ठेवली, कीं ही पळवाट कालान्तरानें नेहमींची पाऊलवाट होते आणि कांहीं अधिक काल गेल्यावर वहिवाटीचा हक्क उत्पन्न होऊन तो सर्वसामान्य राजरस्ताच बनतो ! म्हणून या बाबतींत अपवाद करावेत किंवा नाहीं हा प्रश्नच आहे. कांहीं बाबती अशा नाजूक असतात, कीं त्यांबद्दल मनुष्यानं न्यायनिष्ठुरच बनलं पाहिजे."

" न्यायनिष्ठुर बनावं, पण अन्याय-निष्ठुर बनूं नये एवढंच आमचं म्हणणं आहे." सुशीला म्हणाली. " योग्य प्रसंगीं योग्य अपवाद न मानणं म्हणजे हा देखील अन्यायच आहे. नियम मानणं हें जसं न्यायप्राप्त, तसंच योग्य अपवाद मानणं हें न्यायप्राप्त नाहीं का ?"

" अपवाद योग्य कोणता आणि अयोग्य कोणता यावर आधीं रणं पडतील, आणि त्या रणांचा एकदां निकाल लागला, म्हणजे मग 'योग्य' ठरलेले अपवाद मानणं केव्हांहि योग्यच मानलं जाईल." सुनंदराव म्हणाला. " संभाषणाचा पारा चढण्याची विकृति थांबून हळुहळू उतरत तो आतां प्रकृतीवर आला आहे (म्हणजे 'नॉर्मल'वर आला आहे याचं हें माझं भाषांतर !) तेव्हां 'सामान्य-वाचक', स्त्री आणि पुरुष ही भाषा सोडून आणि 'आ-ई'ची गणिती भाषाहि सोडून सुशीला आणि काफ यांच्यासंबंधानें बोलण्याला आतां हरकत नाहीं. तेव्हां, बाळू, तुला मी असं स्पष्टपणें विचारतों, कीं सुशीलेनं पूर्वी पापाचरण केलं-किंवा ती म्हणते त्याच्यापलीकडे तिचं वर्तन गेलं आहे, असं तुला वाटतं का ?"

" नाहीं, तसं नाहीं वाटत." बाळू म्हणाला. " तिच्याविषयीं मनांत कांहीं कांहीं वेळां कुशंका येते हें मी कबूल करतों आणि तिच्याबद्दलचा राग थोडासा

कुशंका-मूलक आणि थोडासा असूया-मूलकहि आहे असं मी आतां कबूल करतों; पण भलत्या कल्पनांना मीं फार वेळ थारा दिला नाहीं हेंहि मला सांगितलं पाहिजे!"

"अरे, पारा नॉर्मलला आला आहे; इतकंच नव्हे, तर नॉर्मलच्या खालतीं जायला लागलेला दिसतो!" सुनंदराव हंसत म्हणाला. "कांहीं तरी मात्रा दिली पाहिजे!"

"मीहि कबूल करत्यें, कीं त्या वेळचं माझं वर्तन थोडंसं गैरच झालं;" सुशीला म्हणाली. "पण थोर आकांक्षांच्या सिद्धीबद्दल निराश होऊन जीव द्यायला निघालेल्या काफसारख्या सरळ, निष्पाप मनुष्याला आणि लोणावळ्याच्या मिश्र-शाळेंत पुष्कळ सलगीनं वागलेल्या शाळामित्राला, त्यानं अत्यंत सात्विक भावानं केवळ माझा हात हातांत घरला म्हणून झिडकारणं हें मला त्या स्थितींत अशक्यप्राय होतं. त्याच्या नातलगांनीं त्याला कसं फसवलं आहे, त्याच्या पालकांनीं त्याला कसं नागवलं आहे आणि इतर ठिकाणीं त्याला कसले कटुतर अनुभव आले आहेत, हें सगळं जर तुम्हांला ठाऊक असतं तर तुम्हांला त्याच्याबद्दल माझ्याप्रमाणंच सहानुभूति वाटली असती आणि तुमचं मन मृदु झालं असतं. त्याच्या बौद्धिक आणि नैतिक आकांक्षा तुम्हांला काय ठाऊक असणार? आम्हीं एकमेकांनीं एकत्र बसून जगाला किती शिव्या दिल्या आहेत आणि मग सुधारण्याबद्दल किती योजना, किती निश्चय केले आहेत हें तुम्हांला काय ठाऊक? पर्वीच्यापेक्षां अधिक मोहकारक अनेक प्रसंगांतून निभावून मी पावित्र्य कसं संभाळलं आहे याची तुम्हांला काय जाणीव असणार? आणि काफ मला जेव्हां म्हणाला, कीं 'सुशीला, जीव देण्याचा निश्चय झाला आहे, पण केवळ तुम्हांला भेटण्याची अखेरची इच्छा तृप्त करावी आणि मरणापूर्वी उच्च विचारांच्या आणि आनंदाच्या वातावरणांत वावरावं म्हणून मी येथें सोनगांवला आलों.'—असं जेव्हां मला तो म्हणाला, तेव्हां माझ्या हृदयांत काय झालं असेल याची जाणीव तुम्हांला कशी असणार?"

"तुझ्याबद्दल कुशंका मनांत आणली हा मोठा अपराध केला आहे मीं." बळवंतराव म्हणाला. आणि खरोखर महत्पाप केलें आहे आणि त्यामुळें तो पश्चात्तापदग्ध झाला आहे अशा प्रकारची त्याची मुद्रा झाली. कांहीं वेळ तिघांपैकीं कोणीच कांहीं बोललें नाहीं; आणि हें जें दोनतीन मिनिटांचं मौन

स्वाभाविकपणें उत्पन्न झालें त्याचा भंग करण्याला कोणी धजावेना,—इतका शांत क्षोभ, इतका मोकळेपणाचा ताण, इतका आनंदगर्भ मनस्ताप–त्या वेळीं तेथें उत्पन्न झाला होता! अखेर सुनंदरावानें कांहीं निमित्त करून "मी आतां जातों, मला काम आहे," असें म्हटलें आणि तो निघून गेलाहि!

सुशीला आणि बळवंतराव कांहीं वेळ बोललींच नाहींत आणि पुढें काय बोललीं किंवा त्यांनीं काय केलें हेंहि निश्चित ठाऊक नाहीं. एवढी गोष्ट खरी, कीं परत येतांना डोंगराच्या पायथ्याशीं बळवंतराव सुशीलेला म्हणाले, "स्त्री–पुरुषांनीं एकांत करूं नये हीच गोष्ट खरी! ज्या गोष्टीबद्दल मीं तुला दोष दिला...बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. समाजानें नियम केलेत तेच खरे."

पण योग्य अपवाद नको का करायला?" सुशीला म्हणाली. "प्रत्येक वेळेला 'अ' आणि 'ई' पापच करतात?"

"पाप करीत नसतील; पण धोका आहे हें तर कबूल केलं पाहिजे ना?"

"कबूल. धोका आहे यांत शंकाच नाहीं."

---

## ३८ : सभेंतील प्रश्नोत्तरें

मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या एकांतांतील प्रसंगानंतर सुशीलेच्या मनांत व वर्तनांत थोडीशी क्रान्तिच झाली. पूर्वीं तिला आपल्या स्वतःच्या आत्मसंयमनाबद्दल विश्वास होता व अभिमानहि होता. आतां तो नव्हता असेंच केवळ नाहीं; पण तिला असें वाटूं लागलें, कीं आपणहि कदाचित् उच्च भूमिकेवरून च्युत झालों असतों! झालों नाहीं याचें श्रेय आपल्या संयमाकडे जेवढें आहे तेवढें दैवाकडेहि आहे हें तिनें स्वतःशीं कबूल केलें. बळवंतरावदेखील च्युत झाले नाहींत याचें कारण त्यांच्या अंगीं बाणलेलें सौजन्य हें तर खरेंच; पण योगायोग नव्हता, वेळ तशी आली नाहीं, हीहि गोष्ट अगदींच खोटी नव्हे असें तिच्या ध्यानांत आल्याशिवाय कसें राहील? आणि बळवंतरावांनीं हें तिच्याजवळ कबूलहि केलें. आपली जर ही स्थिति, तर सामान्य लोकांची काय असेल? मनुष्यस्वभाव जितका वाईट आहे असें मानतात, तितका वाईट नसेल; पण जितका चांगला आहे असें आपण मानीत होतों तितका आहे का नाहीं याबद्दल तिला संशय उत्पन्न होऊं लागला.

कामविषयक संबंधांतच नव्हे, तर इतर संबंधांतदेखील मनुष्यस्वभावाच्या सात्त्विकपणाविषयीं तिचें मन आतां थोडेंबहुत साशंक होऊं लागलें. मनुष्य हा स्वार्थतत्पर आहे; पण तो समाजघटना बदलली तर परार्थतत्पर होऊं शकेल, बऱ्याच सुलभतेनें होऊं शकेल असें तिला वाटत असे. आतां तिला असें पूर्णपणें कळून चुकलें, कीं मनुष्य हा त्रिगुणात्मक आहे. त्याच्यांत सात्त्विक, राजस व तामस वृत्ति व प्रवृत्ति आहेत. अर्थात् समाजसुधारणा आपणांस जितकी सुलभ वाटत होती तितकी नाहीं अशी तिची आतां खात्री झाली आणि तिच्या भाषणांतील पूर्वीची धडाडीची, बालंबाल खात्रीची, एकांतिक जहाल भाषा कमी होत जाऊन त्याऐवजीं त्यांत सौम्यता, निश्चयाचा थोडा डळमळीतपणा, अपवादांची शक्यता, विशिष्ट परिस्थिति असली तरच तें विधान सत्य आहे हें मान्य करण्याची प्रवृत्ति, हे गुण प्रथम डोकावूं लागले व मग दिवसेंदिवस अधिकाधिक बळावूं लागले; परंतु तत्त्वतः त्यांत फरक झाला नाहीं. किंबहुना वर निर्दिष्ट केलेले सौम्यतादि गुण आल्यामुळें तिचीं विधानें विचारी मनुष्याला अधिक सुलभतेनें पटण्यासारखीं झालीं आणि अशा स्वरूपांत तर तीं बरोबर आहेतच, त्यांविरुद्ध बोलणें दुराग्रहाचें व आकुंचित वृत्तीचें आहे, असें तिच्याशीं मनापासून बोलणाऱ्यांना वाटूं लागलें.

तिचें प्राथमिक शाळेचें काम उत्तमच चाललें होतें. माध्यमिक शाळेंत एक-दोन मुलग्यांनीं एकदोन मुलींना पत्रें वगैरे लिहून थोडेंसें अयोग्य वर्तन केलें होतें, ( आणि हें कबूल केलें पाहिजे कीं एकदोन मुलींनीं अशींच पत्रें लिहून अयोग्य वर्तन केलें होतें ! ) पण त्यांना विशेष महत्त्व देऊन बोभाटा केल्यानें त्या मुलग्यांचें किंवा मुलींचें किंवा शाळेचें किंवा समाजाचें हित होण्यासारखें नव्हतें आणि म्हणून त्या त्या व्यक्तींना योग्य तो 'समज' देऊन तीं तीं प्रकरणें जागच्याजागींच विझविलीं गेलीं होतीं व त्यायोगें सर्वांचेंच हित झालें होतें. यंदां इंग्रजी तिसऱ्या इयत्तेला चवथी इयत्ता जोडण्यांत आली होती. एकत्र शिक्षणानें मुलग्यांवर व मुलींवर कुपरिणाम झाले असें चालकांचेंच नव्हे, तर सर्वसामान्य जनतेचेंहि मत झालें होतें. ( कांहीं कुचाळ व टवाळ लोकांना दांत विचकून हंसण्याला आणि नसत्या कंड्या पिकवायला अनेक संधि मिळत होत्या, हाहि त्या शाळेचा आनुषंगिक फायदाच होता; कारण या कंड्यांनीं कायमचें कोणाचें नुकसान होत नव्हतें आणि त्या टवाळांना मात्र घरबसल्या फुकटचा आनंद होत होता ! )

नवयुगीन विश्वकुटुंबी संस्थेचें कामहि बरें चाललें होतें. काम म्हणजे अर्थात् सभा भरवून लेख वाचणें, व्याख्यान करणें व नंतर चर्चा करणें एवढेंच होय. या सभेचे सभासद–मालक–चालक पहिल्यापासून आणि आतांपर्यंतहि तिघेच होते. अर्थात् सुशीला, बळवंतराव व सुनंदराव हेच ते तिघे. बाकीचे सर्व श्रोते, वक्ते, उपवक्ते किंवा प्रश्न विचारणारे असत. सभा महिन्यामहिन्यांनीं होत असत. श्रोतृमंडळी प्रथम थोडी असे; पण सुशीलेचीं चमत्कारिक भासणारीं मतें तिच्या तोंडून ऐकावीं व जमल्यास टाळ्या वाजवून, किंवा मध्येंच ओरडून किंवा खांकरून, किंवा तेवढी अकल असल्यास एखादी बरीवाईट शंका विचारून किंवा तेवढा धाडशी वात्रटपणा अंगीं असल्यास सामान्य लोकांना हास्यकारक व समंजस लोकांना हास्यास्पद असा कांहींतरी वितंडवादाचा सवाल टाकून, घटका दोन घटका मौजेंत वेळ घालविण्याकरितां त्या सोनगांवांतहि पुष्कळ–म्हणजे ६०–७० लोक जमत असत.

अशाच एका प्रसंगीं सुशीलेचें भाषण—

## " आम्ही नास्तिक का तुम्ही नास्तिक ? "

या विषयावर एका रविवारीं झालें. '**सुवर्णवार्ता**', '**पारिजातक,**' '**मराठमोळा**' इत्यादि स्थानिक वर्तमानपत्रांत आगाऊ जाहीर केल्याप्रमाणें व्याख्यानानंतर खुल्या दिलानें पाहिजे तो प्रश्न विचारण्यास सगळ्यांना पूर्ण मुभा होती. " लोकांना न रुचणारीं मतें उघडपणें लोकांपुढें प्रतिपादण्याची मुभा जर आम्हांला आहे, तर लोकांनाहि तत्संबंधीं प्रश्न व शंका विचारण्याची मुभा ठेवली पाहिजे आणि ती ठेविलीहि आहे; इतकेंच नव्हे, तर प्रश्न व शंका विचारण्यांत आल्यास आम्हांला आनंदच आहे. कारण या मार्गानेंच सत्य कळेल, पटेल व पसरेल असा आमचा कृतनिश्चय "–असें व्याख्यानाच्या जाहीर आमंत्रणांतच म्हटलें होतें. अर्थात् नेहमींपेक्षां आज जास्त गर्दी होती. कांहीं बायकाहि आल्या होत्या. शाळेंतील मुलगे–मुली येत होत्या; पण त्यांना आंत घेण्यांत आलें नाहीं. शाळेंत न जाणारे उनाड पोरगे, टारगे, कोडगे, हे सगळे स-मित्र, स-मंत्र, सायुध व स सामुग्रिक हजर होतेच ! गांवांतले एक प्रतिष्ठित व सज्जन वकील अध्यक्षस्थानीं होते, ही या लोकांना मोठी आपत्ति वाटत होती. बळवंतराव अध्यक्ष असते म्हणजे त्यांची आणि सुशीलेची एकदम रेवडी उडविण्याची चांगली संधि सांपडली असती,

ती या योजनेनें अशक्य झाली ! व्याख्यानाला सरकारी रिपोर्टरहि आले होते. विश्वकुटुंब संस्थेसंबंधानें सरकारांत कांहीं गैरसमज होऊन सदर संस्थेच्या चालकांना तुरुंगांत घालण्याचें शिजत आहे अशी एक हूल गांवांत उठली होती, त्यामुळेंहि या व्याख्यानाला नेहमींपेक्षां अधिक गर्दी जमली होती ! असो.

सुशीलेनें व्याख्यानाच्या प्रारंभीं "आम्हांला लोक नास्तिक म्हणतात, पण बहुतेक लोकच खरोखर नास्तिक आहेत; आम्ही विश्वकुटुंबाचें ध्येय मानणारे आणि तत्प्रीत्यर्थ परिश्रम व स्वार्थत्याग करणारे ध्येयवादी व ध्येयपूजक लोकच खरोखर आस्तिक; ध्येय हाच आमचा देव आणि ध्येयपूजा म्हणजेच देवपूजा; देव जर भावाचा भुकेला आहे, किंबहुना जिथें भाव तिथें देव, अशीच जर खरी वस्तुस्थिति आहे, तर 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर भाव असणाऱ्या आम्हां लोकांपासून देव खरोखर फार दूर नसावा; पण 'देव' आहे असें दांभिकपणें म्हणणारे आणि पाहिजे तसें वागणारे जे लोक आहेत त्यांपासून मात्र देव फार दूर आहे आणि तेच खरे नास्तिक," अशा प्रकारचें विवेचन केलें. "सर्वव्यापी, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् देव आहे अशी खरी श्रद्धा असल्यावर पापें होतील कशीं ? देव सर्वज्ञ आणि सर्वत्र आहे अशी जर खरी श्रद्धा असली तर पाप करतांना तो आपल्याला पाहील असें वाटणार नाहीं का ? आणि तो सर्वशक्तिमान् आहे असा खरा भाव असेल तर त्याच्या कचाटींतून आपण कदापि सुटणार नाहीं असें वाटणार नाहीं का ? आणि असं वाटलं तर हातून पापें होतील का ? आणि जर पापें होताहेत तर पापी लोकांचा देवावर खरा विश्वास नाहीं असंच म्हणायला नको का ?"--अशा रीतीनें प्रश्न करून तिनें प्रतिपक्षावर हल्ला चढविला. नंतर देवाच्या अस्तित्वाबद्दलच्या प्रमाणांकडे वळून तीं कशीं अपुरीं पडतात हें तिनें दाखविलें. उदाहरणार्थ, सर्व जगाचें आदिकरण कांहीं एक मानलें पाहिजे आणि त्यालाच आम्ही देव म्हणतों या युक्तिवादासंबंधीं ती असें म्हणाली, कीं "कोणी तरी, कांहीं तरी म्हणजे कोणी एक 'क्ष'–आदिकरण आहे असं मानलं म्हणजे हा (किंवा हें) 'क्ष' मंगल आहे, 'शिव' आहे, 'सुखकर' आहे, 'शं-कर' आहे–कशावरून ? हा किंवा हें 'क्ष' सर्वज्ञ कशावरून ? सर्वशक्तिमान् कशावरून ? न्यायाची व नीतीची चाड त्याला आहे कशावरून ? जगांत ज्या गोष्टी दिसतात त्यांवरून तर असें म्हणावें लागतें, कीं 'बळी तो कान पिळी' हाच न्याय त्याला प्रिय आहे. जगांतले कलह, खून, रक्तपात, महायुद्धें, क्षय, रक्तपिती इत्यादि रोग, दुष्काळ, टोळधाड इत्यादि आपत्ति, सर्प-

व्याघ्रादि पशूंची क्रूरता इत्यादि गोष्टी—त्या देवाला प्रिय तरी आहेत किंवा अनावर तरी आहेत. या गोष्टी प्रिय असतील तर त्याची अभिरुचि विलक्षणच म्हटली पाहिजे! आणि त्या अनावर असतील तर तो सर्व सामर्थ्यवान् कसला? त्या आदिकारण 'क्ष'ला कोणतेंहि विशेषण लावलें तर अशा प्रकारच्या आपत्ति उत्पन्न होतात व कोणतेहि विशेषण न लावाल तर त्या बीजगणिती 'क्ष'बद्दल प्रेम, आदर किंवा पूज्यभाव कां व कसा वाटावा? त्या 'क्ष'चा 'अज्ञेय', 'अचिंत्य', 'शब्दापलीकडचा', 'मनापलीकडचा', इत्यादि शब्दांनीं उल्लेख केला म्हणून तो 'अज्ञेय' व 'अज्ञात' 'क्ष' पूजनीय कसा ठरणार? या 'क्ष' पूजेपेक्षां ध्येयपूजा काय वाईट?" ध्येय म्हणजेच देव असें म्हटलें, तर व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायानें 'ध्येयें' व्यक्तिगणिक भिन्न असल्यामुळें देव व्यक्तिगणिक भिन्न होतील, या आक्षेपाला सुशीलेनें असें अर्धवट विनोदानें उत्तर दिलें, की तेहतीस कोटी लोकसंख्येच्या हिंदुस्थानांत आतां तेहतीस कोटी देव आहेतच, तेव्हां ध्येय मानल्यामुळें तेहतीस कोटी ध्येयें किंवा देव उत्पन्न झाले तर हे देव जिवंत, ताजेतवाने तरी असतील! बरें, देवाला विष्णु, शंकर, गणपति इत्यादि नांवें आहेतच आणि या सर्व नांवांनीं ओळखला जाणारा देव हा जर एकच असेल—**एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति** हें तत्त्व जर खरें असेल, तर 'ध्येय' हें एक नवीन नांव त्या देवाला दिलें तर फारसें काय बिघडणार आहे? अशा प्रकारचा अर्धवट विनोद केल्यानंतर तिनें आपल्या विश्वकुटुंबात्मक, आपल्या ध्येयस्वरूपी देवाचें कल्पना-रम्य स्वरूपवर्णन केलें आणि या देवाची काया-वाचामनेंकरून सेवा, भक्ति व पूजा करणारे आम्ही विश्वकुटुंबक लोक आस्तिकच आहोंत असा सिद्धान्त लोकांच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला. जुन्या पक्षांतले कांहीं लोक खरोखरच सश्रद्ध, सात्त्विक, सौजन्ययुक्त, थोर व उदार आहेत. ते आस्तिक आहेतच; पण आमच्या विश्वकुटुंबवादी लोकांमध्येंहि जे सात्त्विक व सौजन्ययुक्त असतील तेहि आस्तिकच, असें म्हणून व सगळ्या पक्षांतल्या दांभिक, ढोंगी-सोंगी, धर्माची केवळ ध्वजा फडकावून त्याच्या बळावर अनाचार करणाऱ्या सर्व लोकांना नास्तिक कां म्हणूं नये असा अखेर प्रश्न टाकून तिनें आपलें व्याख्यान संपविलें.

व्याख्यानानंतर प्रश्न विचारणें असल्यास थोडक्यांत विचारण्यांत यावेत अशी अध्यक्षांकडून सूचना झाल्यावर एका शहाण्यानें असा प्रश्न केला, की सुशीलाबाईंचें चारित्र्य इतकें शुद्ध आहे का, कीं त्यांनीं आस्तिक्यासारख्या विषयावर बेधडक बोलावें?

'Fools rush in where angels fear to tread' या वाक्याची त्यानें श्रोतृवृंदाला आठवण करून दिली व हा प्रश्न विचारण्याचें धाडस केल्याबद्दल टाळ्या मिळविल्या! सुशीलेनें या प्रश्नाला कांहींच उत्तर दिलें नाहीं. दुसऱ्या एकानें असा प्रश्न केला, कीं प्रो.वा.म. जोशी यांनीं 'रत्नाकरां'त लिहिलेल्या एका लेखाचा व्याख्यानांत कांहींसा अनुवाद होता; पण मूळ लेखकाचा वक्त्यांनीं उल्लेख केला नाहीं; हें त्यांच्या विश्वकुटुंबी तत्त्वाला अनुसरूनच समजावयाचें काय? कर्मधर्मसंयोगानें प्रस्तुत लेखक (म्हणजे मी–वा. म. जोशी) त्या सभेला हजर होतों. मीं लगेच उठून सांगितलें, कीं "सुशीलाबाईंचीं सर्वच मतें मला पसंत आहेत असें नाहीं. तथापि ही गोष्ट खरी, कीं 'ध्येय हाच देव' हा लेख मीं लिहिला; पण त्यांतलीं मतें मीं सुशीलाबाईंपासून कांहीं अंशीं घेतलीं असून त्यांच्यापासून घेतलेल्या मतांचाच अनुवाद त्या लेखांत कांहीं ठिकाणीं झाला असेल!" हें उत्तर ऐकून सगळ्या लोकांना विजेचा जो धक्का मिळाला त्याची आठवण सोनगांवकर मंडळी कधीं विसरणार नाहींत!

प्रस्तुत लेखकाच्या भाषणानंतर सुशीला उठली व "अनुवाद कोणीं कोणाचा केला याबद्दल पुष्कळ सांगण्यासारखें आहे, पण तो मुख्य प्रश्न नसून मतें बरोबर आहेत किंवा नाहींत, हा मुख्य प्रश्न आहे" असें म्हणाली. तदनंतर सुनंदरावांनीं असा प्रश्न केला, कीं प्रत्येक सजीव प्राण्यामध्यें (organism मध्यें) कांहींएक प्रेरक हेतु आहे; इतकेंच नव्हे, तर सर्व सृष्टीमध्यें कांहींएक हेतु आहे व तो सफळ करण्याकडे सर्व सृष्टीची प्रवृत्ति आहे असें अलीकडील कांहीं मोठे शास्त्रज्ञ (म्हणजे Scientists) म्हणतात तें खरें काय? व खरें असल्यास सहेतुक प्रवर्तक कारणाला ईश्वर म्हटलें तर चुकीचें होईल काय?

सुशीलेनें उत्तर दिलें, कीं "कांहीं शास्त्रज्ञ (सर्व नव्हे) सजीव सृष्टींत सहेतुकता मानतात खरी; पण हा हेतु काय आहे याचा निश्चय होत नाहीं. शिवाय शारीरशास्त्र (Physiology), जीवशास्त्र, प्राणिशास्त्र वगैरे शास्त्रें अद्यापि बाल्यावस्थेंत आहेत, तेव्हां या बाबतींत निश्चित मत बनविणें धोक्याचें आहे. सर्व सृष्टीमध्यें कांहीं तरी हेतु असावा असें मानण्याला कारणें आहेत; पण सृष्टिविषयक हल्लींचें ज्ञान म्हणजे बरींच अक्षरें झिजलेलीं आहेत किंवा न लागलेलीं आहेत अशा एखाद्या जुन्या शिलालेखाच्या ज्ञानाप्रमाणें आहे! त्या शिलालेखांतील मधलीं कांहीं कांहीं अक्षरें लागतात, कांहीं शब्द लागतात; पण

सबंध वाक्य लागत नाहीं. मग हा शिलालेख कोणीं केव्हां लिहिला आणि त्यांत लिहिलेला लेख गद्यात्मक आहे का पद्यात्मक आहे हें कांहीं समजत नाहीं. अशा स्थितींत त्या शिलालेखांत चांगला श्लोक आहे, का तें आज्ञापत्र आहे, का त्यांत मराठींतील एका जुन्या शिलालेखांतल्याप्रमाणें ग्राम्य शिवी आणि शाप आहे, याबद्दल वाद घालण्यांत तात्पर्य काय ? शिलालेख लावण्याचा प्रयत्न करावा व लागेतोंपर्यंत त्याच्या मूलाबद्दल व अर्थाबद्दल विचारवंतांनीं औत्सुक्यपूर्ण ताटस्थ्यच स्वीकारलेलें बरें नाहीं का ?" सुशीलेनें असें उत्तर दिल्यावर अंगांत एक नुसती बंडी, डोकीवर मळका पांढरा रुमाल (म्हणजे पूर्वी पांढरा असलेला रुमाल!), खांद्यावर दुहेरी केलेलें धोतर आणि गुडघ्यापर्यंत पंचा अशा पोषाखांनीं विशिष्ट असलेली एक संस्कृतज्ञ, पण असंस्कृत मनाची, बावळी दिसणारी पण पाजीपणाचा अर्क असलेली व्यक्ति उठली आणि टेबलाजवळ जाऊन वायफळ व गैरलागू असें कांहीं तरी बोलून मग त्या व्यक्तीनें असा खोंचदार प्रश्न टाकला, कीं "सुशीलेनें वर्णन केलेल्या विश्वकुटुंबात्मक समाजव्यवस्थेंत बायका या विश्वयोषिता, म्हणजे सर्व लोकांच्या अखंड सौभाग्यवती सहचारी समजावयाच्या कीं काय आणि लग्न न करतां तरुण स्नेह्यावरोबर फिरावयास जाणाऱ्या आजच्या वक्त्या विश्वकुटुंबात्मक पद्धतीच्या सक्रिय भक्त असल्यामुळें त्याहि त्याच मालिकेंतल्या......" या वक्त्याला अध्यक्षांनीं पुढें बोलूं दिलें नाहीं; पण ते तसेच बोलूं लागले, हातवारे करूं लागले, टेबलावर हात आपटूं लागले आणि अर्थात् चार पांच मिनिटें तेथें होळीवरच्या किंवा थिएटरमधल्या प्रकाराची आठवण करून देणारा गोंगाट होऊन सायुध आलेल्या टारग्यांच्या कांदेबटाटे-फेंकीला चांगलाच वाव मिळाला. एक बटाटा सुशीलेच्या कपाळाला जोरानें लागला, कांदेहि अंगावर आले; पण त्यांनीं इजा मात्र झाली नाहीं. कायमची इजा झाली ती त्या बंडी-पंचेवाल्या संस्कृतपंडित परिप्रश्नकाला. कारण त्याचा एक डोळा दुखरा होता, त्यावरच एक कांदा येऊन आदळला आणि ती दीड डोळ्यांची दीडशहाणी व्यक्ति अतःपर कायमची एकाक्ष बनली ! पण हा एकदोन महिन्यानंतरचा परिणाम; त्या सभेंत व त्या वेळीं त्या व्यक्तीच्या त्या डोळ्याला एकसारखी गळती लागली व तेथल्या त्या धुमश्चक्रींत त्या व्यक्तीची तपकिरीची डबी हरवली हाच काय तो परिणाम दिसून आला !

चार पांच मिनिटांनंतर अध्यक्षांच्या व इतर स्त्री-पुरुषांच्या प्रयत्नांनीं गोंगाट थांबल्यावर सुशीला उत्तर देण्यासाठीं उठली. (उत्तर देण्याची जरूर नाहीं असें

अध्यक्षांनीं सौजन्यानें सांगितलें; पण ती उठलीच.) ती म्हणाली, " विवाह-संस्थेबद्दल माझीं मतें व्याख्यानांत दिग्दर्शित केलींच आहेत. अधिक खुलासा थोडक्यांत करावयाचा म्हणजे मी असें म्हणेन, कीं माझ्या मतें स्त्री पुरुषांचीं मनें विवाहाला अनुकूल झालीं आणि तीं वय, रोगहीनत्व, शिक्षण, अभिरुचि वगैरे दृष्टींनीं परस्परांना अनुकूल असलीं म्हणजे मग विवाहविधि हा एक अपत्यांच्या हिताकरितां व समाजाच्या व्यवस्थेकरितां उघडपणें करण्याचा विधि आहे. परस्परांची अनुरूपता व अनुकूलता आहे तोंपर्यंतच या विधीचें बंधकत्व व पावनत्व. अपत्यांची जबाबदारी मात्र दोघांवर कायमची. अनुरूपता व अनुकूलता नसेल तेथें भिक्षुकांच्या कितीहि अक्षता पडल्या आणि होमाग्नीनें कितीहि डोळे लाल झाले आणि सप्तपदीच नव्हे तर लक्षपदी जरी तेथें झाली, तरी तो विवाह नव्हे; ती अगम्यगमनाची कायदेशीर परवानगी आहे एवढेंच ! नवऱ्यावर प्रेम नसतां, तो निंद्य वाटत असतां, तो सुधारण्याची आशा नसतां, त्याला चिकटून राहाणारी स्त्री माझ्या मतें भोळीभाबडी आहे, ती धर्माबद्दल कुकल्पना मनांत धरून अगम्य-गमन करीत आहे व स्वतःचा, तसेंच स्वतःस झालेल्या आणि होणाऱ्या मुलांचा आणि समाजाचा नाश करीत आहे. पत्नीवर प्रेम नसतां किंवा ती नितान्त त्याज्य वाटत असतां, तिलाच चिकटून राहाणारा पतिहि असाच धर्माबद्दलच्या भ्रांतीनें अधर्म्यभोग घेतो आहे असें माझें मत आहे. या दृष्टीनें पाहातां हल्लींच्या विवाहपद्धतीमुळें अधर्म्यसंबंध समाजांत किती आहे याची गणना करणें फार शोकजनक आहे. आतां विवाहाबद्दलचा सामान्य प्रश्न सोडून माझ्या विवाहाबद्दलचा व्यक्तिविषयक प्रश्न जो निघाला त्याबद्दल मला पहिल्या प्रथम स्वतःचें अभिनंदन करून घेतलें पाहिजे. कारण माझ्या विवाहाबद्दल जनतेमध्यें इतकें औत्सुक्य आहे हें पाहून मला धन्यता वाटते. विशेषेंकरून मी अखंडसौभाग्यवती विश्व-योषिता आहे कीं काय हें जाणण्यास कांहीं वृद्ध संस्कृतज्ञ शास्त्रीपंडितदेखील इतके उत्सुक आहेत हें पाहून या कारणानें मला माझीच धन्यता वाटते, कीं माझ्यामुळें या दुहेरी-धोतर शास्त्र्यांचीं व त्यांना आदरणीय असलेल्या आणि त्यांच्या प्रश्नाला अनुमतिदर्शक स्मिताचा दुजोरा देणाऱ्या कांहीं शालजोडी-शास्त्र्यांचीं व धर्म-मार्तंडांचीं खरीं मनें आज उघडकीस आलीं व इतके दिवस गूढ असलेली त्यांची जिज्ञासा चव्हाट्यावर आली ! "

सुशीलेच्या भाषणांतले शेवटले हे शालजोडींतले टोले बऱ्याच लोकांना आवडले आणि त्यांनीं बराच वेळ टाळ्या वाजवून तिच्या भाषणाबद्दल पसंती दर्शविली.

यानंतर बळवंतरावानें प्रश्न विचारला, कीं " विश्वकुटुंबी व्यवस्थेमध्यें व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला येणार नाहीं काय ? शेतीभाती, गिरण्या, कारखाने, रेल्वे, बोटी, सर्व प्रकारचे उद्योगधंदे-सगळंच कांहीं समाजाच्या मालकीचं, सगळंच समाजानं चालवायचं, असं म्हटलं, म्हणजे भलती चढाओढ, भलता लोभ, भलता अहंकार यापासून व इतर आपत्तींपासून समाजाची सुटका होईल हें खरं; पण समाजाचा एवढा जगड्व्याळ कारखाना चालविणारा कोणीतरी पाहिजेच; त्याचे कोणीतरी गुमास्ते पाहिजेत, त्याचे कोणीतरी मॅनेजर, असिस्टंट मॅनेजर, नोकर वगैरे पाहिजेत. अर्थात् सगळी सत्ता या लहानमोठ्या लोकांच्या हातांत जाणार आणि इतरांना हे लहानमोठे नोकर सांगतील त्याचप्रमाणें वागावें लागणार. अशा स्थितींत व्यक्तिस्वातंत्र्य कितपत राहील आणि या नोकरशाहीचा अंमल कितपत हितावह होईल हा प्रश्नच आहे. राजाची सत्ता जाऊन त्याऐवजीं लोकनियुक्त अध्यक्षाची सत्ता आली तरी या लोकनियुक्त अध्यक्षाला नोकर लोकांकडूनच कामें करून घ्यावीं लागणार. म्हणजे सगळे लोक या नोकरांचे ताबेदार होणार. अशा स्थितींत कामें चांगलीं होतील का ? आणि झालीं तरी ही ताबेदारी चांगली का ? " अशा आशयाचा बळवंतरावाचा प्रश्न होता

हा प्रश्न ऐकल्यावर बळवंतरावांनींच सुशीलेला पकडलें हा देखावा पाहून लोकांना मोठी गंमत वाटली आणि या पेंचांतून किंवा कोंडींतून सुशीला कशी निसटून जाते इकडे त्यांचें लक्ष लागलें. सुशीलेनें क्षणभर थांबून स्मित केलें व नंतर शांतपणें उठून सांगितलें, कीं " या प्रश्नाचें मी उत्तर देऊं शकेन; पण माझ्यापेक्षां प्रश्न विचारणारे विद्वान् गृहस्थच अधिक कुशलतेनें उत्तर देतील अशी माझी खात्री आहे; आणि या प्रश्नाचें उत्तर देण्यास वेळ फार लागणार म्हणून आतां तें न देतां लवकरच त्यांनीं केव्हां तरी व्याख्यान द्यावें अशी माझी त्यांना विनंति आहे. लोकांनीं विचार करावा आणि प्रश्नाचा सर्वांगांनीं ऊहापोह व्हावा हाच त्यांच्या प्रश्नाचा हेतु आहे. तरी या प्रश्नाचा लोकांनीं पंधरा दिवस विचार करावा, चर्चा करावी, आणि एक सोडून पुढल्या रविवारीं पुन्हां येथेंच येऊन त्यांचें व्याख्यान ऐकावें. आणि पुढील चर्चेंत भाग घ्यावा अशी लोकांनाहि माझी विनंति आहे."

आतां वेळ फार झाला होता; तथापि एक उपवक्ता उठलाच आणि "ज्यांचें वर्तन शुद्ध व आदर्शभूत नाहीं त्या स्त्रियांनीं आणि पुरुषांनीं शिक्षक किंवा व्याख्याते म्हणून समाजापुढें यावें व मिरवावें काय ? विश्वकुटुंबी समाजव्यवस्थे-मध्यें अशी व्यवस्था असणार काय ?" असा एक खवचट प्रश्न (त्याला इष्ट असे हावभाव करून आणि उपरोधिक स्वरानें) केला आणि जयसूचक मुद्रा करून खालीं बसला. या प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां सुनंदराव व सुशीला दोघेंहि एकदम उठलीं; पण अध्यक्षांनीं त्या दोघांना खालीं बसवून "वेळ फार झाला आहे, तरी या प्रश्नाचेंहि उत्तर पुढील व्याख्यानाचे वेळीं इष्ट वाटलें तर देण्यांत येईल" असें सांगितलें आणि आपलें भाषण फारच थोडक्यांत पण मार्मिक रीतीनें उरकून घेतलें आणि व्याख्यात्यांचे वगैरे आभार मानून सभा बरखास्त केली. सभेंतील मौजांबद्दल एकमेकांशीं मोकळेपणानें बोलण्यास आणि बायकांच्या भीतीनें जेवण्याकरितां घरीं जाण्यास उत्सुक झालेल्या लोकांनीं अध्यक्षांनीं लांबण लावली नाहीं म्हणून त्यांना अर्थात् किती धन्यवाद दिले ! व्याख्यानाहून परत घरीं जातांना विनायकराव वृद्ध मंडळींबरोबर मागा-हून येत होते. सुशीला, बळवंतराव व सुनंदराव हीं तिघेंहि पुढें गेलीं होतीं;— परंतु बळवंतरावांचें मुख सचिंत दिसल्यामुळें कोणी कांहींहि बोललें नाहीं. घरीं पोंचल्यावर सुनंदरावानें सुशीलेला एकीकडे म्हटलें, "सुशीले, बाळूला आणखी किती दिवस रखडत ठेवणार ? तूं अत्यंत दुष्ट आहेस. 'हो' एवढं एक अक्षर म्हणायला तुझं काय जातं ?"

**सुशीला**—एक अक्षरच कां ? दोन अक्षरं मी म्हणतें—ना......हीं !

**सुनंदराव**—बरं, अडचण काय आहे खरी ?

**सुशीला**—लग्न केल्यानं विश्वकुटुंब-संस्थेचं कार्य मागं पडेल असं वाटतं. शिवाय मला एकदां विलायतेस, अमेरिकेंत, रशियांत वगैरे जाऊन तिकडची परिस्थिति प्रत्यक्ष पाहून यायची आहे. लग्न केल्यावर हें जमायचं नाहीं.

**सुनंदराव**—लग्न करून दोघेंजण जा या सफरीवर म्हणजे झालं. **अधिक-स्याधिकं फलम्** !

**सुशीला**—कल्पना चांगली आहे. पण......

**सुनंदराव**—'पण' काय आहे ? सीतेसारखा धनुर्भंगाचा 'पण' लावणार आहेस का काय ?

**सुशीला**—तसा कांहीं नाहीं, पण मागून बोलूं याबद्दल आपण. माझ्यामुळें त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडताहेत हें मला पूर्वी ठाऊक होतं; पण आज चांगलंच लक्षांत आलं. ते आज शेवटीं शेवटीं अगदीं उदास झाले होते. पण ध्येय आड येतं.

**सुनंदराव**—Nonsense, कांहीं तरी बोलतेस झालं.

**सुशीला**—बरं, पुढं केव्हां तरी बोलूं आपण.

---

## ३९ : पदरांत पडून दोघेंहि खरोखरच पवित्र झालीं

**ठरल्याप्रमाणें** बळवंतरावांनीं पुढें जें व्याख्यान दिलें त्याला (व त्यानंतर सुशीला व बळवंतराव यांचा जो विवाह झाला त्या मंगल प्रसंगीं) प्रस्तुत लेखक हजर होता. परंतु ज्या एका महत्त्वाच्या प्रसंगाची हकीगत या प्रकरणांत द्यावयाची त्या प्रसंगाची हकीगत सुनंदरावांना पुरती ठाऊक नाहीं, आणि बळवंतरावांना विचारली असतां त्यांच्याकडून ती लिहून मिळण्याचा संभव दिसेना, म्हणून सुशीलेच्या निकट स्नेहाचा व संबंधाचा फायदा घेऊन तिलाच ती पत्रद्वारें विचारली. ती त्या वेळीं विलायतेंत ब्रायटन येथें होती. तेथून तिच्याकडून उत्तरादाखल जें पत्र आलें तें तिच्या परवानगीनें खालीं दिलें आहे.

ब्रायटन, ××× 

"सा. न. वि. वि.—तुम्ही विवाह केव्हां कसा ठरला याची हकीगत मला विचारतां आणि ही हकीगत प्रसिद्ध करण्याची परवानगी मागतां; पण ती सांगावी किंवा नाहीं हा प्रश्न माझ्यापुढें येत आहे. तुमची विनंति अमान्य करणें जिवावर येतें म्हणून आणि नांवगांव बदलून तुम्ही ती प्रसिद्ध करणार हें ठाऊक असल्यामुळेंच मी ही हकीगत लिहून पाठवीत आहें. औचित्य-अनौचित्याची जबाबदारी तुमच्यावर आहे.

"सुनंदरावांनीं आपल्या मित्राच्या व माझ्याहि सुखार्थ व हितार्थ हरतऱ्हेच्या विनंत्या, विनवण्या, युक्त्या करून व युक्तिवाद लढवून माझें मन विवाहानुकूल करण्याचा प्रयत्न केला, पण माझें मन अनुकूल होईना. उभयतांचीं मतें भिन्न होतीं तीं जवळजवळ सारखीं झालीं व दुसऱ्या अडचणीहि कमी कमी होत

चालल्या; पण 'हो' म्हणणें जिवावर येई. माझ्याशीं बळवंतरावांचें जें सलगीचें वर्तन असे त्यामुळें त्यांच्यावर भलते आक्षेप येतात हें मला दिसत होतें. माझ्यावर प्रेम असल्यामुळें ते अविवाहित राहाणार आणि त्यांच्या जिवाची आणि बौद्धिक सामर्थ्याची थोडीबहुत हानि होणार; तसेंच त्यांचा सत्कार्याबद्दलचा उत्साह कांहीं अंशानें तरी कमी होणार आणि ते कर्तव्यनिष्ठ राहिले तरी अंत.करण पूर्णत्वानें प्रसन्न नसल्यामुळें त्यांच्या कर्तृत्वामध्यें थोडेंबहुत वैगुण्य येणार हें मला दिसत होतें. त्यांचीं व माझीं ध्येयें एक व अंगीकृत कार्यें एक, अर्थात् आमचा विवाह केव्हांहि उभयतांना हितावह होता. ते ध्येयवादी होते; मी तशीच होतें. त्यांनीं ध्येयाप्रीत्यर्थ वकिली सोडली नव्हती; पण अलीकडे खरे खटलेच ते चालविण्याकरितां घेत असत. त्यांनीं आपली सर्व इस्टेट माझ्याप्रमाणें विश्वकुटुंबी संस्थेकरितां खर्च करण्याचें ठरविलें होतें व तसे कागदपत्रहि झाले होते. माझ्या मनांत त्यांच्याविषयीं आदर होता; प्रेम होतें, पण असें वाटावयाचें, कीं विवाहसुखाच्या नादीं लागून स्वतंत्रता कशाला दवडा ? शिवाय, विवाह केला असतां विलायतेंत वगैरे एकदोन वर्षें जाऊन येण्याची इच्छा सोडून द्यावी लागावयाची. पण सुनंदरावांनीं, उभयतांनीं जावें हें सुचविल्यामुळें ही अडचणहि राहिली नाहीं. उभयपक्षीं प्रेम व आदर असल्यामुळें परस्परांबद्दल आकर्षण व त्यात पुन्हां यौवनसुलभ मोह होताच ! बोलणें चालणें नेहमीं चालूच होतें. अचलेश्वरीला वगैरे कितीदां तरी आम्ही फिरावयास जावयाचे ! आणि यामुळें खोटेनाटे आळ आमच्यावर येऊन आम्हांला एकमेकांबद्दल अधिक आकर्षण वाटावयाचें ! सुनंदरावांचा आग्रह चाललेलाच, पण माझ्या तोंडांतून 'हो' असा शब्द कांहीं निघेना ! एकदां तो शब्द काढावाच आणि त्यांचें आणि आपलें जीवित अधिक सुखकर, उत्साहपूर्ण, अन्योन्यसाहाय्य, कार्यक्षम व काव्यमय करावें असें वाटे. त्यांचें विरहावस्थेंतील दुःख पाहून आणि माझ्यामुळेंच हें दुःख कायम राहातें आहे या विचारामुळें माझें मन मृदु होत असे आणि, स्वतःकरितां जरूर नसली तरी, या थोर आत्म्याला बरें वाटावें म्हणून—त्याची दया येऊन म्हणा—स्वतःला विवाहपाशांत अडकवून घ्यावें असें वाटे. मनाच्या अशा स्थितींत असतां उघड सभेंत त्यांच्यावर व माझ्यावर केले गेलेले आरोप उभयतांच्या मनाला फार लागले. ते कर्तव्य करतांना रडत—कुथत नसत; पण सगळ्या गोष्टी 'कर्तव्य' म्हणून ते करीत,—त्यांत कर्तव्य केल्याचें समाधान असलें, तरी हें समाधान रुक्ष गद्यस्वरूपाचें होतें, त्यांत काव्यानंदाची छटा

नव्हती. त्यांचं हें असें कां होतें हें मी ओळखून होतें. अर्थात् ‘ हो ’ म्हणण्याची इच्छा अधिकाधिक प्रबल होऊं लागली, पण तरी निश्चय होईना.

“ पण त्यांचें ज्या दिवशीं स्वतःच घेतलेल्या आक्षेपांना उत्तरादाखल म्हणून व्याख्यान झालें, त्या दिवशीं मी तें व्याख्यान ऐकत असतां माझें मन पूर्णपणें त्यांच्या स्वाधीन झालें ! त्या वेळीं त्यांच्या बुद्धीच्या कुशाग्रतेला, स्वभावाच्या सरळपणाला, विनयाला, सत्यप्रियतेला आणि प्रतिपक्षाच्या बोलण्याचा विपर्यास न करण्याविषयीं मनांत वसत असलेल्या खऱ्या तत्परतेला, निराशेची छटा असलेल्या त्यांच्या रूपाला, बौद्धिक उच्चतेला, नैतिक आशावादाला व उत्साहाला मी वश झालें !

“ या थोर मनुष्याला साहाय्य करून त्याचें कर्तृत्व वाढविणें हें आपलें कर्तव्य आहे; एवढेंच नव्हे, तर असें करण्यास सांपडलें तर हें आपलें महद्‌भाग्यच आहे असें वाटूं लागलें. त्यांचें ‘ रूप ’ असें मीं आतां म्हटलें, पण हा माझा त्या वेळचा भ्रम असेल; पण मला ते त्या वेळेस सुंदर वाटले खरे. वक्तृत्वाबद्दल वगैरे जें म्हटलें तेंहि मोहमूलक असेल, पण जें वाटलें तें लिहिलें आहे. तुम्ही ज्या हेतूनें ही हकीकत प्रसिद्ध करूं इच्छितां, तो हेतु सिद्धीस जावयाचा म्हणजे जें खरें वाटलें व घडलें तें लिहिलें पाहिजे, म्हणून हें सर्व लिहिलें आहे. त्यांच्यापेक्षां माझ्यामध्यें अधिक वक्तृत्व आहे असें लोक म्हणतात; पण मी बायको म्हणून माझें कौतुक होत असलें पाहिजे आणि माझा सडेतोडपणा व विशेषेंकरून प्रतिपक्षावर तुटून पडण्याची माझी प्रवृत्ति; स्त्रियांमध्यें सहसा न दिसणारा व माझ्यांत आढळणारा स्पष्टवक्तेपणा ( व क्वचित्प्रसंगीं फटकळपणा ) यांमुळें माझ्या व्याख्यानाला लोक अधिक येत असावेत आणि माझ्या वक्तृत्वाची अवास्तव स्तुति करीत असावेत अशी मला कल्पना होतीच. लोकांचें मनोरंजन होईल, त्यांच्या मनाला गुदगुल्या होतील, त्यांना गम्मत वाटेल, प्रतिपक्षाला उत्तर झोंबेल, अशा प्रकारचें वक्तृत्व सोपें आहे; तें माझ्यासारखीला देखील थोडेंबहुत साधेल. पण प्रतिपक्षालाहि आपला पक्ष मांडतां येणार नाहीं इतक्या सुंदर रीतीनें तो मांडणें, प्रतिपक्षावर उगाच जे आक्षेप घेण्यांत येतात ते खोडून काढणें आणि मग प्रतिपक्षाच्या वतीनें जास्तींत जास्ती अनुकूल बोलतां येईल तेवढें बोलून त्याच्यावर शान्तपणें योग्य तेच व योग्य मर्यादेंतच आक्षेप घेणें, शब्द सौम्यतम वापरणें, पण तत्त्वाच्या बाबतींत न्यायनिष्ठुर असणें, सरळ युक्तिवादाची पकड कधीं सोडायची नाहीं, पण अन्यायानें कधीं कोणाला

पकडावयाचें नाहीं, मधून मधून विनोद करावयाचा, पण तो कोणालाहि न झोंबेल असा करावयाचा, इत्यादि गोष्टी आपणांस कालान्तरानें साधल्या तर साधतील–यांच्यासारख्यांच्या संगतींत राहिलों तर साधतील, नाहीं तर साधावयाच्या नाहींत–असें माझी मनोदेवता त्या वेळीं मला सांगूं लागली व तें मला पटूं लागलें.

“ व्याख्यानाचा सारांश मी देत नाहीं, कारण तुम्ही त्या वेळीं हजर होतांच. त्यांचें भाषण आटोपल्यानंतर लोकांबरोबर मींहि टाळ्या वाजविल्या; पण त्यांना मिळालेल्या टाळ्यांचा निनाद ऐकून मला धन्यता वाटली ! आपल्या संस्थेचें किंवा नवीन पंथांचें हें एक जयचिन्हच म्हणून मला धन्यता वाटली असेल; पण बळवंतरावांचा जय म्हणजे माझाच जय, त्यांची थोरवी म्हणजे माझीच थोरवी, असेंहि थोडेंसें मला वाटलें,—इतके ते मला ‘ आपले ’ असें वाटूं लागले !

“ आभारप्रदर्शन वगैरे झाल्यावर सुनंदराव, तुम्ही, मी व ते असे चौघेजण सभागृहांतून बाहेर पडलों; पण सुनंदराव व तुम्ही कांहीं वेळानें ‘ व्याख्यान फार चांगलं झालं ’ असेंतसें म्हणून तुमच्या एका सोनगांवकर स्नेह्याबरोबर त्याच्या घराकडे निघालांत व ‘ अचलेश्वरीच्या पायथ्याकडे जर फिरावयास जायचं असलं, तर आम्हीहि काम झाल्याबरोबर तिकडे येतोंच ’ असें म्हणून तुम्हीं आम्हांला रामराम ठोकला. लोकांचीं अभिनंदनें एकदोन मिनिटें ऐकून घेऊन आम्ही दोघें अचलेश्वरीकडे फिरण्यास गेलों.

“ ‘ व्याख्यान खरोखरीच चांगलं झालं ’—मीं म्हटलें.

“ ‘ झालं असेल चांगलं, ’ ते म्हणाले, ‘—पण व्याख्यान चांगलं झालं का वाईट झालं हा गौण प्रश्न आहे. त्यांतले मुद्दे बरोबर होते का नाहीं हा महत्त्वाचा प्रश्न आहे.’

“ ‘ ही मात्र ऐट आहे हो उगीच ! ’ मीं हसत म्हटलें. ‘ वक्ता म्हणवून घेण्याची हौस लहानपणापासून आहे हें मला ठाऊक आहे. आतां उगाच ऐट करायची झालं ! ’

“ ‘ ऐटीचा प्रश्न नाहीं हा ’ ते म्हणाले. ‘ वक्ता म्हणवून घेण्याची हौस होती–आहेहि; मला कीर्ति हवी, मान्यता हवी, सगळं कांहीं हवं आहे; पण आतां या इच्छेंत तीव्रता राहिली नाहीं. माझं नांव चांगलं झालं म्हणजे जिला आनंद

झाला असता ती आई आतां नाहीं, बाबा नाहींत, पत्नी नाहीं–कोणीच नाहीं ! कोणाकरितां मीं कीर्ति मिळवावयाची ? आतां लोकांनीं चांगलं म्हटलं म्हणजे बरं वाटतं, कीर्तीचा आपल्या कार्याला उपयोग होतो, हें सगळं खरं; पण मला कीर्ति मिळाली असतां खरा आनंद कोणाला होईल ? सुनंदराव, जोशी वगैरे मित्र आहेत त्यांना आनंद होईल; पण...पण आईबापांचा आणि बायकोचा आनंद वेगळा आणि स्नेह्यांचा वेगळा !' असें म्हणून त्यांनीं एक लांब सुस्कारा टाकला आणि मग पुन्हां म्हटलें, 'आहे, ठीक आहे, आहे तें. ज्याच्या नशिबीं जें असेल तें त्याला मिळतं. आहे त्यांत समाधान मानावं, हाच शहाणपणाचा मार्ग.'

" 'पण तुमच्या स्वरावरूनच दिसत आहे, कीं तुमचं समाधान होत नाहीं आहे.' मीं म्हटलं.

" 'जाऊं दे तें. दुसऱ्या गोष्टी बोलूं या आपण ' ते म्हणाले आणि आपल्याच नादांत चालून दोन चार मिनिटें कांहींच बोलले नाहींत. स्वतःशींच कांहीं हातवारे करीत व मधून मधून उसासे टाकीत ते चालले होते. मीं कांहीं प्रश्न केला तर जितक्यास तितकं उत्तर देत. पांच सहा मिनिटें चालल्यानंतर ते म्हणाले, 'आपण आतां परतूं या. सूर्यास्त झालाच पाहा. आतां अचलेश्वरीकडे नको.'

" 'तिची भीति वाटते का ?' मीं स्मितपणें विचारलें.

" 'तिची नाहीं भीति वाटत; तुझी वाटते ! पण–नको, नकोच या गोष्टी. आपण त्या टाळल्याच पाहिजेत. परतूं या आपण.'

" 'जरा पुढें जाऊन परतूं ' मीं म्हटलें, आणि चालूं लागलें. तेहि पाठोपाठ आले.

" 'मीं मग म्हटलें, 'एक प्रश्न विचारत्यें, त्याचं खरं उत्तर मात्र दिलं पाहिजे.

" 'काय प्रश्न आहे ? मी कधीं तुझ्याशीं खोटं बोललों आहें का ?'

" 'तुमच्या व्याख्यानाच्या वेळचा आशावाद आणि तो उत्साह, तीं कल्पनारम्य समाजचित्रं आणि......'

" 'व्याख्यानाच्या वेळचा आवेश तो. तो अगदीं नाटकी नसतो; बराचसा खरा असतो; पण विषयाशीं तन्मय झाल्यामुळें तो उत्पन्न झालेला असतो; अगदीं हृदयांत अंतःकोशांतून आलेला नसतो. माझ्या खऱ्या जीवनांतील खरा आवेश,

खरा उत्साह, खरा आनंद, कांहीं अशीं आतां कमी झाला आहे. अर्थात् त्या मानानं थोडंबहुत असं असमाधान असणारच. Life is only a duty to me. कर्तव्यकर्म जाचक होत नाहीं, त्यांत मन खरोखर रमतं, ही त्यांतल्यात्यांत भाग्याची गोष्ट आहे.'

"' Duty शिवाय आणखी काय पाहिजे तुम्हांला !'

"'काय......पाहिजे ? काय......पाहिजे ? काय सांगूं मी ? मला अनेक गोष्टी पाहिजे आहेत. समाज-व्यवस्था सुधारली पाहिजे, सगळे बौद्धिक व नैतिक प्रश्न सुटले पाहिजेत, सगळ्या लोकांना उच्चतम शिक्षण मिळालं पाहिजे, आरोग्य पाहिजे, कलाकौशल्य पाहिजे, सौंदर्य पाहिजे, आणखी पुष्कळ गोष्टी पाहिजेत; पण पाहिजेत म्हणून त्या काय मिळणार आहेत ?'

"'त्यांतली एखादी मिळाली तर घ्याल का पदरांत ?'

"' अवश्य.'

"'मला घेतां येईल इतका तो पदर मोठा आहे ना ?......खरंच मी म्हणत्यें ! इतके दिवस माझी वृत्ति अशी होती, कीं मीं 'हो' म्हणण्यानें तुम्हांला तो उपकार वाटावा. आज माझी वृत्ति बदललेली आहे; मला आपण पदरांत घेतली तर तो माझ्यावर उपकार होणार आहे !'

"माझें हें भाषण ऐकून ते चकित झाले व क्षणभर स्तब्ध राहिले. नंतर म्हणाले—

"'या म्हणण्यांत काय अर्थ आहे ? उगाच अतिशयोक्ति करूं नये. जुनीं मतं आपण सोडलीं, जुन्या रूढि सोडल्या, मग जुनी भाषा कशाला ठेवायची ? आणि अशा वेळीं-अशा-प्रसंगीं-जुनी औपचारिक भाषा कशाला ? खरी अशी गोष्ट आहे, कीं माझ्यावर तुझे अनंत उपकार आहेत. माझा तुला उपयोग होईल; पण तो थोडा. सुनंदरावानें वर्णन केलेली दुरवस्था वारंवार ऐकून माझी दया येऊन तूं माझ्याशीं लग्न करण्यास तयार झाली आहेस हें मी ओळखून आहें.'

"'कांहीं दिवसांपूर्वी जर मी 'हो' म्हटलं असतं तर हें खरें झालं असतं; कारण 'हो' किंवा 'नाहीं' म्हणणं हें इतके दिवस माझ्या हातांत होतं ! पण आतां मी आपली स्वतःची उन्नति करून घेण्याकरितां पदरांत घेण्याबद्दल विनंति करीत आहें ! ही भाषा अगदीं खरी आहे; पण ती खरी वाटणार नाहीं'.

" पदरांत कोणीं कोणाला घ्यायचं नाहीं. उभयतांनीं उभयतांना स्वीकारायचं, संभाळायचं, उन्नतीच्या मार्गाला न्यायचं, ही त्यांतली अगदीं खरी गोष्ट. मागच्याच गोष्टी खऱ्या; पण ही गोष्ट सगळ्यांत खरी आहे.'

" ' कबूल आहे. पदरांत घेण्याची भाषा थोडीबहुत खरी असली तरी सोडल्यें मीं. उभयतांनीं उभयतांना स्वीकारावयाचं, संभाळायचं, उन्नतीच्या मार्गाला न्यायचं, हीच गोष्ट अंतःकरणाच्या अगदीं गाभ्यांतली आहे,—बाकीच्या भाषा वरच्या पापुद्र्याच्या. या भाषा सोडून देऊन अगदीं अंतःकरण-गुहेंतलं सत्य बोलायचं म्हणजे आपलीच भाषा खरी आणि तीच बोलूं या. कारण सत्य हाच आपला धर्म आणि तोच आपला देव.'

" ' सत्याच्या जोडीला सौजन्य आणि सौंदर्य हे दोन देव ठेवले पाहिजेत.'

" 'उच्चतम सत्याच्या पोटीं ते येतातच. सत्य हें जुन्या परमेश्वराप्रमाणं वस्तुतः एक असून भक्तांना तें त्रिमूर्तिक दिसतं.'

" ' या सत्य देवाबद्दल अशी भाषा वापरणंच चुकीचं आहे. आपण प्रथम लक्षणेनं भाषा वापरतों. पण ही लाक्षणिक भाषा पुढं पुढं लोकांनाच नव्हे, तर स्वतःलाहि फसवते म्हणून ती टाळूं या. हें जरी सर्व खरं असलं तरी या क्षणीं एवढं मात्र मी म्हणणार, कीं तूंच माझं सत्य, तूंच सौजन्य आणि तूंच सौंदर्य !'

" ' मारणाराचा हात धरवेल, बोलणाराचं तोंड कोण धरणार ?'

" आम्ही कांहीं वेळ बोलत बोलत पुढें चाललों; तर फार उशीर होईल म्हणून किती बोलायचं होतं तरी परतलों. परत येतांना सुनंदरावांची आणि तुमची गांठ पडली आणि मग तुम्ही मला ' हो ' एवढा लहानसा शब्द, तो म्हणायला किती आढेवेढे घेतेस ? म्हणून टाक आणि होऊं दे बळवंतरावाला सुखी ' असें म्हणालेत आणि मग असल्या थट्टामस्करीच्या गोष्टी बोलतां बोलतां तुम्हांला आमच्या वाङ्निश्चयाची हकीकत कळली आणि मग सुनंदरावांकडून त्यांच्या पत्नीला आणि तिच्याकडून शेजारणीला, आणि अशा परंपरेनें सबंध गांवाला ही बातमी दुसऱ्या दिवशीं दहा वाजायच्या आंत कळली, वगैरे हकीकत तुम्हांला ठाऊकच आहे म्हणून ती लिहीत नाहीं."

" स्नेहांकित

सुशीला "

---

मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या मंगल प्रसंगाच्या दुसऱ्या दिवशींच बळवंतराव व सुशीला ही इंग्लंड, अमेरिका, रशिया वगैरे देशांत जायचीं हें निश्चित झालें. पहिल्या मुहूर्तावर विवाहविधि उरकून घ्यावयाचा व तत्पूर्वी फोटो वगैरे काढवून पासपोर्ट ( परवाना ) मिळविण्याचा प्रयत्न करावयाचा असें ठरलें. कोणत्या तारखेची कोणती बोट घ्यावी, कोणत्या वर्गानें जावें, बरोबर काय काय घ्यावें, वगैरे गोष्टी आतां सुरू झाल्या. सोनगांवच्या शाळेची व 'विश्वकुटुंबी' संस्थेची व्यवस्थाहि सुनंदरावांकडे सोंपविण्यांत आली. या संस्थेच्या इन-मीन तीन सभासदांपैकीं दोघे बाहेर जाणार, तेव्हां राहिलेल्या एका सभासदाच्या संस्थेचा कारभार 'एक'मतानें व 'एक'सूत्रीपणानें चालेल यांत कोणालाच शंका नव्हती !

विलायतला जाण्याच्या वगैरे गप्पा झाल्यावर आदल्या दिवसाच्या व्याख्याना-कडे—जें व्याख्यान एकदम एक प्रकारची कौटुंबिक क्रान्ति घडवून आणण्यास कारणीभूत झालें, निदान निमित्तमात्र झालें, त्या व्याख्यानाकडे—संभाषणाचा ओघ वळला. विनायकरावांनीं आपलें स्पष्टपणें मत सांगितलें, कीं "व्याख्यान चांगलं झालं हें जरी खरं असलं, तरी आपली शंकानिवृत्ति कांहीं पुरतेपणीं झाली नाहीं. तुमचा हा विश्वकुटुंबी प्रयोग आजकाल व्हायचा नाहीं, तो शंभर—दोनशें वर्षांनंतरच्या युगांत सुरू होणार आहे ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे ! निदान आपल्या ह्यातींत तरी तो सुरू होत नाहीं ही फारच समाधानाची गोष्ट; नाहींतर तुमच्या गांधींचा कोणीतरी खद्दरबहाद्दर गुमास्ता आमच्या सारख्यांना अमुक करा आणि तमुक करूं नका असं सांगायचा आणि साबरमतीहून निघालेल्या फर्मानाप्रमाणं हरताळ, उपास, मौनव्रत वगैरे सर्व करावं लागावयाचं !"

"आज काय लोकांना मोठं स्वातंत्र्य आहे म्हणूनच याची एवढी भीति बाळ-गावयाची ?" सुशीला म्हणाली. "आज सर्व जग आर्थिक, सामाजिक, राजकीय सर्व प्रकारच्या गुलामगिरींत आहे ! हौशीचं आणि आवडीचं काम कोणाला करायला मिळत आहे ? कोण परिस्थितीच्या जुलुमाबद्दल कुरकूर करीत नाहीं ? आजचं स्वातंत्र्य हें नांवाचं, दिखाऊ आहे. स्वातंत्र्य असलं तर तें कांहीं व्यक्तींपुरतं आहे. तसं तें भाविष्यकालीन कुटुंबांतहि थोडया व्यक्तींना लाभेलच !'

बळवंतराव यांनीं 'माझं नाक नकटं, तर तुझं नाक फताडं' हा वाद-विवादाचा न्याय सोडून उच्चतर भूमिकेवर जाऊन म्हटलं, "आणि खरं

बोलायचं, म्हणजे रस्ते, पोस्ट ऑफिस वगैरे गोष्टींची सरकारकडून आज व्यवस्था होत आहे, हा काय आपल्यावर जुलूम आहे ? जी. आय्. पी. रेल्वे खाजगी कंपनीच्या ताब्यांत होती, ती आपण होऊनच पैसे देऊन सरकारनें ताब्यांत घेतली ना ? आणि त्यांत नुकसान काय झालं आहे ? एक एक रेल्वे कंपनी आपण अशाच रीतीनं खाजगी मालकींतून काढून सरकारी मालकीची करणार आहोंत ना ? रेल्वेप्रमाणेंच एक एक गिरणी पैसे देऊन सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली तर त्यांत काय वाईट होईल ? मजुरांना काय, आजहि दुसऱ्याच्या हाताखालींच काम करावं लागत आहे; विश्वकुटुंबांतहि तसंच करावं लागेल. मॅनेजरांना आज शेठजी नेमतो तेथें उद्यां कोणी तरी मिस्टर फिनॅन्स मेंबर किंवा इन्डस्ट्री मेंबर नेमील. हे सरकारी अधिकारी कित्येक वेळां चुक्या करतील. कित्येक वाईट व लुच्चेहि असतील; पण आतांचे शेट्ये, भाट्ये, सगळे काय चांगले आहेत ? ते कधीं चुका करीत नाहींत ? त्यांना लुच्चेगिरीबद्दल तुरुंगांत जावं लागत नाहीं ? खरी गोष्ट अशी आहे, कीं सगळा कारभार सरकारच्या, म्हणजे परंपरेनं लोकांच्या ताब्यांत हळुहळू क्रमाक्रमानं गेला—'हळुहळू' 'क्रमाक्रमानं' हे शब्द महत्त्वाचे आहेत—तर विशेष नुकसान होण्याचा संभव नाहीं. फायदा कदाचित् होण्याचा संभव खास आहे.

"दुसरं असं, कीं मजुरांचा आणि भांडवलवाल्यांचा, नोकरांचा आणि मालकांचा जो आज अहिनकुलाप्रमाणं शाश्वतिक विरोध आहे, तो तुमच्या पद्धतींत कधींहि मिटायचा नाहीं. आमच्या विश्वकुटुंबांत मिटेलच असं जरी म्हणतां आलं नाहीं, तरी मिटण्याचा संभव आहे. आजच्या तुमच्या समाजव्यवस्थेंत पैसा कमी आहे म्हणून भांडणं होत आहेत असं नाहीं. सोन्याचा एखादा मेरुपर्वत जरी तुम्हांला फुकटचा लाभला तरी तुमचीं भांडणं चालू राहतील.कारण,हा मेरुपर्वत लुटणारे लोक कमीजास्त शक्तिवान् आणि युक्तिवान् असणार आणि अर्थात् पुढं विषमता कायम राहाणारच, आणि मजुरांना व नोकरांना आज ३०-४० रुपये मिळतात तिथं ३०-४० कोटि रुपये महिना मिळाले तरी त्यांचं समाधान होणार नाहीं. कारण त्या वेळीं ३०–४० कोटि रुपयांची किंमत ३०–४० रुपयांएवढीच व्हावयाची. लंकेंतल्या सोन्याच्या विटांची ती पुनरावृत्तीच होईल ! बरं, घटकाभर असं मानलं, कीं मजुरांना आणि नोकरांना खरोखर हजारों पटींनीं सुखसोईच्या वस्तु मिळाल्या, तरी त्यांचं समाधान व्हायचं नाहीं. कारण आर्थिक विषमतेमुळें जें मनांत वैषम्य वाटतं तें कायमच राहाणार ! भांडवलवाल्यांनीं चाळी वगैरे बांधून दिल्या आणि इतर

सुखसोई केल्या म्हणजे हें भांडण मिटेल असं पुष्कळांना वाटतं, पण तें चुकीचें आहे. हा प्रश्न केवळ पैशाचा नाहीं, तो मानाचा आहे. आणि केवळ मानाचाहि नाहीं; कारण नोकरांचा आणि मालकांचा दर्जा जरी सारखाच असला, तरी सत्ता मालकाची आणि नोकर केवळ सांगितलेलं काम करणारा, अशी जोंपर्यंत स्थिति आहे, तोंपर्यंत समाजांत असमाधान राहाणारच. हें असमाधान केव्हां थांबेल, तर ज्या वेळेस सगळ्यांना असं वाटेल, कीं अमुक मालक, अमुक सत्ताधारी, असं कांहीं नाहीं, तर समाजच सगळ्यांचा मालक, सगळीं कामं समाजाचीं, सगळेच समाजाचे नोकर! किंवा असं म्हणा, कीं समाज आणि व्यक्ति यांतलं द्वैत नष्ट झाल्यामुळं मालक आणि नोकर, माझं काम आणि तुझं काम, हा भेदच जेव्हां राहाणार नाहीं, सगळीं कामं आपलीं, जें कांहीं होत आहे तें आपलं, असं प्रत्येकाला वाटायला लागेल, आणि जो तो जें येईल तें काम आपलं असं समजून तें उत्तम रीतीनं, सुंदर रीतीनं करील (आणि पुन्हां तें आनंदानं व हौशीनं करील), तेव्हां समाजांतले विरोध, भांडणं, संप, मारामाऱ्या, युद्धं–महायुद्धं हीं संपतील."

"सगळं खरं" विनायकराव म्हणाले, "पण स्वार्थाच्या प्रेरणेशिवाय तुमच्या विश्वकुटुंबांत काम कोण करणार? कालचं आणि आतांचं तुझं उत्तर मला कांहीं पूर्णपणें समाधानकारक वाटत नाहीं. मला तुझं हें म्हणणं कबूल आहे, कीं मनुष्य कांहीं पूर्णपणें स्वार्थी नाहीं. मला हेंहि कबूल आहे, कीं मनुष्याला ज्याची हौस असते, ज्याचा नाद असतो, तें काम तो वेळांत वेळ काढून, रात्रंदिवस जिवापाड श्रम करून, मनापासून करतो. मी आणखी हेंहि कबूल करतों, कीं असलंच काम चांगलं असतं. मोलाच्या कामांत अर्थ नाहीं. जगांतलीं सगळीं चांगलीं कामं हौशी, नादी मनुष्यांनीं केलेलीं आहेत. कवि, गद्य ग्रंथकार, कलावंत लोक ह्यांचीं उत्तमोत्तम कलाकृति पैशाच्या आशेनें झालेली नाहीं. आईचं प्रेम कितीहि पैसे दिले तरी बाजारांत मिळायचं नाहीं. बायकोचं प्रेम तसंच. या सगळ्या गोष्टी खऱ्या; आवडीचं–हौशीचं काम असलं म्हणजे लोक कामाची टाळाटाळी करीत नाहींत, काम करतांना विशेष दमत नाहींत, सांगकामेपणा करीत नाहींत, मनापासून उत्तम काम करतात, हें जें तूं म्हणतोस तें अगदीं अक्षरशः खरं. प्रत्येकाला हौशीचं काम मिळालं तर आजच्यापेक्षां ते हजारपटीनं काम करतील, समाजाची हजारों पटीनं संपत्ति वाढेल, असंतोष अगदीं कमी होईल, भांडणें थोडीं राहातील, देखरेखीची फारशी जरूर राहणार

नाहीं, हें सगळं कबूल; पण—पण हें व्हायचं कसं ? सगळ्यांना हौशीचीं कामं मिळणार कशीं ? तुमच्या विश्वकुटुंबांत काम वांटून देणारा कोणी व्यवस्थापक असणारच ना ? तो भलत्याला भलतं काम देणार नाहीं कशावरून ?"

"आक्षेप कबूल आहे;" बळवंतराव म्हणाले. "पण त्या त्या ठिकाणच्या जनतेचा दाब असल्यावर व्यवस्थापकसुद्धां अगदीं भलतं करूं शकणार नाहीं. दुसरं असं, कीं शिक्षणानं वगैरे सर्व जनतेची बौद्धिक आणि नैतिक सुधारणा हळुहळू होत गेल्यावर व्यवस्थापकांची देखील सुधारणा होत जाईलच. आणि अन्याय करण्याचं एक मुख्य कारण म्हणजे जो **लोभ** तोच अशक्य झाल्यावर अन्याय त्या मानानें कमी होईल. अहंकार, अधिकार-लालसा वगैरे अन्यायाचीं दुसरीं कारणं आहेत; पण हळुहळू तींहि कमी करण्याकरितां शिक्षणादि उपाय योजले म्हणजे थोडंबहुत यश येईलच. आणि पूर्ण जरी यश आलं नाहीं, तरी हल्लींच्यापेक्षां समाज अधिक सुखी होईल अशी आम्हांला आशा वाटते. आधिभौतिक क्षेत्रांत बैलगाड्यांपासून विमानांपर्यंत आपली जशी प्रगति झाली आहे, तशी बौद्धिक आणि नैतिक बाबतींत होणार नाहीं हें मला कबूल; पण हळुहळू प्रगति करणें शक्य आहे. शिक्षण चांगलं दिलं, लोभाचे पायच तोडले, मुलांच्या पुढं चांगलीं उदाहरणं असलीं, तर पुढच्या पिढींत मुलं हल्लींपेक्षां तरी चांगलीं निपजतील आणि पुढं पुढं हा सुधारणेचा वेग गणित-श्रेणीनं नव्हे तर भूमितिश्रेढीनं वाढेल अशी माझी कल्पना आहे. ती कदाचित् कल्पनासाम्राज्यांतच खरी असेल; पण एवढी गोष्ट मला तरी निःसंशय वाटते, कीं हळुहळू समाजाची बौद्धिक आणि नैतिक सुधारणा करणं शक्य आहे. आम्ही विश्वकुटुंबवादी लोक मनुष्यस्वभावाविषयीं आशावादी आहोंत. तुम्ही लोक निराशावादी म्हणूनच तुम्ही देवावर विश्वास ठेवतां ! मनुष्य कांहीं श्रेष्ठ—उच्चतम गोष्टी करणार नाहीं, देवानं त्या त्याच्याकरितां करावयाच्या, किंवा त्याच्याकडून करवावयाच्या असं तुमचं तत्त्वज्ञान ! आम्ही मनुष्यप्रयत्नावर विश्वास ठेवतों. आम्हांला मनुष्य जात्याच पूर्णपणें नीच आहे, केवळ स्वार्थी आहे, असं वाटत नाहीं. आमचं म्हणणं तर्काला आणि अनुभवाला सोडून नाहीं. मनुष्य हा केवळ स्वार्थैकतत्परबुद्धियुक्त पशु आहे असं तुम्हांला वाटतं. आम्हांला त्याच्यांत पशुत्वाचा अंश आहे असं वाटतं, पण तो देव होऊं शकेल—नराचा नारायण होऊं शकेल—असंहि वाटतं. मनुष्य पूर्वी सत्ययुगांत देवतुल्य होता, देवांमध्यें बोलतचालत होता—असं तुम्हांला वाटतं. आमच्या मतें सत्ययुग

अजून यायचं आहे; आणि तें आलं म्हणजे मनुष्य देवासारखा होईल. त्या वेळचे आदर्शभूत लोक म्हणजे आमचे देव. हे देव अद्यापि उत्पन्न व्हावयाचे आहेत. त्यांचा अवतार आमच्याच पोटीं व्हावयाचा आहे. तुम्हांला वाटतं देव आम्हांला उत्पन्न करतो. आम्ही म्हणणार, देवांना आम्ही जन्म देणार. निदान आमची इच्छा अशी आहे. आमचं म्हणणं तर्काला आणि अनुभवाला सोडून नाहीं, म्हणून या दिशेनं प्रयत्न तरी करून पाहावा असं आम्ही म्हणतों. त्याच्यांत चुकलं कोठें ?"

"चुकलं असं,"–विनायकरावांनीं उत्तर दिलें, "—कीं पूर्वी असले प्रयत्न फसले आहेत हें तुम्ही विसरतां आहांत ! इतिहास हा पदार्थच तुम्ही मानीत नाहीं– तुम्हांला तो ठाऊकहि नाहीं असे तुम्ही वागतां ! हा कांहीं समंजस माणसाचा मार्ग नव्हे."

"पूर्वी हे प्रयत्न फसले याला कारणें आहेत," बळवंतराव म्हणाले. "पूर्वीच्या चुका टाळून वागावयाचें हाच इतिहासाचा खरा उपयोग. एकदां दुधानं तोंड भाजलं म्हणून ताकहि फुंकरून प्यायचं हा इतिहासाचा उपयोग नव्हे."

"पण दूध कोणतं आणि ताक कोणतं हें तर पाहिलं पाहिजे ना ?" सुनंदराव केवळ वादाकरितां म्हणाला.

"म्हणून तर लोकांनीं चर्चा करायची." बळवंतरावांनीं उत्तर दिलें. "चर्चा करून, साधकबाधक विचार करून, सर्व प्रमाणं पाहून, सिद्धान्त ठरविण्याचा आणि लोकांना ते पटवून देण्याचा मार्ग स्वीकारणं हाच ना सामाजिक दूध–ताक ओळखण्याचा खरा मार्ग ? लोकांना एखादी गोष्ट प्रथम पटवून द्यायची आणि मग ती अंमलांत आणण्याचा त्यांच्या संमतीनं साहाय्यानं प्रयत्न करायचा, या मार्गानं कोणाचं कसं अनहित होणार ?"

"माझा सर्वसामान्य लोकांवर-बहुसंख्येवर–विश्वास नाहीं; मी जे कोणी थोडे समंजस लोक असतील, त्यांच्या मताला आणि प्रयत्नाला मान्यता देणारा आहें."

"हा निराळा प्रश्न आला" बळवंतराव म्हणाला. "तुमच्या म्हणण्यांत तथ्यांश आहे; पण आपण कितीदां तरी याचा विचार केला आहे आणि याविषयीं बोललों आहोंत. आतां तो वाद नको. मला एवढं मात्र आतां निश्चित वाटतं, कीं समाजानं विचार केला पाहिजे, जी वाटेल ती सुधारणा अंमलांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सुधारणा आपोआप घडतील किंवा देव घडवून आणील या म्हणण्यांत अर्थ नाहीं. मनुष्य हाच देव आहे. 'नर करणी करे तो नारायण हो जाय'–ही

म्हण पूर्वीच्या अर्थानं नसली तरी एका अर्थी खरी आहे. पूर्वींच्या युगीं देव माणसांवर अंमल गाजवीत, आतां माणसें देव होऊं पाहात आहेत ! आम्ही आतां आमच्याशिवाय दुसरा देव मानीत नाहीं. तारलं तर आम्हीच आम्हांला तारणार, आणि मेलों तर आमच्याच कृतीनं आम्ही मरणार, हा आमचा सिद्धान्त. आणि मनुष्यजातीनें मनांत आणलं तर काय होणार नाहीं ? "

" मनुष्याचे देव होणार नाहींत ! " विनायकरावांनीं चटकन् म्हटलें.

" कबूल," बळवंतराव स्मितपूर्वक म्हणाले. " पण आम्ही मनुष्य ' मनुष्य ' म्हणून राहावं अशीच आमची खरी इच्छा आहे. पूर्वींचे. क्षीरसमुद्रांत झोंप घेणारे, किंवा भोळसटपणानं भलतेच वर देणारे, आळशी, भोळसट, फसवे, पक्षपाती देव आम्हांला नकोच आहेत. आम्हांला अशा देवांचं साहाय्य नको; आमचा आम्हीच उद्धार करणार. ' आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः । ' आम्ही आतां देवाचं दास्य सोडलं, आमच्या बायकादेखील आतां ' देवदासी ' होऊं इच्छीत नाहींत, आम्ही आतां देवाच्या दास्यांतून मुक्त झालों, आम्ही आतां स्वतंत्र झालों, लोकांनाहि आतां आम्ही स्वतंत्र करणार ! "

बळवंतरावांचें हें वाक्य संपलें असेल नसेल, तोंच त्यांना एका पोलिस इन्स्पेक्टरनें बाहेर बोलाविलें आणि त्यांना तीन वारंटें दाखविलीं. सुशीला व सुनंदरावांना त्यानें बाहेर बोलावून घेतल्यावर त्या तिघांना पोलिस इन्स्पेक्टरनें पोलिसांच्या स्वाधीन केलें व मग तो तिघांच्या घराच्या झडत्या घेण्याच्या मार्गाला लागला. पहिल्या प्रथम अर्थात् सुशीलेच्या घराची झडती झाली. तेथें आणि इतरत्र पोलिसांना काय सांपडलें हें त्यांचें त्यांनाच ठाऊक !

---

## ४१ : मला युक्तिवाद करायचा नाहीं, ताकीद द्यायची आहे

कागदपत्रांत पोलिसांना दोषार्ह असें कांहीं सांपडलें नाहीं. नव्हतेंच कांहीं, तर सांपडणार काय ? पण सरकारला संशय फार. त्याला ' तांबीळ ' झाल्यामुळें जिकडे तिकडे तांबडें दिसतें आणि ' जॉन बुल'ला तांबडी चिंधी—मग ती काल्पनिक का असेना—डोळ्यांपुढें दिसूं लागली, कीं मग त्याचें डोकें बिथरतें व मग तो कांहींच्याबाहीच करून जातो. पण जॉन बुलमध्यें एवढा गुण आहे, कीं तो दीर्घद्वेषी नाहीं. चूक दिसून आल्यावर ती दुरुस्त करून घेण्याला तो लाजत नाहीं. राज्यव्यवस्थेंतील चक्र या नात्यानें तो कसाहि असला तरी व्यक्ति-दृष्ट्या तो फारच सरळ व न्यायाप्रिय असतो.

सोनगांवकर मंडळीला चार महिने पुण्यामुंबईकडे अटकेंत ठेवून फिरविण्यांत आलें व निरनिराळ्या बड्या बड्या पोलिस अधिकाऱ्यांनीं त्यांना वेगळें वेगळें करून दमदाटी, धाकदपटशा इत्यादींचा प्रयोग त्यांच्यावर केला. सुशीलेला हरतऱ्हेची लालूच दाखविण्यांत आली व धाकहि दाखविण्यांत आला. हस्तस्पर्श झाला नाहीं, पण नाहीं नाहीं ते गलिच्छ शब्द ऐकावे लागले. अखेर ही मंडळी अगदीं निर्दोष आहेत, अशी खालपासून वरपर्यंत सर्वांची खात्री झाली. जिल्ह्याच्या कलेक्टरसाहेबांनीं ( यांचें नांव Wright साहेब ) त्यांना एक दिवस बोलावून आणून, बसण्यास खुर्च्या दिल्या व 'अशीं अशीं राजद्रोही भाषणें करतां, असे असे राजद्रोहात्मक लेख लिहितां, तरी यापुढें असें करूं नये, आतां केवळ ताकीद देऊन सोडून देण्याचा वरून हुकूम आला आहे आणि तुम्हांला मीं खुलें केलें आहे ' असें सांगितलें.

बळवंतरावांनीं तिघांच्या वतीनें 'राइट'साहेबांचे औपचारिक आभार मानले व शेवटीं अशी इच्छा प्रदर्शित केली, कीं भाषणांतील, लेखांतील,सभेच्या कार्यक्रमांतील वगैरे आक्षेपार्ह भाग कोणता तो निश्चित दाखविल्यास बरें होईल. कलेक्टरसाहिबांजवळ भाषणांच्या, रिपोर्टांच्या वगैरे फायली होत्याच. त्यांनीं त्यांतले तांबड्या पेन्सिलीनें खुणा केलेले कांहीं भाग वाचून दाखविले व असले विचार प्रदर्शित करणें वाईट असें सांगितलें सुशीला वादविवाद करून आपलीं मतें कशीं बरोबर व न्याय्य आहेत असें सिद्ध करूं लागली. 'राइट'-साहेब वादामध्यें हरूं लागला—कारण तो खरोखरच सरळ व न्यायप्रिय होता. त्याला वितंडवाद किंवा दंडेलीचा वाद करणें शक्य नव्हतें ! दुसरा एखादा साहेब असता तर त्यानें कदाचित् **शेषं कोपेन पूरयेत्** या अखेरच्या अस्त्राचा उपयोग केला असता; पण हा सज्जन असल्यामुळें **शेषं हासेन पूरयेत्** अशी त्याची युक्ति होती. या युक्तीचा अवलंब करून तो म्हणाला, "Well, I cannot argue with you. Women are always right; they will always have the last word. Young ladies especially are difficult to argue with" (बायकांशीं—विशेषतः तरुण मुलींशीं वाद करतांना पुरुषांना जय कधींच मिळावयाचा नाहीं ! अखेरचा शब्द नेहमीं त्यांचा असायचा आणि त्या म्हणतील तेंच अखेर खरं समजायचं ! ) स्मितपूर्वक असें म्हणून झाल्यावर तो बळवंतरावांकडे वळला आणि म्हणाला, " बळवंतराव, त्यांतली खरी गोष्ट अशी आहे, कीं मला वरून हुकूम आला आहे त्याप्रमाणें

मी वागतों. कलेक्टर मिस्टर राइट, आणि सद्गृहस्थ मिस्टर राइट, यांमध्यें तुमच्यासारख्यांना भेद करतां येईल. व्यक्तिदृष्टया मला तुम्हां तिघांबद्दल अतिशय...पण जाऊं द्या हें; मला काय म्हणायचं आहे तें तुम्हांला समजलं आहे...गुडबाय्—" असें म्हणून त्यानें त्या तिघांशीं अत्यंत सभ्यतेनें हस्तांदोलन केलें आणि पुन्हां गुडबाय् करून ऑफिसच्या कामांत त्यानें लगेच डोकें खुपसलें.

---

## ४२ : बाल-देव

सुशीला व बळवंतराव पासपोर्ट मिळविणें, विलायतचीं तिकिटें काढणें, सामानसुमान घेणें वगैरे तयारी करण्याकरितां मुंबईस आधीं आलींच होतीं. सर्व व्यवस्था झाली होती आणि दोन दिवसांनीं तीं दोघें जाणार म्हणून त्यांना पोंचविण्याकरितां सुनंदराव,विनायकराव,त्यांची पत्नी, उषा, प्रस्तुत लेखक वगैरे मंडळी जमली होती. उद्योग विशेष कांहीं नव्हता म्हणून वेळ चांगल्या रीतीनें घालवावा या हेतूनें कोटामधील प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझिअम् ( वस्तुसंग्रह ) पाहाण्याकरितां मंडळी गेली होती. सुशीला व बळवंतराव यांचें शाळेच्या सांपत्तिक व्यवस्थेसंबंधीं, धोरणासंबंधीं वगैरे संभाषण झाल्यावर मग त्यांचें संग्रहालयांतील वस्तूंकडे लक्ष गेलें. तेथपर्यंत शरीरानें तेवढे ते तेथील दालनांतून हिंडत होते !

तेथील एका दालनांत हरतऱ्हेच्या देवदेवतांच्या, बुद्धाच्या वगैरे मूर्ति ठेवल्या होत्या. जवळच हरतऱ्हेच्या माशांचे व इतर प्राण्यांचे सांपळे ठेवलेले होते. तेथें गेल्यावर सुशीला खोडसाळपणानें म्हणाली, कीं "आतां मरूं घातलेल्या सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् देवाचा सांपळा शंभर-दोनशें वर्षांनीं एथल्या एका कपाटांत ठेवला जाईल असं वाटतं ! जीर्ण झालेल्या 'धर्मा'च्या सांपळ्याकरितां दुसरं एक कपाट लागेल."

"बायका वाईट असतात किंवा त्या कोमल असतात, बायकांना गोषांत कोंडून ठेवलं पाहिजे किंवा बायका म्हणजे 'गृहदेवता' आहेत, या कल्पनांच्या सांपळ्यांना तिसरें एक कपाट लागेल." बळवंतराव म्हणाला.

"युरोपियन स्त्रियांत नीतिमत्ता मुळींच नाहीं, आम्ही हिंदी स्त्रिया फार नीतिमान्, एक जात कनिष्ठ आणि दुसरी जात श्रेष्ठ, या कल्पनांना चवथं एक लागेल." सुनंदराव म्हणाला.

“ आणि विश्वकुटुंबवादाला पांचवं एक लागेल ! ” प्रस्तुत लेखक म्हणाला.

“ नाहीं. त्याला एवढ्यांत नाहीं लागायचं.” विनायकराव म्हणाले. “ हा वाद अजून बाल्यावस्थेंत आहे. तो वाढायचा आहे. त्याच्या हातून चांगलीं कामं व्हायचीं आहेत. हीं कामं झालीं म्हणजे वृद्धत्व येऊन त्याला देह सोडावा लागेल आणि मग इतिहाससंशोधकांना, तत्त्ववेत्त्यांना ( किंवा बायकापोरांना ! ) मौजेनं पाहाण्याकरितां त्याचा सांपळा इथं आणण्यांत येईल ! ”

इमारतींतील बरींच दालनें पाहून झाल्यावर मंडळी बाहेरची बाग पाहात इकडे तिकडे हिंडूं लागली. कोठें कडेला हरतऱ्हेच्या पिंवळ्या, तांबड्या, शेंदरी रंगांचीं फुलें असलेल्या कर्दळी, तर कोठें हरतऱ्हेचे तांबडे, गुलाबी, केशरी गुलाब; कोठें इकडचीं मोगरा, जाई वगैरे सुवासिक फुलं, तर कोठें डेझी, जर्बेरा, फ्लॉक्स, पिंक, कॉसकोम, नॅस्टरशॅम वगैरे विलायती फुलें; कोठें नुसतें हिरवेंगार अगदीं सुतांत सरळ सारखें कापलेलें गवत, तर कोठें बारीक रंगीबेरंगी फुलांचे सुंदर ताटवे; कोठें गुलाबमोगऱ्यासारखे लाल फुलांचे वृक्ष, तर कोठें बिनफुलांचीं हरतऱ्हेचीं फर्न्स, अशा प्रकारची तेथील लहानशीच पण सुंदर रचना केलेली, व्यवस्थित आणि आल्हाददायक बाग पाहून झाल्यावर मंडळी तेथेंच एका कडेला हिरव्या गवतावर बसली.

“ पूर्वीं इथें दलदल होती म्हणतात.” प्रस्तुत लेखकानें म्हटलें.

“ इथं इतकी घाण होती, डांस, चिलटं इतकीं होतीं, कीं जो कोणी इथं राहील तो हिंवतापानं लवकर मरावयाचाच असं वर्णन आहे.” सुनंदराव म्हणाला.

“इथं आतां जी बाग झाली आहे आणि जी स्वच्छता नि शोभा आहे, ती कांहीं आपोआप आली नाहीं.” बळवंतराव म्हणाले. “ लोकांना श्रम करावे लागले, पैसे खर्च करावे लागले, तेव्हां या गोष्टी झाल्या.”

“ पूर्वीचीं झाडं-झुडपं, मोठमोठे वृक्षहि काढून टाकावे लागले आहेत–‘ जुने ’ म्हणून त्यांच्याबद्दल भलता आदर दाखविला गेला असता तर कांहीं या गोष्टी झाल्या नसत्या.” सुशीला म्हणाली.

“ या गोष्टी तरी टिकतील अशी खात्री आहे का ? ” प्रस्तुत लेखकानें म्हटलें. “ हा सगळा भाग मिलिटरी खात्याच्या ताब्यांत जाणार आहे म्हणतात. हें जर खरं असलं, तर या इमारतींत पुराण वस्तूंच्याऐवजीं कदाचित् शस्त्रास्त्रं ठेवलीं जातील. आपण बसलों आहोंत तिथं कदाचित् हजार–पांचशें वर्षांनीं Airdrome ( विमानाचें स्टेशन ) होईल ! कोणीं सांगावं काय होईल तें ? ”

"ती तरी एक व्यवस्थाच आहे ना?" बळवंतरावांनीं उत्तर दिलें. "प्रत्येक व्यक्तीनं, समाजानं आपल्याला योग्य दिसेल ती व्यवस्था घडवून आणावी आणि पुढच्या गोष्टी 'काला'वर सोंपवाव्यात! माझी सुधारणा आणि माझी व्यवस्था त्रिकालाबाधित राहावी हा आग्रह फुकट आहे. मरण प्रत्येकाला आहे. देवाला-धर्मालाहि तें येऊं लागलेलं आहे! म्हणून काय जगायचं नाहीं?'

"देवा धर्माला मरण येत आहे असं मला वाटत नाहीं." प्रस्तुत लेखक म्हणाला. "खरा देव आणि खरा धर्म नित्य आहे-'सनातन' आहे. त्याचं स्वरूप बदलतं इतकंच."

"त्याचं स्वरूप बदललं म्हणजे पूर्वीचं स्वरूप गेलं-मेलं असं आम्ही स्पष्टपणें म्हणतों, तुम्हांला हें म्हणावंसं वाटत नाहीं; हाच तुमच्या आमच्यामध्यें फरक." सुशीला म्हणाली.

"एवढाच नाहीं,आणखी थोडासा फरक आहे." प्रस्तुत लेखकानें उत्तर दिलं. "आई मरणार हें ठाऊक असलं आणि तिच्या हालअपेष्टा पाहून मरण लवकर येईल तर एक परी बरं असं जरी वाटत असलं, तरी तिला मारावी असं अजून मला वाटत नाहीं. तिच्या मरणानं मला आनंदहि होत नाहीं. सृष्टिक्रमाप्रमाणें मरण हें प्रत्येकाच्या पाठीमागं लागलेलंच आहे आणि हें एका अर्थी चांगलंच आहे. एक पिढी मरून दुसरी पिढी येते, एक चाल जाऊन दुसरी चाल येते, एक युगधर्म जाऊन दुसरा युगधर्म येतो, एक सत्य जाऊन दुसरंच सत्य गादीवर बसतं-हें सर्व ठीक आहे; पण हा प्रकार माझ्या बुद्धीला पटला तरी अंतःकरणाला जांचतो. जुनं मेलं म्हणून मी सुतक मानीत नाहीं; पण वाईट वाटतं. नवीन जन्माला आलं तर त्या नव-बालकाचं मी कौतुक करीन; पण हें बाळ पुढें कसं निघणार हा विचार माझ्या मनांत आल्याशिवाय राहात नाहीं. तुमचं तसं नाहीं."

"हा तुमचा भ्रम आहे." सुनंदराव म्हणाला. "सुशीला, बाळू किंवा मी एखादे वेळेस अर्धवट विनोदानं कांहींतरी बोलून जातों हें खरं; पण जुन्याबद्दल आम्हांला आदर नाहीं आणि नव्याचे आम्ही अंधभक्त आहोंत असंहि नाहीं."

"नवीन देखील पुढं केव्हां तरी मरायचं आहे हें आम्हांला ठाऊक आहे." सुशीला म्हणाली. "पण पुढं मरायचं आहे म्हणून आज सुतक धरण्याचं कारण नाहीं. नवीन जें आज जिवंत आहे, गोंडस गोजिरवाणं आहे, बोलतं-चालतं, वाढतं-खेळतं आहे, त्याचं आम्हीं कौतुक कां करूं नये? ही उषा पाहा; ती

आज लहान आहे, पण पुढं केव्हां तरी मरणार आहे खास. पण पुढं मरणार आहे म्हणून आज तिचं कौतुक करायचं नाहीं ? आज तिला जग दाखवायचं नाहीं ? जगांत तिला बोलूं-चालूं द्यायचं नाहीं ? उपेचं कशाला ? तुम्हीहि केव्हां तरी मरणारच आहांत ना ? मग आज कशाला एवढी हरतऱ्हेची धडपड आणि खटपट चालविली आहांत ? माझं चरित्र लिहितां आहांत तें तरी कशाला ? आणि हें लिहितांना आपले संबंध जेथें प्रामुख्यानें आले ते सगळे अजीबात कां गाळतां ?"

"व्यक्तिविषयक गोष्टी सोडून देऊं या." बळवंतराव म्हणाले. "तुम्ही आम्हीच काय, सगळं जग पुढं अगदीं बर्फाप्रमाणें थंड होणार आहे—जगांत एकदेखील जीव राहाणार नाहीं, वारादेखील हलणार नाहीं, सर्व जग हिमालयाप्रमाणं बर्फाच्छादित होणार आहे, असं कांहीं शास्त्रज्ञ म्हणतात. हें जरी खरं असलं, तरी आपण जीव देत नाहीं ना ? आपल्या गुण-धर्माप्रमाणं आणि आवडीनिवडीप्रमाणं हरतऱ्हेचीं कामं करीतच आहोंत ना ? ज्यानं त्यानं आपआपला प्रकृतिधर्म ओळखून, आसक्तिरहित आणि अहंकार सोडून, स्वकर्तव्य करीत राहावं आणि सर्व भवितव्य भविष्यतेवर सोंपवावं हा गीतेचा संदेश खरोखरच सुंदर आहे आणि त्याप्रमाणंच वागलं पाहिजे."

"तुमच्या या असल्या तत्त्वज्ञानांत आणि वृत्तींत उत्साह उत्पन्न करण्याचं सामर्थ्य नाहीं. धर्माशिवाय..."

"For Heaven's sake don't bring in your religion now. We had enough of it." सुशीला म्हणाली.

"शिवी देण्याकरितां तरी 'देव' आणलात हें भाग्यच म्हणायचं !" प्रस्तुत लेखक म्हणाला. "बाकी 'देव' नको म्हणालेत तरी तुमच्या पोटीं एक देव, नाहीं तर देवी, सहासात महिन्यांनीं येणार आहे असं मला एका गुप्त हेरानें सांगितलें आहे. वाईट एवढंच वाटतें, कीं हा बाल-देव हिंदुस्थानाबाहेर जन्माला येणार !"

"तो बाल-देव सबंध जग आपलं घर मानील—तो कृत्रिम देशमर्यादा मानणार नाहीं. तो अंतर्राष्ट्रीय होणार आहे." बळवंतराव म्हणाले.

"त्याला सुशीलेनें कडेवर घेतलेलं पाहाण्याची इच्छा आहे; पण या गोष्टी पुढच्या. सध्यां बोटीवर जाऊन कोणत्या केबिन्स मिळाल्या आहेत, कशा आहेत, तें पाहूं या."

समाप्त

IRBK-0105415